# अमेरिका किती मोठी ? किती छोटी ?

म. ग्रं. सं. ठाणे.
विषय
सं. क्र.




RFFBK-0026228

डॉ. उषादेवी विजय कोल्हटकर

संदर्भ ग्रंथ
७२२
२६२२८
६।१९९१।९०

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागले.

| | |
|---|---|
| DEC 1990 | 20 JUL 1991 |
| 6 MAR 1991 | 6 JUN 1992 |
| 16 MAR 1991 | JUL 1992 |
| MAR 1991 | 21 AUG 1993 |
| 18 MAY 1991 | 21 AUG 1993 |
| 1 JUN 1991 | 9 MAR |
| 10 JUL 1991 | 12 MAR 1994 |

( क्र. मा पहा )
१००००–११–८९

# अमेरिका
## किती मोठी ?
## किती छोटी ?

डॉ. उषादेवी विजय कोल्हटकर
पीएच् डी. (पुणे विद्यापीठ-भारत)
पीएच् डी (मिशिगन स्टेट विद्यापीठ-अमेरिका)

REFBK-0026228

अनुबंध प्रकाशन

□ प्रकाशिका
सौ अस्मिता अनिल कुलकर्णी
अनुबंध प्रकाशन
बालाजीनगर, पुणे-सातारा रोड
पुणे -४११०४३

□ मुद्रक
सुरेश जगताप
जनसेवा मुद्रणालय
१९२, शुक्रवार पेठ, पुणे ४११००२

□ प्रथमावृत्ती
११ नोव्हेंबर १९८९

©
लेखिकेच्या स्वाधीन

□ मुखपृष्ठ
शि द फडणीस

□ आतील चित्रे
विजय आग्रे

□ मांडणी
अनिल कुलकर्णी

□ मूल्य
रुपये पन्नास फक्त
5 American Dollars

□ विशेष सहाय्य □
शैक्षणिक, ललित साहित्य निर्मिती व प्रसारण मंडळ
"मायतारा" १५ वी गल्ली, प्रभात रोड, पुणे-४

प्रिय अण्णा (वडील)

बाळ (बधू)

डॉ कृष्णराव कोल्हटकर (सासरे)

सौ कृपाबाई कोल्हटकर (सासू)

या दिवगतानी दिलेल्या प्रेम-वात्सल्यास

आणि

प्रिय आई श्रीमती सुमनबाई दाविद त्रिभुवन

हिच्या छत्रछायेखाली

अजूनही लाभणाऱ्या निर्व्याज मायेस

सादर समर्पण

## अनुक्रम

□ किल्लीचा बाहुला १७ □ फोन ॲडिक्ट २१ □ भोवरा २६ □ प्रिझन पेन पॅल ३५ □ कोकोची कार ४१ □ हिरव्या कोटातला पक्षी ४७ □ १०,००० येनचा कागदी दागिना ५५ □ बोलका मुका चेहरा ६४ □ तो आणि ती ६८ □ मिस्टर मम्मी ७२ □ दत्तक-आजोबा ८० □ सरोगेट मदर ८५ □ न दिसणारे अश्रु ९३ □ डेट ९८ □ सोशल सिक्युरिटी ? १०३ □ वेळापत्रक १११ □ पत्त्याचा महल ११५ □ शेजारधर्म १२६ □ भलेपणाची किमत १३२ □ मृतदेहाचा शृंगार १३८ □ सशाचे अश्रु १४९ □ सरगम १५३

♣

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
०२२
अ. क्र. २८२२६
क्र. ७७९१७
(स्थल प्रत)

## अमेरिका, किती मोठी ? किती छोटी ?

### आजच्या अमेरिकन समाजजीवनाचा घेतलेला विदारक साहित्य वेध

---

पुण्याच्या डॉ उषादेवी कोल्हटकर अमेरिकेत १२ वर्षे वास्तव्य करून नुकत्याच भारतात परतल्या १९७८ साली, पुणे विद्यापीठाकडून त्यानी, समाजशास्त्र विषयात पीएच डी मिळविली. सशोधनाचा विषय होता, A Study of of Educated Scheduled Caste Women In An Urban Setting.' त्यातून उद्भवलेला समाज-जीवनाच्या कुतुहलापोटी त्या थेट अमेरिकेत गेल्या व १९८१ साली मिशिगन स्टेट युनिव्हर्सिटीने त्याना दुसरी पीएच् डी दिली सशोधनाचा विषय होता 'A Reappraisal Juvenile Delinquency In Relationship To The Broken Home (With Reference To the United States Of America) दोन पीएच. डी मिळविलेल्या सुविद्य डॉ उषादेवी कोल्हटकर, या अभ्यासाच्या विषयाशी जेवढ्या एकरुप झाल्या, तेवढ्याच त्या अभ्यासातून समोर आलेल्या विदारक सामाजिक सत्यान, त्याच्यातील लेखिकेला जन्माला घातल

डॉ कोल्हटकर याचे हे लिखाण कथा, व्यक्तिचित्रणे, समाजवर्णन, प्रवासवर्णन या कुठल्याच साहित्यिक प्रकारात बसणारे नाही. अगदी मोकळ्या मनी, अमेरिकेतील हॉलीवूडमधील विख्यात मेट्रो गोल्डविन मायरचा कॅमेरा फिरावा तशी दृष्टी ठेवून व अगातील रक्तभूत भारतीय मन सदैव जागृत ठेवून त्यानी हे ललित रेखाटन केले आहे त्याला 'अनुभव – चित्रे' असेच काहीसे म्हणावे लागेल. ज्या खोलवर, टोकदार व परखड धाटणीत त्यानी हे लिखाण केले आहे त्यामुळे ते अत्यत वाचनीय व नि:सशय अभिनंदनीय झाले आहे.

अमेरिका, फ्रान्स, इग्लड, जर्मनी इत्यादी अतिशय पुढारलेल्या देशात आपले अनेक भारतीय, निरनिराळ्या कारणासाठी जाऊन येतात. त्यानतर तेथील वास्तव्य व जीवन यावर लिखाणही करतात, पण डॉ

## अनुक्रम

□ किल्लीचा बाहुला १७ □ फोन ॲडिक्ट २१ □ भोवरा २६ □ प्रिझन पेन पॅल ३५ □ कोकोची कार ४१ □ हिरव्या कोटातला पक्षी ४७ □ १०,००० येनचा कागदी दागिना ५५ □ बोलका मुका चेहरा ६४ □ तो आणि ती ६८ □ मिस्टर मम्मी ७२ □ दत्तक-आजोबा ८० □ सरोगेट मदर ८५ □ न दिसणारे अश्रु ९३ □ डेट ९८ □ सोशल सिक्युरिटी ? १०३ □ वेळापत्रक १११ □ पत्याचा महल ११५ □ शेजारधर्म १२६ □ भलेपणाची किमत १३२ □ मृतदेहाचा शृंगार १३८ □ सणाचे अश्रु १४९ □ सरगम १५३

♣

६२२
ग्रं. क्र. २६२२८


## अमेरिका, किती मोठी ? किती छोटी ?

### आजच्या अमेरिकन समाजजीवनाचा घेतलेला विदारक साहित्य वेध

---

पुण्याच्या डॉ उषादेवी कोल्हटकर अमेरिकेत १२ वर्षे वास्तव्य करून नुकत्याच भारतात परतल्या १९७८ साली, पुणे विद्यापीठाकडून त्यानी, समाजशास्त्र विषयात पीएच डी मिळविली सशोधनाचा विषय होता, A Study of of Educated Scheduled Caste Women In An Urban Setting ' त्यातून उद्भवलेला समाज-जीवनाच्या कुतुहलापोटी त्या थेट अमेरिकेत गेल्या व १९८१ साली मिशिगन स्टेट युनिव्हर्सिटीने त्याना दुसरी पीएच् डी दिली सशोधनाचा विषय होता A Reappraisal ' Juvenile Delinquency In Relationship To The Broken Home (With Reference To the United States Of America) दोन पीएच. डी मिळविलेल्या सुविद्य डॉ उषादेवी कोल्हटकर, या अभ्यासाच्या विषयाशी जेवढ्या एकरुप झाल्या, तेवढ्याच त्या अभ्यासातून समोर आलेल्या विदारक सामाजिक सत्यानं, त्याच्यातील लेखिकेला जन्माला घातल

डॉ कोल्हटकर याचे हे लिखाण कथा, व्यक्तिचित्रणे, समाजवर्णन, प्रवासवर्णन या कुठल्याच साहित्यिक प्रकारात बसणारे नाही. अगदी मोकळ्या मनी, अमेरिकेतील हॉलीवूडमधील विख्यात मेट्रो गोल्डविन मायरचा कॅमेरा फिरावा तशी दृष्टी ठेवून व अगातील रक्तभूत भारतीय मन सदैव जागृत ठेवून त्यानी हे ललित रेखाटन केले आहे त्याला ' अनुभव – चित्रे ' असेच काहीसे म्हणावे लागेल. ज्या खोलवर, टोकदार व परखड धाटणीत त्यानी हे लिखाण केले आहे त्यामुळे ते अत्यत वाचनीय व नि सशय अभिनदनीय झाले आहे.

अमेरिका, फ्रान्स, इग्लड, जर्मनी इत्यादी अतिशय पुढारलेल्या देशात आपले अनेक भारतीय, निरनिराळ्या कारणासाठी जाऊन येतात. त्यानतर तेथील वास्तव्य व जीवन यावर लिखाणही करतात, पण डॉ

उषादेवी कोल्हटकर याचे हे लिखाण सर्वस्वी आगळ्या दृष्टीचे व ढगाचे आहे. मराठीतील हे असे पहिलेच लिखाण असावे

या सग्रहात एकूण २२ 'अनुभव-चित्रे' उतरली आहेत जसे मानवी जीवनाचे बाल्य, तारुण्य व वृद्धत्व असे तीन स्पष्ट विभाग पडतात, तसे अगदी नकळत डॉ. कोल्हटकर यानी अमेरिकेतील या तीनही अवस्थाचा अत्यत लक्षणीय असा साहित्य वेध घेतला आहे तो घेताना एक मजेदार गोष्ट मला जाणवली ती ही की, त्यानी आपले पती श्री विजय कोल्हटकर, विद्यापीठात समाजशास्त्र शिकविणारे सर याचा अगदी आवश्यक तेव्हाच व निसटता उल्लेख कटाक्षाने केला आहे. मात्र 'आज मला आईला पत्र लिहायचे होते ते लिहायला सुरवात केली, असे लिहायला किंवा 'इथ, इथं बस रे मोरा, या बालगीतातल्या मोराला कुणी चारा घालणार नाही नि चिरेबदी वाड्यामागे लपलेल्या चादोमामाच्या माडीवर बसलेल्या सशाला निरखीत दुधभाताचे घास चादीच्या वाटीतून कुणाला भरविले जाणार नाहीत' असा आपल्या भारतातील गावाकडचा सास्कृतिक सदर्भ द्यायला त्या विसरलेल्या नाहीत. त्यामुळे या लिखाणाला एक अतर्मुख करविणारी वाचनीयता आली आहे यातील काही अनुभवचित्रे सरळ, सरळ कादंबरीच्या विशाल साहित्य क्षेत्राची मागणी करणारी आहेत. उदाहरणादाखल 'प्रिझन पेन पॅल,' 'सरोगेट मदर' व 'सरगम' ही अनुभवचित्रे

आता ह्या अनुभवचित्रानून इथ उतरलेल अमेरिकेतील बाल्य, तारुण्य व वार्धक्य याच कल्पनाही करता येणार नाही अस वास्तव जीवन कस आहे, ते बघण्यासारख आहे. ही चित्रणे त्यासाठी मुळातच सपूर्णपणे बारकाव्यासहित वाचली पाहिजेत.

एरवी अमेरिकन चित्रपटात, फोटोमधून, साहित्यातून दिसणारी अमेरिकन बालके, तुम्हा आम्हा जगभरच्या परस्थाना गोंडस व मोहकच वाटतात आपल्या देशात सर्वत्र पसरलेल्या झोपडपट्ट्यातील, कुपोषणाने करुण दिसणारी बालके समोर आली की, ही तफावत फारच जाणवते पण डॉ कोल्हटकर यानी इथल्या सपन्न अमेरिकेतील पोरक्या, किंकर्तव्य, गोंधळलेल्या व गुदमरलेल्या बालकाच्या अनेक प्रश्नावर नेमके बोट ठेवले

आहे किल्लीचा बाहुला ' या चित्रणात केव्हिन या दोन वर्षांच्या मुलाची स्थिती, करिअरच्या मागे धावणाऱ्या त्याच्या आईबापाच्या गतिमान जीवनामुळे कशी किल्लीच्या बाहुल्यासारखी झाली आहे याचे अत्यंत तरल वर्णन आले आहे तो आईच्या उबदार कुशीसाठी आसुस‌लेला आहे पण त्याला ते बोलता येत नाही त्यामुळे झोपेतच त्याच्या डोळ्यातून अश्रु ओघळतात हे वर्णन टिपणारी लेखिका, अमेरिकेच्या समाजजीवनात किती खोलवर घुसली आहे याचा प्रत्यय येतो

'बोलका मुका चेहरा ' व 'तो आणि ती ' या अनुभचित्रात लेखिकेने दोन अपंग युवामनाच्या अतितरल भावविश्वाचा आलेख रेखाटला आहे यातील 'तो ' हा पूर्णत अपंग आहे. तो केवढा अपंग आहे याचा बारकावा टिपताना लेखिका लिहीते, ' एकदा त्याला ठसका लागला होता, वाकडी स्ट्रॉ असलेल्या त्याच्या बाटलीत पाणी ओतून. पाणी पाजीपर्यंत तो कासावीस झाला होता.' असे नेमके वर्णन येते. या अपंगाला फक्त हाताची हालचाल करु शकणारी दुसरी अपंग मुलगी त्याने मदतीसाठी दिलेली जाहिरात वाचून त्याला मदत करायला उत्सुक आहे पण तीही खरी तर असहाय आहे एक क्षण असा येतो की, हात धड असलेली ती मुलगी त्या अपंग मुलाला भरविताना लेखिकेला दिसते व एक चमत्कारिक लहर तिच्या मनात तरळून जाते की, आपणच अपंग आहोत

' मिस्टर मम्मी ' या शब्दवेधात बेन या तरुणाच्या जीवनातील त्याची प्रेयसी निकी हिच्यामुळे उद्‌भवलेल्या मुलाच्या पालनाचा प्रश्न, फारच बारकाव्याने हाताळला आहे निकी सांसारिक जबाबदाऱ्यापेक्षा करियरमागे धावणारी तरुणी आहे. परिणामी बेनलाच आपल्या अपत्याच्या पालनासाठी मिस्टर मम्मीचा रोल करावा लागतो.

या चित्रणात आजचे अमेरिकन दूरदर्शन पालकाना चक्क सावध करताना दिसते की, ' रात्रीचे दहा वाजलेत, Do you know where your children are ? '

' दत्तक-आजोबा ' या अनुभवात, आपल्याकडील मराठीतील जयवंत दळवींच्या 'कालचक्र ' या नाटकाची आठवण व्हावी अशी

कथा आहे मात्र इथ एली या ७–८ वर्षांच्या अमेरिकन बालिकेन आपल्या दत्तक आजोबाना ख्रिसमस गिफ्ट घेण्यासाठी 'शॉपिंग कार्ट्स्' गोळा करण्याचे काम आनदाने स्वीकारले आहे विशेष म्हणजे या एकाच अनुभवचित्रात लेखिकेने अत्यत मार्मिक भाष्य केले आहे आणि ते म्हणजे, 'तरुणतरुणींच्या ह्या छोट्या अमेरिकेत आज मला एक मोठी अमेरिका दिसली - एलीच्या रूपान'

'वेळापत्रक' या चित्रणात आजचा अमेरिकन माणूस घड्याळाच्या काट्यामागे किती वेड्यासारखा धावतो आहे व त्यात जिमसारख्या ३ वर्षांच्या कोवळ्या वयाच्या बालकाच्या मनाचा कसा चुरडा होतो आहे याचे बारकाव्यानिशी वर्णन येते, आणि आपण जिमच्या जागी असतो तर ? ह्या विचाराने वाचक अस्वस्थ होतो इथ लेखिका एकूणच आजच्या झपूर्झागत झालेल्या अमेरिकन जीवनावर भाष्य करून हे चित्रण सोडते, ते भाष्य असे, 'जिमी तुझ्या आईचे वेळापत्रक, तुझ्या जीवनाचे वेळापत्रक चुकविणार आहे रे'

एकूणच या लिखाणात अमेरिकन बालपण सापडते ते असे की, कधी ते अपार पोरके आहे, कधी परिस्थितीवश सुजाण झाले आहे, कधी किल्लीच्या बाहुल्यासारखे गुदमरलेले व कोंदटलेले. ह्या बालजीवनाचा वेध तटस्थ, अलिप्तपणे घेणे हे वाटते तेवढे सोपे काम नाही लेखिकेने ते हृदयस्पर्शी आत्मीयतेने केले आहे

तसे आजच्या जगभरच्या तरुणाचे प्रश्न गगनाला भिडले आहेत, पण अमेरिकन तरुणाचे प्रश्न इथे येतात ते वाचकाला कासावीस व सुन्न करून सोडणारे असेच आहेत केवळ सपन्नता, समृद्धी, विपुलता म्हणजे सुखी जीवनाचा मार्ग म्हणता येईल का ? अमेरिकेत तर हे सगळेच आहे. पण इथला तरुण खरोखरच निरामय मन शाती व सुखात आहे का ? नाही, असे त्याचे उत्तर लेखिकेने अनेक दाखल्यानी दिले आहे. 'फोन ॲडिक्ट' या अनुभव चित्रणात सॅम या तरुणाची चमत्कारिक कोंडी लेखिकेने समर्थपणे पकडली आहे सॅमच्या खोलीत निर्धोकपणे घरटे बाधणारी रॉबीन पक्षीण जेवढी बिनधास्त आहे तेवढा स्वत: सॅम

नाही तो स्वत ला सदैव एकाकी मानतो पत्रमैत्रीतून, मित्रमैत्रिणी जोडतो त्याचे फोननबर्स मिळवितो व त्याना कोणत्या ना कोणत्या कारणासाठी सतत फोन करीत राहतो त्याला जीवनात कुणी आपले म्हटलेले नाही, मानलेले नाही 'आपलेपणाच्या शोधात' 'फोनची लाईन' एकाकी सॅमची 'लाईफलाईन' झाली आहे या त्याच्या फोन–मान्यामुळे फोनचे प्रचड बिल त्याच्या बोकाडी बसले आहे व ते भरता येणे शक्य नसल्याने कोंदटलेल्या, गुदमरलेल्या सॅमने आत्महत्या केली आहे ! हे चित्रण सपविताना लेखिका लिहून जाते, " हिवाळा आला नसता तर रॉबीण पक्षिणीचा त्याच्या खोलीतला मुक्काम वाढला असता, त्याला सोबत मिळाली असती त्याचे एकाकीपण सुसह्य झाले असते " या अनुभवचित्रात, जवळजवळ सत्तर हजार विद्यार्थी असलेल्या विद्यापीठातील एकाकी सॅम वाचताना मन हेलावून जाते

'भोवरा' या चित्रणात जेफच्या निमित्ताने लेखिकेने व्यक्तिस्वातत्र्याचे डागोरे पिटणाऱ्या अमेरिकन शासनावर अत्यत परखड कोरडे ओढले आहेत. येथील तुरुगातील मनोरुग्ण कैद्याचे वर्णन अमेरिकेचा बुरखा फाडणारे आहे विद्यार्थ्यांसाठी अमेरिकन कैदी जीवनाचा जो सिनेमा दाखविला जातो त्यात "प्राथमिक व अतिगभीर स्वरुपाचे मनोरुग्ण कैदीदेखील या तुरुगाच्या एकाच छताखाली राहायला येत तेव्हा सर्वांचे कपडे काढून त्याना नग्न करण्यात येई यामुळे त्याचे 'डिह्यूमनायझेशन' होते हे तुरुगातील अधिकारी, मनोविकारतज्ञ, सोशल वर्कर याच्या लक्षात कसे येत नाही ?" असा सडेतोड प्रश्न लेखिका येथे विचारते यातील जेफला 'ऑब्सेसिव्ह कम्पलसिव्ह' म्हणजेच पराकोटीचे अधिकार गाजविण्याची विकृती, या वर्तनप्रकाराचे कुतुहल आहे व शेवटी जेफ स्वत त्याचे परिणाम, त्याची प्रेयसी मिशालकडून भोगताना दिसतो या चित्रणातील अमेरिकन मनाची विचित्र नागमोडी वाटचाल पकडायला, समजायला अवघड आहे लेखिकेने ती सुघड केली आहे

अमेरिकन तरुणाचे प्रश्न उकलून दाखवताना इथ सर्वात थरारक व अगावर शहारे आणणारे चित्रण येते ते 'प्रिझन पेन पॅल' ह्या चित्र-

णातून या अनुभवात नायक जॅक व त्याची प्रेयसी हे 'टीन एजर' आहेत जवाबदारीची जाणीव नसताना 'अडगर' वयात त्यानी लग्न करून ससार थाटला आहे जॅकची पत्नी एका मुलीला जन्म देते पण तिची जवाबदार आई होऊ शकत नाही, कारण सगळेच जीवन भावनिक अधातरी विचाराचे परिणामी जॅक हा तिचा टीन एजर अमेरिकन तरुण नवरा, 'हाऊस हजबड' हे परिस्थितीने लादलेले पद नाखुषीने स्वीकारतो, वैतागतो, कोंडीत सापडतो, 'क्रॅक' नावाच्या महाघातकी अमली पदार्थाच्या व्यसनात सापडतो त्या क्रॅकच्या अमलाखाली तो आपल्याच सहा महिन्याच्या मुलीवर चक्क पाशवी बलात्कार करतो ! सहा महिन्याचे ते कोवळे अमेरिकन बालक मेलेले वाचताना, वाचकाचा लोकशाही, व्यक्तीस्वातत्र्य, माणुसकी या शब्दावरचा विश्वास उडून जातो मन कसे सुन्न, बधीर होऊन जाते 'भलेपणाची किंमत' हा असाच एक थरारक अनुभव आहे. अमेरिकेत आलेला नेपाळी तरुण बिंदु व त्याची प्रेयसी बगाली तरुणी तोषा याचे घडू, साकारू बघणारे जीवन एका साध्या प्रसगामुळे कसे उध्वस्त होते याचे चित्रण येथे आले आहे बिंदु अत्यत भाबडेपणी आपल्या एका अमेरिकन सहकाऱ्याच्या सात वर्षांच्या मुलीला तिची आघोळ झाल्यानतर कपडे घालायला मदत करतो ती मुलगी गप्पाच्या ओघात आपल्या आईला हे सागते आई या साध्या घटनेचा विपर्यास करते. बिंदुला २००० डॉलर्सचा जामीन द्यावा लागतो एक रात्र पोलिस कस्टडीत राहावे लागते– त्याचे सपूर्ण जीवनच उध्वस्त होते. जगातल्या कुठल्याही देशात सहज म्हणून केलेल्या ह्या भलेपणाला एवढी कठोर शिक्षा दिली जात नसेल.

या पुस्तकात सर्वात अधिक काळीजवेधी व उलगडून दाखवायला अत्यत कठिण अशी उकल लेखिकेने केली आहे ती अमेरिकेतील म्हाताऱ्याची. उपयुक्तता– Utility हाच जीवनाचा निकष मानणाऱ्या अमेरिकेत, निरुपयोगी व विकलाग झालेली म्हातारी माणसे कसकसल्या अडचणीत येतात याचे अत्यत भावस्पर्शी वर्णन इथे आले आहे. 'सोशल सिक्युरिटी?', 'पत्त्याचा महाल', 'कोकोची कार' ही अनुभव चित्रे याचा पुरेपुर व मनस्वी दाखला देतात सोशल सिक्युरिटी? हे चित्रण– 'दोन नोव्हेंबर

हा सर्व जगातील लोक 'मृतात्मा दिन– All Souls' Day' म्हणून साजरा करतात' अशा अत्यंत भावुक धार्मिक शब्दाने सुरू होते, वाचक कुतुहलाने ते वाचत जातो. आणि 'ताजमहाल' देखील एक समाधीच पण आजपर्यंत लाखो लोकाना तिने रोजगार मिळवून दिला अशा कठोर वास्तव शब्दात हे चित्रण अमेरिकेंतील असहाय वृद्धाच्या करुणास्पद स्थितीवर परखड प्रकाश टाकते ही स्थिती किती भयावह तर वृद्धाश्रम, कबरस्थान व दोहोच्या मध्ये 'ड्राइव्ह इन थिएटर' हे करमणुकीचे स्थान. असे वास्तव अमेरिकेत आज नादते आहे इथले लोकशाहीबद्ध शासन, सोशल सिक्युरिटीच्या व्यवस्थेने वृद्धाना काही दिलासा देत असेल या अपेक्षेने वाचक वाचत जातो याच वृद्धाश्रमाच्या सचालिकेला तिच्या देखरेखीखाली सोपविलेल्या वृद्धाचे चक्क खून करून ते नाहीसे झालेत असे भासवून, वर्षानुवर्षे त्याच्या सोशल सिक्युरिटीचे चेक गडप करताना वाचून वाचकाची जाणीव, ठणका लागून सुन्न व्हायची पाळी येते

इथेच काही ठिकाणी लेखिकेच्या नकळत उतरलेल्या एका शैलीचा उल्लेख केला पाहिजे. या चित्रणात ती म्हणते, 'प्रेताच्या टाळूवरचे लोणी खाणे ह्याचा भीषण अर्थ लक्षात आला,' तसेच एका चित्रणात ती लिहीते, 'त्याचे घर माझ्या मनात 'घर' करून बसले होते,'

पत्याचा महाल या अनुभवचित्रात डॉ कोल्हटकर यानी आपल्या समाजशास्त्र विषयाला धरून अमेरिकन समाजशास्त्रज्ञ डब्ल्यू आय थॉमस यानी केलेल्या चार इच्छाचे वर्गीकरण दिले आहे हे सपूर्ण पुस्तक समजून घेताना त्या वर्गीकरणाचा फार उपयोग होण्यासारखा आहे थॉमसने वर्णन केलेल्या मानवी इच्छाचे चार भागात वर्गीकरण असे १) नवीन अनुभव घेण्याची इच्छा २) सुरक्षिततेची इच्छा ३) इच्छित सवादी प्रतिक्रियेची इच्छा– The desire for response ४) व्यक्तिचे विशेष गुण मान्य व पसत केले जावेत याची इच्छा पत्याचा महाल या चित्रणात, समृद्ध अमेरिकेत साठी उलटलेली एक विधवा स्त्री या इच्छाच्या कुठल्या प्रकारात मोडते याचे लेखिकेला कोडे पडते मिसेस गिब्सन या मध्यमवयस्क विधवा आहेत, त्याना तीन

मुले आहेत लग्ने होऊन ती वेगळी राहतात मिसेस गिब्सन आपल्या अत्यत नेटक्या घरात एकटयाच पण आनदी जीवन जगतात लेखिकेला त्याच्या घरात 'हाऊस सिटीगसाठी' जावे लागते मिसेस गिब्सन याना वेळ जाण्यासाठी कसिनोमध्ये जाऊन पत्याचा जुगार खेळण्याची सवय आहे. ह्या सवयीपोटी त्याचे उभे जीवनच उलथेपालथे होऊन जाते. या चित्रणात अमेरिकन जीवनावर भाष्य करताना लेखिकेने सुदर परिमाण वापरले आहे 'अमेरिकन माणसाला प्रत्येक क्षणी आयुष्या-मध्ये काही वेगळे घडावे अशी उत्सुकता फार ॲबनॉर्मेलिटी हीच जीवनाची नॉर्मेलिटी असावी असे त्याला वाटते हातात जे आहे त्या-पेक्षा हातात जे नाही त्यामागे धावणे त्याला आवडते' या कसिनोला जाण्याच्या सवयीपोटी ज्याना नातवडे आहेत अशा मिसेस गिब्सन पेट्रोलपपावर भेटलेल्या स्टीव्हशी उतारवयात लग्न करतात स्टीव्ह हा 'कम्पलसिव्ह गॅम्बलर'– 'पराकोटीचा जुगारी' आहे तो गोड बोलून बाईंचे सगळे पैशाचे व्यवहार स्वत च्या ताब्यात घेतो, बँकेतील खाते दोघाच्या नावावर करतो, राहते घर गहाण ठेवून फ्लॉरिडामध्ये सुट्टीला जाण्यासाठी मोबल होम विकत घेतो आणि एके दिवशी मुला-खतीसाठी परगावी जातो असे सागून बाईच्या हातावर तुऱ्या देऊन कायमचा परागदा होतो गिब्सनबाईंचा पत्याचा महाल कसिनोमधील जुगारापोटी असा कोसळतो.

दहा हजार येनचा कागदी दागिना ह्या चित्रणात टोकिओच्या आभाळाला भिडलेल्या महागाईचे वर्णन आहे. इथे एक अमेरिकन क्रिस्टीन आजी, लेखिकेला टोकिओच्या विमानतळावर भेटल्या आहेत. त्या आपल्या मिलिटरीतल्या मुलाला भेटण्यासाठी सेऊलला निघाल्या आहेत आपल वृद्धत्व कष्टाळू व अर्थपूर्ण बनवून त्यानी मुलाच्या भेटी-साठी अनेक कष्ट करून पैसे जमवले आहेत. टोकिओत पुढील विमान वेळेत न मिळाल्यामुळे व शहरात लॉजवर राहणे परवडण्यासारखे नस-ल्यामुळे या आजी चक्क विमानतळावरच दोन दिवस राहिल्या आहेत एक दिवस तर त्यानी काटकसरीपोटी जेवणही घेतलेले नाही लेखिकेच्या चौकस स्वभावाप्रमाणे ह्या आजी तिला आपली सर्व कथा ऐकवतात.

लेखिकेला पतीने एखादी जपानी वस्तु खरेदी करण्यासाठी दिलेली १०,००० येनची नोट, लेखिका तिच्या हाती मिनतवारीने सोपविते व त्याबद्दल ती तयार करीत असलेली कागदी वस्तू भेट म्हणून स्वीकारते. इथे लेखिकेच्या भारतीय सस्कारी मनाची खूण प्रकर्षाने पटते

'कोकोची कार', 'हिरव्या कोटातला पक्षी', 'शेजार धर्म', 'मृतदेहाचा शृगार', 'सशाचे अश्रु' ही अनुभवचित्रणे अशीच अमेरिकन जीवनाचे कॅलिडोस्कोप सारखे विविध पैलूनी दर्शन घडवितात

या अनुभवचित्रणाच्या आकर्षक व कलात्मक पुस्तकात 'सरोगेट मदर' हा लेखिकेचा अनुभव नि सशय कादबरीचीच मागणी करणारा आहे सरोगेट मदर म्हणजे प्रातिनिधिक माता, आपल्याकडे उल्हासनगरमध्ये सर्व वस्तूच्या नकला मिळतात उल्हासनगर म्हणजे आपल्याकडचे U S A पण प्रत्यक्ष यू. एस. ए मध्ये मात्र नकली वा 'प्रातिनिधिक माता' ही मिळू शकते या अनुभवचित्रणातील सिन्ड्रेला ह्या अर्थपूर्ण नावाची नायिका मूलत एक वेश्या आहे स्वत.ला ती 'दर्जेदार वेश्या' मानते आपण हाच व्यवसाय का स्वीकारला ह्याची सफाईदार कारणेही ती देते फार दिवसानतर ही सिन्डी लेखिकेला एका डिपार्टमेंटल स्टोअरमध्ये गरोदर स्त्रियासाठी असलेल्या कपड्याच्या विभागात दिसते. ती आता गरोदर आहे आपले गर्भाशय तिने एका अपत्यप्रेमी अमेरिकन जोडप्याला २५,००० डॉलरला विकत दिले आहे ती पूर्वी वेश्या होती आहे 'भाडोत्री माता' झाली आहे

स्वत जवळ असणारी एकमेव 'एक्सप्लॉयटेबल कमॉडिटी' म्हणून तिने शरीराचा सौदा केला आहे स्वत ला 'बेबी मशीन' बनविले आहे लेखिका इथे प्रश्न विचारते 'मातृत्वासारख्या सत्यातून पैसे काढणाऱ्या अमेरिकनाना काय म्हणावे ?' समाजशास्त्राच्या अभ्यासक व लेखिका असलेल्या डॉ उषादेवी कोल्हटकर येथे पिळवटून एक प्रश्न विचारतात, 'व्यक्तिस्वातत्र्याचा अतिरेक झाला की, समाजाचे अर्धांगच नव्हे तर सपूर्ण समाजच विकलाग होऊ लागतो का ? ' त्याच्या या प्रश्नाला अमेरिकेत राहणाऱ्या, तिला भेट देणाऱ्या वा समाजाचे निकोप चितन करणाऱ्या कुणाकडेच उत्तर नाही.

या अनुभवचित्रणांच्या रेखाटनातून डॉ. कोल्हटकर यानी मराठी भाषेतील एका आशयपूर्ण साहित्य प्रकाराचा पायंडा पाडला आहे हे लिखाण अत्यत सुटसुटीत व आवश्यक त्या ठिकाणी समाजशास्त्राची इंग्रजी परिभाषा वापरून समजेल असे केले आहे असे म्हणतात की, पिरॅमिडमध्ये घुसलेल्या माणसाला त्याची अतरगाची बाधणी किती किचकट आहे याचा प्रत्यय येतो अमेरिकन समाजजीवनात घुसलेल्या डॉ कोल्हटकर यानी या पुस्तकाद्वारे अमेरिकन जीवनाचे अनेक किचकट पापुद्रे असेच उकलून दाखवले आहेत. या त्याच्या यत्नाबद्दल मी त्याचे हार्दिक अभिनदन करतो व त्याच्या साहित्यिक वाटचालीत सर्व प्रकारचे सुयश चितीतो

**शिवाजी सावत**

' राधाकुद '
विवेकानद सोसायटी,
पर्वती पुलाजवळ,
पुणे–४११०३०

## ‘इये हृदयीचे ते हृदयी’

मी लेखिका नाही, साहित्यिका तर मुळीच नाही. समाजशास्त्राची विद्यार्थिनी या भूमिकेतून अमेरिकेतील एका भव्य विद्यापिठात वावरताना व न्यूयॉर्कच्या उपनगरातील माझ्या वास्तव्यात मला पावलोपावली जाणवले की, हा देश मानवतेचा अविष्कार करण्यात कमी पडतोय त्यामुळे ज्या सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत, त्या जशा मला भावल्या तशा मी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. भावनावर नियंत्रण ठेवणारा कायदा जगातल्या कुठल्याही देशात, आजपर्यंत लिहिला गेला नाही आणि म्हणूनच भावनिक संघर्षातून निर्माण होणाऱ्या समस्याचे निराकरण कायद्याची, व्यक्तिस्वातंत्र्याची ‘लेबल्स’ लावून होत नाही हे प्रकर्षाने जाणवले या समस्याचे समाधान या क्षणी तरी माझ्याकडे नाही फक्त भावनिक संघर्षातून निर्माण होणाऱ्या समस्याची जाणीव निर्माण करणे, त्याच्या भल्याबुऱ्या परिणामाबद्दल समाजाला सावधान करणे व रंजनातून समाजाचे प्रबोधन करणे, या इच्छेपोटी मी साहित्याच्या ‘वाटेला’ जाण्याचा प्रयत्न केला आहे

या पुस्तकात आलेल्या घटना प्रत्यक्ष घडलेल्या मी पाहिल्या आहेत, पण त्या जशाच्यातश्या न लिहिता त्याच्यामध्ये लालित्य आणण्याचा प्रयत्न केला आहे. समाजशास्त्राची विद्यार्थिनी असल्यामुळे, जीवनातील प्रत्येक गोष्टीकडे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहण्याची कदाचित मला सवय लागली असावी अमेरिकन समाजाच्या निरिक्षणातून माझ्या मनाला ज्या समस्या जाणवल्या त्यामुळे मी प्रचंड अस्वस्थ झाले माझी ती अवस्थताच कदाचित या पुस्तकाच्या माध्यमातून व्यक्त झाली असावी ‘ Sociology of Literature- साहित्याचे समाजशास्त्र ’ अशी एक शाखा, इकडे खूपच विकसित झाली आहे. या शाखेच्या मान्यतानुसार साहित्याचे मुख्यत्त्वे दोन प्रकारे वर्गीकरण कले जाते. एक म्हणजे बाजारात खपू शकेल असे साहित्य— Literature as a consumer

Product आणि दुसरे म्हणजे सामाजिक वास्तवतेचे अविभाज्य अंग म्हणून निर्माण होणारे साहित्य- Literature as an integral part of Social reality समाज आणि साहित्याचे परस्परसंबंध तीन प्रकारांनी अभिव्यक्त होऊ शकतात असे कल्पिले आहे 1) Reflection- साहित्यात समाजाचे प्रतिबिंब पडणे, 2) Influence- साहित्यात, समाजाला प्रभावित करणाऱ्या गोष्टींचे चित्रण होणे, 3) Social Control- सामाजिक बंधनाची जाणीव साहित्यातून व्यक्त करणे माझे हे लिखाण समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून 'Sociology of Literature' या प्रकारात मोडावयास हरकत नाही. त्याचप्रमाणे वर सांगितलेले साहित्य व समाज यांच्या तीनही प्रकारच्या परस्परसंबंधाचे प्रतिबिंब माझ्या लिखाणात पडलेले आहे असे मला वाटते

मला भेटलेला, मी पाहिलेला व अनुभवलेला अमेरिकन समाज माझ्या मनाला आणि बुद्धीला अनेक आव्हाने देऊन गेला आर्थिक समृद्धतेबरोबरच, सामाजिक, कौटुंबिक 'समस्यांची समृद्धता' मला अमेरिकेत भरपूर आढळली कदाचित कुणाला हे लिखाण आशावादी वाटणारही नाही मी समाजशास्त्राची अभ्यासक आहे तेव्हा माझ्याकडून ह्या समस्यांचे निराकरणही सूचित व्हावे अशीही कुणाची अपेक्षा असेल पण समस्यांची जाणीव अंतरात झाली तरच उपाय शोधण्याच्या दृष्टिने काहीतरी आशा निर्माण होईल असे मला वाटले व म्हणूनच मला जे जाणवले ते 'इये हृदयीचे ते हृदयी' घालण्याचा खटाटोप मी केला. केवळ समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून गंभीर व विद्वत्तापूर्ण लेख लिहून हे काम होईल असे मला वाटले नाही मला जाणवलेली ही सामाजिक वास्तवता, भावनिक संघर्षातून निर्माण झालेल्या समस्यासंबंधीच्या जाणीवा समाजापर्यंत पोहोचवायच्या असतील तर ललित साहित्याच्या माध्यमाचा आश्रय घेतल्यास हे काम प्रभावीपणे होईल असे मला वाटले म्हणून मी ह्या अनुभवचित्रणाचा प्रयत्न केला अर्थात एक गोष्ट मला स्पष्ट करावीशी वाटते की, ही अनुभवचित्रे अमेरिकेच्या एका मर्यादित 'लँडस्केप' शीच संबंधित आहेत त्यामुळे हे लिखाण अमेरिकन समाजाचे प्रातिनिधीक चित्रण आहे असे कुणी समजू नये

अमेरिकेतील आर्थिक समृद्धी, तंत्रविज्ञानातील प्रगती, आकाशाला गवसणी घालण्याचे सफल प्रयत्न, सर्व क्षेत्रात मुक्तपणे राबवून घेतलेले व्यक्तिस्वातंत्र्य या सर्वांचा परिणाम म्हणून निर्माण झालेल्या समस्या-कडे पाहिले तर लक्षात येते की. अमेरिकन लोकाना हे सर्व हवे आहे परंतु त्यांच्या परिणामाना तोंड देण्याची त्यांची तयारी नाही किंवा यामध्ये ते कमी पडतात भौतिक समृद्धीच्या एव्हरेस्टवर उभ्या असलेल्या अमेरिकन समाजाला कमालीचे व्यक्तिस्वातंत्र्य हवे आहे, त्याचे फायदेही हवे आहेत पण परिणामाना तोंड द्यायची त्यांची तयारी कुठे-तरी अपुरी वाटते व्यक्तिस्वातंत्र्य ही मानवी समाजाची मूलभूत गरज आहे हे जरी मान्य केले तरी सुरळीत समाजजीवनासाठी काही नीती-मूल्ये, बंधने, व्यक्तिने स्वत वर लादून घेतली पाहिजेत हेही तितकेच खरे. समाज-नियंत्रण, समाज-स्वास्थ्य, सामाजिक स्थैर्यासाठी हे अत्या-वश्यक आहे लिखित कायद्याने काही गोष्टी शक्य होत असल्या तरी सामाजिक आतरक्रिया, प्रतिक्रिया, भावना, मूल्ये याचे नियंत्रण केवळ कायद्याने होऊ शकत नाही अलिखित कायद्याच्या नियंत्रणाचा विचार करताना, धर्माच्या प्रभावाला अनन्यसाधारण महत्त्व द्यावे लागते त्या-नुसार अमेरिकेतील बहुजनसमाजाच्या ख्रिस्ती धर्माचा जनमानसावर किती प्रभाव आहे याचा विचार करावा लागतो तरुण पिढीवर धर्माचा प्रभाव कमी होत चालला आहे त्यामुळे ‘स्वातंत्र्याचे नियमन प्रेमाच्या द्वारे झाले पाहिजे,’ या सत पौलाने सांगितलेल्या प्रमुख ख्रिस्ती धर्मत-त्वाचा अनेकाना विसर पडला आहे की, काय अशी शका येते इथे सुखाची परिभाषा ‘स्वय’ या शब्दावर केन्द्रित झाली आहे उपभोगाची चरमसीमा गाठली गेली आहे. त्यामुळे परस्पराच्या सुखासाठी त्याग करणे ही भावना हरवून गेली आहे बायबलमध्ये, सत पौलाने दिलेला सावधानतेचा इशारा याना उमगत नसावा का ? असा प्रश्न पडतो. सत पौलाचे हे उद्गार मुळातूनच वाचण्यासारखे आहेत , “ बंधुजनहो, तुम्हाला स्वतंत्रतेकरिता पाचारण झाले, तरी त्या स्वतंत्रतेने देहवास-नाना वाव मिळू देऊ नका, तर प्रीतीने एकमेकाचे दास व्हा कारण ‘जशी आपणावर तशी आपल्या शेजाऱ्यावर प्रीती कर,’ हे एकच वचन

पाळल्याने अवघे नियमशास्त्र पूर्णपणे पाळण्यात आले आहे परंतु तुम्ही जर एकमेकास चावता व खाऊन टाकिता तर परस्पराच्या हातून एक-मेकाचा सहार होऊ नये म्हणून जपा'' आज भौतिक समृद्धतेचा कैफ चढलेले अमेरिकन लोक परस्पराना तसेच परस्पराच्या भावनाना असेच चावताना व खाऊन टाकताना आढळतात कौटुबिक तणावापोटी कुटुबातील व्यक्तिनी एकमेकाची हत्या करण्याचे अमेरिकेतील वाढते प्रमाण हेच सूचित करते

भाडवलशाहीवर आधारित अर्थव्यवस्था व उपयुक्ततावादाचे प्राबल्य यामुळे स्वत वर तशी शेजाऱ्यावर प्रीती कर हे येशू ख्रिस्ताचे तत्त्व 'स्व' च्या अधिक्यात हरवून गेले आहे, असे जाणवते. जे 'उपयुक्त' तेच समाजजीवनात स्वीकारले जात असेल तर वृद्धानी कोठे जायचे ? झाड सुकले व ते लाकूड घराचा वासा करण्यासाठी वापरले तर सुकलेले लाकूड निरुपयोगी, म्हणून घर पाडून टाकणाऱ्याना काय म्हणायचे ?

ईश्वर प्रेमस्वरूप आहे हे येशू ख्रिस्ताचे तत्त्व यानी स्वीकारले आहे, पण त्यानुसार परस्पराशी प्रेमभावनेने वागण्याची कृती मात्र अमेरिकन समाजात अभावानेच आढळते प्रेम त्यागाची अपेक्षा करते आणि भोगवादी अमेरिकन कुठलाच त्याग करायला तयार नसतो, असे चित्र सर्वत्र आढळते. येशू ख्रिस्ताने देव असूनही माझ्यासाठी काही करा असे सागितले नाही, तर मानवबाधवाच्या गरजा जाणून त्याच्या-साठी काही करा असे सागितले आहे. येशू म्हणतो, "जेव्हा मनुष्याचा पुत्र आपल्या वैभवाने येईल तेव्हा आपल्या वैभवशाली राजासनावर बसेल आणि आपल्या उजवीकडच्यास म्हणेल, अहो, माझ्या पित्याचे आशिर्वादितहो, या, जे राज्य जगाच्या स्थापनेपासून तुम्हाकरिता सिद्ध केले आहे ते वतन घ्या, कारण मी भुकेला होतो तेव्हा तुम्ही मला खावयास दिले, तान्हेला होतो तेव्हा मला प्यावयास पाणी दिले, परका होतो तेव्हा मला घरात घेतले, उघडा होतो तेव्हा मला वस्त्र दिले, आजारी होतो तेव्हा माझ्या भेटीला आला, बदिशाळेत होतो तेव्हा तुम्ही माझ्याकडे आला. त्यावेळेस नीतीमान् त्याला उत्तर देतील की,

प्रभुजी आम्ही तुम्हाला केव्हा भुकेले पाहून खावयास दिले ? केव्हा तान्हेले पाहून प्यावयास दिले ? तुम्हाला परके पाहून केव्हा घरात घेतले ? उघडे पाहून केव्हा वस्त्र दिले ? आणि तुम्हाला आजारी अथवा बंदिशाळेत पाहून केव्हा आम्ही तुमच्याकडे आलो ? तेव्हा राजा त्यास उत्तर देईल, मी तुम्हास खचित सांगतो की, ज्याअर्थी तुम्ही ह्या माझ्या कनिष्ठ बंधुपैकी एकाला केले, त्याअर्थी ते मला केले आहे "*

येशूच्या उद्गारातील या सारगर्भित तत्त्वाचे आचरण, समाजबांधणी व समाजस्थैर्यासाठी आवश्यक आहे स्वत च्या व स्वत च्या प्रतिबिंबाच्या प्रेमात आकंठ बुडालेले अमेरिकन मन जोपर्यंत या महान तत्त्वज्ञानाचे आचरण करण्याची नैतिक ताकद मिळविणार नाही तोपर्यंत अशा मूलभूत समस्यांचे निराकरण होणे कठीण आहे परस्परांवर प्रीती करणे, परस्परांसाठी त्याग करणे, परस्परांच्या सुखदु खाचा विचार करणे यांचे महत्त्व जोपर्यंत येथील समाजाला जाणवणार नाही, तोपर्यंत येथील समाजजीवन सुरळीत होणार नाही असे मला तरी वाटते

साहित्य जेव्हा सामाजिक अभिव्यक्तिचे साधन, Mirror of Life किंवा अनुभवाचे Record बनते तेव्हाच ते समाजबांधणीसाठी काही विधायक असे सुचवू शकते, करू शकते माझ्या अनुभवांना, साहित्याचे बोट धरून पहिली पावले टाकायला शिकविण्याचे माझे प्रयत्न कितपत सफल झाले हे ठरविणे मी माझ्या वाचकांवरच सोपवून देते

माझ्या ह्या नवीन प्रयत्नाबाबत, ख्यातनाम, सिद्धहस्त, प्रतिभावान साहित्यिक श्रीमान् शिवाजी सावंत यांनी उत्सुकता दाखवली, कौतुक केले, विधायक सूचना केल्या इतकेच नव्हे तर प्रकृती बरी नसतानाही प्रस्तावना लिहून दिली, हा माझा मोठा सन्मान झाला, असे मी समजते कृतज्ञता व्यक्त करण्याच्या औपचारिक सोपस्कारापेक्षा या श्रेष्ठ व ज्येष्ठ साहित्यिकाच्या ऋणात राहणेच मला अधिक आवडेल.

चित्रातून बोलणारे सुप्रसिद्ध चित्रकार श्री शि. द फडणीस यांनी माझ्या पुस्तकासाठी केलेले मुखपृष्ठ पाहिल्यावर माझी उत्स्फूर्त प्रतिक्रिया होती, 'My Hats off To you Mr Phadnis' त्यांच्या आत्मीयतापूर्ण सहकार्याबद्दल मन पूर्वक धन्यवाद

---

* संदर्भ– 'मत्तयकृत शुभवर्तमान', अध्याय २५, वचने ३१ ते ४०, बायबलमधील नवीन करारातून

ही अनुभवचित्रे लिहून काढण्याची प्रेरणा, मला माझे थोरले बंधू श्री जयतकुमार त्रिभुवन यानी दिली. माझ्या समाजशास्त्रीय लिखाणावर, ललित, संपादकीय मस्कारही त्यानीच केले खरे पाहता हे पुस्तकच नव्हे तर माझे जीवनही त्याच्या प्रेरणेने, मार्गदर्शनाने, वात्सल्याने घडले आहे माझ्या अल्प यशात त्याचा सिंहाचा वाटा आहे व माझा 'Psyche' त्यानीच पुरेपूर व्यापलाय माझ्या असामान्य 'दादा' चे ऋण व्यक्त करायला मजजवळ शब्द नाहीत व्यक्त करायचे ठरविले तर शब्द त्याच्याकडूनच उसने घ्यावे लागतील एकच म्हणावेसे वाटते–

"तू आकाशच राहा

नाहीतर डोळे उचलून वर, पाहायचे तरी कोणाकडे ? "

हे पुस्तक पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेले माझे भारतातील वास्तव्य आनदाने 'वियोगणारे' माझे अमेरिकेत असलेले पण अमेरिकन नसलेले पती श्री विजय कृष्णराव कोल्हटकर व प्रत्येक क्षणी मला सहर्ष साथ देणारे असीम, अनुरता, अमित व सौ नीला याचे मी मन - पूर्वक आभार मानते

माझा 'ताईपणा' सहन करावा लागतो तरी माझे कौतुक करणारे माझे धाकटे बधू अशोककुमार व शशिकिरण यानाही 'थँक्यू' म्हटल्याशिवाय राहवत नाही

प्रकाशिका सौ अस्मिता कुलकर्णी, श्री अनिल कुलकर्णी, अल्पावधीत पुस्तकाची दर्जेदार छपाई करून देणारे श्री भाईसाहेब जगताप याच्या सहकार्याबद्दल मी आभारी आहे.

'ये हृदयीचे ते हृदयी', माझ्या मनाची स्पदने व जाणीवा पोचविण्याचा माझा हा पहिलावाहिला प्रयत्न आपण रसिक वाचक स्वागतार्ह मानाल असा मला विश्वास वाटतो. हृदयाची भाषा जाणणाराच्या प्रतिक्रिया जाणून घ्यायला १२,००० मैलावरूनही मी उत्सुक असेन

**डॉ उषादेवी विजय कोल्हटकर**

33-45, 73rd Street Jackson Heights,
New York 11372 U S A.

१

# किल्लीचा बाहुला

विद्यापीठाच्या परिसरात पन्नासपक्षा अधिक वसतीगृहे होती. शिवाय विवाहित विद्यार्थ्यांना फॅमिलीसह राहता यावे म्हणून 'युनिव्ह-र्सिटी व्हिलेज' नावाचा अपार्टमेंट कॉम्प्लेक्स होता 'युनिव्हर्सिटी व्हिलेज' मधील एका अपार्टमेंट बिल्डिंगमधील एक बेडरूम असलेल्या अपार्टमेंटमध्ये मी काही महिने राहत होते बरेच दिवस रिकाम्या अस-लेल्या, शेजारच्या दोन बेडरूम अपार्टमेंटमध्ये दोन वर्षाचा मुलगा असलेले एक विवाहित विद्यार्थी जोडप राहायला आल्याने मला फार आनद झाला. मला लहान मुले आवडतात त्यामुळे त्या लहान मुलाशी मी स्वत हूनच ओळख करून घेतली आणि सध्याकाळीच त्या जोडप्याला चहाला बोल-विले आमचा परिचय झाला व पुढील काही दिवसातच त्याचा दोन वर्षाचा केव्हिन माझा जानी दोस्त बनला

केव्हिनचे वडील गणितात पीएच डी करीत होते व आई कम्प्यु-टर सायन्समध्ये एम एस करीत होती दोघानाही त्याच्या डिपार्टमेंट-मध्ये पार्टटाईम जॉब होते सध्याकाळी सहा ते दहा या वेळात केव्हिनचे वडील एका हॉटेलात वेटरचे काम करीत, फी, घरभाडे, जेवणाचा खर्च, इतर खर्च, अधिक एक मूल वाढविण्याचा खर्च होताच शिवाय अभ्यास व कामामुळे आईवडील दोघेही बाहेर त्या काळात केव्हिनचे बेबी-सिटीग करणाऱ्या बाईंना प्रत्येक तासाचे तीन डॉलर्स द्यावे लागत हृया सर्व खर्चाची तोडमिळवणी करण्यासाठी दोघानाही जादा कामे करावी लागत केव्हिनची आई रविवारी दहा-बारा लहान मुलाचे बेबी-सिटीग करीत असे उद्देश हा की, जास्तीत जास्त वेळ केव्हिनबरोबर घालविता यावा हा उद्देश कितपत सफल होई याबद्दल मी साशक होते रविवारी सकाळी

अपार्टमेंटमध्ये दहा-बारा मुलांचा जो गोंधळ चालत असे, तो मी प्रत्यक्ष पाहिला होता जमेल तेव्हा केव्हिनच्या आईला मदतही केली होती

रविवारी सकाळी अकराच्या सुमारास मुलांचे आईवडील मुलांना सॅलीकडे आणून पोचवित एक ते सहा या वयोगटातील ती मुले, त्यांच्या वगवेगळ्या गरजा सॅलीने पुरवाव्यात म्हणून मोठ्या आशेने सॅलीकडे पाहात असत दुपारी एक ते दीडच्या बेताला जेवण खाऊ शकणाऱ्या मुलांना, सॅली ' इन्स्टंट–लंच' देई बहुधा सँडविच, कपभर दूध, फ्रोझन वाटाण्याच्या डब्यातील, उकळत्या पाण्यात दोन-तीन मिनिटे शिजविलेले वाटाणे किंवा बटाट्याचे वेफर्स असे ते लंच असे लहान मुलांना दूध किंवा फळांचे रस बाटलीने पाजणे, बेबी–फूड गरम करून भरविणे, झोप येत असलेल्यांना झोपविणे, रडणाऱ्यांना शांत करणे व मुलांसाठी करावे लागणारे बरेच काही सॅलीला न कंटाळता करावे लागे ही मुले सध्याकाळी आपापल्या घरी जाईपर्यंत सॅली क्वचितच केव्हिनच्या वाट्याला येई व मुले घरोघर गेल्यानंतर ती थकून गेलेली असे सध्याकाळचे जेवण म्हणून ब्रेडच्या स्लाईसवर जेली, जॅम, पीनट बटर असे काहीतरी घेऊन ते सँडविच ब्लॅक कॉफीबरोबर ती खाऊन टाकी केव्हिनची आघोळ, बेबी-फूड गरम करून त्याला भरविणे व झोपविणे हे आटोपून सॅली जेव्हा अभ्यासाचे पुस्तक डोळ्यासमोर धरी तेव्हा अतिश्रमाने तिचे डोळे मिटू लागलेले असत अकरा वाजता केव्हिनचे वडील येत ' सॅम तुला जेवायचय ?' या सॅलीच्या थकलेल्या आवाजातील प्रश्नाला 'मला भूक नाही' असे उत्तर जेव्हा सॅम देई तेव्हा तिला हायसे वाटे

झोपलेल्या केव्हिनच्या गालावर साडेचार सेकद ओठ टेकवून सॅम 'गुडनाईट कीस' चा सोपस्कार पूर्ण करी आणि कोचावरच झोपून जाई पदवी मिळवून पुढचे आयुष्य सुखकारक करण्यासाठी या पती-पत्नीने जीवाचा असा आटापीटा करावा याचे कौतुक वाटे व त्यांची ओढाताण पाहून वाईटही वाटे कळत, नकळत केव्हिनच्या समस्या मला माझ्या वाटू लागल्या

व्यक्तिवादाच्या आहारी गेलेल्या समाजात विभक्त कुटुंबांना ज्या असंख्य तडजोडी कराव्या लागतात त्याचे एक चांगले उदाहरण सॅली व

सॅमच्या रूपात माझ्या डोळ्यासमोर होते एकत्र कुटुबात आजी हा घटक लहान मुलाना साभाळण्याच्या समस्येचे उत्कृष्ट उत्तर होते पण इकडे आजीचे सर्वांनाच वावडे नातवाला साभाळीत आपल्या म्हातारपणाला खदखदून हसायला लावणारी व आपल्या वहाद्दर नातवाचे कौतुक करताना न दमणारी आजी फक्त पूर्वेकडेच असते, असे माझे ठाम मत येथील कुटुबाच्या निरीक्षणानतर वनू लागले होते येथील आजीला लिपस्टीकचे धनुष्य विस्कटलेले चालत नाही आजीची ही स्थिती तर मग आईबद्दल विचारणेच नको

विझी वेळापत्रकात सॅम व सॅलीची टर्म सपली सुट्टीला ते सॅलीच्या भावाकडे जाणार असे सॅलीने मला सागितले चला, आता काही दिवसासाठी तरी या दोघाना आराम मिळेल, याचे मला समाधान वाटले.

दोन आठवडयानतर ते परतले केव्हिनकडून मी दोन आठवडयाचे पापे वसूल केले त्याला ओजळ भरून चॉकलेटे दिली आणि एक किल्लीचा वाहुला दिला चालणारा, रडणारा, टाळ्या वाजविणारा, डोळे मिटणारा किल्लीचा वाहुला अभ्यासाने एकदमच गती घेतली व रात्री अभ्यासासाठी जाग्रणे होऊ लागली भरीस भर रोज रात्री बराच वेळ केव्हिनचे केविलवाणे रडणे ऐकू येऊ लागले क्वचित सॅली वा सॅमचा आवाज येई व त्यानी केव्हिनला शात केल्याचे जाणवे ओळीने चार पाच रात्री केव्हिनचे रडणे ऐकू येत होते न राहवून मी एके दिवशी सॅलीला विचारले, "केव्हिनला वरे नाही का ग ? रात्री तो खूप रडतो" सॅलीने जे उत्तर दिले ते ऐकून मी चक्रावूनच गेले ती म्हणाली, "अग माझ्या भावाच्या घरी, केव्हिनला वेगळी बेडरूम न मिळाल्यामुळे तो माझ्याच कुशीत झोपत होता दोन आठवडे असे करावे लागले त्यामुळे त्याला माझ्या कुशीत झोपायची सवय झाली येथे परतल्यापासून त्याला त्याच्या वेगळ्या बेडरूममध्ये झोपायला नको असते तो माझ्या कुशीत झोपायचा हट्ट करून रडतो त्याची नवी सवय घालवायसाठी मी त्याच्या हट्टाकडे दुर्लक्ष करते आय लेट हिम क्राय ॲन्ड ही क्राईज हिमसेल्फ टू स्लीप " सॅलीच्या ह्या उत्तराने माझी झोपच उडाली व्यक्ती स्वातंत्र्याच्या अवास्तव अट्टाहासापायी वाळाला वेगळ्या खोलीत झोपविणारी आई माझ्या मनाला

पटत नव्हती स्वत च्या आयडेन्टीबाबत इतके सावध असणार मातृत्व आणि आईची कूस, माया, ऊब, स्पर्श याला पारखे झालेले केव्हिनचे बालपण मला सहन होत नव्हते

केव्हिनची दिनचर्या उगाचच माझ्या डोळ्यासमोर तरळू लागली सॅलीने दोन वर्षाच्या केव्हिनसाठी देखील एक वेळापत्रक आखलेले आहे त्यानुसार सोमवारी तो एक तास पोहायला शिकतो, तेव्हा आवश्यक म्हणून त्याची आई त्याच्याजवळ असते स्वीमिंग पूलच्या काठावरून ती त्याला फ्लाईंग कीसेस देते शनिवारी नऊ ते दहा स्केटिंग शिकताना, त्याला आई एकटयासाठी मिळते रविवारी सॅलीच्या "मॉब बेबी–सिटींग" मध्ये काही निसटते स्पर्श व दोनचार पापे केव्हिनला मिळतात रोज रात्री साडे चार सेकद जेव्हा त्याचे वडील त्याच्या गोबऱ्या गालावर ओठ टेकतात तेव्हा केव्हिन झोपलेला असतो आठवडयाच्या उरलेल्या दिवसात केव्हिन बेबीसीटरच्या मूड प्रमाणे जगतो खेळण्यातल्या माकडाबरोबर किंवा अस्वलाबरोबर गप्पागोष्टी करीत टी व्ही बघतो आणि हा दोन वर्षांचा 'अडोअरेबल चाइल्ड' केव्हिन स्वत च्या वेगळ्या बेडरूममध्ये 'क्राईज हिमसेल्फ टू स्लीप' केव्हिनला आई-वडिलाकडून मिळणाऱ्या सहवासाची मी गोळाबेरीज करीत राहिले

अशावेळी मला उगाचच वाटले, केव्हिन एक किल्लीचा बाहुला आहे, सॅली त्याला किल्ली देते, तो पोहू लागतो, वडील स्पर्श करतात, तो झोपी जातो पुन किल्ली दिली की, स्केटिंग करतो, तासनचे तास बेबीसीटरकडे बिनातक्रार राहातो व किल्ली सपल्यावरनतर आईच्या उबदार कुशीची अपेक्षा करीत आणि स्वत ला काय हवे ते केवळ सागता येत नाही म्हणून रडत झोपी जातो

नकळत केव्हिनचा निरागस चेहरा माझ्या नजरेसमोर तरळला खेळण्यातला गुबगुबीत ससा कुशीत घेऊन केव्हिन शात झोपला होता. एकाएकी तो झोपेत गोड हसला आणि हसता, हसता झोपेतच त्याच्या डोळ्यातून अश्रु पाझरू लागले मी एकदम स्वत शी पुटपुटले, 'अरे रडण्याची किल्ली कुणी फिरवली ?

२

# फोन अॅडिक्ट

९०० विद्यार्थी-विद्यार्थिनी आरामात राहू शकतील अशा सात मजली होस्टेलच्या तिसऱ्या मजल्यावरील तीनशे त्रेपन्न क्रमांकाच्या माझ्या खोलीसमोर आमच्या मजल्यावर राहाणाऱ्या मुलामुलींसाठी एक समाईक अभ्यासिका होती अभ्यासिकेतच इस्त्री करायचा टेबल असल्यामुळे, आठवड्यातून एकदा तरी मला त्या खोलीत पाऊल टाकावेच लागे आज रविवारच्या कामाच्या यादीतील मोठे काम झाले मशीनमध्ये कपडे धुवून, ड्रायरमध्ये सुकवून, मी अभ्यासिकेमध्ये पोहोचले बाल्कनीत नजर टाकली तर कोपऱ्यात, तो शून्यात नजर लावून, हातात पुस्तक घेऊन, समोरच्या टेबलावर वह्या कागदाचा पसारा घेऊन बसला होता त्याचे माझ्याकडे लक्षही नव्हते मजल्यावर राहाणाऱ्या मुलामुलींचे चेहरे, जाता येता भेटल्याने किंवा लिफ्टमध्ये, कॅफेटेरियात हाय- हॅलो बायच्या देवाणघेवाणीत लक्षात राहिले होते या मुलाचा चेहरा तर चांगलाच लक्षात राहिला होता. कारण मजल्यावरील ३६० क्रमांकाच्या शेवटच्या खोलीत तो राहत असे व त्याच्या रुमचे दार सतत उघडे असायचे लिफ्टकडे जाणारा दरवाजा त्याच्या रुमला लागून असल्याने नको असताही, कुतूहलाची नजर त्या उघड्या दारातून आत एक दोन क्षण फिरून येई कपडे अस्ताव्यस्त, भिंतीवर 'मॉडर्न आर्ट' सदरात मोडणारी दोन-तीन अगम्य चित्रे, टेबलावर वह्यापुस्तकाच्या जोडीला ब्रेड व जेलीजॅमच्या बाटल्या, उघडी कोकाकोलाची बाटली व फोनवर मग्न होऊन तावातावाने गप्पा मारणारा तो आज प्रथमच त्याला मी फोनशिवाय व अबोल पाहात होते गेल्या ५-६ महिन्यात ज्या, ज्या वेळी त्याच्या रुमच्या उघड्या दारातून तो दिसला तेव्हा फोनबरोबरच दिसला होता. इतक्यात फोनची घंटा ऐकू आली.

एकदा, दोनदा, तीनदा माझ्या विचाराची साखळी तुटली व तो दचकून उभा राहिला 'प्लीज, वॉच माय बुक्स, आय विल बी बॅक इन अ मिनिट' असे म्हणून तो रुमकडे धावला विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी होस्टेलच्या प्रत्येक खोलीत फोन असावा व फोनवर संभाषण करून प्रवासासाठी जागा आरक्षित करण्यापासून, परदेशी असणाऱ्या आईवडिलांशी बोलण्याइतपत कामे सुलभतेने व्हावीत याची मला सुरुवातीला अपूर्वाई वाटत असे माझ्या शेजारच्या खोलीतील मुलीला दिवसातून असंख्य वेळा व रात्री अपरात्रीही फोन डायल करताना ऐकले होते व तिची बोटे 'बायॉनिक' आहेत की, काय अशी शंकाही आली होती

मी इस्त्रीकडे वळले आता विजयला चित्रा सिंगचा आवाज व गजल आवडतात म्हणून मी त्या माझ्या सुरेल आवाजात तातडीने गुणगुणल्याच पाहिजेत का ? या विचाराने हसू फुटले व आठवणीचे पक्षी नऊशे मैल दूर असलेल्या विजयच्या नि माझ्या घरात पोहोंचले देखील पदवी पूर्ण करायचीय ना ? मग तडफडा असे स्वत शीच म्हणत, इस्त्री कपड्यावरून भराभरा फिरू लागली इस्त्री करून संपली दहा मिनिटे बाल्कनीत उभे राहून निसर्गही न्याहाळून झाला तरी या 'पसारा – किंग' मुलाचे फोनवरचे एक मिनिट संपले नव्हते अभ्यासाची तीव्रतेने आठवण झाल्याने मी चरफडत त्याची वह्यापुस्तके गोळा केली व त्याच्या रुमच्या उघड्या दारात जाऊन उभी राहिले 'ओह, सो स्वीट ऑफ यू, थँक्यू' असे म्हणून फोनवर दोन क्षण थांबविलेले संभाषण त्याने पुन सुरु केले व मी या मुलाकडे इतका रिकाम्या वेळ कसा असतो ? या प्रश्नाचा पाठलाग करीत, कपडे घेऊन रुममध्ये परतले त्याची, माझी झालेली ही पहिली अल्प ओळख

दिवस गतीने पळत होते नऊ आठवड्यानंतर नवीन टर्म सुरु होणार होती निसर्ग रंग बदलीत होता मिडटर्मच्या परीक्षा उरकून सुटकेचा निःश्वास टाकेपर्यंत फायनल्सचा आठवडा मेंदूचा दरवाजा ठोठावत उभा राहात होता आणि नऊ आठवड्याची टर्म म्हणजे फार लहान, ही हुरहुर संपण्याआधीच दुसरी टर्मही सुरु होत होती त्यानंतर त्याची-माझी भेट झाली नाही फक्त एकदाच दारावर टकटक करुन 'माय फोन इज डेड,

कॅन आय यूझ यूवर्स फॉर अ मिनिट ईट इज इम्पॉर्टंट' असे म्हणून, त्याचा मिनिट कसा अर्धा तासाचा असतो हे दाखवून, आभार मानीत तो निघून गेला होता

त्या दिवशी, लेक्चर्स सपवून मी होस्टेलवर परतले व तिसऱ्या मजल्यावर पोहोंचले तो, मजल्यावरची सारी मुले-मुली व आमच्या खोल्या आठवड्यातून एकदा स्वच्छ करणारी मेड – मेरी, त्याच्या खोलीसमोर हॉल–वे मध्ये उभे राहून केक खात होती मी तेथे पोहोचताच त्याने आनदाने उडी मारून माझी पुस्तके घेऊन बाजूला ठेवली व माझ्या हातात केकची प्लेट देऊन तो उत्साहाने सागू लागला, 'यू नो, आय ॲम अ फादर, अ डॅडी, अ पप्पा' मला वाटल त्याला मूल झाल्याची तार आली असावी व तो आपला आनद सर्वांबरोबर साजरा करीत असावा या विचाराने त्याचे अभिनदन करून मी केक खाऊ लागले एवढ्यात त्याने विचारले, 'डू यू वॉंट टू सी माय बेबी ?' माझी उत्सुकता वाढली, कदाचित बाळ व बाळाची आई रूममध्ये बसले असावेत म्हणून त्याच्यामागोमाग मी त्याच्या रूममध्ये प्रवेश केला माझ्या पाठोपाठ सारी मुले-मुलीही आत शिरली व समोरचा देखावा पाहून मी आश्चर्यचकित झाले त्याच्या रूमच्या मोठ्या खिडकीच्या रुद पट्टीवर एका रॉबिन पक्षिणीने घरटे बाधले होते व एका पिल्लाला जन्म दिला होता त्या पिल्लाचा जन्मदिन आज तो मुलगा अत्यानदाने साजरा करीत होता त्याने, कमालीच्या तत्परतेने त्या पक्षिणीच्या, त्याच्या रूममधील आगमनाच्या पहिल्या दिवसापासून ठेवलेल्या नोंदींची वही सर्वांना दाखविली पक्षिणीने घरटे कसे बाधले याची सचित्र क्रमवार माहिती त्याने लिहिली होती त्याच्या त्या आगळ्या आनदाबद्दल विचार करीतच मी रूमवर परतले

मानवी मन, सवेदना, भावना सगळीकडे सारख्याच त्वचेचा रग बदलला वा डोळ्यात आकाशाच्या निळाईचे हुबेहूब प्रतिबिब उमटले म्हणून 'कुणीतरी आपले असावे' ही गरज सपते का ? त्या रॉबिन पक्षिणीच्या जीवत अस्तित्वाने त्या मुलाच्या एकाकी आयुष्यात किती मोहक रग भरले होते वाईट एवढेच वाटले की, येथे बोलू शकणाऱ्या मानवाना, एकमेकाशी जवळीक साधता यावी, नात निर्माण करता याव इतपत

वेळ नाही हे निष्पाप, अबोल पक्षीही येथे नसते तर ?

पानाच्या गर्द हिरवेपणाची चोरी करून त्याच्या रुपावर गर्द केशरी नि लाल रंगाची उधळण करणारा, मिस्कील निसर्गाशी मित्रत्वाच्या गप्पा-गोष्टी करणारा, मला अत्यंत आवडणारा असा 'फॉल सीझन' आला अनेक वृक्षांची वाऱ्याने उधळलेली रंगीबेरंगी पाने जमा करून माझ्या जाडजूड संग्रहवहीत मी दडवून ठेवीत असतानाच हळू, हळू वृक्ष निष्पर्ण झाले अगदी शांत झाले वाऱ्यावर रागावले होते ते जणू

हिवाळ्याची चाहूल लागली, एके सकाळी खिडकीच्या काचेवर जमा झालेला बर्फाचा शुभ्र थर पाहिला रॉबिन पक्षीण पिलाला घेऊन निघून गेल्याचे मेरीने मला सांगितले होते कारण त्या मुलाची रूम स्वच्छ करताना ते रिकामे घरटे मेरीनेच उचलून फेकून दिले होते गारठलेल्या आसमंताला पाहून उगाचच एकाकीपणाची भावना तीव्र होऊ लागली हिवाळा रौद्र स्वरूप धारण करू लागला तपमान शून्याखाली ३० डिग्री,इतपत कमालीचे थंड झाले आणि अशाच एका अत्यंत थंड व धुक्याने अंधारलेल्या उदास दिवशी मला त्याच्या रूमसमोर पोलिस दिसले त्यांनी त्याचे निष्प्राण शरीर स्ट्रेचरवरून बाहेर आणले मजल्यावरील मुला-मुलींनी वर्गणी जमवून आणलेल्या शुभ्र फुलांचा गुच्छ त्याच्या उशाशी ठेवला व रॉबीन पक्षीणीच्या पिलाच्या डॅडीचा चेहरा, पांढऱ्या चादरीने पूर्णपणे झाकून पोलिस त्याच्या थंड शरीराला घेऊन गेले त्याने आत्म-हत्या केली होती

होस्टेलच्या, मुख्य हॉलच्या एका कोपऱ्यात त्याच्या स्मरणार्थ ठेव-लेली फुले आठ-दहा दिवस दिसली होती मी रोजच त्या फुलाकडे पाहत असे त्या दरम्यान बऱ्याच चर्चा मी ऐकल्या होत्या मुलेमुली बोलत होती की, दोन महिन्यापूर्वी त्याचे फोनचे बिल थकले म्हणून फोन कंपनीने त्याच्या रुममधील फोन डिसकनेक्ट केला होता तो मुलगा 'फोन-ॲडिक्ट' झाला होता सतत कुणा ना कुणाशी तरी बोलल्याशिवाय त्याला सुरक्षित वाटत नसे मासिकात, वर्तमानपत्रात पत्रमैत्रीसाठी असलेल्या जाहिरातींना तो उत्तर देई पत्रमैत्रीतून मित्र-मैत्रिणी जोडी, त्यांचे फोन नंबर्स मिळवी व सर्वांशी बोलत बसे तो एकाकी होता, कुणी त्याला आपले

म्हटले नव्हत, आपले मानले नव्हते. आपलेपणाच्या शोधात फोनची लाईन ही त्याची 'लाईफ- लाईन' बनली होती थकलेल्या दिलाची काळजी करणाऱ्या व त्यावरील उपायाची सत्वर अमलबजावणी करणाऱ्या या छोटया अमेरिकेत एकाकीपणाने थकून गेलेल्या मनाची काळजी करणारे कुणी, कुणी नसावे ना ?

हॉलमध्ये सुकत चाललेल्या फुलाकडे पाहताना त्याचे नावही समजले फुलाजवळ एक नोट ठेवली होती 'इन मेमरी ऑफ आवर डिअर सॅम' हिवाळा आला नसता तर ? कदाचित रॉबिन पक्षीणीचा त्याच्या खोलीतील मुक्काम वाढला असता त्याला सोबत मिळाली असती तिच्या पिलासबंधी वहीत नोंदी लिहीत, त्याचे एकाकीपण सुसह्य झाले असते पक्षीणी तुला जायलाच हवे होते का ग ? हा प्रश्न मनात येत असतानाच त्या सुकत चाललेल्या फुलातले एक फूल मी उचलले सजल नेत्रांनी रुममध्ये परतले नि 'फॉल--सीझन' मध्ये वृक्षाशी मस्ती करणाऱ्या वाऱ्याने, इतस्तत धरतीवर उधळून दिलेल्या अनेक रंगीबेरंगी पानाच्या संग्रहाच्या वहीत, ते सुकलेले फूल ठेवून दिले

♣

# ३

# भोवरा

दुपारी एक वाजता सराची वाट पाहात मी वर्गाच्या दारात उभी होते गेल्या चार टर्मसमध्ये सराची टीचिंग असिस्टंट म्हणून मी बी ए पर्यंतच्या वर्गांना, समाजशास्त्राचे वेगवेगळे विषय शिकविण्यास, सराना मदत केली या टर्ममध्ये विषय होता, 'सोशॉलॉजी ऑफ मेन्टल डिसऑर्डर' हा कोर्स घेण्यामागे विद्यार्थ्यांचा काय हेतू असावा हे जाणून घेण्याच्या उद्देशाने, टर्मच्या सुरवातीला, विद्यार्थ्यांकडून, एक, निनावी प्रश्नावली भरून घेतली वेड्याच्या हॉस्पिटलमध्ये कधी तुम्ही नोकरी केली का ? कधी कुणाला भेटायला गेला होता का ? अशा प्रश्नासोबत, कधी पेशंट म्हणून वेड्याच्या हॉस्पिटलमध्ये राहण्याचा प्रसंग तुमच्यावर आला होता का ? असाही एक प्रश्न होता या प्रश्नाला, तीन विद्यार्थ्यांनी होकारार्थी उत्तर दिले होते व स्वत चा अनुभव नमूद केला होता प्रश्नावलीवर, स्वत चे नाव लिहू नका, या सूचनेमुळे, हे तीन विद्यार्थी कोण असावेत हे कोडे सोडविण्याच्या प्रयत्नात, टर्मचे गेले पाच आठवडे मी प्रत्येक विद्यार्थ्याकडे सशयाने पाहात होते व सर माझी थट्टा करीत होते

आज लेक्चरच्या वेळी, 'प्रिझन फॉर क्रिमिनली इनसेन' ही मनोरुग्ण गुन्हेगाराच्या तुरुगात तयार केलेली फिल्म विद्यार्थ्यांना दाखवायची होती कम्युनिकेशन्स विभागातून फिल्म व प्रोजेक्टर घेऊन येणारा विद्यार्थी दिसतो का हे मी पाहात होत, आणि माझ्या वर्गातील एक विद्यार्थी जेफ, डोक्यावर प्रोजेक्टर घेऊन येताना मला दिसला वयाच्या सत्तेचाळीसाव्या वर्षी, तरूण मुलामुलींबरोबर, पदवी पूर्ण करण्याची उत्साही धडपड करणारा जेफ, दोन वर्षांपूर्वी तुरुगातून सुटला होता बँकेवर दरोडा घातला या आरोपाखाली, इतर साथीदाराबरोबर त्यालाही पचवीस वर्षांची

सजा झाली होती चांगल्या वागणुकीमुळे सजेमध्ये सवलत मिळून काही वर्षे आधीच तो तुरुंगातून बाहेर पडला बाहेर पडताच त्याला समजले की, त्याची पत्नी बेपत्ता आहे आणि एकाच वेळी तो तुरुंगातून, त्याचप्रमाणे व्यक्तीला घराशी बांधून ठेवणाऱ्या बंधनातून मुक्त झाला तुरुंगातील इतक्या वर्षांच्या वास्तव्याने तो नाउमेद झाला नव्हता निराश झाला नव्हता. थकून निरुद्देशतेकडेही झुकला नव्हता त्यामुळे त्याने स्वत च्या जीवनाला विधायक वळण देण्याचा निश्चय केला पुढील आयुष्यात कधीच कायदा मोडायचा नाही असे त्याने ठरविले आणि तुरुंगात काम करून साठविलेल्या पैशाचा उपयोग करून कॉलेजात नाव नोंदविले युनिव्ह-र्सिटीच्या अपार्टमेन्ट कॉम्प्लेक्समध्ये तो राहू लागला कष्टाची पर्वा न करता मिळेल ती कामे करणे, वीक एन्डला तुरुंगातील जवळच्या मित्रा-साठी फुलेफळे घेऊन भेटायला जाणे आणि अभ्यास करणे अशा चाकोरी-बद्ध रीतीने परंतु मस्त कलंदरासारखे जीवन घालवू लागला समाज-नियमाच्या चौकटीत जीवन जगताना इतके सुरक्षित वाटते हे तो प्रथमच अनुभवीत होता जेफ दिसायला खूपच हॅंडसम होता आयुष्याच्या मध्यावर-देखील कोणत्याही स्त्रीला बांधून ठेवतील असे भेदक,गर्द निळे डोळे व भरदार शरीरयष्टी त्याला लाभली होती त्याच्या गोऱ्यापान दंडावर गोंदलेला साप सर्वांचे लक्ष वेधून घेई तोंडात एक टूथपीक ठेवून ती ओठाच्या एका कोपऱ्या-पासून दुसऱ्या कोपऱ्यापर्यंत फिरवीत बसण्याचा चाळा तो करीत असे मला वाटते ही विचित्र सवय त्याला तुरुंगात असताना लागली असावी एकदा सराच्या परवानगीने त्याने,तो ज्या तुरुंगात होता त्या तुरुंगाच्या स्लाईडस वर्गात दाखविल्या व स्वत ची चित्तरकथाही सर्वांना ऐकविली जेफच्या भूतकाळामुळे कुणी त्याला वाळीत टाकले नाही किंवा नावे ठेवली नाहीत. व्यक्तिच्या एका गुन्ह्याची सजा, तिला या ना त्या प्रकारे आयुष्यभर भोगायला लावणे असे अतिरेकी संकेत येथे नाहीत सामाजिक कलंकाचा चेहरा देखील बदलू शकतो, असा निरोगी दृष्टिकोण येथे आहे आणि मला वाटते हेच खऱ्या प्रगतीचे लक्षण आहे हृदय परिवर्तन झालेल्या कैद्याला मानाने जीवन जगायला संधी मिळायला हवी व येथे ती मिळते प्रोजेक्टर घेऊन येणाऱ्या माझ्या प्रौढ विद्यार्थ्याबद्दल असा विचार करीत असतानाच जेफ माझ्यासमोर येऊन उभा राहिला व स्मितहास्य करीत म्हणाला,

'हॅलो, मिस्टिक ब्यूटी, यू, नो मी कोणती फिल्म घेऊन आलो आहे ? ब्लू फिल्म' माझी गमत करण्याच्या हेतूने तो नेहमीच असे काहीतरी बोले अमेरिकेच्या वातावरणात न वसणाऱ्या माझ्या बाळबोध वागणुकीमुळे माझी अशी फिरकी घेण्यात त्याला मजा वाटत असे इतक्यात सर आले, कागदाचा एक तुकडा माझ्या हातात देत म्हणाले, 'मला एका महत्त्वाच्या मिटींगला जायचे आहे तू क्लास मॅनेज कर हा पोलिसाचा फोन नवर व हा ॲम्ब्युलन्सचा हातातील कागदावर लिहीलेल्या क्रमाकाकडे प्रश्नाकित नजरेने पाहणाऱ्या माझ्या चेहऱ्याकडे पाहात सरानी सागितले, 'आजच्या फिल्ममधील काही काही दृश्ये पाहून कुणी विद्यार्थी बेशुद्ध होण्याची शक्यता नाकारता येत नाही तेव्हा तसे काही घडले तर पोलिसाच्या मदतीने ॲम्ब्युलन्स बोलावून घे व बेशुद्ध विद्यार्थ्याला हॉस्पिटलमध्ये घेऊन जा' आणि, सर मी बेशुद्ध पडले तर ? हा माझा प्रश्न ऐकण्याआधीच सर घाईने निघून गेले

वर्गात जाऊन, प्रस्तावना सपवून फिल्म दाखवायला सुरवात केली सुदैवाने कोणी बेशुद्ध न पडता एका तासाने फिल्म सपली व मी सुटकेचा निश्वास टाकला सरानी सागितल्याप्रमाणे फिल्ममधील काही दृश्ये खरोखरी अगावर शहारे आणणारी होती प्राथमिक व अतिगभीर स्वरुपाचे मनोविकार असणारे कैदी या तुरुगाच्या एकाच छताखाली राहायला येत, तेव्हा सर्वांचे कपडे काढून त्याना नग्न केले जाई व त्याच्या वास्तव्यातील सर्व दिवस त्याना त्या अवस्थेतच राहावे लागे काही वेडे गुन्हेगार सातत्याने अगावरच्या कपड्याच्या चिंध्या करीत आर्थिक नुकसानीचा अदाज घेता लक्षात आले की, त्याना वारवार कपडे पुरविण्याचा खर्च सरकारला परवडत नाही त्यावरचा उपाय म्हणून त्याना अशा 'ओरिजनल ड्रेस' मध्ये ठेवण्यात आले होते

समाजाचे नियम, कायदेकानू धाब्यावर बसवून व्यक्ति जेव्हा गुन्हेगार होते तेव्हाच कमरेचे सोडून डोक्याला गुडाळण्याइतपत ती निडर, निर्लज्ज बनलेली असते आणि हे जरी खरे असले तरी ज्याच्या सर्व जाणीवा अजूनही विकाराधीन झालेल्या नाहीत अशा प्राथमिक स्वरूपाचे मनोविकार झालेल्या कैद्याचे, या लादलेल्या नग्नतेमुळे 'डिह्यूमनायझेशन' होते व त्यामुळे त्याच्यावर होणारे उपाय सर्वस्वी

लागू पडणार नाहीत,हे तुरुगातील अधिकारी,मनोविकारतज्ञ किंवा सोशल वर्कर याच्या लक्षात कसे येत नाही? मी विचार करीत होते फिल्मधील एक दृश्य, भयानक होते अगावर कपडे घालायला मिळावेत म्हणून सतत तीन दिवस उपाशी राहिलेल्या कैद्याला चार शिपायानी पकडून टेबलावर झोपविले एकाने अमानुषपणे, एक प्लॅस्टिकची नळी त्याच्या घशात कोबली व दुस-ऱ्याने नळीच्या दुसऱ्या टोकावर नरसाळे बसवून, त्यातून गरम, गरम सूप भसाभसा ओतले त्या क्षणी, कैद्याच्या चेहऱ्यावर उमटलेल्या वेदना पाहून वाटले,या तुरुगात पावलो पावली कैद्याना जर अमानवीकरणाच्या अशा क्रूर पद्धतीना तोंड द्यावे लागणार असेल,तर सर्व जाणीवाच्या पलीकडे जाऊन व्यक्ति पूर्णपणे वेडी झाली नाही तरच नवल या कैद्याना खरे वाटावे, सजा भोगून होताच त्यानी परत समाजात जावे त्याच्या पुनर्वसनाला सरकारने, लोकानी मदत करावी हा जर ' कम्युनिटी - केअर' प्रकल्पाचा प्रधान हेतू आहे तर या अशा अमानुष पद्धतीचा अवलब केल्याने गुन्हेगार व बाहेरचे जग याच्यातील भिंत कधी तरी नष्ट होईल का ? परतु अभा-वानेच का होईना जेफसारखी व्यक्ती भेटल्यावर ह्याबाबतीत आशेचा किरण दिसू लागतो व वाटू लागते, सर्वच गुन्हेगाराना स्वत चा एखादा उपसमाज वा उपसस्कृती तयार करून जगावे लागणार नाही

टर्म चालू असताना, सराच्या परवानगीने, त्याच्या ऑफिसरुमच्या बुलेटिन बोर्डवर अधून - मधून जेफ वर्तमान पत्रातील बातम्याची कात्रणे आणून लावीत असे एका कात्रणात होते, क्ष मुलीच्या एक्स बॉयफ्रेन्डच्या सध्याच्या मैत्रीणीला, क्ष मुलीने सतत धमकीवजा फोन करून, पत्र लिहून तिचे जगणे असह्य करून टाकले म्हणून पोलिसाचा या केसमध्ये हस्तक्षेप दुसरे कात्रण होते, एका स्त्रीच्या पतीचा, पतीच्या एक्स-प्रेयसीने निर्घृण खून केला, मृत देह कबरेतून चोरून नेणार आहे अशी धमकी देणारे फोन करून या विधवा, दु खी, एकाकी स्त्रीला वेडे करण्याचा प्रयत्न केला म्हणून पतीच्या एक्स-प्रेयसीला अटक झाली जेफ अशाच प्रकारच्या बातम्याची कात्रणे का लावतो ह्याबद्दल मला कुतुहल वाटू लागले म्हणून एकदा जेफला विचारले, 'जेफ, अशा बातम्यामध्ये तुला रस का वाटतो ? तर त्याचे उत्तर होते, 'अशा वर्तनाला 'ऑब्सेसिव्ह कम्पलसिव्ह' वर्तन म्हणतात आपल्या

प्रियकराला वा प्रेयसीला स्वत च्या मालकी हक्काची वस्तु मानणे व तिला कुणी हिरावून घेण्याचा प्रयत्न केला तर तसा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तीला निष्ठुरपणे दुखाविणे, शारिरीक इजा करणे, मानसिक त्रास देऊन वेडे करण्याचा प्रयत्न करणे असे प्रकार ह्या वर्तणुकीत मोडतात अशा विचारानी काही व्यक्ति इतक्या का झपाटल्या जातात याचे मला फार कुतुहल वाटते राजाराणीच्या गोष्टीत कधीही खलनायकाचा प्रवेश होऊ नये असे वाटणे साहजिक आहे पण तसे घडले तर निरपराध व्यक्तीवर अन्याय का करायचा ? मैत्री म्हणजे विश्वासाची, जीवनमूल्याची, अपेक्षाची, वास्तवतेच्या जाणीवाची एक प्रामाणिक भागीदारी असते ज्यामुळे सघर्ष, मानसिक तणाव, गोंधळलेल्या वृत्तींचा अत व्हायला मदत व्हावी पण तसे होत नसेल तर मग मित्रत्त्वाचा काय फायदा ? व्हॉट डू यू थिंक उषा ? मी त्याला उत्तर देऊ शकले नाही मात्र जेफन केलेल्या मैत्रीच्या व्याख्येतून त्याचा जीवनानुभव प्रगट होतोय हे मला जाणवल

टर्म सपली तरी जफ अधून-मधून डिपार्टमेंटमध्ये येऊन माझी भेट घेऊन स्वत ची प्रगती सागे स्वत चा पत्ता व फोन नवरही त्याने न विसरता मला दिला होता मध्यतरी, तुरुगातून सुटलेल्या आपल्या जवळच्या मित्राला घेऊन जेफ मला भेटायला आला व तो प्रेमात पडल्याची आनदाची बातमी त्याने मला ऐकविली. बेपत्ता व्यक्तिचा शोध घेणाऱ्या एजन्सीमार्फत बरेच प्रयत्न करून व त्यासाठी खूप पैसा खर्च करूनही त्याच्या पत्नीचा शोध लागला नव्हता शेवटी मित्राच्या आग्रहाला, व स्वत च्या एकाकीपणाला शरण जाऊन त्याने एका मुलीच्या स्नेहाला प्रतिसाद दिला जेफची मैत्रीण मिशाल, लॉ विभागाच्या लायब्ररीत काम करून 'क्रिमीनल-लॉ' या विषयात पदवी पूर्ण करीत होती जेफ गमतीने म्हणाला, 'पुन गुन्हा करताना करताना सापडलो तर घरचा वकील असलेला बरा, खर्च वाचेल' आणि लगेचच भानावर येत गभीरपणे बोलू लागला, 'पुन हे हात कधी गुन्ह्याने रगणार नाहीत या हातानी कष्ट करून मी मानाने जीवन जगणार आहे यू नो उषा, तुरुगात असताना प्रत्येक दिवशी हात जोडून परमेश्वराकडे एकच प्रार्थना करीत असे की, हे देवा बाहेरच्या जगात 'नॉर्मल ह्यूमन बिईंग ' म्हणून जगण्याची फक्त एकदाच सधी दे.

ही संधी मी वाया घालविणार नाही ट्रस्ट मी उषा' जेफच्या निळ्या डोळ्यात कुठेतरी सच्चाई दिसे, प्रामाणिकता जाणवे व मला समाधान वाटे मिशाल जीवनात आल्यामुळे जेफचे समाजातील पुनर्वसन यशस्वी होण्याच्या मार्गावर आहे असे मला वाटू लागले

त्यानतर सहा महिन्यासाठी मी दुसऱ्या विद्यापीठात स्पेशल कोर्स करायला गेले परत आल्यावर एके दिवशी सहज आठवण आली म्हणून त्याने दिलेल्या नबरवर मी फोन केला जेफच्या रुममेटने फोन घेतला व म्हणाला, गेले चार महिने तो हॉस्पिटलमध्ये आहे व त्याने हॉस्पिटलचा पत्ता सागितला पत्ता लिहून घेताना मी कमालीची दचकले जेफ ॲडमिट होता ते मेन्टल हॉस्पिटल होते त्या सध्याकाळी मी हॉस्पिटलमध्ये गेले जेफच्या हातात फुले दिली त्याच्या त्या बाधून ठेवणाऱ्या निळ्या डोळ्यात कुठेही परिचयाची पुसटशी खूण देखील उमटली नाही ते जाणवून मला गलबलून आले जेफला भेटायला आलेल्या त्याच्या तुरुगातील जवळच्या मित्राने मला बाहेरच्या बागेत नेऊन जेफ या अवस्थेला कसा पोहचला ती कहाणी सागितली माझ्या कोर्सचा अभ्यासक्रम सपल्यानतर दुसऱ्या टर्ममध्ये जेफने सशोधन पद्धतीवरील कोर्स घेतला सरानी त्याला व वर्गातील एका मुलीला मिळून एक रिसर्च-प्रोजेक्ट पूर्ण करायला सागितले अभ्यासाच्या निमित्ताने, जेफने या मुलीला वारवार भेटावे हे मिशालला सहन होईना ईर्ष्येने पेटलेल्या मत्सरी मिशालने परिणामाचा थोडासुद्धा विचार न करता एका कराटे शिकलेल्या हायस्कूलच्या मुलाला पैसे देऊन जेफवर पाळत ठेवायला सागितले एके सध्याकाळी जेफ त्याच्या वर्गमैत्रीणीसह अपार्टमेंटमध्ये रिसर्च प्रोजेक्टचा फायनल ड्राफ्ट सपवीत असता हा मुलगा खिडकीतून डोकावताना दिसला जेफने त्याला पकडले स्वत च्या बचावासाठी त्या मुलाने आपल्या कराटे ट्रेनिगचा अवास्तव उपयोग केला मारामारीमध्ये जेफचे डोके जोराने जमिनीवर आदळून तो बेशुद्ध झाला वर्गमैत्रीणीच्या प्रसगावधानाने जेफला लगेच हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले मेदूला लागलेल्या जबरदस्त धक्क्याने व अतर्गत रक्तस्त्रावाने त्याची स्मृती गेली डॉक्टर त्याला बरे करण्याचे आपल्या परीने सर्व प्रयत्न करीत होते परतु अजून तरी जेफ ठीक होण्याचे लक्षण नाही जेफची ही कहाणी

एकून माझ्या मनात विचार आला की, जेफला नहमी 'ऑब्सेसिव्ह-कम्पल-सिव्ह' वर्तनाचे कुतुहल वाटे व आज तशाच वागण्याचे परिणाम तो भोगीत आहे प्रेमाच्या आणाभाका घेऊन मिशालने जेफचा हात पकडला आणि क्षणाचाही विचार न करता त्याला विस्मृतीच्या अधारात ढकलून दिले. व्यक्तिच्या स्वभावात असा शुष्क कोरडेपणा अचानक कोठून येत असावा? कोणत्याही सबधाला आत्मीयतेने पकडून ठेवण्याइतपत निरोगी मानसिकता जोपर्यंत व्यक्तिच्या ठायी निर्माण होत नाही तोपर्यंत स्नेहाला सुरक्षितता कशी लाभणार ? मेंटल हॉस्पिटलमधल्या जेफने अनेक प्रश्न माझ्या समोर निर्माण केले होते मी मिशालसबधी चौकशी केली जेफच्या मित्रानेच मला तिची माहिती पुरविली

युनिव्हर्सिटी अपार्टमन्ट कॉम्प्लेक्समध्ये राहाणाऱ्या विद्यार्थ्यांवर प्राणघातक हल्ला झाल्यामुळे या प्रकरणाची अत्यत जलद गतीने पुरेपूर चौकशी झाली हायस्कूलमधील तो कराटे चॅम्पियन मुलगा व मिशालला अटक झाली हायस्कूलमधील मुलाला बालगुन्हेगारासाठी असलेल्या सुधारगृहात काही महिन्यासाठी पाठविण्यात आले मिशालने आपली चूक स्वीकारल्याने व तिला 'सिच्युएशनल क्रिमिनल' ठरविल्यामुळे दहा वर्षाच्या प्रोबेशनची सजा मिळाली दहा वर्षांतील सर्व वीक-एन्डस् तिला तुरुगात राहावे लागणार आहे व बाहेर असताना आठवड्यातील काही तास सक्तीने कम्युनिटी-सर्व्हिस करावी लागणार आहे कम्युनिटी सर्व्हिसच्या पूर्ततेचा भाग म्हणून हल्ली मिशाल नियमितपणे जेफला भेटायला येते मनोभावे त्याची शुश्रूषा करते व त्या दिवसाची कम्युनिटी-सर्व्हिस हॉस्पिटलमध्ये पूर्ण केली म्हणून पोलिसाना द्यायच्या फॉर्मवर, त्या तारखेला हॉस्पिटलच्या नर्सची सही घेते मिशालची हकीकत ऐकून मी क्षणभर अवाक् झाले मिशाल सारख्या व्यक्ति स्वभावत गुन्हेगार नसतात त्यामुळे सराईत किंवा धदेवाईक गुन्हेगाराप्रमाणे अशा व्यक्तिला तुरुगात ठेवून कोणताही सामाजिक हेतु साध्य होत नाही न्यायासबधी समाजाची अपेक्षा पूर्ण होण्यापेक्षा, सबधीत व्यक्तीला स्वत च्या अयोग्य कृत्याबद्दल योग्य सजा मिळणे मला तर्कसगत वाटत होते

काही दिवसानी मी पुन जेफच्या समाचाराला गेले तेव्हा योगा-योगाने मिशाल तेथे भेटली तिने माझ्याजवळ तिच्या चुकीची कबुली

दिली ती म्हणाली, 'जेफवर मी विनाकारण अविश्वास दाखविला प्रेमाचा मान राखणे म्हणजे व्यक्तिवरील विश्वासाचा मान राखणे प्रेमात असलेल्या व्यक्तींनी एकमेकाच्या प्रगतीसाठी आवश्यक ती 'पर्सनल स्पेस' प्रेमिकानी आपल्या नातेसबधात ठेवायला हवी हे योग्य अतर निभावण्याची कला जिला साधते ती व्यक्ती खरी सुसस्कृत अभ्यासाच्या निमित्ताने दुसरी स्त्री काही काळ जेफच्या आयुष्यात आली याचा अर्थ असा नव्हता की, तो माझ्याकडे दुर्लक्ष करीत होता किंवा मी त्याच्या मैत्रीच्या योग्य नाही असे सुचवीत होता मैत्री म्हणजे काय ? प्रेम म्हणजे काय ? ते मलाच खऱ्या अर्थाने उमगले नव्हते माझे वास्तवतेचे भान फक्त स्वत भोवती केन्द्रीत झाल्याने अवास्तव बनले होते त्यामुळे माझ्या नकळत मी सत्याला नाकारत होते माझे त्याच्याशी वागणे योग्य नव्हते मी त्याच्यावर हल्ला करविला हे तर अधिक अयोग्य होते मी जे प्रेम समजत होते तो माझा स्वार्थ होता मी पझेसिव्ह बनले होते डोळ्याना स्वार्थाचे झापड बाधून चालणाऱ्या, सारासार विचार करू न शकणाऱ्या माझ्यासारख्या व्यक्ति, जेफ सारख्याचे स्वप्न उध्वस्त करून टाकतात पाहिलस उषा, अशी 'अनवर्केबल स्ट्रॅटेजी' घेऊन मी यशस्वी जीवन कसे जगणार होते ? हल्ली मी माझ्या मनोव्यापारातील त्रुटीचा अभ्यास करून त्यावर उपाय शोधण्यासाठी मानसशास्त्रज्ञाचा सल्ला घेण्याचा विचार करते आहे.' मिशालचे हे बोलणे ऐकून मला वाटले तिच्या अविचारी कृत्यानेच तिला स्वत कडे विचारी दृष्टीने बघण्याची दृष्टी दिलीय त्याक्षणी मला मनापासून वाटले की, ही दृष्टी खरी असेल तर जेफच्या आयुष्यातला विस्मृतीचा अधकार क्षणात उजळून स्मृतीत परावर्तित व्हावा

जफची शुश्रूषा करणाऱ्या मिशालचा, तसेच अनोळखी नजरेने माझ्याकडे पाहाणाऱ्या जेफचा निरोप घेऊन मी हॉस्पिटलच्या बाहेर पडले विद्यापीठातून वाहणाऱ्या नदीच्या पुलावर केव्हा येऊन पोहोंचले ते मला समजलेही नाही जेफच्या आयुष्यातील घटनाबाबत विचार करण्यात मी गुगून गेले होते मावळत्या सूर्याचे प्रतिबिंब नदीच्या पाण्यात पडले होते पुलाच्या कठड्याला रेलून मी पाण्याचा प्रवाहाकडे पाहू लागले पाण्यात पडलेल्या सूर्याच्या प्रतिबिंबात

मला का कोण जाणे नदीला पूर आल्यावर तयार होणारा, आपल्या परिघात येणाऱ्या सर्वांना वेगाने आपल्या गतीत ओढून घेणारा भोवरा दिसू लागला त्या वेगवान भोवऱ्यात अनेक भोवरे तयार झाले एक भोवरा होता मिशालच्या प्रेमाचा, त्यात स्मृती हरवलेला जेफ गिरक्या घेतोय, त्याला त्यातून बाहेर पडता येत नाहीय अनेक भोवरे नजरेसमोर तरळू लागले मिशालने नकळत स्वतःसाठी तयार केलेला भोवरा समाजाच्या भोवऱ्यात सापडलेली व्यक्ती, व्यक्तिच्या भोवऱ्यात सापडलेला समाज, अशाप्रकारे विचाराच्या भोवऱ्यात असतानाच माझ्याजवळ एक कार येऊन थांबली भानावर येऊन पाहिले तर कारचा दरवाजा उघडीत जेफचा मित्र म्हणत होता 'टीचर चला, तुम्हाला होस्टेलवर ड्रॉप करतो ' मी कारमध्ये बसले,कार सुरु झाली कारमधील व्यक्तिकडे संकेत करीत जेफ म्हणाला, 'मीट माय फ्रेन्ड,ही इज रिकव्हरिंग अल्कोहॉलिक,त्याच्याबरोबर आज मीही अल्कोहॉलिक ॲनॉनिमसची मीटींग अटेन्ड करून आलोय मला खात्री आहे, माझी मैत्री, त्याला व्यसनमुक्त होण्यासाठी मदत करील आफ्टरऑल व्हॉट आर फ्रेन्डस् फॉर ?'

जेफच्या मित्राचे ते शब्द ऐकून मी पुन विचारात हरवले स्वतःची नवी ओळख तयार करण्याच्या प्रयत्नात स्वतःची स्मृती हरवून बसलेला जेफ, स्वतःच्या खऱ्या परिचयाच्या शोधात असलेली मिशाल, दारूच्या नशेपेक्षा जीवनाची नशा कितपत नशा आणतेय हे पाहण्याचा प्रयत्नातला जेफच्या मित्राचा मित्र आणि मला माहित नसलेले असे कितीतरी जण असतील मला वाटत होत माझ्या डोळ्यासमोरच्या भोवऱ्याचा गतीचा वेग वाढतोय माझ्या डोळ्यात तरळलेल्या पाण्यात वेगवान भोवरा तयार होतोय

♣

४

# प्रिझन पेन पॅल

इच्छा नसतानाही जागे व्हावे लागले वीक-एन्ड साठी राखून ठेवलेली कामे सपविणे भाग होते. गर्दी होण्याच्या आत लॉन्ड्री-रुममधील चागली मशीन पटकावून कपडे धुवायचे, लॉन्ड्री होता, होता आईला पत्र लिहायचे व पत्र टाकायला होस्टेलच्या पहिल्या मजल्यावर असणाऱ्या पत्रपेटीकडे जाता जाता कॉफी, केक घेऊन लॉन्ड्री रुममध्ये परतायचे म्हणजे वेळ वाचेल असे ठरवून; कपड्याचे ओझे घेऊन लिफ्टने बेसमेन्ट-मध्ये पोहचले कपडे धुण्याच्या मशीनच्या स्लॉटमध्ये टाकायला पर्समध्ये नाणी शोधताना एक क्वार्टर कमी पडतोय हे लक्षात आले, एक डॉलरची मोड आणायला पहिल्या मजल्यावरील रिसेप्शन डेस्कपर्यंत जाणे भाग पडले तेथे पोहचले तोच, 'व्हेरी , व्हेरी गुडमॉनिंग उषा' असा मॉलीचा अधीरा स्वर कानी आला हातात निळा लिफाफा नाचवित ती पत्रपेटी-कडे येत होती शनिवारच्या सकाळी, मॉलीचे, इतक्या लवकर उठणे म्हणजे महद्‌आश्चर्य तिच्यावरोबर बोलताना समजले की, निळ्या पाकिटातील खास पत्र, तिने तिच्या प्रिझन पेन पॅल साठी, रात्री जागून लिहिले होते व नऊ वाजता पोस्टमन पत्र न्यायला येण्यापूर्वी तिला ते पोस्ट करायचे होते पत्र पोस्ट करून ती निघून गेली व पत्रमैत्रीच्या या आगळ्या प्रकाराबाद्दल विचार करीत मी कपडे धुण्यासाठी लॉन्ड्री रुम-मध्ये आले

मशीनमध्ये कपडे टाकले पत्रलिखणास सुरुवात केली. प्रिय, आईस हे शब्द लिहून होताच,विचार पुन्हा'प्रिझन पेन पॅल'या शब्दाकडे धावू लागले. पत्रमैत्री करणारे बरेच विद्यार्थी, विद्यार्थिनी मला माहित होते. पण मॉलीने कैद्याशी पत्रमैत्री का केली असावी? हा प्रश्न मला पडला मॉली एक

बगळीच मुलगी होती तीही समाजशास्त्राचीच विद्यार्थिनी असल्याने आम्ही बरेच आवश्यक कोर्सेस एकत्र घेतले होते. त्यातील जवळ, जवळ निम्मे मॉलीला अजूनही पूर्ण करायचे होते टर्म संपायच्या दोन आठवडे आधीच हा कोर्स मी इनकम्प्लीट घेणार असे मॉली जाहीर करून टाके या टर्ममध्ये समाजशास्त्रज्ञ 'हावरमास' हा कोर्स मॉलीने, केवळ सराचे तेजस्वी निळे डोळे आवडतात म्हणून घेतला होता विचारसरणी तत्वज्ञान, भाषाशैली इत्यादी पैलूमधून अभ्यास करताना, हाबरमास किती अवघड विचारवंत आहे हे मला उमगत होते. पण तासाच्या पचावन्न मिनिटात मॉली, सराच्या बोलण्याकडे लक्ष देण्याएवजी त्याच्या डोळ्यात हरवून जायची मागच्या उन्हाळ्यात, तिने गमत म्हणून ऑपेरासिंगिंगचा कोर्स घेतला होता मी तिला बऱ्याचदा बेसमेन्टच्या म्युझिकरूममध्ये, दिवे ऑफ करून, काळा चष्मा लावून, ऑपेरा गाण्याची प्रॅक्टीस करताना ऐकले होते काळा चष्मा लावण्याचे कारणही मी न विचारता तिनेच सागून टाकले होते, 'तुला माहिती आहे का ? सगळे फेमस ब्लॅक सिंगर्स काळा चष्मा लावतात त्यामुळे मीही काळा चष्मा लावून ऑपेरा गाते' पाच आठवड्याच्या शॉर्ट कोर्समध्ये फेमस ऑपेरा सिंगर होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या मॉलीचे डोके ठिकाणावर तर आहे ना ? अशी शंकाही मला येत असे गेल्या दोन वर्षांत तिने किती मुलाशी मैत्री करावी याला तर गणतीच नव्हती मित्राने थोडा जरी विरोध केला तर ती मैत्री तोडून टाकीत असे काही दिवसापूर्वी एका गणिताच्या विद्यार्थ्याबरोबर मात्र तिने पाच आठवडे सिरीयस मैत्री केली होती त्या टर्ममध्ये तिने कोर्सही पूर्ण केला होता त्यावेळी परीक्षेचे टर्म-पेपर लिहिताना लागणारी रेफरन्स बुक्स शोधायला, माझ्याबरोबर अनेकदा ती चक्क लायब्ररीतही आली होती

इकडे टर्म सपल्यानतर तीन दिवसाची सुट्टी असते अशाच सुट्टीच्या काळात एका सायकाळी कॅफेटेरियाच्या कोपऱ्यात उदास चेहऱ्याने बसलेली मॉली मला दिसली मी जवळ जाऊन 'हॅलो' म्हणताच तिचे डोळे भरून आले गणिताच्या विद्यार्थ्याबरोबर, तिची मैत्री तुटली होती कारण साधे होते अभ्यासामुळे तो बिझी होता व एक आठवडा मॉलीला भेटू

शकणार नव्हता मॉलीला ती तडजोड पटत नव्हती, पसत नव्हती व कर-ताही येत नव्हती मॉलीच्या स्वभावातील या विचित्र चचलतेमुळे तिला जीवनाकडे गभीरपणे पाहाता येत नव्हते मी तिची समजूत काढीत म्हटले, 'आयुष्यात व्यक्तिला केव्हातरी तडजोड करावीच लागते मॉली, किती दिवस, तू आयुष्याकडे गमत म्हणून पाहणार ? केव्हातरी तुला कमिट-मेन्ट म्हणजे काय हे शिकावे लागेल, गणिताच्या विद्यार्थ्याला जर स्वत च्या अभ्यासासबधीच्या प्रायॉरिटीज महत्त्वाच्या वाटतात, तर तुलाही तुझ्या ठरवायला नकोत का ? फायदा-तोटा ,या समीकरणात जर तू मैत्री शोध-तेस तर त्या मुलाच्या वेयक्तिक हक्कावर अधिकार गाजविणे तुला पटते का ?' त्या सध्याकाळी बराच वेळ मी मॉलीशी बोलत होते

माझे बोलणे तिला पटत असावे कारण त्यानतर तिची दिनचर्या बदलली, अभ्यासाच्या बाबतीत ती सिरीयस झालेली दिसू लागली, तिचे बॉयफ्रेन्डचे वेडही कमी झाले योग्य मार्गदर्शनाचा अभाव, मायेच्या बाबतीत लहानपणी झालेली उपेक्षा,मुलींनी आकर्षक दिसले पाहिजे,इत्यादी मुलीवर होणारे सस्कार, त्यामुळे ज्युनियर हायस्कूलच्या उबरठ्यावरच बॉयफ्रेन्डसाठी कासावीस होणारे अर्धोन्मिलीत कळ्यांचे अबोध तारूण्य, अशी एक ना अनेक कारणे मॉलीसारख्या मुली बिघडविण्यासाठी इथे कार-णीभूत ठरू शकतात या तरूण-तरुणीमध्ये कुठलीही स्थिरता नाही,विचारात आचारात,, स्वप्न बघण्यात वा स्वप्न साकार करण्यातही नाही कशा-वरही आणि कोणावरही विश्वास नाही, कारण नाजूक वयातच अनुभव-विश्वात भल्याबुऱ्या अनुभवाची गर्दी झालेली असते अतर्मनात असख्य सघर्ष चाललेले असतात परिणामी वाढते 'कन्फ्युजन' आकर्षक, देखणी, बऱ्याच अशी बुद्धीमान व कष्ट करण्याची तयारी असलेली ही मुले-मुली अशी अस्थिरतेच्या वावटळीत सापडून भरकटून तर जाणार नाहीत ना ? या विचाराने माझे मन खिन्न होई मॉलीसारख्या मुलीला, कैद्याशी पत्र-मैत्री का करावीशी वाटते ? तस पाहिल तर कुणाला तरी प्रेम, सहानुभूती आपुलकी द्यावी ही एक उपजत मानवी इच्छा आणि कुणाच्या तरी जीव-नात आपल्याला महत्त्वाचे निकटतम स्थान असावे ही सहजसुलभ मानवी भूक, पण त्यासाठी तिन कैदी का निवडावा? हे मला कळेना बुधवारी

दुपारी एक ते तीन या वेळात मॉली व मी एका क्लासला एकत्र बसणार होतो, तेव्हा तिला ह्याबद्दल विचारायचे असे ठरवून मी माझे घरगुती पत्र पूर्ण करू लागले

बुधवार आला, क्लासमध्ये विशेष बोलता आले नाही. पण क्लास सपताच, मॉलीने मला राईड हवी आहे का? विचारले तिने कार घेत-ल्याचे मला माहित नव्हते माझा प्रश्नाकित चेहरा पाहून ती म्हणाली, 'आज काही तासासाठी सुझनची कार मागून घेतली आहे, चल.' आम्ही निघालो पार्किग लॉटकडे जाताना तिने विचारले, 'ज्युव्हेनाईल डिटेन्शन सेन्टरमध्ये फक्त दहा मिनिटे थाबायचे आहे, तुला चालेल ना ?' मी होकारार्थी मान हलविली मी, माझ्या सशोधनासाठी बालगुन्हेगारी हा विषय निवडायचा विचार करीत होते त्यामुळे हे केन्द्र पाहण्याची मला उत्सुकता होती तेथे पोहोचल्यावर आम्ही रिसेप्शन हॉलमध्ये गेलो काचेच्या पलीकडे गुन्हेगार व अलिकडे त्याना भेटायला आलेल्या व्यक्ति दिसल्या मॉलीने,गार्डला कुणाला भेटायचे हे सागितले व तेव्हाच तिच्या-कडून मला समजले की, जॅक हा तिचा प्रिझन पेन पॅल होता काही मिनि-टानी जॅक काचेच्या पलिकडे येऊन उभा राहिला आतून त्याने त्याचा हात काचेवर ठेवला व बाहेरच्या बाजूने मॉलीने तिचा हात,त्याच्या हाता-वर ठेवला दोघाच्या स्पर्शाने ती काच मात्र धूसर झाली स्पर्शाची भूक , त्या निर्जीव काचेला कधी जाणवणार होती का ? मॉली उत्साहाने जॅकशी बोलत होती तिने त्याच्यासाठी वाचायला आणलेली पुस्तके व चॉकलेटस् गार्डकडे दिली गार्डने ती चेक करून जॅकच्या हाती दिली जॅकच्या थॅक्यू म्हणाला त्याची व्यथित नजर मॉलीच्या नजरेत मिसळली व भेटीची वेळ सपली आम्ही परत निघालो परतताना पाहिले, एका खोलीत, सोशल वर्कर एका बालगुन्हेगाराशी बोलत काही लिहून घेत होती होस्टेलमध्ये परतताना मॉलीने सागितले की, काही आठवड्या-पूर्वी क्रिमिनल जस्टिस विभागाच्या बुलेटिन बोर्डवर तिला प्रिझन पेन पॅल सबधी जाहिरात दिसली व त्या जाहिरातीला प्रतिसाद देऊन तिने जॅकशी पत्रमैत्री केली आज ती त्याला तिसऱ्यादा भेटत होती जॅकला आपण, आनद, आत्मीयता देत आहोत, म्हणजे जीवनात काहीतरी 'वर्थव्हाईल'

करतो आहोत हे आगळे समाधान मॉलीच्या शब्दातून जाणवत होते.

त्यानतर एकदोन वळा, मी, मॉलीबरोबर बालगुन्हेगार केन्द्रात गेले होते मॉलीबरोबर झालेल्या सभाषणातून, जॅककडून सहा महिन्याच्या मुलीचा खून झाल्याचे समजले होते जॅकच्या वयामुळे त्याला ॲडल्ट प्रिझनर म्हणून सजा द्यायची की, बालगुन्हेगार म्हणून? यावर कोर्टाचा निर्णय झाला नव्हता तो निर्णय होईपर्यंत जॅक या केन्द्रात राहणार होता गेल्या दोन वर्षातील सहवासाने मला पूर्ण कळाले होते की, मॉलीच्य अतरगाचा एक अत्यत कोमल कोपरा,मायेचा भुकेला आहे उत्कट स्वभावाच्या मनस्वी मॉलीने कैद्याशी मैत्री करावी या घटनेकडे स्वच्छ, निरोगी दृष्टिकोणातून पाहणारे येथील लोक, मला, खऱ्या अर्थाने प्रगतिप्रेमी वाटत होते स्वत च्या अस्तित्वाभोवती लपेटलेल्या सामाजिक मान्यता व मूल्याच्या पलिकडे जाऊन, असे अनाहूतपणे आयुष्यात येणारे क्षण मन-पूर्वक अनुभविता येणे, ही एका मुलीच्या वाट्याला येणारी वास्तवता, मनाला सुखावीत होती तरीही मॉलीचे, जॅकबरोबर भावनिक दृष्ट्या अधिक जवळचे सबध तयार होणे, मॉलीच्या दृष्टीने योग्य ठरणार नव्हते सामाजिक अतराचे निकष स्वत पुरते बदलून फुलणारी मॉलीची निर्व्याज मैत्री स्वत हून स्वत साठी एक मानसिक सघर्ष तयार करीत होती सरळ, निर्व्याज क्षणाच्या भागिदारीतूनही मला मॉलीच्या दु खद भविष्याची चाहूल लागत होती अशा विचारात आजही मी मॉलीबरोबर बालगुन्हेगार केन्द्रात गेले सोशल वर्कर तिच्या रूममध्ये एकटीच, वाचत बसलेली दिसली 'मॉली तू जॅकला भेटून ये तोपर्यंत मी या बाईबरोबर बोलत बसते' असे म्हणून मी सोशल वर्करच्या खोलीच्या दारावर टकटक केले अभिवादनाची औपचारिकता सपल्यावर, मी समाजशास्त्राची विद्यार्थिनी आहे हे तिला सागताच ती उत्साहाने तिच्या अनुभवाबद्दल बोलू लागली बोलण्याच्या ओघात जॅकचा 'केस स्टडी' तिने किती बारकाईने केला होता हे मला जाणवले त्याचप्रमाणे तिने सागितलेला वृत्तात ऐकून माझ्या अगावर काटा आला

हायस्कूल पास होताच जॅकने त्याच्या शाळेतील स्वीट-हार्टशी लग्न केले चागले टायपिंग येत असल्याने तिला क्लेरिकल जॉब मिळाला

परतु काहीच गुणवत्ता नसल्यामुळे खूप प्रयत्न करूनही जॅकला नोकरी मिळाली नाही कोवळ्या वयात केवळ भावुकतेने स्वीकारलेल्या विवाह बंधनामुळे स्वत वर पडलेली आर्थिक जबाबदारी निभावता येईना जीवनाची कठोर यथार्थता पेलता येईना, तेव्हा 'इन्स्टट' उपायाची सवय असलेल्या त्याच्या मनाला फ्रस्ट्रेशन आले तो ॠॅक नावाच्या महाघातकी अमली पदार्थाची नशा करू लागला तशात त्याच्यावर बाप बनण्याची जबाबदारी देखील पडली त्याची पत्नी स्वत बेबी असतानाच एका बेबीची आई बनली जॉब नसल्यामुळे बेबी-सीटर परवडेना, म्हणून जॅकला 'हाऊस हजबड' बनून, स्वत च्या लहान मुलीची देखभाल करणे भाग पडू लागले ॠॅकच्या नशेसाठी तो लहानमोठ्या चोऱ्या करू लागला नशेच्या धुंदीत सद्सद्विवेक पार बुडून गेला नि एका दुपारी त्याने स्वत च्या सहा महिन्याच्या मुलीवर अमानुष बलात्कार केला त्या बलात्कारात बाळाचा अत झाला व जॅक पकडला गेला विकृतीची परिणती ही अशी झाली कोमल भावनाची ही अशी होळी झाल्यामुळे बेबी असताना आई झालेली जॅकची सोळा वर्षाची पत्नी, मनोरुग्ण बनली शून्यात लागलेल्या नजरेने स्वत च्या आईच्या कुशीत शिरली तिची आई, आता तिला नेमाने मनोविकारतज्ञाकडे नेत असते सुन्न व बधीर झालेल्या मेंदूने मी सोशल वर्करचे बोलणे ऐकत होते अशा अनेक आणि यापेक्षाही चित्तथरारक अनुभव शब्दांकित केलेल्या सोशल वर्करला माझ्या मन स्थितीची कल्पना येणे शक्य नव्हते 'तुमच्या मैत्रीणीला सावध करा!' हे सोशल वर्करचे शब्द ऐकत असतानाच, मॉली येताना दिसली मॉलीला बरोबर घेऊन मी हॉस्टेलवर परतले मॉली नेहमीसारखीच आनदी, उत्साही होती हसत होती तिच्या चेहऱ्यावरचे हे काहीतरी आगळे, वेगळे केल्याचे समाधान हरवू नये असे वाटत असूनही मी विचार करीत होते की, मॉलीला तिच्या प्रिझन पेन पॅलच्या गुन्ह्याची कथा कोणत्या शब्दात सागायची ?

♣

५

# कोकोची कार

कोको, हे आहे माझ्या सराच्या कुत्र्याचे नाव कोको कोण आहे ? असा प्रश्न तुम्हाला पडण्यापूर्वीच मी हे तुम्हाला सागून टाकते म्हणजे घोटाळा व्हायला नको, कारण सपन्न अमेरिकेत असे किरकोळ घोटाळे लोक विकत घेतात, पाळतात, जोपासतात, डॉलर्सच्या तराजूत भावनाना तोलून बघण्याचा प्रयत्न देखील करतात नाहीतर कोकोसाठी सरानी अख्खी कार कशाला विकत घेतली असती ? अर्थात घेतली तरी आपल्याला काय त्याचे ? आपल्याला काही तासाच्या 'डॉग-सिटीगचे' सर ५० डॉलर्स देतात ना ? मग बस झाले, तेवढाच आपला आठवड्याचा जेवणखर्च निघतो असा इहवादी, व्यावहारिक दृष्टिकोण मी ठेवला होता

आता देखील मी कोकोला माझ्या होस्टेलच्या रुमवर घेऊन जाण्यासाठी सराकडे आले होते 'हे बघ कोकोला आता घेऊन जा,(सोमवारी तास सपल्यावर भेट, तेव्हा तुला चेक देतो,' 'कोको' चे डॉग-फूड व इतर लागणारे सामान बॅगमध्ये मोठ्या आत्मीयतेने भरताना सर, बोलत होते शनिवार–सुट्टीचा दिवस असूनही सराची सकाळ, भराभर कामे उरकण्यात चालली होती घराची स्वच्छता, भाडी घासणे, फर्निचर पॉलिश व ग्रोसरीची खरेदी सपली होती आता कोकोला, त्याच्या लाडक्या जिवलग मित्रासमान असणाऱ्या कुत्र्याला, माझ्या अपार्टमेंटमध्ये वीक-एन्ड साठी पोहोचविल्यावर, सर परत येऊन, तयार होऊन त्याच्या पत्नीला, घरी घेऊन येण्यासाठी, विमानतळावर जाणार होते महिन्यातून एकदा मी सराच्या कोकोसाठी 'डॉग-सिटीग, करीत असे व त्याबदल्यात सर मला चक्क ५० डॉलर्स देत सराच्या पत्नीला प्राण्याची अजिबात आवड नसल्यामुळे हा उपाय शोधावा लागला होता मलाही कमी कष्टात आर्थिक अड-

चण भागविता येई शिवाय या योजनेनुसार कोको महिन्यातून एक वीक-एन्ड आमच्या अपार्टमेंटमध्ये घालवितो या गोष्टीस माझ्या अमेरिकन रुम-मेटचाही विरोध नव्हता मला मदत व्हावी या हेतूपेक्षाही तिचा बॉय-फ्रेन्ड भेटायला आल्यावर मी समजूतदारपणे लायब्ररीत निघून जाते, हे तिच्या सहकार्याचे कारण असावे अशी शका मला नेहमीच येई तर कोकोचे माझ्याकडे येणे हे नेहमीचेच झाले होते व 'बेबी सिटींग'च्या तुलनेत अमानवीय ठरणारे माझे 'डॉग-सिटींग हा विद्यार्थ्यामध्ये चर्चेचा व विनोदाचा विषय झाला होता

त्या दिवशी सर व मी कोकोला घेऊन, कोकोच्या कारमधून माझ्या अपार्टमेंटकडे चाललो होतो मागच्या सीटवर शातपणे बसून कोको खिडकीतून बाहेरची रहदारी पाहात होता सर अबोलपणे कार चालवीत होते आणि माझे मन भूतकाळात जाऊन पोहोचले

सराची व माझी ओळख तीन वर्षांपूर्वी झाली त्याची टीचिंग असिस्टट म्हणून एक टर्म मी त्याच्याबरोबर कोर्स शिकवित होते सराना माझे शिकविणे, विद्यार्थ्यांना मन पूर्वक मदत करणे, स्वत कष्ट करून पदवी पूर्ण करण्याची चाललेली माझी धडपड खूप आवडली त्यानी अत्यत विश्वासाने त्याच्या ऑफिस-रूमची एक डुप्लिकेट किल्ली मला दिली माझ्या डॉक्टरेटच्या सशोधनासाठी, त्याच्या पुस्तक—सग्रहातील, पुस्तके वापरण्यास दिली इतकेच नव्हे तर कॉफी विकत घेण्यासाठी, टेबलाच्या ड्रॉवरमध्ये असलेल्या सुट्ट्या पैशाच्या बॅन्केचा उपयोग करण्यासही आवर्जून सागितले टेबलाच्या तिसऱ्या कप्प्यात ठवलेली चॉकलेटे खाण्याचीही मला मुभा दिली सराच्या बरोबर कोर्स शिकविणे सपले तरी मी त्याना नियमित भेटत असे त्याच्या सशोधनाच्या कामात त्याना मदत करीत असे व त्याच्या टाईपरायटरचा उपयोग करून अभ्यासही करीत असे सर माझ्यासाठी, कमी वेळात होणारी छोटीमोठी कामे नेहमी शोधून काढीत व मला आर्थिक हातभार लावण्याचा प्रयत्न करीत कोकोचा वीक-एन्ड, त्याच मदतीतला एक भाग सरानी माझ्याबाबतीत पालकाचा दृष्टिकोण स्वीकारला होता हे मला जाणवत होते

दिवसातून ३-४ तासाचा वेळ मी त्यांच्या ऑफिस-रूममध्ये घालविते हे लक्षात येताच, सरानी घरी असणारी 'रॉकिंग-चेअर' ऑफिसमध्ये आणून ठेवली एके दिवशी मी ऑफिसमध्ये प्रवेश केला तर माझे स्वागत रॉकिंग चेअरने केले रॉकिंग चेअरवर चिकटविलेल्या कागदावर डिझाइनमध्ये अक्षरे कोरली होती 'फॉर उषा' मायदेशापासून १२,००० मैल दूर अशी मनःपूर्वक आत्मीयता क्वचितच अनुभवायला मिळत असल्यामुळे, 'फॉर उषा' हे दोन शब्द माझ्या पाणावलेल्या डोळ्यात विरून गेले नकळत चेअरच्या हाताला स्पर्श केला, चेअरच्या आंदोलनात, सराच्या मनातील पिता बनण्याच्या अधुऱ्या राहिलेल्या इच्छेची आंदोलनं जाणवू लागली त्या रॉकिंग चेअरने आम्हा दोघात एक मायेचे बंधन निर्माण केले नकळत औपचारिकतेचा पडदा दूर झाला सर मधूनमधून माझ्याशी व्यक्तिगत जीवनाबद्दल बोलू लागले व संभाषणाच्या ओघात सराचे आयुष्य माझ्यापुढे उलगडत गेले

ध्येयासक्तीच्या नादात, चाळीशी उलटल्यावर सराना साक्षात्कार झाला की, 'अरे लग्न करायचे, संसार थाटायचा हे जगरहाटीतील मोठ्ठे काम राहूनच गेलय,' आणि एका अधिवेशनात सराना त्यांची जोडीदारीण सापडली तीही ध्येयवेडी होती तशात गणिताची प्राध्यापिका संशोधन करणे, शोध-निबंध लिहीणे, स्वतःचे पेपर्स, पुस्तके प्रकाशित करणे यात इतिकर्तव्यता मानणारी होती करिअरबाबतच्या सुस्पष्ट योजना तिच्या दृष्टीने जीवनसर्वस्व होते तिच्या प्रखर बुद्धीमत्तेमुळे सरासारखा बुद्धीवादी दिपून गेला आणि त्यानी, लग्नासाठी तिला राजी केले

बुद्धीप्रामाण्यावर जगणाऱ्या त्या दोन ध्येयवेड्याचे लग्न झाले. दोघे आपापल्या क्षेत्रात नाव व कीर्ती मिळवितच राहिले, पब्लिकेशनची यादी वाढतच गेली. करिअर फुलतच गेले परन्तु संसारवेलीवर फूल फुललेच नाही करिअरच्या बाबतीतील अवास्तव कल्पनामुळे अपत्य वास्तवात येऊच शकले नाही सेवानिवृत्तीचा काळ जवळ येऊ लागला म्हणून जमलेल्या पैशातून सरानी अत्यंत सुंदर घर विकत घेतले ते घरही सरानी मला दाखविले होते इतके मोहक घर पाहिल्यावर मी सराना म्हटले, 'किती छान घर घेतलत ? ' सर हसत, हसत म्हणाले, 'या चिंता

तल्या घरासारख्या आखीव, रखीव देखण्या घरासाठी, या मोहात पाडणाऱ्या हिरवळीसाठी, या रंगसंगती साधून कलात्मकतेने लावलेल्या मोजक्या फुलझाडासाठी, पैशाबरोबर इतरही क्वालिफिकेशन्स असावी लागतात या भागात जे घर विकत घेऊ इच्छितात त्याच्याकडे लहान मुले नसावीत व पाळीव प्राणी असलेच तर त्यानी घरासमोरच्या हिरवळीला स्पर्शही करू नये. या अटीमध्ये मी बसलो म्हणून मला येथे घर विकत घेता आले हे जरी सर हसत, हसत म्हणाले होते तरीही त्यामागची वेदना जाणवल्याशिवाय राहिली नाही एवढे मोठे देखणे घर घरात माणसे दोनच. सराच्या पत्नीचा वेळ वाधलेला. त्यामुळे वाईच्या वेळापत्रकात, सरासाठी वेळ कमी यामुळेच कोकोचा या कुटुंबात प्रवेश झाला असावा असे मला उगाचच वाटले सराच्या मनातील मायेला 'आलवन' पाहिजे होते आणि शेवटी अमेरिकन प्रथेनुसार त्यानी ते विकतच घेतले सरासारख्या बुद्धीवादी व्यक्तीने अटॅचमेन्टसाठी कुत्र्यासारखा प्राणी का निवडावा याचे मला नेहमीच कोडे पडे पाळीव प्राण्याची बाईंना आवड नव्हती कोकोने कारपेटवर बसणे, घरभर फिरणे हे त्याना आवडत नसे. घराबाहेरील हिरवळीवर कोकोला फिरविणे शक्य नसल्यामुळे, कारमध्ये बसवून त्याला दूरच्या पार्कमध्ये न्यावे लागे अशावेळी कोकोचे केस कारमध्ये पडतात या गोष्टीवर सराची पत्नीशी रोजच वादावादी होत असे तडजोड करणे स्वभावतःच अंगी असलेल्या सरानी स्वतःच्या प्रेमाच्या व दोघाच्या वादाच्या विषयावरही उपाय शोधला आणि कोकोला फिरायला नेण्यासाठी सुंदर, निळ्या रंगाच्या कारची खरेदी झाली सर आवडीने त्या कारमध्ये कोकोला फिरवून आणीत व स्वतःचा रिकामा वेळ कारणी लावीत सराच्या कोको-वेडाशी, बाईच्या आवडीनिवडीचे पटेना शेवटी संघर्षाची चरमसीमा झाली अर्थात नेहमीच्या अमेरिकन प्रथेनुसार घटस्फोट झाला नाही पण बाईंनी स्वतःवर विभक्त राहणे लादून घेतले व घरापासून सहाशे मैल दूर असलेल्या शहरी नोकरी पत्करली बाईच्या त्या नव्या घरामध्ये त्याची आवडती पुस्तके होती पण कोको नव्हता व सरही नव्हते महिन्यातून एकदा त्या आवर्जून सराना भेटायला येत व स्वतःच्या पत्नीधर्माचे पालन करीत या भेटीमध्ये, पत्नी धर्माबरोबर व्यवहाराचेही पालन होत असे, यायचे विमानाचे तिकीट त्या काढीत व

जाताना सराच्या पैशाने तिकीट घेतले जाई महिन्यातून एकदा त्या येत, तेव्हा त्याना कोकोची भागीदारी नको असे त्यामुळे त्याचा वीक-एन्ड सराकडे व कोकोचा माझ्याकडे अशी सोय केली जाई या व्यवहारामध्ये सराना ५० डॉलर्स अधिक खर्च येतो हे बाईंना सांगितले असते तर बाईंनी स्वखुशीने २५ डॉलर्स दिले असते का? असा खटयाळ प्रश्न उगाचच माझ्या मनात डोकावत असे त्याचा तो महिन्यातून येणारा खास वीक-एन्ड आला की, कोको स्वतःच्या कारने अगदी दिमाखाने माझ्याकडे येई सराचा जीवनपट माझ्या विचारातून उलगडत असतानाच कार थांबली कोको सवयीने माझ्या अपार्टमेंटच्या पायऱ्या चढू लागला ही वाव त्यालाही परिचयाची झाली होती कोको व मी अपार्टमेंटमध्ये आलो मी कोचवर बसले सहज लक्ष गेले तर कोको माझ्याकडे टक लावून पाहात होता डोळयातले भाव असे होते की, त्याला माझ्याशी खूप काही बोलायचे आहे कोकोकडे पाहत मन पुन्हा विचारात गुंतले

एक दोन वर्षातच सर सेवानिवृत्त होतील कोको प्रामाणिकपणे त्यांची साथ करील चित्रातल्यासारख्या घराच्या परिसराची घडी विस्कटू नये म्हणून प्रत्येक घरमालक काळजी घेईल सकाळी पेपर टाक-णारा नऊ दहा वर्षांचा पेपर-बॉय, त्याच्या मित्रांना घेऊन सायकली चाल-वित या घरासमोरून दहा मिनिटे फिरतो हे पाहूनही सराच्या शेजाऱ्याच्या कपाळावर आठी पडेल व तो सराजवळ पेपर-बॉयची तक्रार मांडील

ह्या देखण्या घराच्या भिंती कधीही बोबडे बोल ऐकणार नाहीत. छुमछुम घातलेली बाळसेदार तांबूसगोरी पावलं या हिरवळीवर कधीही आपली पहिली पावलं रुमझुमवित चालणार नाहीत 'इथ,इथ बसरे मोरा' या बालगीतातल्या मोराला कुणी चारा घालणार नाही नि चिरेबंदी वाड्यामागे लपलेल्या चांदोमामाच्या मांडीवर बसलेल्या सशाला निरखीत, दूधभाताचे घास चांदीच्या वाटीतून कुणाला भरविले जाणार नाहीत

अपत्यप्रेमाला, माणसाच्या मायेला, पत्नीच्या सुखाला भुकेलेलं आसावलेलं माझ्या सराचं 'म्हातारपण' त्या सुंदर घरात व न विस्कटलेल्या, परिसरात विस्कटलेल्या मनानं एकटंच जगेल नि कोकोच्या कारमधनं स्वतःला रोज फिरवून आणील कोण जाणे कदाचित तोपर्यंत कोको कार-ड्रायव्हिंगही शिकला असेल

♣

६

# हिरव्या कोटातला पक्षी

कॅफेटेरियाच्या दाराजवळील कोट ठेवण्याच्या जागेकडे सहज लक्ष गेले. सर्व कोटात उठून दिसणारा हिरवा कोट दिसताच, आर्ट आत आहे व जेवताना काही गमतीजमती ऐकायला मिळतील या आशेने, मी घाई-तच, आत गेले. हवे ते पदार्थ प्लेटमध्ये वाढून घेतले. प्लेट ट्रेमध्ये ठेवली व कॅफेटेरियात जाऊन आर्टला शोधून काढले. त्याच्या टेबलाजवळ जाताच त्याच्याबरोबर गप्पा मारीत बसलेला मुलगा उठला व लेक्चर आहे, पळतो म्हणून जाऊ लागला. त्याच्या पोशाखातील वैचित्र्याने माझे लक्ष वेधून घेतले. खांद्यापर्यंत लांब सोनेरी केस, वाढलेली दाढी, चष्मा, निळा शर्ट, त्यावर शोभेल असा टाय, स्वेटर, स्कर्ट, गुडघ्यापर्यंत मोजे व बूट. तो गेला त्या दिशेने मी पहातच राहिले. माझ्या चेहऱ्यावरचे आश्च-र्याचे भाव जाणून आर्ट हसत म्हणाला, 'माझ्या मित्राचे असे म्हणणे आहे की, स्त्रिया पॅन्ट घालतात तर त्याने स्कर्ट का घालू नये? शिवाय फेमिनिस्ट लॉयर होण्याचा त्याचा इरादा आहे.'

'रिअली' असे म्हणत मी लंच खाऊ लागले. अजूनही आर्टचा तो 'अर्धनारी नटेश्वर' माझ्या डोक्यात घोळतच होता.

येथील काही व्यक्तींना, सर्वांचे लक्ष वेधून घेण्याची, काहीतरी जगावेगळे करण्याची, स्वतःचे अलग अस्तित्व सातत्याने जाहीर कर-ण्याची गरज का भासते ?

'घटं भिन्द्यात्, पटं छिन्द्यात् कुर्यात्रासभरोहणम् ।
येनकेन प्रकारेण प्रसिद्धः पुरुषो भवेत् ॥'

या उक्तीप्रमाणे वागणारे अमेरिकेत खूप जण आढळतात. 'सेल्फ-आयडेन्टिटी' ची स्वतःला पटेल अशी व्याख्या करून स्वतःचे वेगळेपण

सिद्ध करण्यासाठी पुरुष, स्त्रियाचे कपड घालतात, कानात डूल घालतात, केसाना एकाच वेळी लालनिळ्या पिवळ्या जाभळ्या रगात रगवून केसाची अचाट हेअर-स्टाईल करतात किंवा सूटकेसच्या आकाराचा ट्रॅन्झिस्टर-रेडिओ खाद्यावर ठेवून तो जोरजोरात वाजवित रस्त्याने फिरतात एखादी सुदर मुलगी, पाळलेला अजगर गळचात घालून सगळी-कडे फिरते समाज काय म्हणेल ? असा प्रश्न सहसा कुणी विचारात घेत नाही चीप प्रसिद्धीसाठी काही वेळा लोक आपले आयुष्य फेकून द्यायलाही तयार असतात प्रत्येक व्यक्तिच्या जीवन पद्धतीतून व्यक्तित्वातील कोणत्यातरी न्यूनगडावर किंवा आयुष्यातील कमतरतेवर मात करण्याची धडपड व्यक्त होत असते, असे मानसशास्त्राच्या पुस्तकात वाचले होते आर्टच्या, स्कर्ट घालणाऱ्या मित्राच्या आयुष्यातही काही अभाव असावेत मी विचारात गुरफटत चालले होते पण आर्टने मला भानावर आणले तो म्हणाला, 'तू जेव, मी तुला ग्रेट गमत सागतो आज मी काम सपवून एअर पोर्टवरून निघालो तोच, मला होस्टेलपर्यंत राईड देणाऱ्या पोलिस मित्राला युनायटेड एअरलाईन्सच्या गेट अठराहून फोन आला की, एका स्त्रीला मेडिकल हेल्पची गरज आहे माझ्या मित्रासह एकूण चार पोलिस व मी गेट अठरावर पोहचलो चौकशी करता समजले की, एका स्त्रीचे नख तुटले होते तिच्या नवऱ्याने ज्या आविर्भावात कस्टमर सर्व्हिस एजटकडे मेडिकल हेल्प मागितली होती त्यावरून एजटला वाटले निश्चित काही-तरी सिरीयस आहे म्हणून त्याने एअरपोर्ट सिक्युरिटी ऑफिसला मेडि-कल हेल्प अरेन्ज करण्यासाठी फोन केला पोलिस पोहोंचण्यापूर्वीच एका हवाई सुदरीने पर्समधून बॅन्ड-एड काढून दिले एजटने गेटला जोडून उभ्या असलेल्या विमानातून त्या स्त्रीच्या ठसठसणाऱ्या बोटावर ठेवण्यासाठी बर्फ आणून दिला पोलिसानी, तेथे पोहोंचताच लगेच हॉस्पिटलला फोन करून मेडिकल हेल्पची गरज नाही असे सागितले व गभीर चेहऱ्याने रिपोर्ट लिहून घेतला पूर्ण आठ तासातला, त्याचा तो पहिलाच ॲक्टि-व्हिटी रिपोर्ट होता 'हाऊ रिडिक्यूलस' असे म्हणत, हसत, हसत आर्ट लेक्चरला जाण्यासाठी उठला जाताना म्हणाला, 'आज तुटलेल्या नखा-पायी माझे महत्त्वाचे लेक्चर बुडाले' येथील स्त्रियाना काळजीपूर्वक वाढविलेली, रगविलेली नखे कशी प्राणाहून प्रिय असतात याची मला

कल्पना होती मी आर्टला म्हणाले, 'आर्ट, नवऱ्याने मेडिकल हेल्प मिळविण्यासाठी फोन करायची विनंती केली नसती तर घटस्फोटाच्या कारणात अजून एका क्षुल्लक कारणाची भर पडली असती' 'ओ आतापर्यंत तसं झालंही असेल मी चौकशी करून तुला सांगतो, कॅच यू लेटर,' जाता,जाता तो म्हणाला येथे 'कॅच यू लेटर' म्हणजे 'पुन्हा भेटू,' हे समजायला मलाही सुरवातीला वेळ लागला होता

होस्टेलवर ज्या मजल्यावर मी राहात होते त्याच मजल्यावर आर्ट राहत असे आर्ट, विमानतळावरील सुरक्षा विभागात काम करून क्रिमिनल जस्टिस या विषयातील पदवी पूर्ण करीत होता एअर-पोर्टच्या दोन्ही बाजूंना पाणी होते पाण्याच्या सहवासात राहणारे बगळे, करकोचे बदके, सीगल्स शिवाय चिमण्या, कबुतरे व इतर पक्षीही तेथे गर्दी करून राहात व धावपट्टीवर आरामात ऊन खात अनिर्बंधपणे फिरत, आपला वेळ मजेत घालवीत असत पुष्कळदा विमानाचे पखे सुरु होताच, गतीमुळे काही पक्षी पख्यामध्ये ओढून घेतले जात व प्राणाला मुकत पखे दुरुस्त करावे लागत विमानाना उशीर होई प्रवासी चिडून जात व अशाप्रकारे पक्ष्याच्या नाचण्याबागडण्यामुळे समस्या निर्माण होत यावर उपाय म्हणून आर्टकडे पक्षाना उडवून लावण्याचे काम सोपविले होते आर्टकडे वेगवेगळ्या पक्षाच्या आवाजाच्या टेप्स होत्या पक्षाचे प्रियाराधनाचे आवाज, प्रेमाने साथीदाराला साद घालणे, पक्षीणीचे पिलाशी बोलणे, आईला प्रतिसाद देण्यासाठी पिलानी केलेला चिवचिवाट असे नाना प्रकारचे, वेगवेगळ्या पक्षाचे आवाज त्या टेप्समध्ये होते युनिफॉर्मचा हिरवा कोट घालून आर्ट या टेप्स मोठ्याने वाजवीत, रनवेच्या आजूबाजूला जीपमधून फिरत असे आणि पक्षाना उडवित असे काही हट्टी पक्षासाठी त्याला हवेत बंदुकीचे आवाजही करावे लागत चिमुकल्या पक्षाना सावध करून त्याचे जीव वाचविण्यासाठी मदत करणे व वनपशुपक्ष्याच्या संरक्षणाच्या कायद्याला एकप्रकारे हातभार लावणे हे आर्टच्या कामाचे स्वरूप मला खूप आवडत असे डोळ्यासमोर यायचे की, विमानाचे पखे सुरु होण्यापूर्वीच आर्टच्या मेहरबानीमुळे सर्व पक्षी सुरक्षित ठिकाणी जाऊन पोहोचलेत येता, येता फुलपाखरानाही त्यानी सावध केले आहे. स्वच्छ उन्हात,

हिरव्याभुऱ्या धरतीच्या कुशीत, निळ्या आकाशाच्या पाण्यात विसावलेल्या प्रतिबिंबाला चोचीने विस्कटीत सृष्टीकर्त्याच्या या चिन्टुकल्या 'हस्तकृती' जीव वाचल्याचा आनंद साजरा करण्यासाठी, येथील भाषेत पार्टी करीत आहेत. मद्याची नशा अनिवार झाल्याने वदकानी नाव वल्हवायला सुरवात केलीय आणि किलबिलाटाने आसमंत निनादून गेलाय. पक्षाच्या दुनियेतील या आनंदाला, बेहोषीला आर्टचा हातभार लागलाय ही भावनाही सुखावीत असे.

अशा प्रकारचे संवेदनाशील काम करणारा आर्ट स्वभावानेही खूप भावुक होता. येथील अनेक मुलामुलींच्या घरी घडणाऱ्या कहाणीप्रमाणे आर्ट लहान असतानाच त्याच्या आईवडिलाचा घटस्फोट झाला. कोर्टाच्या परवानगीने महिन्यातून एकदा आर्टची व त्याच्या वडिलाची भेट होई. तर अशा मासिक भेटी घेत, तसेच आपल्यापेक्षा तेरा वर्षांनी लहान असलेल्या सावत्र भावाला ख्रिसमससाठी खेळणी विकत घेत, आईच्या कष्टाची जाणीव ठेवीत आर्ट मोठा झाला. वीस जानेवारीला येणाऱ्या आईच्या वाढदिवसासाठी वक्षीस विकत घेण्यासाठी तो लहानपणी शेजाऱ्याच्या घरापुढचे बर्फ स्वच्छ करून देई व मिळणारे पैसे साठवून आईसाठी भेटवस्तु विकत घेई. बर्फ स्वच्छ केल्यामुळे त्याचे लहान, लहान हात कसे दुखत हे त्याला अजूनही आठवत होते. दोन वर्षांपूर्वी आईनेही पुनर्विवाह केला व आर्ट खऱ्या अर्थाने एकटा झाला. आमच्याच मजल्यावर राहणारी, दुपारी चार ते रात्री बारा हॉस्पिटलमध्ये काम करणारी व सकाळच्या वेळात कम्युनिटी नर्सिंगचे विशेष कोर्सेस घणारी जॉय आर्टला मनापासून आवडत होती. जॉय हे नाव परिचारिकेला शोभून दिसते. शिवाय परिचारिका कोमलता, सहनशीलता, श्रद्धा, त्याग, दयाभावनेचे प्रतीक असते असे आर्टचे मत होते. पण तिला 'हॅलो' म्हणण्याचे धाडसही त्याने केले नव्हते, मी कितीवेळा त्याला गमतीने सुचविले की, प्रेयसीला मनोगत समजेल अशा आर्त आवाजात तुझ्या भावना व्यक्त करणारी टेप तयार कर व ती जॉयच्या पत्रपेटीत ठेव, तेही आर्टला जमले नव्हते.

आर्टला मदत करावी या हेतूने मी जॉयबरोबर परिचय करून घेतला. वेळेअभावी या मुलीला कोणाशी मैत्री करणे, संबंध वाढविणे

शक्य झाले नव्हते तिच्याबरोबर काही वळा सभाषण केल्यावर माझ्या लक्षात आले की, स्त्रीस्वातत्र्याच्या काही अर्थी एकागी कल्पना असलेली ही मुलगी आहे तिच्या मते, स्त्रीला स्वत चा स्वतत्र परिचय असावा, हा परिचय प्राप्त करण्यासाठी तिने नोकरी करावी व आर्थिकदृष्टचा स्वतत्र व्हावे, स्वत च्या अस्तित्त्वाचे सर्व पैलू व स्वत चे कलागुण प्रगट करण्याचे एकमेव माध्यम म्हणजे नोकरी असे तिचे ठाम मत होते स्त्रीने स्वत चा दर्जा स्वत मिळविला पाहिजे, वाढविला पाहिजे, स्वत चे भविष्य तिने स्वत घडविले पाहिजे असे तिला वाटे यशस्वी, आनदी जीवनाचा शोध घेण्याचे अमेरिकन स्त्रीचे स्वप्न इतके मर्यादित असेल, असे मला वाटले नव्हते पक्षीमित्र, भावडचा आर्टला ही अतिस्वतत्र विचाराची मुलगी कितपत झेपेल या विचाराने मी आर्टबरोबर तिची ओळख करून दिली नाही मला वाटायचे व अजूनही वाटते की स्वातत्र्याच्या अवास्तव कल्पनाच्या आहारी गेलेल्या स्त्रीला स्वत च्या एकाकीपणापासून सुटका करून घेण्यासाठी नोकरी करणे पुढे अत्यावश्यक ठरू लागते पण निर्व्याज कौतुक, प्रेम, माया, आधार, मान या सर्व स्त्रीसुलभ भावनाची पूर्ती फक्त कुटुबात होते तिच्या स्वत्त्वाला न्याय मिळतो तो कुटुबातच तिच्या अस्तित्वाला समतोल देण्याचे, पूर्णतया प्रगट करण्याचे खरे माध्यमही कुटुबच जी भावनिक कोमलता, विश्वास, निष्ठा कुटुबात अनुभवायला मिळते ती नोकरीच्या ठिकाणी, वसतीगृहात किवा एकटे राहून मिळत नाही वास्तविक पाहता जॉयला पदवी होती, चागल्या प्रकारची नोकरी होती विशेष अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर तिला प्रमोशनही मिळणार होते, होस्टेलमध्ये राहिल्यामुळे पगारातही बचत होत होती सुदर घर विकत घेण्याचे, जगप्रवास करण्याचे तिचे स्वप्न ती लग्न करूनही पूर्ण करू शकेल असे मला वाटत होते तिच्या विचाराप्रमाणे ती या जबाबदारीसाठी तयार नव्हती तिला काहीतरी वेगळे हवे होते पण ते अजूनही स्पष्ट झाले नव्हते अमेरिकेत ही कोडचात पाडणारी प्रवृत्ती माणसात का दिसावी ? कष्ट केल्यावर किमान गरजा अधिक चागल्याप्रकारे भागू शकतात राहणीमानाचा चागला दर्जा टिकविण्यासाठी माफक प्रमाणात खर्च करावा लागतो कार ही चैनीची बाब नसून जेव्हा गरजेची, परवडण्याजोगी वस्तु बनते [illegible] कॅडिलॅकसारखी कार

खरेदी करण जमते या 'इन्स्टट' सुखवस्तुपणाचा, त्वरित प्राप्त होऊ शकणाऱ्या आर्थिक सुवत्तेचा हेतु काय, अर्थ काय ? या विचाराने व्यक्तिला भीती वाटू लागते की, काय न कळे एक विचित्र अपराधीपणाची भावना किंवा 'गिल्ट-फीलिंग' व्यक्तिमध्ये निर्माण होत असावी अति सुखाचीही शका येऊ लागते व भरपूर काम करणाऱ्यानाही डॉक्टरानी सागावे लागते, सुट्टी घेऊन मजा करण्यात तुम्हाला गैर वाटू नये सतत वाढत्या वेगाने होणारी भरभराट, त्यामुळे जाणवणारी सपन्नता व्यक्तिला भिववितें का ? साशक बनविते का ? कदाचित त्यामुळेही भावनिक सबध वाढविण्याआधी व्यक्ती सर्व बाबींचा विचार करीत असावी, लग्नाआधी करारपत्र लिहून मगच चर्चच्या पायऱ्या चढत असावी यामुळे एक मात्र होते की,सहजीवनाची मूलभूत गरज नाकारून व्यक्ती स्वत च्या जीवनात स्वत हून पोकळी निर्माण करते भीती दाखविणाऱ्या एकाकी क्षणातूनच 'नॉट इनफ ॲक्सेप्टन्स बाय सिग्निफिकन्ट आदर्स' हे बुजगावणे तयार होत असावे स्वत ला, स्वत च्या सुखासमाधानाच्या कल्पना, सकल्पनाना ओळखण्याचे सामर्थ्य पारखून घेण्यासाठी, जॉयसारख्या व्यक्ति स्वत ला तेवढा वेळही उपलब्ध करून देत नाहीत व्यक्ती प्रवासाला निघते ती निश्चित स्थान, निश्चित उद्देश डोळ्यासमोर ठेवून 'नॉलेजलेस हॅपीनेस' किंवा 'फॉल्स पॅराडाइज' कडे धावणाऱ्या जॉयसारख्या व्यक्तिचा एकाकी अन्तहीन प्रवास पाहिला की, वाटू लागते आर्टसारख्या व्यक्तिच्या भावुकतेला कोणत्या जगाची साथ मिळणार आहे ?

एके सध्याकाळी कॅफेटेरियाच्या बाहेर, कोट ठेवण्याच्या जागी हिरवा कोट पाहिला व उत्सुकतेने आत जाऊन आर्टला शोधू लागले एका कोपऱ्यात खिन्न चेहरा करून तो एकटाच बसला होता शिष्टाचाराची पर्वा न करता मी त्याच्या एकाताचा भग केला व मैत्रीच्या अधिकाराने त्याच्या उदासीनतेचे कारण विचारले कारण समजले जॉयला पोलिस अटक करून घेऊन गेले होते जॉयचे जीवन खरोखरी अभावपूर्ण असावे हॉस्पिटल–स्टाफ, पेशन्टस् व विद्यार्थी जगात इन्स्टट प्रसिद्धी मिळविण्याच्या हेतुने, एक शूर, प्रसगावधानी, सेवा सहायतेचे वाण हाती घेऊन रोग्याचे रक्षण करणारी, कल्याण करणारी, प्राण वाचविणारी अद्वि-

तीय नर्स म्हणून सर्वांनी स्वीकार करावा या गरजेपोटी, जॉयने मुद्दाम एका रोग्याला औषधाचा ओव्हरडोस दिला लिच्या प्लॅनप्रमाणे ती त्याला डॉक्टराच्या मदतीशिवाय, दुसरे औषध व इजेक्शन देऊन पूर्वस्थितीत आणणार होती व सर्वांकडून प्रशसा मिळवणार होती तिचा वेळेचा अदाज चुकला, असहाय तगमग होऊन रोग्याचे तडकाफडकी निधन झाले वॉर्डमधील सर्व पेशटस् या प्रकाराचे प्रत्यक्ष साक्षीदार होते गेल्या वर्षात जॉयच्या वॉर्डमध्ये अशाच प्रकारे अचानक झालेल्या चार रोग्याच्या मृत्युशी जॉयचा सबध असण्याची शक्यता बोलून दाखविली जात होती. खुनाच्या आरोपाखाली जॉयला बरीच सजा होण्याची शक्यता होती. मृत व्यक्तिचे नातेवाईक हॉस्पिटलच्या अधिकाऱ्याना व जॉयलाही कोर्टात खेचून नुकसानभरपाई वसूल करणार हे निश्चित होते जॉयच्या प्रत्येक दिवसाचे, कामाचे सारे क्षण तिच्या अनिश्चित उद्देशामुळे व दुर्बल सकल्पामुळे डळमळीत झाले होते अशावेळी असहाय पावलानी जर तिला तुरुगात पोहोंचविले तर त्यात नवल ते काय ? त्यात त्या बिचाऱ्या पावलाचा काय दोष ?

जॉयची हकिगत ऐकून माझ्या मनात उठलेल्या विचारतरगाना शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न करीत मी म्हणाले, 'आर्ट, आमच्याकडे आघात सहन करून जीवनाचा सामना करणे, योग्य निर्णय घेणे, स्वत च्या गरजा ओळखणे, विसगतीतून सगती शोधणे हे सारे सस्कारातून येते . विचाराच्या परिपक्वतेतून निर्माण होते मला तर वाटत निरोगी मन नसेल, ज्ञानाबरोबर विवेक नसेल तर स्वत च्या मर्यादा ओळखण्याची ताकद, 'इन्स्टट' प्रसिद्धी हवी असणाऱ्याच्या अगी कशी येणार ? प्रसिद्धी, प्रशसेच्या मागे लागलेली आत्मलक्षी, स्वयकेन्द्रित, स्वार्थी माणसे अपेक्षाच्या वादळात भरकटतात, विवेक विसरतात व प्रसिद्धीच्या मोहाच्या काही क्षणाच्या बदल्यात, जीवनाच्या तसेच व्यवसायाच्या नीतीमूल्याना तिलाजली देऊन पराजित होतात मला प्रश्न पडलाय, जीवनमृत्युमधील अर्थपूर्ण अतर, अशी उद्देशहीनता घेऊन सपविणाऱ्याची सख्या जर वाढतच गेली तर मानवी मूल्याचे अस्तित्व कोण टिकवून ठेवील ?' मी बोलतच राहिले असते परतु माझ्या 'लाऊड थिंकिंग' मधून मला जागे करीत हसत

आर्ट म्हणाला, 'मूलभूत मानवी मूल्यावरच्या एखाद्या सोप्या पुस्तकाचे नाव लिहून दे पुस्तक व फुले घेऊन, मी जॉयला तुरुगात भेटायला जाणार आहे' आणि आपला हिरवा कोट खांद्यावर टाकून आर्ट कॅफेटेरियातून बाहेर पडला त्यावेळी मला वाटले आर्ट एक पक्षी आहे आणि तो खेचला जातोय नियतीच्या पख्यामध्ये त्याला कोण सावध करणार ? मानवी मूल्याची टेप अजून तयारच करता आलेली नाही कुणाला

♣

७

# १०,००० येनचा कागदी दागिना

टोकिओतील कमालीच्या महागाईला भिऊन आम्ही दोन दिवसातच टोकिओचा निरोप घ्यायचे ठरविले एक्सचेंज रेट, एक डॉलर म्हणजे १२५ येन होता टोकिओपासून जवळ-जवळ साठ मैल दूर असलेल्या नरीटा विमानतळापासून, बसने हॉटेलपर्यंत जाण्याचे प्रत्येकी ३५०० येन, हॉटेलचा प्रत्येक दिवसाचा दर २५,००० येन, अगदी साधे जेवण २००० येन, गावातील प्रेक्षणीय स्थळे पाहण्यासाठी सकाळी आठ ते सध्याकाळी साडेचार अशी एक दिवसाची सफर प्रत्येकी १७,५०० येन, पोस्टकार्ड ९० येन, हवाईपत्र १२० येन असा महागपणाचा चढता आलेख होता अगदी साध्या हॉटेलात राहिले तरीसुद्धा दिवसाचा खर्च २०० डॉलर्स लागत होता एकच समाधान, येथे टीप देण्याचा रिवाज नाही तरीही टोकिओ खिशाला परवडणारे नाही म्हणून टोकिओच्या स्वच्छतेला, टापटिपीला, नीटनेटकेपणाला सुबकतेला व महागाईला 'सायोनारा' म्हणत आम्ही नरीटा अेअरपोर्टवरील, युनायटेड अेअरलाईन्सच्या टर्मिनलमध्ये येऊन पोहचलो पूर्ण दिवसाचे पैसे द्यावे लागू नयेत म्हणून हॉटेल लवकर सोडले त्यामुळे फ्लाईटच्या वेळेच्या कित्येक तास आधी, आम्ही विमानतळावर येऊन हजर झालो

एका कोपऱ्यातील रिकाम्या जागेत बॅग्ज ठेवून, मी खुर्चीवर बसले व आजूबाजूला नजर फिरविली माझ्या शेजारी बसलेली, पासष्टच्या आसपास वय असलेली एक अमेरिकन वृद्धा, गळ्यातील क्रॉसवर हात ठेवून, डोळे मिटून, एकाग्रपणे प्रार्थना करीत होती गळ्यातील दुसऱ्या साखळीवर अक्षरे होती 'यू आर स्पेशल,' मिटलेल्या डोळ्याच्या कडाशी अश्रु येऊन थाबले होते नाजूक फुलाच्या डिझाईनचा जाड सुती काप-

डाचा स्कर्ट, दर्शनी भागावर 'आय, हॅव अ ड्रीम' अशी अक्षरे छापलेली लाव बाह्याचे ब्लाऊज, कानातले डूल मात्र मजेदार होते, डाव्या कानातल्यावर अक्षरे होती 'इन' व उजव्या कानातल्या डूलावर लिहिले होते, 'आऊट' केशभूषाही काळजीपूर्वक केलेली होती एकूण जीवनाबद्दल आस्था असणारी, जीवनात रस घेऊन जगणारी ही स्त्री दिसत होती नाहीतर या वयात अशी एकटी प्रवासाला निघाली नसती आजूबाजूच्या गर्दीने विचलित न होता निश्चित भावाने प्रार्थना करणाऱ्या या स्त्रीने मला प्रभावित केले प्रार्थना संपवून तिने डोळे उघडले तेव्हा मी तिचे निरीक्षण करीतच होते तिला ते जाणवले असावे मोहक हसून मनमोकळे पणाने म्हणाली, 'हॅलो स्वीटहार्ट तुला भेटून खूप आनंद झाला, माझं नाव क्रिस्टीन' आणि माझा हात हातात घेऊन तिने हस्तांदोलन केले ज्या नावात 'ख्राईस्ट आहे, ते नाव या प्रेमळ स्त्रीला निश्चित शोभते असा विचार मनात येऊन गेला तिच्या मनमोकळेपणावर विश्वास ठेवून, माझ्या सामानाकडे थोडावेळ लक्ष देण्याची विनती केली व तिचे आभार मानीत, मी व विजय कॅफेटेरिया शोधू लागलो जेवण झाल्यावर विजयने, मला एक दहा हजार येनची नोट देऊन म्हटले, 'मी सामानाजवळ जाऊन बसतो, तू तुझ्यासाठी टोकिओची आठवण म्हणून एखादी वस्तु घे व युनायटेड टर्मिनलमध्ये परत ये चुकू विकू नकोस टेक यूवर टाईम,बट हरी अप,' हसत हसत असे सांगून विजय मला दुकानासमोर सोडून निघून गेला विमानतळावरील दुकानात वस्तु अत्यंत महाग असतात याची कल्पना होती तरी एखादा नाजुक जपानी रुमाल विकत घ्यावा असा मोह झालाच चौकशी केली डोक्याला बांधायच्या साध्या रुमालाची किंमत किमान पंधरा हजार येन होती हातातील दहा हजार येनची नोट मुठीत पकडून काही न घेता मी परतले

क्रिस्टीन आजी मन:पूर्वक, रंगीत कागदाची छोटीशी वस्तु बनवित होत्या माझे कुतूहल जाणवून त्या म्हणाल्या, 'ख्रिसमस ट्री सजविण्यासाठी अशा छोट्या-छोट्या वस्तु बनविणे माझा छंद आहे ख्रिसमस सीझनमध्ये या वस्तु विकून मला थोडेफार पैसेही मिळतात पंधरा-वीस मिनिटांनी वस्तु तयार झाली व त्या मनमोकळे पणाने माझ्याशी बोलू

लागल्या बराचवेळ आम्ही बोलत होतो क्रिस्टीन आजीच्या बोलण्यातून तसेच त्यानी दाखविलेल्या काही छायाचित्रातून सध्याच्या अमेरिकेतल्या वृद्धाच्या समस्याची विचार करायला लावणारी बाजू, माझ्या ध्यानात आली आजीच्या तरूणपणी , वयान मोठ्या व्यक्तिना मान दिला जाई, त्याची कार्यक्षमता, ज्ञान, अनुभव याचा उपयोग करून घेणे कमीपणाचे मानले जात नसे आजी शेतीप्रधान खेडेगावात लहानच्या मोठ्या झाल्या होत्या त्या खेड्यामध्ये वृद्ध व्यक्तिाना, त्याना झेपेल अशा कामासाठी उपयोग करुन घेतला जाई. आपण निरूपयोगी झालो अशी भावना वृद्धाना कधीही जाणवत नसे

परतु ही गोष्ट झाली १९५० पूर्वीची त्यानतर १९६० साली ६५ वयापुढे असणाऱ्या व्यक्तिची सख्या पूर्ण लोकसख्येच्या ९ टक्के होती आता आधुनिक वैद्यकीय प्रगतीने वयोमर्यादा व पर्यायाने वृद्धाची सख्याही वाढली परिणामी 'सोशल सिक्युरिटी' व 'वेल्फेअर प्रोग्रॅम्स' अपुरे जाणवू लागले आजीना आठवत होते, नोव्हेंबर १९६६ मध्ये, सेवानिवृत्त झालेल्या दाम्पत्याला, सरकारकडून मिळणाऱ्या सवलतीचे, वर्षाला सरासरी १७०० डॉलर्स म्हणजे दोघासाठी सुमारे १४० डॉलर्स महिन्याला मिळत म्हणजे प्रत्येकी सुमारे ७० डॉलर्समध्ये अमेरिकेत महिना काढायचे अतिशय कठिण दिव्य करणे

थोडक्यात वृद्ध व्यक्ती म्हणजे दारिद्र्य असे समीकरण तयार होऊ लागले नतर अत्याधुनिक तत्रविज्ञान, शहरीकरण, आधुनिकीकरणाचे युग आले, इफिशियन्ट तरूण-तरूणीची मागणी वाढली. 'निगेटिव्ह इमेजेस ऑफ एजिंग' म्हणजे प्रौढ व्यक्तिबद्दल नकारात्मक दृष्टिकोण समाजात रूढ होऊ लागला अगदी आजी-आजोबा, वृद्ध व्यक्तीसाठी असणाऱ्या ग्रीटिंग्ज कार्डावरील चित्रातून, आतील मजकुरातूनही वृद्धत्वाविषयीच्या नकारात्मक प्रतिमा दिसू लागल्या वृद्धाबद्दल सर्वत्रच अभावसूचक सूर जाणवू लागला वृद्ध व्यक्ती गरीब असतात त्याचे शरीरस्वास्थ चागले नसते त्याच्यातील काही मनोरूग्ण असतात सर्व वृद्ध व्यक्ती एकसारख्याच असतात असे नकारात्मक समज रूढ होऊ लागले अशा प्रकारच्या विचार प्रवाहाचे परिणाम असे झाले की, आप-

त्याला कुणी अपंग, ॲन्टिक किंवा 'दृष्टीआड म्हणजे सृष्टीआड' असे समजू नये म्हणून काही वृद्ध स्वतःवर कॉसमॅटीक सर्जरी करून तरूण दिसण्याचा प्रयत्न करू लागले, वयाबद्दल खोटे बोलू लागले तर काही वृद्ध, वय होणे ही अनिवार्यता आहे, अपरिहार्यता आहे असे मानून, स्वतः-च्या मनाला हेतूपूर्वक कामात गुंतवून जीवन मनोरंजक बनवू लागले. अशा दुसऱ्या प्रकारच्या वृद्धाचे एक जीतेजागते उदाहरण क्रिस्टीन आजींच्या रूपात माझ्या शेजारी बसले होते वयाची साठी उलटल्या-नंतरही उद्योगप्रिय जीवन, उत्साहाने , तडफदारपणे जगता येते असा 'पॉझिटिव्ह दृष्टिकोण' घेऊन जगणाऱ्या वृद्धांपैकी क्रिस्टीन आजी या एक होत्या

शेतावर वाढलेली, साधीभोळी मुलगी, क्रिस्टीन निसर्गाच्या सह-वासात फुलली, उमलली व एका मिलीटरी ऑफिसरबरोबर विवाहबद्ध झाली कोरियन युद्धात तिच्या पतीचे ऐन तारूण्यात निधन झाले एका तरूण विधवेने एकटीने समर्थपणे नोकरी करून, एकुलत्या एका मुलाचे-वॉल्टरचे पालनपोषण, शिक्षण केले शिक्षण पूर्ण होताच वॉल्टर मिलि-टरीत भरती झाला, सध्या तो कोरियातल्या सोल (SEOUL) येथील, अमेरिकन मिलिटरीचे ठाण्यावर होता आणि त्यालाच भेटायला क्रिस्टीन-आजी निघाल्या होत्या वॉल्टर जवळ असेपर्यंत त्या सॅन फ्रॅन्सिस्को या शहरात राहात होत्या, तो मिलिटरीत भरती झाल्यावर आजींमधली निसर्गाच्या सहवासात रमणारी स्त्री जागी झाली त्याचा विश्वास होता की, जो निसर्गाच्या सान्निध्यात राहातो तो देवाच्या अधिक जवळ असतो शहरात त्याचे मन रमेना,आजूबाजूला नजर फिरविली की,त्याना वाटायचे, प्रत्येक शहरी माणूस एका अन्तहीन संघर्षाला तोंड देतो आहे वयोमर्यादा वाढल्यामुळे शहरातील, रस्त्यातून वृद्धांची गर्दी जरी वाढली तरी रस्त्यावरील वॉक, डोन्ट वॉक, या खुणाचा वेग थकलेल्या व्यक्तीच्या गतीला मानवेल इतपत कमी झाला नाही, हे आजीच्या लक्षात आले राहणीमानाचा दर्जा, सामानाच्या किंमती, घराचे भाडे वाढले, पण सोशल सिक्युरिटीच्या चेकवरील आकडा तोच राहिला सामाजिक बदल अस-मान गतीने, वेगवेगळ्या दिशेने जाऊ लागले तर समस्या निर्माण होणा-

रच, याची आजींना जाणीव झाली आजीच्या मित्रमैत्रीणीना पायऱ्या चढणे, डोअर नॉब फिरवून दार उघडण या साध्या क्रिया करणे अवघड जाऊ लागले, ते पाहून आजींनी विचार केला की, त्या स्थितीला जाऊन पोहोंचण्याआधी, वृद्धत्त्वाच्या सर्व गरजाचा विचार करून सर्व सोयी असलेले साधे, परवडेल असे घर बाधायला हवे त्याचे उताराला लागलेले जीवन, निसर्गाचा हात पकडून चालण्याचा हट्ट करू लागले आजीच्या इच्छा – आकाक्षाना पूर्णपणे प्रतिबिंबीत करणारी, जगलात स्वकष्टाने उभारलेली एक झोपडी त्याच्या विचाराचा पाठलाग करू लागली रानावनातील डोंगरमाथ्यावर आपले रग बदलीत धावत येणारी सध्याकाळ, वृक्षाच्या शाखामध्ये हळूहळू धीमे होत, झोपी जाणारे पक्ष्याचे स्वर, परिसराच्या श्रीमतीला दृष्ट लागू नये म्हणून तीट लावणारा अधकार, पहारा देणाऱ्या चादण्या, झोपडीत उजळणारा दिवा, स्वत च्या सरक्षणाची जबाबदारी जगन्नियत्याकडे सोपवून, आपोआप जोडले जाणारे हात, न कटाळता पूर्वेला जागे करणारा सूर्य, दिवस सुरू झाल्याचे घोषित करणारी पक्षाची किलबिल, नदीच्या कलरवाला साथ देणारे असख्य लयबद्ध ध्वनी अशा निसर्ग सुदर दुनियेत जाण्यासाठी आजी व्याकूळ झाल्या एका अनोख्या जीवनानुभूतीचा अनुभव घेण्याचा त्या गभीरपणे विचार करू लागल्या विचार पक्का होताच त्यानी शहरापासून दूर, निसर्गाच्या कुशीत, नदीकाठी शेतीला उपयुक्त असा जमिनीचा तुकडा विकत घेतला, स्वत च्या हाताने तिथे एक टुमदार लाकडी घर बाधले गेली पधरा वर्षे आजी त्याच्या त्या छोट्याशा फार्म हाऊसमध्ये राहात आहेत जी व्यक्ती स्वावलबी असते ती खऱ्या अर्थाने सतुष्ट, तृप्त, समाधानी असते हे आजींना पाहून पटत होते

बहुधा, प्रत्येक अमेरिकन व्यक्ति, आपल्या घराचे, आवडत्या व्यक्ति व वस्तुचे, पाळीव प्राण्याचे फोटो नेहमी आपल्याजवळ बाळगते पर्समध्ये, स्वत च्या ऑफिसच्या टेबलावर, ऑफिसच्या भितीवर देखील स्वत चे जग सजवून ठेवते, असे केल्याशिवाय त्याना सुरक्षित वाटत नसावे आजीनीही निवडक फोटोंचा लहानसा अल्बम मला दाखविला त्यानी स्वत घडविलेले घर, छोटा जनरेटर विकत घेऊन घरभर खेळ-

विलेली बीज, घरासमोरच्या झाडाला टांगलेले त्यांनीच बनविलेले बर्ड-हाऊस, पक्षांना पाणी पिण्यासाठी वॉटर फाऊन्टन, घरासमोरची फुल-झाडांची बाग, बागेला लागून असलेले शेत, काही यार्डाच्या अंतरावर वाहाणारी नदी, नदीत पोहणारी आजींची मित्र बनलेली बदके, माशांची स्वच्छंद कुटुंबे, नदीकाठी विसावलेली आजींच्या मालकीची छोटीशी नाव, घराच्या मागच्या बाजूला कोंबड्यांचे घर व त्याला लागून असलेली 'रूट बीयर' तयार करण्याच्या सामानाची खोली अशाप्रकारे स्वत:च्या कल्पनेतले जग प्रत्यक्षात साकार करून, आजींनी दाखवून दिले की, म्हातारपणदेखील 'प्रॉडक्टिव्ह' असू शकते अमेरिकेत 'प्रॉडक्टिव्हिटी' या संकल्पनेवर इतका अनावश्यक जोर दिला जातो की, बहुधा व्यक्तिच्या भावनिक गरजांकडे दुर्लक्ष होते साठी ओलांडलेली स्त्री, रानावनात एकटी राहाते, जवळच्या शहरातल्या ऑरगॅनिक फूड स्टोअरसाठी त्यांना हव्या असलेल्या पद्धतीने पुस्तके वाचून धान्य पिकविते, ब्रेड व रूट बीयर तयार करते, त्यांना हव्या त्या पद्धतीने कोंबड्या वाढविते, स्वत:ची नाव स्वत: वल्हवीत शहरापर्यंत जाते व तेथून टॅक्सीने या वस्तु ऑरगॅनिक फूड स्टोअर्समध्ये नेऊन विकून उपजीविकेपुरते पैसे मिळविते शहरातील पोस्टात, आजींची पोस्ट बॉक्स क्रमांक असलेली भाड्याने घेतलेली पत्र-पेटी आहे ज्या वेळी शहरात जावे लागते, तेव्हा पोस्टात जाऊन आजी आपली पत्रे, सोशल सिक्युरिटीचा चेक घेतात, बँकेत जाऊन चेक जमा करतात व लागणारे सर्व सामान, वर्तमानपत्र, वाचनासाठी पुस्तके घेऊन नावेने पुन: आपल्या घरकुलात परत येतात थंडी सुरु होण्यापूर्वी फायर प्लेससाठी लागणारे जळण, लाकडे तोडून साठवून ठेवणे हे कष्टाचे काम अजूनही आजींना ते सहजसुलभ वाटते नैसर्गिक परिसरात वाढणाऱ्या कोंबड्या आनंदी असतात, त्यांचे मटण, ऑरगॅनिक फूड स्टोअरवाले 'नॅचरल फूड' म्हणून महाग किंमतीत विकतात सुपरमार्केटमध्ये ज्या कोंबड्यांचे मटन मिळते, त्या कोंबड्या फॅक्टरीसारख्या बंदिस्त वाता-वरणात वाढविल्या जातात त्यांना हारमोन्सची इंजेक्शने देऊन धष्ट-पुष्ट करतात त्यांचे मटण खाणे आरोग्यासाठी घातक असते अशी उपयुक्त माहिती आजी मला देत होत्या मानसशास्त्रीयदृष्ट्या आनंदी कोंबड्या कशा वाढवाव्यात या विषयावरील पुस्तके वाचून आजी

कोंबड्या वाढवितात पशुपक्षावर अत्याचार होऊ नयेत असे निसर्ग-प्रेमी आजींचे मत असते खुल्या हवेत, निसर्गाच्या सहवासात, मनमुराद भटकत कोंबड्यानी वाढावे, फॅक्टरीसारख्या वातावरणात, बद खुराड्यात अनैसर्गिक पद्धतीने वाढवून त्याच्यावर जुलूम करू नयेत हे माझ्या मनाला पटत होते पण नॅचरल फूड म्हणून किंवा हारमोन्सची इंजेक्शने देऊन शेवटी कोंबड्याचे मटण जर विकायचे तर ती ( Animal Cruelty ) कशी होत नाही? हे मला समजत नव्हते आजी बोलत होत्या व त्याच्या बोलण्यातून, त्याच्या व्यक्तिमत्वाचे वेगवेगळे पैलू माझ्यासमोर येत होते एका कमालीच्या जिद्दी समर्थ स्त्रीबरोबर योगायोगाने माझा परिचय झाला होता आजींसमोर अनेक प्रश्न होते त्यातील महत्त्वाचा प्रश्न होता, वृद्धाच्या हक्कावर अतिक्रमण होऊ नये म्हणून प्रार्थना करणारे तरी कुणी आहे का ' त्याचे महत्त्वाचे विचार त्याच्याच शब्दात लिहायचे झाले तर,

' you know dear although I do not have strong, youthful hands yet I have been leading a productive life I have a goal, a purpose and I pursue it passionately If one can see positive side of aging in America, one can definitely add much value to one's old years So, this is the way I am living extended years of my life with elevated vitality, trying to add life to my years ' असे लिहीता येतील

आजींच्या या अनुभवाच्या बोलातून जाणवले, अमेरिकेतील वृद्धाच्या संख्येत, संध्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जाणवण्या इतपत वाढ झाली आहे आणि या 'ग्रे पॅंथर्स'कडे ' स्पेशल क्लास ऑफ पीपल ' म्हणून निश्चितपणे वेगळ्या दृष्टिकोणातून पाहण्याची गरज निर्माण झाली आहे वयाच्या पासष्टीनतरचा समय प्रत्येक वृद्ध व्यक्तीसाठी 'टाईम ऑफ सिरीयस डिक्लाईन' बनून येत नाही त्यामुळे अशा व्यक्तींचे, त्याच्या सेवानिवृत्तीनतरचे दिवस अधिक सार्थकी कसे लागतील ? उत्सा-हवर्धक, समाधानी व आनंददायक कसे होतील ? ह्याकडे अधिक लक्ष दिले गेले पाहिजे त्यासाठी समाजात वेगवेगळे उपक्रम सुरू केले पाहिजेत

क्रिस्टीन आजींनी माझ्या विचाराना चालना दिली होती स्वत च्या वृद्धत्वाबरोबर, एकाकी जीवनाबरोबर इतक्या सहजतेने, तन्मयतेने

समझोता करणारी ही स्त्री मला अत्यंत धीट, धाडसी व खबीर वाटली जीवनातील प्रत्येक क्षणाबद्दल वाटणारी आस्था, श्रद्धा, स्वत च्या गरजा स्वकष्टाने भागविण्याची क्षमता असलेला हा निसर्गवेडा जीव, या एकाकी लढाईत कुठेही थकला नाही, निराश झाला नाही किंवा त्याने तक्रारही केली नाही जीवनाला ओझे मानून जगण्याचा ज्याना छंद आहे, त्यानी एकदा का होईना क्रिस्टीन आजीना जरूर भेटले पाहिजे असे मला वाटले

आमचे संभाषण वेगवेगळी वळणे घेत चालूच होते त्यामधून समजले की, गेले दोन दिवस आजी विमानतळावर अडकून पडल्या आहेत टोकिओला पोहोचताच त्याना समजले की, ज्या एअरलाईनचे पुढचे तिकीट त्याच्या जवळ होते त्या नॉर्थवेस्ट अेअरलाईनचे मॅकॅनिक्स संपावर गेले आहेत मुलाला भेटायच्या उत्कट इच्छेमुळे या ट्रीपसाठी गेले वर्षभर आजीनी खूप कष्ट केले होते, प्रत्येक क्षण निष्ठेने कामात घालविला होता रूट-बीयर, धान्य, कोंबडया, ख्रिसमस—ट्री सजावटीसाठी लागणाऱ्या वस्तु बनवून, विकल्या होत्या व पुरेसे पैसे साठवून त्या आपल्या मुलाच्या भेटीला निघाल्या होत्या परंतु मॅकॅनिक्सचा संप झाल्यामुळे, टोकिओ ते सोल पर्यंत आजीना, युनायटेड अेअरलाईनच्या विमानाने 'स्टॅन्ड बाय' म्हणून म्हणजे जागा मिळेल त्या फ्लाईटने जावे लागणार होते, त्याच्याजवळ असलेल्या रकमेमध्ये, अनिश्चित मुदतीसाठी, टोकिओच्या हॉटेलमध्ये राहाणे परवडले नसते म्हणून गेले दोन दिवस, युनायटेडची फ्लाईट मिळेल ह्या आशेने त्या एअरपोर्टवरच राहिल्या होत्या गेले दोन दिवस जेवणासाठी, येनच्या हिशेबाने, बरेच पैसे खर्च झाले. काल रात्री, उरलेल्या पैशाचा हिशेब केल्यावर लक्षात आले की, एअरपोर्ट टॅक्स दिल्यावर, सोलला पोहोचून, टॅक्सीचा खर्च वजा जाता, थोडेसेच पैसे उरणार आहेत थोडेफार पैसे जवळ असणे आवश्यक व हिताचे आहे या विचाराने काल सध्याकाळपासून त्या जेवल्याही नव्हत्या रात्रीपासून उपाशी असणाऱ्या वृद्धेला आपण बॅगकडे लक्ष द्यायला सागून खुशाल जेवायला निघून गेलो या भावनेने मला फार दोषी वाटू लागले प्रवासाची हौस असणारी एक अमेरिकन स्त्री या भावनेनेच केवळ मी

सुरवातीला त्याच्याकडे पाहिले, याचे मला वाईट वाटू लागले हया नव्या जाणिवेने त्याच्याकडे पाहिल्यावर मला अपराध्यासारखे वाटू लागले अपुऱ्या झोपेमुळे लाल झालेले त्याचे डोळे व थकलेला त्याचा चेहरा पाहून वाईट वाटले आत्मीयतेने संबंध जोडण्यासाठी, आपली खरी ओळख स्वत -लाच करून देणारे असे अल्प क्षण पुरेसे असतात धीर करून त्याना म्हटले, 'आजी मी तुम्हाला काही देऊ केले तर तुम्ही नाकारणार तर नाही ?' 'त्या म्हणाल्या, 'मला तर तुझे नावही माहित नाही, मी तुझी मदत कशी स्वीकारू ?' 'क्रॉसवर हात ठेवून, तुम्ही ज्या देवाची प्रार्थना करीत होता त्याची मुलगी म्हणून स्वीकारा व जेव्हा तुम्हाला शक्य होईल, तेव्हा तुम्ही कुणा गरजवताची मदत करा' असे म्हणत मी, मुठीतील दहा हजार येनची नोट त्याच्या हातात देत म्हटले, 'तुम्ही जेवून या, मी तुमचे सामान साभाळते' साश्रु नजरेने त्यानी विचारले, 'याची परतफेड मी कशी करू ? त्यानी मघाशी बनविलेली कागदी वस्तु त्याच्या हातातून घेत मी म्हटले, 'हा दागिना मला द्या, तुमची आठवण म्हणून या वर्षी माझ्या ख्रिसमस-ट्रीची शोभा हयामुळे वाढेल' माझ्या केसावरून, आईच्या-मायने हात फिरवीत ख्रिस्टीन आजीनी आत्मीयतेने माझा मुका घेतला खुर्चीवरून उठल्या, कपडे सारखे करीत असताना, 'आय हॅव ए ड्रीम' या ब्लाऊजवरील अक्षरावर अभावितपणे त्याची सुरकुतलेली बोटे फिरली अपार कष्ट झेललेली, सुरकुतलेली बोटे अजूनही स्वप्नाचा निर्देष करीत आहेत असे मला उगाचच वाटले आणि जेवण नावाची महागडी गमत शोधायला आजी कॅफेटेरियाच्या दिशेने मार्गस्थ झाल्या वर्तमानपत्रातील स्पोर्टस् पेज वाचण्याचे नाटक करीत आमचे सभाषण चोरून ऐकणाऱ्या विजयने माझ्याकडे पाहिले त्याच्या नेहमीच्या मिस्कील डोळ्यात कमालीचे मृदु भाव दाटले होते

♣

८

# बोलका मुका चेहरा

मी लेक्चर सपविले व सुटकेचा निश्वास टाकला मुले-मुली भराभर वर्गाच्या वाहेर पडली मीही वह्या पुस्तके आवरून होस्टेलच्या दिशेने चालू लागले रोज सशोधनाचा अभ्यास, अर्धवेळ शिकविण्याचे काम यामुळे मी थकून थकून जात असे पण नाईलाज होता आज हवेमध्ये गारवा जरा अधिक जाणवत होता, कधी एकदा होस्टेलवर पोहोंचेन असे झाले होते होस्टेलवर पोहोंचले, रूमच्या दिशेने वळलेली पावल एकदम थवकली लेटर-बॉक्स उघडून पाहण्याची आठवण आली होस्टेलच्या मुख्य दरवाज्यातून आत शिरताच उजव्या हाताला रिसेप्शन डेस्क व त्याभोवती असलेल्या कपाटाच्या कप्प्यामध्ये होस्टेलमधील प्रत्येक मुलग-मुलींसाठी खोलीक्रमाक असलेली छोटीशी पत्रपेटी परदेशातून आलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनीना या पत्रपेटीवद्दल अत्यत जिव्हाळा कारण घरून येणारी पत्र हा त्याचा खरा मानसिक आधार असे सर्व मायेच्या माणसापासून हजारो मैल दूर असल्यावर घरचे पत्र आले की, प्रत्यक्ष घरचे माणूस भेटल्याचा आनद जाणवत असे रोजच घरचे पत्र यावे, ही माझी इच्छा अव्यवहारी, वालिश आहे हे उमगत असूनही रोज अधीऱ्या हातानी पत्रपेटी उघडली जाई व ती रिकामी दिसली की, दिवसभराचा थकवा अधिकच जाणवू लागे पत्र आले का ते पाहण्याचा जणू छद जडला होता त्यामुळे आजही रुमच्या दिशेने निघालेली मी लेटर-बॉक्सकडे वळले उत्सुकतेने पत्रपेटीचे चिमुकले दार उघडले पण निराश झाले आत पत्र नव्हते, पण होस्टेलचे महिन्यातून दोनदा प्रसिद्ध होणारे वातमीपत्र होते होस्टेलचे वातमीपत्र म्हणजे विरगुळा असायचा वातमीपत्रात परीक्षाच्या तारखा, फी भरण्याची शेवटची तारीख, कुणाचा तरी छोटासा लेख, कविता

किंवा विनोद, होस्टेलमध्ये होणाऱ्या पार्टीजच्या तारखा, होस्टेलमध्ये घडलेल्या महत्वाच्या घटना, दाखविल्या जाणाऱ्या आगामी चित्रपटाची जाहिरात इत्यादी मजकूर असे थोड्याशा नाराज मनानेच मी वातमीपत्र घेतले व न उघडता रूममध्ये गेले, ब्रॉश घेतला व वातमीपत्रात काही गोष्टी महत्त्वाच्या व आवश्यक असत म्हणून ते नजरेखालून तरी घालावे म्हणून मी ते चाळू लागले, आणि चाळता-चाळता एका जाहिरातीने माझे लक्ष वेधून घेतले मजकूर पुढीलप्रमाणे होता

स्वयसेवक पाहिजे

हात, पाय लुळे असलेल्या, होस्टेलमधील एका मुक्या मुलास जेवण भरविण्यासाठी स्वखुशीने आपली सेवा देऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनीने, होस्टेलच्या प्रमुख चालकाना सध्याकाळी ६ ते ७ या वेळात भेटावे

ती जाहिरात वाचताच मला तो मुलगा आठवला त्याची स्वयचलित व्हील चेअर चालविण्यासाठी वेगवेगळी वटने होती त्याच्या लुळ्या बोटाना धातुच्या पट्ट्या लावलेल्या होत्या या धातुमय बोटानी तो खुर्चीची वटने ऑन करून विद्यापिठात हिंडत असे, कॅफेटेरियात येत असे हे सर्व करताना त्याला निश्चितच त्रास होत असे पण आपल्या अपगत्वावर मात करण्याची जिद्द त्या खुर्चीने आणि त्या बोटानी त्याला दिली होती अनेकदा मी त्याला कॅफेटेरियाच्या अन्नपदार्थ ठेवलेल्या विभागात पाहिले होते तेथे काम करणाऱ्यापैकी कुणीतरी ट्रे घेऊन, त्याच्यावरोवर फिरून त्याने दाखविलेले पदार्थ प्लेट मध्ये ठेवून, तो ट्रे तेथल्या टेबलावर नेऊन ठेवीत असे वेळेनुसार दोन-चार घास त्याला भरवी व घाईघाईने निघून जाई ते दृश्य वघून मला वाईट वाटे मला आठवते, एखादा त्याला ठसका लागला होता, वाकडी स्ट्रॉ असलेल्या त्याच्या वाटलीत पाणी ओतून, पाणी पाजीपर्यंत तो कासावीस झाला होता खुर्चीने त्याला फक्त सचाराची सोय उपलब्ध करून दिली होती, परतु हातातोंडाची गाठ पडणे मात्र शक्य नव्हते एकदरीत या सगळ्या प्रकारामुळे त्याची उपासमारच होत असावी, तेव्हा त्याला भरविण्यासाठी कुणाची तरी मदत अत्यावश्यक आहे हे जाणवून होस्टेलच्या सचालकानी ही जाहिरात दिली असावी

डोळ्यावर झोप आली तरी मी विचार करीतच होते एकदम

काहीतरी निश्चय करीत मी उठले, माझी डायरी उघडून वेळापत्रक पाहिले व या मुलाला वेळ देता येईल का ? याचा विचार करू लागले सकाळी डिपार्टमेन्टमध्ये गेले की, सध्याकाळीच परतणे शक्य होई, कारण अर्ध-वेळ शिकविणे, स्वत च्या अभ्यासाची लेक्चर्स, ग्रथालयात सशोधनासाठी घालवावा लागणारा वेळ, होस्टेल ते डिपार्टमेंट हे अतर रोज दोनदा चालून जाणेयेणे व सध्याकाळी दोन तास रिसेप्शन डेस्कवर करायचे काम वेळ असता तर बरे झाले असते असे वाटले पण इच्छा असूनही मी त्या जाहिरातीला प्रतिसाद देऊ शकले नाही बघू या, पुढच्या टर्ममध्ये वेळापत्रक ॲडजेस्ट करून घेऊ नक्कीच कुणीतरी या मुलाला मदत करायला तयार होईल या विचाराने स्वत चे समाधान करुन घेतले

वीकएन्ड आला, अमेरिकन विद्यार्थ्यांना बेहोष करण्याची जादू असलेला शनिवार, रविवार मात्र माझ्यासाठी चिक्कार कामे घेऊन येई घरी पत्र लिहीणे, होमवर्क सपविणे, टर्म पेपर्स टाईप करणे या कामामध्ये त्या मुलाचा विचार देखील मनात आला नाही सोमवारी नेहमीप्रमाणे तासाला निघाले आणि मला तो त्याच्या व्हीलचेअरवरून जाताना दिसला जाहिरातीला प्रतिसाद मिळाला की, नाही देव जाणे मी ठरविले, आज त्याला मदत मिळाली का हे शोधून काढायचेच

रोज सध्याकाळी सातच्या आत सध्याकाळचे जेवण घ्यावे लाग आज जरा उशीरच झाला होता भराभरा काही खाद्यपदार्थ प्लेटमध्ये वाढून घेतले प्लेट ट्रेमध्ये ठेवली व कोपऱ्यातील एका टेबलाजवळ जाऊन ट्रे टेबलावर ठेवला पिण्याच्या पाण्याचा पेला भरुन आणला व खुर्चीवर बसून पहिला घास घेतला नि एकदम थबकले दूर कोपऱ्यामध्ये त्याची व्हीलचेअर दिसली, तो पाठमोरा होता मुलाच्या गर्दीतून वाट काढीत मी त्याच्या टेबलाजवळ जाऊन पोहोचले व जेवणाचा ट्रे, त्या टेबलावर ठेवीत म्हणाले, 'May I Join you ?' ' Most Certainly' त्याला आस्थेने जेवण भरविणाऱ्या गोड चेहऱ्याच्या मुलीने हसून प्रत्युत्तर दिले स्थिर न राहणारी मान कशीवशी सावरून मोठ्या समाधानाने तो जेवत होता त्याला अभिवादन करीत मी म्हणाले, 'तुम्हाला ही मदत मिळाली याचा मला आनद वाटतोय' ' मी मदत करीत नाही, मी माझे कर्तव्य करीत

आहे,' ती मुलगी पटकन म्हणाली मला कुणीतरी चपराक मारल्यासारखे वाटले 'That's nice, someone should do it ' मी अपराधी-पणाची भावना लपवीत म्हटले व अन्यमनस्कपणे जेवायला सुरुवात केली एवढ्यात जेवण भरविताना, तिच्या हातून चमचा सुटला व खाली पडला ती वाकून चमचा घेण्याचा प्रयत्न करणार तोच मी म्हणाले, 'Allow me ' व दुसरा चमचा काऊंटरवरून आणून देण्यासाठी मी उठले जाण्यापूर्वी जमिनीवर पडलेला चमचा उचलून बेसीनमध्ये टाकावा म्हणून खाली वाकले क्षणभर नजर थिजल्यासारखी झाली ती मुलगी अपग होती तिला पाय नव्हते मी तिला नवीन चमचा आणून दिला कसेबसे जेवण संपविले व त्या दोघांचा निरोप घेऊन रूमकडे निघाले डोळ्यासमोर सतत येत होती हातपाय नसणाऱ्या मुलाला भरविणारी, पाय नसलेली पण हात सलामत असलेली ती सुन्दर मुलगी आणि मला वाटले अनेक अपग मनाच्या अमेरिकेत मनाने अपग नसलेली ही एकच मुलगी आहे डोळ्या-च्या कडा नकळत पाणावल्या शरीराने अपग पण मनाने समृद्ध असलेल्या ह्या दुर्मिळ अमेरिका-दर्शनाने मला मूक केले आणि चालता-चालता मला वाटू लागले की, मीच अपग आहे

♣

घात टळला  एकूण या मुलाची जगण्याची जिद्द, जीवनाबद्दल आस्था, उत्साह सारे, सारे वाखाणण्याजोगे होते या मुलाची कीव करण्याचे काही-ही कारण नाही हे लक्षात आले व दुसऱ्याच क्षणी त्याच्या विचारानी मला आगळीच स्फूर्ती दिली  सर्व अवयव शाबूत असणे हे केवढे मोठे भाग्य आहे याची पहिल्यादाच जाणीव झाली व निराश होता कामा नये असे स्वत'ला बजावले  ओठावर शद्व आले, 'थँक्यू, फ्रेन्ड'

दिवसभराचा अभ्यास  सपवून मी घाईघाईने होस्टेलकडे  परतले कारण आज 'व्हॅलन्टाईन्स डे' असल्याने स्पेशल जेवण होते व सातच्या आत पोहोंचले नाही तर कॅफेटेरिया बद झाला असता  वर्गात, एका अमेरिकन मैत्रिणीला, 'व्हॅलन्टाईन्स डे' का साजरा करतात? हा प्रश्न विचारून माझी जिज्ञासा भागवून घेण्याचा प्रयत्न केला  तिने दिलेल्या माहितीतून एवढेच समजले होते की, हा मूळचा फ्रान्स व इग्लडमधील रिवाज आहे १४ फेब्रुवारी या सेट व्हॅलेन्टाइन्स डे च्या सध्याकाळी तरूण-तरूणी एकत्र जमत असत  सर्वांच्या नावाच्या चिठ्या एकत्र ठेवून त्यातील एक चिठ्ठी उचलीत  चिठ्ठीवर ज्या व्यक्तिचे नाव असेल तो/ती चिठ्ठी  उचलणाऱ्याची व्हॅलेन्टाईन किवा स्वीटहार्ट आहे असे पुढच्या व्हॅलेन्टाईन्स डे पर्यंत समजले जाई  अमेरिकन मुला-मुलीनी या रिवाजाला आपल्याला सोईस्कर असे रुप दिले आहे  अमेरिकन  मुलेमुली  आपल्याला  आवडणाऱ्या व्यक्तिला  व्हॅलन्टाईन्स डे ग्रिटीग कार्ड पाठवून 'यूवर  सिक्रेट लव्हर' किवा 'यूवर सिक्रेट अॅडमायरर' अशी  सही करतात वा अन्य रीतीने आपल्या भावना व्यक्त करतात  तरूण-तरूणींना आपल्या भावना व्यक्त करायला एक रोमहर्षक सध्याकाळ देणारा दिवस म्हणजे व्हॅलेन्टाईन्स डे अशी मनाशी सोपी व्याख्या करीत, मी होस्टेलच्या दारातून आत  शिरले व लॉबीमध्ये एका  बोर्डजवळ विद्यार्थ्यांची गर्दी पाहून कुतूहलाने थावले  एका  लाकडी स्टॅडवर, हृदयाच्या आकाराचा मोठा कार्डबोर्डचा तुकडा,  रगीबेरगी  कागदानी सजवून लावला होता  काही विद्यार्थी-विद्यार्थिनी त्यातील एकेक छोटा कोपरा शोधून आपल्या 'सिक्रेट-लव्हर' साठी निरोप लिहीत होते  बाकीचे विद्यार्थी बोर्डावर लिहीलेली मिनी प्रेमपत्र वाचीत होते  त्या गर्दीत तो अपग मुलगाही होता,  त्याच्याकडे

९

# तो आणि ती

आधुनिकीकरणाचा शहरी समुदायावर होणारा परिणाम या विषयावर प्रोफेसर बोलत होते साधारण पहिला अर्धातास सपल्यावर सराचे लेक्चर नेहमीप्रमाणे कटाळवाणे होऊ लागले व मी दरवाजाच्या काचेतून बाहेर बघू लागले विद्यार्थी-विद्यार्थिनी जात येत होते नि मला तो दिसला माझ्या होस्टेलमध्ये राहणारा अपग मुलगा त्याची व्हीलचेअर थावली होती आणि मोठ्या मुष्कीलीने, आपल्या अधु बोटाना लावलेल्या धातुच्या पट्ट्याने तो खुर्चीच्या हातावर बसविलेल्या बटनाशी धडपड करीत होता भान न राहवून मी वर्गातून उठले व बाहेर पडून धावतच त्याच्या खुर्चीपर्यंत गेले खुर्ची सुरू करून वळवून दिली व तो निघून गेला आज प्रथमच त्याला मी इतक्या जवळून पाहिले त्याचे दोन्ही हात व दोन्ही पाय लुळे होते, तो मुका होता व त्याची मान काही क्षणा शिवाय जास्त वेळ स्थिर राहू शकत नव्हती स्वत तच हरविलेल्या त्याला मी त्याच्या व्हीलचेअरवरून जाताना अनेकदा पाहिले होते

त्या मुलाचा विचार करीतच मी वर्गात परतले व मला एकदम आठवले, स्प्रिग टर्मच्या पहिल्या दिवशी स्टुडट न्यूजपेपरच्या पहिल्या पानावर त्याचा फोटो आला होता हिवाळ्यात पोहण्याचा तलाव बद असे वसतऋतुची चाहूल लागताच 'आऊटडोअर अॅक्टिव्हिटीज' सुरू होत पोहण्याचा तलाव विद्यार्थ्यांसाठी खुला होई 'लाईफ गार्डस' आपल्याला निश्चित साभाळतील या विश्वासाने, त्या अपग मुलाने स्प्रिग टर्मच्या पहिल्या दिवशी व्हील चेअरवरून पाण्यात उत्साहाने उडी मारली एकदा विन्टरमध्ये बर्फावरून त्याची व्हील चेअर घसरली तेव्हा काही विद्यार्थ्यांनी धावत जाऊन व्हील चेअर पकडली म्हणून पुढे होणारा अप-

घात टळला एकूण या मुलाची जगण्याची जिद्द, जीवनाबद्दल आस्था, उत्साह सारे, सारे वाखाणण्याजोगे होते या मुलाची कीव करण्याचे काही-ही कारण नाही हे लक्षात आले व दुसऱ्याच क्षणी त्याच्या विचारांनी मला आगळीच स्फूर्ती दिली सर्व अवयव शाबत असणे हे केवढे मोठे भाग्य आहे याची पहिल्यादाच जाणीव झाली व निराश होता कामा नये असे स्वत ला बजावले ओठावर शब्द आले, 'थँक्यू, फ्रेन्ड'

दिवसभराचा अभ्यास सपवून मी घाईघाईने होस्टेलकडे परतले कारण आज 'व्हॅलन्टाईन्स डे' असल्याने स्पेशल जेवण होते व सातच्या आत पोहोंचले नाही तर कॅफेटेरिया बद झाला असता वर्गात, एका अमे-रिकन मैत्रिणीला, 'व्हॅलन्टाईन्स डे' का साजरा करतात? हा प्रश्न विचारून माझी जिज्ञासा भागवून घेण्याचा प्रयत्न केला तिने दिलेल्या माहितीतून एवढेच समजले होते की, हा मूळचा फ्रान्स व इग्लडमधील रिवाज आहे १४ फेब्रुवारी या सेंट व्हॅलेन्टाइन्स डे च्या सध्याकाळी तरूण-तरूणी एकत्र जमत असत सर्वांच्या नावाच्या चिठ्या एकत्र ठेवून त्यातील एक चिठ्ठी उचलीत चिठ्ठीवर ज्या व्यक्तिचे नाव असेल तो/ती चिठ्ठी उचल-णाऱ्याची व्हॅलेन्टाईन किंवा स्वीटहार्ट आहे असे पुढच्या व्हॅलेन्टाईन्स डे पर्यंत समजले जाई अमेरिकन मुला-मुलींनी या रिवाजाला आपल्याला सोईस्कर असे रुप दिले आहे अमेरिकन मुलेमुली आपल्याला आव-डणाऱ्या व्यक्तिला व्हॅलन्टाईन्स डे ग्रिटींग कार्ड पाठवून 'यूवर सिक्रेट लव्हर' किंवा 'यूवर सिक्रेट ॲडमायरर' अशी सही करतात वा अन्य रीतीने आपल्या भावना व्यक्त करतात तरूण-तरूणींना आपल्या भावना व्यक्त करायला एक रोमहर्षक सध्याकाळ देणारा दिवस म्हणजे व्हॅले-न्टाईन्स डे अशी मनाशी सोपी व्याख्या करीत, मी होस्टेलच्या दारातून आत शिरले व लॉबीमध्ये एका बोर्डजवळ विद्यार्थ्यांची गर्दी पाहून कुतूहलाने थांबले एका लाकडी स्टँडवर, हृदयाच्या आकाराचा मोठा कार्डबोर्डचा तुकडा, रंगीबेरंगी कागदांनी सजवून लावला होता काही विद्यार्थी-विद्यार्थिनी त्यातील एकेक छोटा कोपरा शोधून आपल्या 'सिक्रेट-लव्हर' साठी निरोप लिहीत होते बाकीचे विद्यार्थी बोर्डावर लिहीलेली मिनी प्रेमपत्र वाचीत होते त्या गर्दीत तो अपग मुलगाही होता, त्याच्याकडे

कुणाचे लक्षही जात नव्हते सकाळीच मी त्याला मदत केली असल्याने त्याने हसून माझ्याकडे पाहिले व मी जवळ जावे असा इशारा केला मी त्याच्या खुर्चीजवळ गेले त्याच्या एकुण खाणाखुणाचा अर्थ लावीत त्याच्या खुर्चीच्या पाठीला अडकविलेल्या पिशवीतून एक प्लॅस्टिकची पाटी काढून त्याच्यासमोर धरली त्या पाटीवर इग्रजी मुळाक्षरे लिहीलेली होती तो आपल्या लुळ्या बोटानी मला काही अक्षरे दाखवू लागला व त्याने दाखविलेल्या अक्षरातून तयार झालेले वाक्य मी त्या बोर्डावर लिहावे असे त्याने खुणेने सुचविले माझ्याजवळ असलेल्या हिरव्या, निळ्या, लाल शाईच्या पेनचा उपयोग करून मी हृदयाच्या आकाराच्या बोर्डच्या कोपऱ्यात छोटे हृदय चितारले व त्यात त्या मुलाला हवे असलेले वाक्य लिहीले ते पुढील-प्रमाणे होते --

'ल्युसी यू आर ब्यूटीफल'

त्याच्या चेहऱ्यावरचे समाधान निरखीत मी रूमवर गेले तोंड धुवून दिवस-भराचा थकवा सपविण्याचा प्रयत्न केला व मैत्रिणीला फोन करून कॅफेटे-रियात जेवायला येतेस का ? विचारले आम्ही दोघी जेवायला गेलो, जेवत असता काही मिनिटापूर्वी घडलेला प्रसग सागितला व ही ल्युसी तिच्या माहितीची आहे का ? याची चौकशी केली तिने सागितलेल्या माहितीमुळे, प्रेम या भावनेचा एक अगदी वेगळा पैलू माझ्या ध्यानात आला ज्या ल्युसीला त्या अपग मुलाने सुंदर म्हटले होते, ती त्याला रोज जेवण चारायला मदत करणारी अधू पायाची मुलगी होती ल्युसीच्या मदतीची अशी लोभस जाणीव ठवणारा व ती इतक्या सुदररित्या व्यक्त करणारा अपग मुलगा त्या क्षणानतर माझ्या नजरेला कधीच अपग दिसला नाही एक निरागस हृदय, एक स्वच्छ दृष्टिकोण, एका स्वर्गीय मानवतेचा अश जपणारा तो अमेरिकन मुलगा मला खरोखर खूप देखणा वाटू लागला

येथे आल्यानतर काही अनुभवाती वाटू लागले होते की, अमेरिकन स्त्रियाचा एकच चेहरा असतो, 'रगविलेला चेहरा' आणि अमेरिकन पुरु-षाचाही एकच चेहरा असतो, 'नाटकी, फोनी चेहरा' पण या चेहऱ्या-पलिकडे जाऊन विचार करायला लावणारा, एक न बोलू शकणारा तरीही अत्यत बोलका चेहरा मला पाहायला मिळाला व अतीव मानसिक समाधान

अनुभवले या दशात असा निष्पाप, निरागस, मानवी चेहरा पहायला मिळणे ही दुर्मिळ चीज झाली आहे आणि त्यामुळेच का ? या मुलाच्या मानेला ताठपणे जगणे या समाजात जमत नसावे असे वाटले दर काही सेकदानी दोनपैकी एका खाद्याचा आधार घेऊन जग इच्छिणारी त्याची मान लोकाना वाकडी दिसत असेल पण मला मात्र, एकमेव 'सरळ' चेहरा साभाळणारी ती ताकदपूर्ण मान वाटते आहे

त्या मुलाचा 'मान' ठरलेल्या त्या मानेचा व त्याच्या निर्व्याज मनाचा अपग म्हणून कुणीही अपमान करू नये असच वाटत, नेहमीच वाटत राहील या छोट्या मनाच्या अमेरिकेत मनाचा सरळपणा सापडला पण मनमानी करीत जगणारे त्यालाच वाकडातिकडा, लुळापागळा व मुका समजताहेत कदाचित म्हणूनच या देशात नाजूक दवबिंदु देखील गोठून बर्फ बनत असावेत

♣

१०

# मिस्टर मम्मी

सर्व सोयी असलेल्या एका खोलीला अमरिकेत 'स्टुडिओ अपार्टमेन्ट' म्हणतात अशा अपार्टमेन्टचे भाडे महिन्याला चारशे ते पाचशे डॉलर्स असते तरीही बेन, वय वर्ष चोवीस, एका स्टुडिओ अपार्टमेन्टमध्ये राहत होता. चक्क एकटा आणि एकट्याच्या दृष्टिकोणातून स्टुडिओ अपार्टमेन्टचे भाडे परवडणारे नव्हते कारण केवळ स्वत च्या एकाकी पणाचा विचार करण्यासाठी एवढे भाडे भरण्यात अर्थ नव्हता परतु सध्या तरी तो आणि त्याचे विचार या अपार्टमेंटमध्ये राहत होते आणि विचाराच्या केंद्र स्थानी होती ती, त्याची भूल हाऊ घातलेली प्रेयसी निकी अंधार वाढत चालला, थडी जाणवू लागली खिडकी बद करताना ती भाडून निघून गेली त्या रस्त्याकडे नजर गेली व मनातील कटुता वाढली मन दुसरी-कडे लावावे या विचाराने त्याने टी व्ही चे बटन दाबले टेलिव्हिजन स्टेशन गभीरतेने विचारत होते, 'रात्रीचे दहा वाजलेत, डू यू नो व्हेअर यूवर चिल्ड्रन आर ?' काही वर्षांपूर्वी अशाच प्रकारचा प्रश्न विचारला जाई परतु त्यातला मतितार्थ वेगळा असे मुले घरात तरी आहेत ह्याची खात्री स्पष्ट होई प्रश्न असा असे, 'आपण आपल्या मुलाला आज कुशीत घेतले का?' ( Did you hug your child today ?)मुलाकडे आईवडिलाचे किती दुर्लक्ष होत आहे याची आठवण करून देऊन, टी व्ही समय सूचकता दाखवतो आहे की, कुटुबसस्थेचे ओझे कमी करण्याचा प्रयत्न करतो आहे ? असे मला ही सूचना ऐकून वाटे एक मात्र निश्चित की, मुले व आई-वडीला-वरील बोलके भाष्य या प्रश्नातून प्रगट होत होते बेनला वाटले टी व्ही ने असाही एक प्रश्न विचारावा, 'डू यू नो व्हेअर यूवर पेरेन्टस आर ?' आणि बेनला वाटू लागले बालपणापासून प्रत्येकजण आपल्याला हाच

प्रश्न विचारतोय त्याला त्याच्या अस्तित्वाची जाणीव झाली तव्हा तो 'फॉस्टर होम' मध्ये होता तो कोठून आला? त्याचे आई-वडिल कोण ? ही माहिती त्याला कोणी दिली नाही दाईकडून आईचे सुख मुलाला कोठून मिळणार ? अस्वस्थता, औदासिन्य, दबाव, थकवा, निराशा, आत्यंतिक काळजी, एक अनाम पोकळी व अभावाच्या असख्य जाणीवा घेऊन बेन मोठा झाला त्याच्या खोलीतील भिंतीना सजविण्यासाठी, कधीही त्याच्या-जवळ आपल्या म्हणता येतील अशा व्यक्तीचे फोटो नव्हते अठराव्या वर्षी तो 'फॉस्टर होम 'मधून बाहेर पडला एकाअर्थी शापित बालपण जगून बेन उघड्या जगात आला बालपणाला सोईस्कररीत्या विसरून व म्हातारपणाला पदोपदी नाकारून, तारूण्याची पूजा करणारा हा समाज, त्याच्या देखण्या तारूण्याच्या पदरात काय टाकतो याची परीक्षा घेण्या-साठी बेन जगाच्या बाजारात आला जगणे या क्रियेतील आनद, समाधान चैतन्य हे सारे अनुभविण्याची दुर्दम्य इच्छा घेऊन त्याने कॉलेजमध्ये नाव नोदविले, नोकरी मिळविली, एका खोलीची का होईना स्वत'ची जागा भाड्याने घेतली थोड्या कालावधीतच निकीशी परिचय होऊन त्या दोघाचे रगीत छायाचित्र त्याच्या एका खोलीच्या घराच्या रिकाम्या भितीची शोभा वाढवू लागले बेनला वाटायचे छपरावर उभे राहून सर्व जगाला ओरडून सागावे, 'निकी माझी आहे, मी निसर्गातील रगसगतीवर प्रेम करतो, फुलाच्या सौरभावर प्रेम करतो चमचमणाऱ्या चादण्याशी हितगुज करतो माझी प्रत्येक सकाळ पक्ष्याच्या कलरवाला बदिस्त करीत माझ्या कानाशी रूजी घालते ' निकीमुळे बेनला असे काही तरी वाटू लागले होते जीवनाचे युद्ध लढण्याची ताकद आपल्या बाहुत आहे असे जाणवू लागले होते परन्तु निकीने, त्याच्या स्वप्नावर फार निष्ठुरतेने प्रहार केला होता

आपल्या आयुष्याला वळण लावणारी ती सध्याकाळ त्याच्या डोळ्यासमोर तरळू लागली महत्त्वाचे काही बोलण्यासाठी त्याची प्रेयसी त्या सध्याकाळी त्याला भेटायला आली तिला बाळ होणार आहे ही आनद-दायक बातमी तिने कमालीच्या थडपणे सागितली लग्नाआधी मूल होणे ही वास्तवता, अमेरिकेत अगदी सहजपणे स्वीकारली जाते निकीबरोबर

विवाहबद्ध होण्याचे स्वप्न लवकरात लवकर प्रत्यक्षात आणावे लागणार या कल्पनेने बेन रोमांचित झाला. लहानपण फॉस्टर होममध्ये गेल्यामुळे, स्वतःचा संसार थाटायचा, स्वतःच्या हक्काच्या मुला-बाळांना सर्व सुखे भरभरून द्यायची, एक तृप्त, साधे, सोपे, समाधानी जीवन जगायचे एवढेच चिमुकले त्याचे स्वप्न होते. बेनचे विचार निकीला पटत नव्हते. त्याच्या स्वप्नाशी ती सहमत झाली नाही. तिने त्याला ऐकवले, 'बेन वयाच्या एकविसाव्या वर्षी मला संसाराची जबाबदारी घ्यायची नाही, मला लाईफ एन्जॉय करायचेय, वेगवेगळे अनुभव घ्यायचेत. नृत्य-कलेत प्राविण्य मिळवून ब्रॉडवे शोज्‌मध्ये काम करून प्रसिद्धी मिळवाय-चीय. हे बघ, बेन तू मला अत्यंत प्रिय आहेस पण आपल्या दोघांच्या सध्याच्या पगारात मूल वाढविणे ओझे वाटणार आहे. विचारांची परि-पक्वता, आयुष्यभराची जबाबदारी पेलण्याची तयारी, अधिकार–भावनेत असावा लागतो तो समतोल, मुलाला सुरक्षितता देता येईल इतपत आर्थिक स्थैर्य, मूल वाढवायला लागणारी शिस्त यापैकी काहीही या क्षणाला तरी माझ्या व्यक्तित्वात नाही. असले तरी ते शोधायला वेळ नाही. पुढील पाच वर्षांच्या माझ्या प्लॅनमध्ये मूल बसत नाही. शिवाय आजच्या सेल्फ एक्स-प्रेशनच्या व्याख्येत अपार कष्ट, चिकाटी, निस्वार्थीपणा, जबाबदारीतले सातत्य या मूल वाढविण्यासाठी लागणाऱ्या अत्यावश्यक गोष्टी बसतात का? तूच सांग स्त्रीच्या शारिरीक, मानसिक आरोग्याचा नव्याने विचार होऊ लागला पण लहान बाळाच्या शारिरीक व भावनिक गरजा बदलल्या नाहीत रे. आपल्या मुलासाठी एकाग्रपणे देण्यासाठी आपल्याकडे वेळ तरी आहे का ? भावनिक तादात्म्य अनुभविण्यासाठी,आपली वैचारिक, भाव-निक वाढ होण्यासाठी, मूल वाढविण्यासाठी, तुझी ही एका खोलीची जागा पुरेल का ? आपण दोघांनी तर्कसंगत विचार करून एकमेकांसाठी वेळ दिला पाहिजे. अवधी आणि एकमेकांतील अंतर – टाईम ॲन्ड स्पेस तुला महत्त्वाचे कसे वाटत नाही ? आपल्या प्रथम भेटीतच तुझी जीवनाकडे पाहण्याची भाबडी, सरळ वृत्ती माझ्या लक्षात आली होती, म्हणून पहिल्या वेळी मी तुला न सांगता गर्भपात करून घेतला. यावेळी फार उशीर झालाय, गर्भपात करण्यात धोका आहे असे डॉक्टरांनी सांगितले, म्हणून मी मुलाला जन्म देण्याचे ठरविले आहे. बाळाच्या भविष्याच्या

दृष्टीने विचार करून मी निर्णय घेतला की, आपण बाळ ॲडॉप्शनसाठी द्यायचे सरकारी एजन्सीतर्फे प्रयत्न केले तर वकीलाचा खर्चही करावा लागणार नाही सरकारी एजन्सी आपल्या बाळासाठी योग्य घर व दत्तक आईवडील शोधून देईल तू विचार कर व या अर्जावर सही करून ठेव तुझ्या सहीशिवाय मला पुढील हालचाली करता येणार नाहीत सध्याच्या वाढत्या स्पर्धेच्या जगात मला माझ्या करिअरचा विचार करणे अधिक महत्त्वाचे वाटले तू ॲडॉप्शन पेपर्स नीट वाच व सही करून ठेव मी उद्या सकाळीच पेपर्स घेऊन जायला येईन', व ती निघून गेली

बेन अतरात मोडून पडला निकीचे विश्लेषण त्याला पटत होते, पण उपाय पटत नव्हता अमेरिकन जीवनाची मोठी गमत आहे परि-स्थितीचे ॲनालिसिस करणे, आपला निर्णय बरोबर आहे हे पटवून देण्या-साठी कारणमीमांसा शोधणे, आपल्या वागण्याचे पटेल अशा शब्दात सम-र्थन करणे, हे दहापैकी नऊ व्यक्तींना व अगदी दहाबारा वर्षांच्या मुलानाही जमते रेडिओ, टी व्ही वरील मानसशास्त्रज्ञाचे टॉक शोज, शाळेत, हॉस्पिटलमध्ये समस्या-समाधानासाठी सहजपणे उपलब्ध अस-णारे मानसशास्त्रज्ञ, सोशल वर्कर व काऊन्सिलर्स याची मदत, या सर्व सोयीमुळे देखील परिस्थितीचा 'परफेक्ट ॲनालिसिस' करण्याच्या दृष्टीने विचार करण्याची सवय त्याना होत असावी इतके साग्रसगीत विश्लेषण करून, परिस्थितीचा एवढा बारकाईने विचार करून एकत्र येणाऱ्या जोड-प्प्याचेच अधिक घटस्फोट होतात असे का ? मला वाटते माणसे विचार खूप करतात पण विचाराना कृतीची जोड असावी याचा बहुधा त्याना विसर पडत असावा

निकीच्या ॲडॉप्शनच्या निर्णयामुळे बेनची धुन्दी उतरली होती तो जागा झाला होता सदैव प्रेयसीच्या रूपात तिला पाहणाऱ्या बेनला तिचे हे रूप अगदी वेगळे वाटत होते त्याला वाटत होते निकीच्या चेहऱ्या-वरचा प्रेयसीचा मुखवटा गळून पडलाय आज त्याच्या डोक्यात प्रकाश पडला की, तिच्या भावनिक, शारिरीक, आर्थिक गरजा भागविण्या-साठी, तिने त्याचा सोईस्करपणे शिडीसारखा उपयोग करून घेतला आहे आता तिच्या उचीवरून तिला त्याचे जग, त्याच्या इच्छा-

आकाक्षा, गरजा  नगण्य दिसतात, अगदी न जाणवण्या इतपत.

स्वत च्या  फायद्यासाटी  जीवत माणसाचा उपयोग करण्याच्या स्वार्थी वत्तीची त्याला  मनापासून  चीड येत असे  लहानपणापासून त्याने पदोपदी तेच अनुभविले  बेन स्वत ला प्रश्न विचारू लागलाय, 'डू यू नो व्हेअर यू आर' ? आपण स्वत  जीवनाच्या कोणत्या वळणावर उभे आहोत ? जीवनाची निश्चित दिशा कोणती ? हे कष्ट, ही धडपड कोणासाठी ? हे प्रश्न स्वत ला विचारणाऱ्या बेनला, लहान मुलाना केन्द्रीभूत मानणारी सस्कृती, समाज आता स्वप्नवत् वाटू लागलाय  स्वत च्या स्वप्नाचे असे तुकडे-तुकडे होताना पाहून तो कासावीस झाला  त्याच्या बाळाचा पहिला मुलायम स्पर्श कसा असेल, असा कोमल विचार करण्याचा क्षणही निकीने केलेल्या आघातामुळे  त्याच्याजवळ उरला नव्हता

व्यक्तिला जे पाहिजे ते मिळू नये असाच जगाचा मूलभूत नियम आहे का ? स्वत चे सुख हेच अतिम साध्य मानणारी, 'सुखलोलुप कर्मवादाच्या' (Hedonism) आहारी जाऊन,स्वत च्या मुलाला ओझे मानणारी निकी त्याला अत्यत कुरूप वाटू लागली  त्याच्या समाधानाला डावलण्याचा अधिकार तिला कुणी दिला ? बाळाला ॲडॉप्शनसाटी द्यायचे ठरविणारी ती कोण ? तो स्वत ला प्रश्न विचारू लागला, ज्याची उत्तरे त्याच्याकडे नव्हती

बाहुल्या  जमा करणे  किवा तिकीटे गोळा करणे अशा छदाप्रमाणे मुले दत्तक घेणारी काही कुटुबे त्याला आठवली यातील काही  कुटुबामध्ये मुलाचे बालपणातील भाव जीवन  उध्वस्त झाले  जबाबदारी पेलत नाही म्हणून परिणामी मुलाना इतकी मारहाण झाली की, काही मुलाचे केविलवाणे मृत्यु झाले काही मुले घरातून पळून गेली व वाईट मार्गाला लागली  अशा अनेक प्रसगाबाबत ऐकत व काही प्रसग डोळ्यासमोर घडताना पाहत, तो स्वत ही एका फॉस्टरहोममध्येच  वाढला होता आधुनिक समाजाच्या गरजाप्रमाणे, मुलाच्या सगोपनाकडेही बदलत्या दृष्टिकोणातून पाहिले पाहिजे हे त्याला कळत होते  येथील बहुतेक स्त्रिया लोकापवादाची पर्वा करीत नाहीत  घटस्फोटासारखी, मूल ॲडॉप्शनला देण्यासारखी गभीर घटनाही कॅज्युअली घेऊ शकतात याची बेनला कल्पना

होती पण स्वतंत्र समाज,स्त्रीपुरुषाचा समान दर्जा,समान हक्क या संकल्पना-बरोबरच ध्येय, स्वत चे अस्तित्व टिकविणे, आणि वाह्यरूप म्हणजे ॲपिअरन्स जपायचे की मुले ? यातून एकाची निवड करण्याचा प्रश्न उद्भवू शकतो हे त्याला प्रथमच प्रकर्षाने जाणवले जीवनाच्या सर्व क्षेत्रात स्त्रीपुरुषाना समान संधी उपलब्ध झाल्या नोकरीनिमित्ताने स्त्री-चा अधिक वेळ घराबाहेर जाऊ लागला करमणुकीची, मनोरंजनाची साधने व प्रकार वाढले कॅबरे नृत्य करणाऱ्या स्त्रियाप्रमाणे काहीसे त्याच थाटाचे नृत्य करणारे पुरुषही स्टेजवर नाचू लागले स्त्रियाच्या समान हक्काच्या वेडाचा फायदा उठवून क्लबात,संगीताच्या तालावर, पैशासाठी अंगावरचे कपडे उतरवू लागले काही अल्ट्रा मॉडर्न म्हणवून घेणाऱ्या स्त्रिया, ओठात सिगारेट सजवून, एका हातात वाईन किंवा व्हिस्कीचा ग्लास घेऊन, दुसऱ्या हाताने नर्तकासाठी दौलतजादा करु लागल्या म्हणजे अक्षरश नोटा त्याच्या तोकड्या अंत वस्त्रात कोबू लागल्या 'आय डिझर्व्ह सम फन' असे म्हणत स्त्री मुक्ती आंदोलनाचे समर्थन करू लागल्या नीती-मूल्ये इतकी का बदलली ? 'फ्री मोरॅलिटी' सहन करण्याची समाजाची ताकद वाढली की लोकाची ? बेन विचार करीत होता येथील शेजारी जर शेजाऱ्याशी साधा परिचय वाढवायला उत्सुक नाही, तर कुणाला कुणाच्या बऱ्यावाईट वागण्याची चिकीत्सा करण्याचे काय कारण ? शिवाय इतकी व्यवधाने असल्यावर,नीती अनीती या Heavy म्हणजे डोक्यावरून जाणाऱ्या गोष्टीसाठी वेळ कोण देणार ? हे सारे जरी अक्षरश खरे असले तरी मूल जन्माला येण्याआधी त्याला ॲडॉप्शनसाठी देण्याचा एकतर्फी निर्णय घेणारी कुमारी माता निकी, बेनच्या आधुनिकतेच्या व्याख्येत बसत नव्हती असे करण्याने 'सेल्फ-इमेज' जपण्यासाठी वेळ मिळणार आहे असे निकीला वाटते पण मूलत जर तिचे स्वत्त्व सबळ, सशक्त नाही तर अशा 'वीक सेल्फ इमेजला' निकी जपणार म्हणजे नक्की काय करणार? अशा अनेक उलटसुलट विचारात थकून त्याला झोप लागली सकाळी तो जागा झाला तो डोअर-बेलच्या आवाजाने

इतक्या सकाळीही मेकअपने रंगविलेला चेहरा घेऊन निकी दारात उभी होती तिला आत यायला सांगून त्याने दरवाजा बंद केला शिष्टा-

चार न विसरता चहा केला एक कप तिच्या हातात दिला व तिच्या बोल-ण्याची वाट पाहू लागला चहाकडे दुर्लक्ष करून ती तावातावाने बोलू लागली, 'बेन तू अजूनही सही केली नाहीस, मुकाट्याने सही करून ते कागद मला परत दे सही केली नाहीस तर नाईलाजाने मला उपलब्ध असलेल्या कायदेशीर ऑप्शन्सचा विचार करावा लागेल तुला चाईल्ड-सपोर्ट द्यावा लागेल तुझ्यासाठी आर्थिकदृष्ट्या तो एक कॉस्टली सौदा होईल तुला कळत कसे नाही? मी तुझ्याही फायद्याच्या दृष्टीने बोलते आहे'

आर्थिक सुरक्षितता एवढाच जीवनाचा हेतु असावा का ? तिचे ते बोलणे बेनला शुष्क वाटत होते कठोर वाटत होते बेन निकीच्या चेहऱ्या-कडे पाहत होता मातृत्वाची चाहूल लागलेल्या एका ममतामयी स्त्रीचा चेहरा तो शोधत होता स्वत चे मूलही सहज स्वाभाविकतेने स्वीकारू न शकणारे तिचे हे नवे रूप त्याला अत्यत अस्वाभाविक वाटत होते ज्यातील स्त्रीत्वाचे अस्तित्व सकटात सापडलय असा तो चेहरा होता

स्त्रीत्वच जर सकटात असेल तर या अशा स्त्रीस्वातत्र्याला काय अर्थ ? समाजाच्या बदलत्या गरजानी, स्त्रीपुरुषाच्या प्रायॉरिटीज् बद-लल्या व या दु खद अनुभवाने बेनला वाटू लागले, साध्या, सहजासहजी सुलभपणे , स्वाभाविकपणे स्वीकारल्या जाणाऱ्या प्रेम, सहजीवन, मातृत्व, पितृत्व या गोष्टीसाठीही आटोकाट प्रयास, जीवघेणी धडपड का करावी लागावी ? इथे तर, मूल जन्माला येण्याआधीच, त्याची आईकडून प्रेम, सगोपन मिळण्याची आशा सपलीय जन्म देणार आहे म्हणून निकी, आईचे नाते सागू शकेल पण नात्यातील आदर, विश्वास,वात्सल्य हे भाव जर गायब झालेत तर फक्त नातेसबधाने काय होणार ? नाती कर्माने सिद्ध करावी लागतात नाते पेलण्याची, निभावण्याची तयारी व ताकद जर तिच्यात नाही तर माझ्या मुलाची आई म्हणवून घेण्याचा अधिकार मी तिला देणार नाही निकीला तर स्वत च्या खऱ्या अस्तित्वाचीही ओळख नाही ती तिच्या नकळत तिहेरी भूमिका वठविते आहे यश, प्रसिद्धी, करिअरच्या अवास्तव कल्पनाच्या मागे लागलेली अत्याधुनिक स्त्री, स्त्रीसुलभ भावना शमविण्यासाठी पुरुषाचा उपयोग करून घेणारी स्वार्थी स्त्री व स्वत चे समाधान कशात आहे याबाबत पूर्णपणे अधारात असलेली, गोंधळलेली

कन्फ्युझड् स्त्री बेन उठला, त्याने टेबलावरचे अॅडॉप्शन पेपर्स उचलले, त्याचे तुकडे, तुकडे केले गतीने तो दरवाजाजवळ पोहोचला, दरवाजा उघडला, सयत आवाजात म्हणाला, 'प्लीज निकी, नीट ऐक, मूल जन्माला येईल तेव्हा मी तुझ्याजवळ असेन त्याचे पहिले रडणे, पहिले हुकार माझ्या कुशीत माझे हृदय ऐकेल हॉस्पिटलच्या खर्चाची काळजी करू नकोस तो सर्व खर्च मी देईन मला फक्त माझे मूल दे आणि नतर तुला हव ते तू कर आणि आता स्वत ला जप काही लागले तर नि सकोचपण मला साग मी आपल्या बाळाला आई म्हणून वाढविण्याचा निश्चय केला आहे मी बाळासाठी मिस्टर मम्मी बनायचे ठरविले आहे, नाऊ प्लीज गो लीव्ह मी अलोन'

आणि निकी सथपणे दरवाजातून बाहेर पडली

♣

११

# दत्तक आजोबा

खिडकीचा पडदा सरकवून बाहेर नजर टाकली दूरवर पसरलेली बर्फाची शुभ्रसफेद चादर खिडकीच्या काचेतून निरखायला लोभस वाटते, पण बाहेर पडल्यावर ? या कल्पनेने अंगावर शिरशिरी आली कानाच्या पाळ्या नि नाकाचा शेंडा थड होऊ लागला आता साधारण सात मिनिटात बसस्टॉप गाठला पाहिजे, नाहीतर महत्त्वाचे लेक्चर चुकायचे, या विचारात स्नो-जॅकेट, स्नो-शूज, स्कार्फ, टोपी, ग्लोव्हज्, दप्तर नि दुपारच्या लचसाठी डोनट हा प्रचड ओझ वाटणारा जामानिमा आटोपून बाहेर पडून अपार्टमेन्टच्या दाराला कुलूप घातले बालकनीत जमा झालेल्या बर्फाच्या ढिगाऱ्यातून कसरत करीत जिन्यापर्यंत व जिना उतरून साईडवॉक वर पोहचले आता पेंग्विन पक्ष्याच्या चालीने या बर्फातून बस-स्टॉप गाठायचा या कल्पनेमुळे ओठ हसण्यासाठी विलग झाले तोच 'हाय यषाआन्टी' ही साद कानी आली वळून पाहिले तो माझ्या मैत्रीणीची जॅकीची मुलगी एली, शॉपिगकार्टस् गोळा करून महत्प्रयासान त्या ढकलीत, ग्रोसरी-शॉपकडे चालली होती अमेरिकनाच्या, नावाचा शॉर्टफॉर्म करण्याच्या नादापायी एलीझाबेथची झालेली 'एली', तितकेसे बरे न वाटूनही मी तिला 'हाय' म्हटले एवढ्या सकाळी, अशा जीवघेण्या थडीत त्या ढकलगाड्या गोळा करण्याचे प्रयोजन विचारले 'oh ! I want to buy x'mas gift for my grandpa, I need money' असे म्हणून थडीने लाल झालेले गाल नि ते ओझ ढकलणारी ग्लोव्हज्च्या आतील गारठलेली इवली बोटे माझ्यापासून दूर जाऊ लागली

विद्यापीठाने बाधलेल्या या लहान, लहान अपार्टमेन्टस्मध्ये राहणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याकडे कार नसे नि मग ग्रोसरीचे ओझे अशा बर्फा-

तून हातात वागवीत घरी परतण या अवघड कसरतीवरचा सोपा उपाय म्हणून काही विद्यार्थी, ग्रोसरी-शॉपकडे आतल्या आत वस्तू जमा करण्यासाटी उपलब्ध असलेल्या ढकलगाड्या, नजर चुकवून अपार्टमेंट-पर्यंत आणीत व सामान घरात ठेवून त्या गाड्या तेथेच जवळपास टाकून देत दुकानाचे मालक, लहान मुलाना प्रत्येक गाडीचे १५ सेंटस् देऊन अशा बेजबाबदार विद्यार्थ्यांनी इतस्तत टाकून दिलेल्या ढकलगाड्या गोळा करून आणायला सागत आज सकाळी एलीही तेच काम करीत होती. आठ वर्षांच्या एलीला भेटवस्तू घेण्याची इच्छा आहे ही स्तुत्य गोष्ट असूनही तिला अशा थडीत या प्रकारचे काम करावे लागावे याचे मनोमन वाईट वाटले मी ज्या देशातून आले तेथील लहान मुले, लहान मुला-सारखीच वागतात, लहान मुलासारखेच बोलतात, रडतात, हट्ट करतात, रूसून बसतात नि मग सशाची वा चिमणीची गोष्ट ऐकत आई, ताई, दादा व अण्णाच्या खांद्यावर मान टाकून निश्चितपणे परीराज्याची स्वप्ने बघत झोपी जातात . . येथील लहान मुलाचा तरी काय दोष ? सामाजिक परिस्थितीने कुटुबसस्थेची अशी वाताहात केलीय की, परि-स्थिती, अकाली या मुलाना प्रौढ बनविते या विचारातच बस आली, मी बसमध्ये बसले, बसच्या वेगात माझे विचार एलीच्या नि माझ्या मैत्रिणीच्या जॅकीच्या भोवती केन्द्रीत झाले

जॅकीची नि माझी पहिली भेट आठवली आम्ही दोघींनी एकच कोर्स घेतला होता वर्गात जवळ बसत होतो एकमेकींना 'हॅलो' म्हणत होतो व सरानी किती 'बोअर' केले यावर हसतमुखाने चर्चाही करीत होतो आम्ही दोघी जवळ आलो तो प्रसग आजही अगदी तसाच नजरेसमोर उभा राहतो विद्यार्थीदशेत किमान परदेशाततरी, असलेले अपुरे पैसे जपून वापरावे लागत म्हणून मी मशीनमधली ३० सेंटची कॉफी घेण्या-ऐवजी डिपार्टमेन्टच्या ऑफीसमध्ये मिळणारी १० सेंटची कॉफी घेई. व ती बरोबर डोनट खाऊन लच खाल्याचे समाधान मिळवी एके दिवशी मी कॉफी घेत होते नि जॅकीही आली तिने कॉफीचा कप भरून घेतल्यावर मी तिला माझ्या एका डोनटमधला अर्धा डोनट दिला 'थँक्स' म्हणून तिने तो घेतला व तिच्या पुढच्या वाक्याने मला उगाचच गलबलून आल्यासारखे

झाले ती म्हणत होती, 'यूषा आज सकाळपासून प्रथमच मी काहीतरी खाते आहे' कदाचित आमच्या नजरभेटीत माझ्या भावना तिला कळाल्या असाव्यात मग त्या संध्याकाळी लेक्चर्स संपवून परतताना जॅकीने तिची जीवनकहाणी मला सांगितली 'यूषा एलीचा जन्म माझ्या सोळाव्या वर्षी झाला मी हायस्कूलमध्ये शेवटच्या वर्गात होते मायकल हा माझा वर्गमित्र नकळत माझा बॉयफ्रेंड बनला त्याच्या बरोबरच्या डेटस् नुकत्याच फुलू लागलेल्या तारूण्याला धुन्दी आणणाऱ्या ठरू लागल्या, आम्ही लग्न करण्याचेही ठरविले पण त्याआधीच मी आई बनणार हे कठोर सत्य आम्हा दोघांच्या कोवळ्या आयुष्यापुढे उभे ठाकले मायकल पुढील जबाबदारीला घाबरला व एके दिवशी मला न सांगता कुठेतरी निघून गेला मी एकाकी झाले घरी, कुणाला विश्वासात घेऊन सर्व सांगण्याचे धाडस होईना नि मीही घर सोडले हॉटेलात वेट्रेसचे काम केले एलीचा जन्म झाला नाईट-स्कूलमध्ये जाऊन हायस्कूलचे शिक्षण पूर्ण केले व अशीच अर्धवेळ नोकरी करीत करीत आज मी एम ए करते आहे अपार्टमेंटचे भाडे, माझी फी, आम्हा दोघींचा जेवणाचा खर्च, पुस्तके, औषधे, आजारपणे या साऱ्याला पुरे पडतील इतपत पैसे कधीच नसतात पण एली समजस आहे. आमचे जेमतेम भागते मला वाईट वाटते की' एलीला वडिलांचे सुख मिळाले नाही आजी-आजोबा, मामा-मामी, काका-काकू, चुलतभावंडे, मामेभावंडे ही नाती व त्यातील माया अनुभवता आली नाही पाहिलस यूषा, १६ व्या वर्षीच मी आयुष्याची ही अशी सुरवात केली लग्नाआधी झालेली मुलगी एकाकी आयुष्य नि एक मोठ्ठे प्रश्नचिन्ह what to do with my life ? पण धीराने परिस्थितीवर मात करणे मला जमले, सगळ्यांना जमतेच असे नाही अशा अनुभवानंतर कितीतरी मुलींना मी, व्यसनाधीन झालेले वा वेश्याव्यवसायाच्या आहारी गेलेले पाहिले आहे वनवास होतो तो बिचाऱ्या लहान मुलांचा'

जॅकीची कहाणी ऐकत मी अंतर्मुख झाले तिचा निरोप घेतला तिच्या जिद्दीचे कौतुक वाटले व कुमारी मातांना स्वतःचे मूल मानाने वाढवता येते या स्वातंत्र्याचेही कौतुक वाटले. त्यानंतर मी एलीची 'यूषा आन्टी' बनले तिला आन्टीचे प्रेम देऊ लागले जॅकीची काही लेक्चर्स

रात्री ७ ते १० या वेळात असत, तेव्हा एली माझ्या अपार्टमेंटमध्ये वेळ घालवी, अभ्यास करी, बाहुल्याशी खेळे, शाळेतल्या गमतीजमती सांगे.

आज एलीला ढकलगाड्या गोळा करून जाताना पाहिले नि जॅकीचे आयुष्य पुन डोळ्यासमोरून गेले एकच आनद वाटला की,एलीचे आजोबा बहुधा या ख्रिसमसला तिला भेटणार असतील कारण त्याना भेटवस्तु घेण्यासाठीच ती पैसे जमवीत होती जॅकीचे कुटुंबीय तिला पुन भेटतील यापेक्षा मोलवान कोणती ख्रिसमस-गिफ्ट असणार ? या समाधानात मी होते

टर्म सपली परीक्षा आटोपल्या, तीन आठवड्याची ख्रिसमसची सुट्टी व पुढच्या टर्मच्या फीसाठी लागणाऱ्या पैशासाठी सुट्टीतले कामही सुरू झाले ख्रिसमसची सध्याकाळ उगवली, मी जॅकीसाठी व एलीसाठी घेतलेल्या भेटवस्तु सुंदर कागदात बाधून घेऊन त्याच्या अपार्टमेंटमध्ये गेले एलीसाठी तयार केलेला एक छोटासाच पण देखणा ख्रिसमस ट्री कोपऱ्यात स्वागताला उभा होता जॅकीने जमेल तितके, अपार्टमेंटचे डेको-रेशनही केले होते आम्ही शुभेच्छाची व भेटवस्तुंची देवाणघेवाण केली मी प्रश्न विचारला. 'जॅकी, एलीचे आजोबा येणार होते ना?'

जॅकी म्हणाली, 'नाही, आम्हीच त्याच्याकडे जाणार आहोत, त येतेस ?

एका कुटुंबात ख्रिसमसची सध्याकाळ घालविता येणार व अमेरिकन पद्धतीने साजरा होणारा ख्रिसमस बघता येणार म्हणून मीही उत्साहाने हो म्हणाले एलीने आजोबासाठी घेतलेली भेटवस्तु, फुले, ख्रिसमस केकचा तुकडा या वस्तु नीट बाधून घेतल्या व आम्ही निघालो. साधारण १५ मिनिटे चालल्यावर आम्ही युनिव्हर्सिटी चर्चच्या कोपऱ्या-जवळील इमारतीपाशी थाबलो मला वाटले एली बर्फात चालून थकली असेल म्हणून जरा वेळ थाबायचे असेल पण जॅकीने त्या इमारतीचा मोठा दरवाजा उघडला व त्या दोघीमागून मीही आत गेले ... पुढचे दृश्य पाहून माझा स्वत च्याच डोळ्यावर विश्वास बसेना... तो वृद्धाश्रम होता अनेक वृद्ध स्त्री-पुरुष ख्रिसमस ट्री भोवती बसून ख्रिसमसची गाणी गात होते त्यानीच एकमेकासाठी भेटी आणल्या होत्या. त्याचे

स्वतःचे आप्तस्वकीय त्याची भेट घ्यायला आलेले नव्हते, येणार नव्हते. या देशात वृद्ध होणे हा गुन्हा आहे. माझ्या डोळ्यापुढे युनिव्हर्सिटीच्या कॅफेटेरियात एकटेच बसून थरथरत्या हाताने सूप पिणारे वृद्ध गृहस्थ उभे राहिले जॅकीचे वडील इतके जवळ असून आतापर्यंत मला कसे कळले नाही ? या प्रश्नाशी माझे मन झगडत होते एवढ्यात एली धावत आत गेली व व्हीलचेअर ढकलत घेऊन आली व्हीलचेअरवर ऐंशीच्यापुढील वयाचे अत्यंत वृद्ध गृहस्थ बसले होते आमच्याजवळ येताच, एलीने उत्साहाने जॅकीच्या हातातील भेटवस्तु त्या वृद्ध गृहस्थाना देऊन त्याच्या सुरकुतलेल्या गालावर ओठ टेकवून अत्यंत आत्मीयतापूर्ण मुका घेत म्हटले, 'Happy x'mas Grandpa' वृद्धाच्या थकलेल्या चेहऱ्यावर एक आगळे समाधान विलसले व नेत्रातून दोन अश्रुमोती ओघळले एली आजोबाच्या गळ्यात हात टाकून ख्रिसमसच्या गमतीजमती सांगत होती नि त्या दृश्याकडे साश्रु नेत्रानी बघत जॅकी मला सांगत होती

'पुष्पा, हे एलीचे दत्तक-आजोबा आहेत वृद्धाना मदत करण्याच्या Apopt a Granpparent या स्कीममध्ये एलीच्या शाळेतील काही मुलामुलींनी आजी व आजोबा दत्तक घेतले आहेत ही मुले या दत्तक आजीआजोबाना नियमित भेटायला येतात, त्याना भेटवस्तु देतात व त्याच्या आयुष्याचे भयाण एकाकी क्षण काही कालावधीसाठी तरी उजळून टाकतात'

नकळत माझ्या नेत्रात आसवानी गर्दी केली TAB (Temporarily Able Bodies ही टर्म आपण कशी शोधली व वृद्धावरील आपला रिसर्च आता Computer Analysis साठी लागणाऱ्या स्टेजपर्यंत कसा आला आहे हे सांगणारे माझे सर आठवले ज्याना करिअरमुळे आई-वडिलाचा पूर्ण विसर पडला होता रक्ताच्या नात्याला म्हातारपण आले म्हणून सोईस्कररीत्या त्याना विसरून गेलेल्या 'छोट्या' मनाच्या तरूण-तरूणींच्या या छोट्या अमेरिकेत, आज मला एक 'मोठ्ठी' अमेरिका दिसली आणि ती होती ढकलगाड्या गोळा करून पैसे जमविणारी व दत्तक आजोबाना भेटवस्तु घेणारी आठ वर्षाची चिमुकली एली आजही ख्रिसमसची सध्याकाळ आली की, डोळ्यासमोर उभी राहते ती व्हीलचेअर ढकलणारी एली आणि तिच्या दत्तक आजोबाच्या डोळ्यात चमकणारे ते समाधान

♣

१२

# सरोगेट मदर

दुपारी दोन वाजता मी व माझी मैत्रीण एलन, तिच्या कारने एका मद्यालयाच्या दिशेने चाललो आहोत दचकू नका माझी वर्गमैत्रीण एलन मद्यालयातील वेश्यावर प्रबंध लिहीते आहे सिन्डी नावाची वेश्या आज मुलाखत द्यायला तयार झाली होती, तिला मद्यालयात भेटून नंतर आम्ही तिला घेऊन एखाद्या बागेत किंवा तळ्याकाठी जाऊन मुलाखत संपविणार होतो

येथील मद्यालय 'बार' या नावाने ओळखले जाते. तेथे जाण्याचे धाडस मला तसे कधीही झाले नसते पण एलनच्या प्रबंधाच्या निमित्ताने ते आज शक्य झाले होते आमच्या वर्गातील व होस्टेलमधील मुलेमुली नियमितपणे डिस्कोसाठी किंवा बीअर पिण्यासाठी वीक-एन्डला गावातील बारमध्ये जात असत मला चांगले आठवते, मी होस्टेलमध्ये राहायला आले त्या संध्याकाळी शेजारच्या खोल्यातील काही मुली मला भेटायला आल्या व प्रश्न विचारू लागल्या 'यूषा, तू दारू पितेस?' 'तुला मित्र आहे? तुला डान्स करता येतो? तू सिगरेट ओढतेस? डू यू डू ड्रग्ज?' या सर्व प्रश्नांना मी नकारात्मक उत्तरे दिली तेव्हा त्यांना माझी कमालीची कींव वाटली व 'ओ? देन यू आर गोईंग टू हॅव लॉटस् अॅन्ड लॉटस् ऑफ प्रॉब्लेम्स्' असे म्हणत त्या निघून गेल्या त्यानंतर कित्येक वेळा त्याच्या समस्या घेऊन त्याच रडत माझ्याकडे आल्या होत्या, हा भाग वेगळा तर सांगायचे म्हणजे येथील सोशल लाईफचा महत्वाचा भाग असलेले ठिकाण, मद्यालय मी काही मिनिटांनी बघणार होते.

कार पार्क करून आम्ही मद्यालयात प्रवेश केला ओळखीच्या कुणी

मला पाहिले तर पचाईत नको या विचाराने मी माझा चेहरा स्कार्फमध्ये लपविण्याचा प्रयत्न केला

आपके लिए पाप सही, मेरे लिए सवाब वनती है ।

सौ गम निचोडने के बाद, एक बूँद शराव वनती है ।

अशा आशयाचा अमेरिकन शेर सुनविणारा अमेरिकन शायर कसा दिसेल याची कल्पना करीत मी मद्यालयात प्रवेश केला व आतील सजावट पाहू लागले मंद प्रकाशात, कानठळ्या वसविणारे म्युझिक ऐकत दारू पिणारे रसिक व रसिका सिगारेटच्या प्रचंड धुरात बुडून गेले होते 'वार-टेन्डर' स्थितप्रज्ञाचा आव आणून सर्वांच्या दर्दभऱ्या कहाण्या ऐकत मद्याचे पेले भरभरून देत होता आमच्या विद्यापीठात 'वार टेन्डर ट्रेनिंग' घेण्याचेही कोर्सेस होते काही मुलेमुली हौशीने ते प्रशिक्षण पूर्ण करीत अशा वातावरणात आठ तास काम कसे करायचे ? हा प्रश्न मला पडला पगारासोवत गिऱ्हाईकाकडून मिळणाऱ्या भरपूर टिप्स हेही एक कारण असावे ऐन तारूण्यात व्यक्तिस्वातंत्र्याच्या आहारी गेलेले तरूणतरूणी आईवडिलांचे घर सोडून स्वतंत्र राहायला घराबाहेर पडतात त्याच वेळी निर्वाहासाठी पैसा मिळविणे ही वास्तवता स्वीकारणे भाग पडते कमी वेळात पूर्ण होणारा अभ्यासक्रम संपविणे हा वास्तवता स्वीकारण्याचाच परिणाम सहज माझे लक्ष एका कोपऱ्यात गेले तेथ दोन स्त्रिया दारू पित होत्या. भर दुपारी वारमध्ये येऊन दारू पिण्यामागे या स्त्रियाची काय अगतिकता असेल या कुतुहलाने, मी दोन स्त्रियाचे संभाषण लक्षपूर्वक ऐकू लागले. तरुणी वृद्धेला सांगत होती, 'काल संध्याकाळी नवऱ्याशी माझे कडाक्याचे भांडण झाले, तो मला सोडून गेला मला जर हे माहित असते तर मी सहा डॉलर, नव्याण्णव सेंट, पौंड या दराचा महागडा मासा त्याच्या डिनरसाठी आणला नसता' वृद्धा म्हणत होती, 'हल्ली मला माझ्या कुत्र्याची फार काळजी वाटते, मला शंका येऊ लागली आहे की माझा कुत्रा मेन्टली रिटार्डेड असावा, आय नोटिस सुईसायडल टेन्डन्सीज इन हिम' मला या संभाषणाची गमत वाटली एवढ्यात सिन्डीला घेऊन एलन आली मी तिच्याकडे वघतच राहिले एकोणीस वीस वर्षांची, प्रमाणवद्ध अवयव असलेली, देखण्यात जमा होणारी सिन्ड्रेला नावाची मुलगी या व्यव-

सायात का पडली असावी ? असा विचार मी करू लागले अर्थात या प्रश्नाचे उत्तर एलनच्या सशोधनाने मिळणार होते किमान सिन्ड्रेला नावाच्या मुलीने तरी वेश्याव्यवसाय करू नये असे मला उगाचच वाटू लागले

बाहेर पडून तळचाकाठी जाऊन मुलाखत सपविण्याचा प्रस्ताव माडताच सिन्डी म्हणाली, 'तुम्ही माईन्ड करणार नसाल तर मला घरी जाऊन स्नान करायला आवडेल शॉवरनतर तुम्हाला विचारायचे ते विचारा, मी झकास मुलाखत देईन' आम्हाला तिची सूचना मानण्याशिवाय गत्यतरच नव्हते तिच्या घराकडे जाताना रस्त्यात रेस्टॉरन्ट दिसताच तिने सुचविले, 'एलन माझ्यासाठी काही खाण्याच्या वस्तु विकत घेऊ शकशील ? म्हणजे घरी गेल्यावर स्टोव्हजवळ वेळ घालवावा लागणार नाही व तुझा वेळ वाचेल' एकूण एलनला मुलाखतीसाठी सिन्डीचा वेळ विकत घ्यावा लागणार होता 'आफ्टरऑल सिन्डी वॉज सेलींग एव्हरीथिंग' इतक्या कोवळ्या वयात तिच्या अगात मुरलेली व्यापारी वृत्ती आवडली नाही सिन्डीच्या घरी पोहोचलो तिचे घर पाहून मी आश्चर्यात पडले त्यापूर्वी हिन्दी चित्रपटात वेश्येचे घर पाहिले होते, वेश्यावस्तीची वर्णने वाचली होती, 'रेड लाईट डिस्ट्रीक्ट' बद्दलही ऐकले होते माझ्या पूर्वकल्पनाशी पूर्णपणे विसगत असे अत्यत कलात्मकतने सजविलेले, चागल्या वस्तीतले तिचे अपार्टमेन्ट पाहून मी सुटकेचा निश्वास टाकला ती स्नानाला गेल्यामुळे, मोकळेपणाने मी तिच्या बैठकीच्या खोलीचे निरीक्षण करू लागले भितीवर एक वेगळे परतु आशयपूर्ण चित्र होते चित्रात दोन हात होते एक हात दणकट मनगटाचा, केसाळ, नखे वाढलेला अगदी कुरूप व दुसरा हात कोमल, निमुळत्या बोटाचा एका सुंदर तरुण स्त्रीचा चित्र पहाताना भास होत होता की, ते दोन हात एकमेकाना स्पर्श करण्याची जीवघेणी धडपड करीत आहेत, पण अतर संपत नाही

इतक्यात सुस्नात सिन्डी, ट्रेमध्ये एलनने तिच्यासाठी विकत घेतलेले खाद्यपदार्थ घेऊन आली व म्हणाली, 'एलन यू नो, आय ॲम अ व्हेरी प्रायव्हेट परसन, पण तू मला वैयक्तिक प्रश्न विचारू शकतेस' एका वेश्येचे हे विधान ऐकुण मला गमत वाटली चेहऱ्यावरची रगरगोटी धुतली

गल्यामुळे सिन्डीचा चेहरा अगदी वगळा व काहीसा भावडा दिसत होता मला कटाळा येईल म्हणून तिने माझ्या हाती एक वही दिली व म्हणाली, 'यात मी लिहीलेल्या कविता आहेत, वाच, तुझा वेळ कदाचित चागला जाईल, एलनने पहिला प्रश्न विचारला, 'तुला तुझा व्यवसाय मनोरजक वाटतो का ? होय / नाही होकारात्मक उत्तर असेल तर का ? नकारात्मक उत्तर असेल तर का ? दुसरा प्रश्न तुझा वैवाहिक दर्जा काय ? कुमारिका / विवाहिता / घटस्फोटीता / विधवा / इन बिटवीन, टू मॅरेजेस' एलनच्या प्रश्नावलीत शभराहून अधिक प्रश्न आहेत याची कल्पना असल्याने मी हातातील कविताची वही उघडली व पहिल्या पानावरची कविता वाचू लागले

रग उडालेली नख

आरक्त, लुसलुशीत तळवा
निमुळत्या बोटाची गुलाबी अग्र
काळजीपूर्वक रगविलेली, जपणूक केलेली नख
अनामिका, मध्यमा याना शोभणाऱ्या अगठ्या
तिचे हात .तिचे हात जणू विधात्याची कुशल कारागिरी
त्या हातानी, निमुळत्या बोटानी, रगविलेल्या नखानी
जाहिरातीच्या जगात, तिला मिळवून दिलेल यश
अधीऱ्या बोटानी मोजलेल्या असख्य नोटा
नि कुरवाळलेले मत्नीचे अनेक हात
तारुण्याने धुन्दावलेल्या रात्नीच्या कुशीत
देखण्या बोटाच्या प्रशसेच्या नशेत
जमल्या अनेक अगठ्या, हिऱ्याच्या, मोत्याच्या, सोन्याचादीच्या
पैसा, दागिने, पुरुष याच्या स्पर्शाला आसावलेली
तिची ती कमनीय बोटे नि देखणे हात
आज प्रथमच जोडले जात आहेत
त्याना घडविणाऱ्या कारागिरापुढे
नि तिच्या अश्रूंच्या प्रतिबिंबात
दिसताहेत तीन झडलेली, दोन सुजलेली बोटे

उरलेल्याच्या नखाचे लोभस रग उडालेत
तिच्या आयुष्यासारखे, तिच्या आयुष्यासारखे

क्षणभर नजर सिन्डीच्या हाताकडे गेली, खरोखरच तिची बोटे सुंदर होती तिची मुलाखत आता रगात आली होती एका बुद्धीमान व्यक्तिने, तर्कसगत बोलावे त्या थाटाने सिन्डी बोलत होती, 'एलन, माझा व्यवसाय एक शो बिझनेस आहे शोवूमनशीपसाठी लागणारी तत्र मी अवगत करून घेतली कमी वेळात,कमी कष्टात भरपूर पैसा मिळविणे हा प्राथमिक हेतू आणि तूच बघ सध्या माझ्याजवळ असलेली मोस्ट एक्सप्लॉयटेबल कमॉडीटी आहे माझे शरीर. माझ्या आयुष्याच्या काही क्षणाची तरी मी बॉस असते पुरुष आपल्याकडे लक्ष देतो आहे, आपली मनधरणी करतो आहे, आपली आर्जवे करतो आहे ही भावना अनुभविणे प्रत्येक स्त्रीला आवडते "व्हॉट डू यू थिंक?" स्त्रीमनाला पटणारे विचार बोलून दाखविणाऱ्या सिन्डीच्या कवितांच्या वहीचे दुसरे पान मी उघडले दुसऱ्या कवितेतून उपरोध व वेदनाही जाणवली

खेळ

काल रात्री एक परदेशी भेटला
दारूच्या नशेत म्हणाला
बायकोसाठी फरकोट घ्यायला निघालोय उदराच्या कातडीचा
आणि त्याची मिठी मला माकडासारखी वाटली . .

पैशासाठी माकडासारखी मिठी सहन करणारी सिन्डी कवितावरून सुशिक्षित व विचारी वाटली रात्री कामाला जाण्यापूर्वी सिन्डीला तिची 'ब्यूटी-स्लीप' पूर्ण करायची होती म्हणून आम्हाला निघावे लागले सिन्डी एकूण सव्वीस मिनिटे बोलली त्यासाठी एलनचे पेट्रोल व जेवण मिळून वीस डॉलर्स खर्च झाले व आमचे एकूण तीन तास या गतीने एलनच्या मुलाखती कधी सपणार ? परतताना एलनकडून समजले की, ह्याआधी सिन्डी नेलपॉलिश व कोल्ड क्रीमच्या जाहिरातीसाठी हाताचे मॉडेलिग करीत होती, व कॉलेजमध्ये इग्रजी साहित्यात बी ए जाहिरातीच्या व्यवसायातील वाढती स्पर्धा तिला जगण्यापुरतेही पैसे मिळवू देईना म्हणून नाईलाजाने ती या व्यवसायात पडली आमचा अभ्यास चालू होता त्यानतर

एलनबरोबर मुलाखतींसाठी जाणे जमले नाही पण एलनकडून तिचे अनुभव ऐकायला मिळत पॅटी नावाच्या वेश्येने एलनचा टेप रेकॉर्डर चोरला. काही मुली मुलाखतीसाठी वेळ देत व एलन तेथे पोहचेपर्यंत गायब झालेल्या असत काहीवेळा त्याच्यासाठी जेवण व ड्रिंक्स विकत घ्यावी लागत कारसाठी पेट्रोलचा खर्च कधी बसचा खर्च, पुष्कळदा वेळेचा अपव्यय, मनस्ताप, पण एलन तिच्या पीएच. डी साठी सर्व सहन करीत होती

एके दिवशी अचानक तयार कपड्याच्या स्टोअरमध्ये सिन्डी मला भेटली सिन्डीकडे पाहताच माझ्या चेहऱ्यावरचे भाव बदलले, तिला बाळ होणार होते गरोदर स्त्रियासाठी असलेल्या कपड्याच्या विभागातून तिला कपडे विकत घ्यायचे होते मला पाहून तिला बरे वाटले असावे थकलेल्या आवाजात ती म्हणाली, 'स्टोअरमधील कॅफेटेरियात बसून चहा-घऊ या का ? आय कॅन रिअली यूज सम रेस्ट' तिच्या अवघडलेल्या अवस्थेकडे पाहून मी तत्काळ होकार दिला चहाचा कप समोर ठेवून मी सिन्डीच्या जीवनातील, आमच्या प्रथमभेटीनतर घडलेल्या वादळी घटना ऐकल्या सिन्डीपेक्षा अधिक तरूण व देखण्या मुली मद्यालयात आल्यामुळे तिचा व्यवसाय नीट चालेनासा झाला घरभाडे देण्यासाठी, उदरनिर्वाहासाठी नेहमीच्या गिऱ्हाईकाकडून, जवळच्या मैत्रिणींकडून तिने अनेकवेळा उसने पैसे घेतले दागिने विकले व शेवटी कटाळून तिने सरोगेट मदर होण्याचे ठरविले सर्व प्रयत्नानतरही मूल न झालेले जोडपे एकमताने, सरोगेट मदर होण्यास तयार असलेल्या स्त्रीचे गर्भाशय भाड्याने घेतात 'प्रतिनिधी माता' हे गोंडस नाव जरी 'सरोगेट मदर' या शब्दातून सूचित होते तरी त्यामागील भीषण सत्य, मातृत्व या सज्ञेला शोभणारे नाही, हे निश्चित सिन्डीसाठी मदर किंवा आई होणे महत्वाचे नव्हते पण कमी वेळात भरपूर पैसे मिळवावेत हा एकमेव हेतू मनात ठेवून तिने योग्य सस्थेकडे सपर्क साधून ती सरोगेट मदर होण्यास अॅव्हेलेबल आहे, हे सागितले. मुलासाठी आसावलेल्या एका सुखवस्तु दाम्पत्याने, सस्थेतर्फे सिन्डीशी सपर्क साधला सर्व वैद्यकीय तपासण्या समाधानकारक झाल्यामुळे व सिन्डीच्या रूपाकडे पाहून त्यानी तिच्याबरोबर कायदेशीर करार करून तिचे गर्भाशय २५,००० डॉलर्स देण्याचे कबूल करून, भाड्याने घेतले ती

गरोदर राहिल्याबरोबर, कराराप्रमाणे तिला १०,००० डॉलर्स ॲडव्हान्स दिले गेले, संस्थेला आपले कमिशन मिळाले सध्या काही महिन्यासाठी तरी तिचा आर्थिक प्रश्न सुटलाय चहा संपला माझे आभार मानून सिन्डी स्वतःच्या भाडोत्री आईपणासाठी कपडे शोधायला गेली

सिन्डी गेली त्या दिशेने पाहात, मी विचार करीत होते काही महिन्यानी सिन्डी आई होईल स्वतःच्या श्वासाची भागीदारी केलेले पोटचे मूल दुसऱ्या अपरिचित स्त्रीच्या ओटीत घालताना, परक्या स्त्रीला स्वतःच्या बाळाचे मातृत्व बहाल करताना सिन्डीला काय वाटेल ? तिच्या स्त्रीमनाला अशा अवघड परिस्थितीशी तडजोड करायला जमेल का ? मूल जन्माला घातल्याच्या खुणा शरीरावर उमटल्या व शारिरीक सौंदर्य कमी झाले तर ती कोणता व्यवसाय करेल ? कराराप्रमाणे उरलेले १५,००० डॉलर्स मिळतील ते संपल्यावर पुढे काय ? जीवनाबद्दल वाटणारी आस्था, कशाही प्रकारे फक्त देह जगविण्यापुरती मर्यादित व्हावी ना ? स्वतःजवळ असणारी एकमेव 'एक्सप्लॉयटेबल कमॉडिटी' म्हणून शरीराचा सौदा करून झाला, तो फायद्यात पडेना म्हणून सिन्डीने स्वतःला 'बेबी मशीन' बनविले, गर्भाशयाला कातडी पिशवी बनवून बाजार दाखविला मला वाटायचे संवेदनाक्षम, भावुक, प्रेमळ, मायावती स्त्री-जेव्हा माता बनते तेव्हा स्वतःतील चेतना शक्तिशी, निर्मितीच्या सामर्थ्याशी परिचय होऊन ती शक्तिसंपन्न बनते तेच प्रभावी, पवित्र, समर्थ मातृत्व येथे इतके बाजारू व्हावे ना ?

नवऱ्याच्या घरी जायचे आहे म्हणून लहानपणापासून मुलीच्या जातीवर एकनिष्ठ सतीत्वाचे संस्कार करणारा माझा समाज तर मुलीने आकर्षक दिसले पाहिजे असे बालपणापासून मुलीचे समाजीकरण करणारा येथील समाज विचारसरणीच्या या प्रचंड तफावतीमुळे इथे स्त्रीच्या सौंदर्याचा बाजार होतो व्यापारी वृत्तीचा पुरुष स्त्रीला वस्तु मानून तिचा उपयोग करतो, उपभोग घेतो उपभोग घेऊनही तिचे वर्चस्व कबूल करीत नाही मातृत्वासारख्या कल्पनेतून पैसे काढणाऱ्या अमेरिकनांना काय म्हणावे? येथील सामाजिक परिवेश स्त्रीला पुरुषाचे सामर्थ्य बनण्याची संधी देतोय का? स्त्री मुक्ती आंदोलन तिला कोणत्या दिशेने घेऊन चालले आहे ? 'इझी वे

आऊट' किंवा 'उपलब्ध असणारे अनेक ऑप्शन्स,' त्यामुळे एकापेक्षा अधिक विवाह करून तुझी, माझी नि आपली--your mine and ours मुले वाढविणारी कुटुंबे मानसशास्त्रज्ञाचा व मनोरुग्णतज्ञाचा बँक-बलन्स का वाढवित आहेत ? आईचा एक्स हजबंड, वडिलाची एक्स वाईफ किंवा स्टेप फादरची एक्स वाईफ अशी नात्याची खिचडी लहान मुलाच्या भावनिक सुरक्षिततेचे धिंडवडे का काढीत आहे ? असे अनेक प्रश्न माझ्यापुढे उभे राहिले आणि त्यात नवीन प्रश्नाची भर पडली. सिन्डीसारख्या मद्यालयातील वेश्येला 'सरोगेट मदरहूड' बहाल करून समाज काय साधणार आहे ? सिन्डीसारख्या किती तरी तरुणी मनमानी करीत जगण्याच्या प्रयत्नात शेवटी एकाकी व्यथेलाच जगवीत असतील. 'सरोगेट मदरहूड' स्वीकारून इथल्या समाजाचे प्रश्न वाढलेत, कमी झालेले नाहीत या प्रश्नाची कायदेशीर पातळीवर दखल घेण्यात यावी अशी चर्चा होऊ लागलेली आहे परंतु या चर्चेलाही अमेरिकन व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनेचा छेद आहेच शेवटी हा प्रत्येकाचा वैयक्तिक प्रश्न आहे. 'व्यक्तिस्वातंत्र्य' या संकल्पनेचा अतिरेक झाला की, समाजाचे अर्धांगच नव्हे तर संपूर्ण समाजच विकलांग होऊ लागतो का? ' Let us go now Usha सिन्डीच्या आवाजाने भानावर आले, ती म्हणत होती, 'डू कम टू व्हिजीट मी व्हेन टाईम परमिटस यू, मी तुला मातृत्वावर केलेल्या माझ्या नवीन कविता दाखवेन '

♣

१३

# न दिसणारे अश्रु

दिवसभराचे शिकणे, शिकविणे, विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविणे, ग्रथालयाची फेरी हे सारे सपवून सायकाळी पावल होस्टेलच्या दिशेने चालू लागली की, सगळा थकवा पायात जाणवू लागायचा परदेशात येऊन पदवी पूर्ण करायची हे स्वत चेच लाडके स्वप्न, तेव्हा तक्रार करायची नाही या बुद्धीवादाकरवी, थकलेल्या पायाची समजूत घालणारे मन चालता, चालता आजूबाजूच्या सौंदर्याचा नकळत आस्वाद घेऊ लागले गोडेदार शेपटी फुलवून प्रचड लगबगीने धावणाऱ्या गबदुल खारी, ग्रॅंड रिव्हर हे मोठ्ठे नाव असलेली, विद्यापीठाच्या परिसरातून धावणारी चिमुकली नदी नाव माहिती नसलेले तरीही ओळखीचे वाटणारे हिरवेकच वृक्ष, छोटी, छोटी झुडपे, रगबेरगी फुले...वसतऋतु आला की, वास्तविक पाहता स्नो-शूज ज्या दिवशी पॅक करून डब्यात ठेवून दिले त्याच दिवशी वर्फाचा तोरा वितळू लागलाय हे उमगले होते पण अभ्यास व कामाच्या घाईगर्दीत निसर्गातील या आल्हाददायक बदलाचे मन पूर्वक स्वागत करायला मुब-लक वेळही मिळाला नव्हता भोवतालचे सृष्टीसौंदर्य निरखताच मन पुन उत्साही झाले व पावल भराभर पडू लागली होस्टेलच्या दारातून आत शिरण्यापूर्वी मात्र एका झाडाखाली मुद्दाम बसण्यासाठी ठेवलेल्या बाकावर, पाच मिनिटे विसावण्याचा मोह आवरला नाही बाकावर बसताच निळ्या निरभ्र आकाशाकडे नजर टाकली ती नजर खाली उतरून आजूबाजूच्या विलोभनीय परिसराकडे कौतुकाने बघू लागली अगदी परवापरवापर्यंत ही झाड निष्पर्ण होती येथे किती गतीने बदल होतात ? वसतऋतुच्या या परिचीत खाणाखुणा निरखताना क्रिस्टीन व स्पार्कीची आठवण आली. माझ्या अमेरिकेच्या वास्तव्यात, अमेरिका हा व्यक्तिस्वातत्र्याच्या कल्प-

नने अतीव पछाडलेला देश आहे हे मला जाणवले प्रत्येक गोष्टीचा अतिरेक हा येथील मनुष्य स्वभाव स्वत चे स्वत्व जपणे यामध्ये अमेरिकन माणसे हरवून गेलेली आहेत इतकी की, या 'स्व'मध्ये इतराचा विचार क्वचितच असू शकतो देण्यातले सुख माहिती असते तर क्रिस्टीनला तेव्हा अगतिकपणे रडावे लागले नसते टराविक वय होताच मुलाना देखील या 'स्व' चा साक्षात्कार होतो ती लगेच आईबापाना सोडून स्वतत्र होतात. आईबापानाही त्याचे काही वाटत नाही कारण त्याना त्याचे स्वत्व जपायचे असते दुसऱ्याना आपण सुख देऊ शकतो, दिले पाहिजे अशाप्रकारच्या विचाराना क्वचितच स्थान मिळते माणसाचे सामाजिक जीवन हे एक प्रकारचे देणेघेणे आहे काही गोष्टींची आपण लोकाकडून अपेक्षा करतो तेव्हा आपल्याकडून लोकाच्याही अपेक्षा असतात याची कल्पना ठेवायला हवी या देवघेवीचे मूल्य, पैशात चुकविता येत नाही तुम्हीच सागा आत्मीयता,प्रेम,सहानुभूती इत्यादी भावना डॉलर्स देऊन विकत घेता येतील का ? तसे जर झाले तर येथील लोक 'पॅशन शॉप' सारखे एखादे 'इमोशन शॉप' काढायला कमी करणार नाहीत हे सर्व विचार, माझ्या डोक्यात यायचे कारण म्हणजे क्रिस्टीन व तिचा सोबती स्पार्की, आणि स्पार्की हा आहे एक कुत्रा

क्रिस्टीन आणि स्पार्कीच्या या गोष्टीची सुरवात गेल्या वसतऋतुच्या सुरवातीला झाली अशीच एका सध्याकाळी मी या बाकावर बसले होते आणि एका मुलीचा आवाज ऐकू आला त्याबरोबर कुत्र्याच्या भुंकण्याचादेखील 'कोणी बसलय का बाकावर?' ती विचारीत होती 'रोज सध्याकाळी मी एकटीच येऊन बसते येथे स्पार्कीला आज कुणीतरी नवे दिसले म्हणून स्पार्की भुकला स्पार्की से सॉरी,' ती म्हणाली स्पार्की गुरगुरला, बहुधा तो सॉरी म्हणाला असावा मी माझे नाव सागत हस्तादोलनासाठी क्रिस्टीनने पुढे केलेला हात हातात घेतला हात हातात घेताना मी क्रिस्टीनच्या डोळ्याकडे पाहिले तेव्हा मला जाणवले क्रिस्टीन आधळी आहे व स्पार्की तिचा 'वॉच-डॉग' आहे आधळ्या व्यक्तींना सर्व प्रकारची मदत करण्याचे ट्रेनिग दिलेल्या कुत्र्याला 'वॉच-डॉग' म्हणतात. माणसाना वेळ नाही म्हणून प्राण्याना ट्रेनिंग देण्याचा अव्यापारेषु व्यापार

अमेरिकाच करू शकत  नकळत व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनेत न बसणारा प्रश्न मी केला, 'क्रिस्टीन, तू स्पार्कीला मॅनेज कशी करतेस'? प्रश्न विचारताच मला वाटले की, मी तिला दुखावले असावे म्हणून मी लगेच पुढे म्हणाले, 'सॉरी, तुला दुखवायचा हेतू नव्हता' 'नाही, नाही  असा प्रश्न विचारणारी तू पहिलीच  उलट अपंग व्यक्तिच्या सामाजिक गरजा वेगळ्या प्रकारच्या आहेत याची जाणीव तुझ्या प्रश्नातून व्यक्त झाली' असे म्हणून तिची कहाणी तिने मला ऐकविली  'मी अनाथ आहे, एका अनाथाश्रमाने मला मोठे केले  या देशात प्रत्येक व्यक्तिने स्वतंत्रपणे जगण्यास शिकावे यावर इतका भर दिला जातो की, अपंग  व्यक्तिला विशेष सहानुभूतीची, आत्मीयतेची गरज आहे, त्याच्या सामाजिक  गरजा भागविण्यासाठी वेगळ्या उपक्रमाची गरज आहे याकडे हवे तेवढे लक्ष पुरविले जात नाही असे मला जाणवते  अर्थात सर्व अपंग व्यक्तिचा अनुभव असाच असेल असे नाही. मी हिवाळ्यात येथे आले  सत्तर हजार विद्यार्थी असणारे हे विद्यापीठ, इतका प्रचंड विस्तारलेला परिसर  तुला कल्पना आहे सुरवातीला मी व स्पार्की खूपदा हरवायचो कारण स्पार्कीसाठी परिसर नवीन  होता वर्फात, हरवणे हा सुखद अनुभव नाही ग  कुणीतरी भेटे व त्याच्या सोबतीने खूप थकून, भागून आम्ही परत येत असू  आता हळूहळू परिसर ओळखीचा होऊ लागलाय, पूर्वीइतका त्रास होत नाही  मी कुणावर आर्थिकदृष्ट्याही अवलंबून नाही  सरकारकडून आर्थिक मदत मिळते तशी अडचण भासत नाही पण पुष्कळदा वाटते एखादी मैत्रीण किंवा मित्र असावा कुणाशी तरी बोलावे, भावना व्यक्त कराव्यात  तू जाणतेसच येथे प्रत्येक विद्यार्थी स्वतः  कमवून शिकत असल्याने खूपच बिझी  असतो व वीकएन्डला स्वतःची कामे उरकून 'डेट'ची तयारी करतो  माझ्यासाठी कोण वेळ काढणार ? माझा कुत्रा स्पार्की हाच माझा एकमेव दोस्त तो मला सगळीकडे घेऊन जातो, मला कम्पनी देतो, मी त्याच्याशी बोलते व तो ऐकतो  केवळ स्पार्कीमुळे माझे आतापर्यंतचे आयुष्य सुसह्य झाले आहे.' क्रिस्टीनच्या या बोलण्यात स्पार्कीने भुंकून व्यत्यय आणला  तिने घड्याळ चाचपले व म्हणाली, 'स्पार्कीने डिनरची वेळ झाल्याची आठवण दिली, बघ, तो असा आठवण करून द्यायला नसता तर कॅफेटेरिया केव्हाच बंद होऊन गेला असता व मी उपाशी राहिले असते' असे म्हणत ती लगबगीने

उठली व स्पार्की मागोमाग कॅफेटेरियाच्या दिशनें गेली त्या प्रसगान आम्ही तिघे मित्र बनलो

अभ्यास करणे व शिकविणे या वळखाऊ कामाबरोबर प्रत्यक दिवस इतरही खूप कामे घेऊन येई अधून मधून मी क्रिस्टीनला फोन करीत असे· वीक-एन्डला एखाद्या सध्याकाळी आम्ही बरोबर जेवण घेत असू, फिरायला जात असू तिच्या एकाकी आयुष्यात आनदाचे क्षण निर्माण करण्याचे माझे अल्प प्रयत्न बहुधा यशस्वी होत असत

एका अनाम वेगाने दिवस धावत होते, वसतऋतु सपत आला मला जाणवले येथील ऋतुही तटस्थ कुणामध्ये इन्व्हॉल्व न होणारे उन्हाळा सुरू झाला होता समर जॉब करीत अभ्यास सपविण्यात वेळ कसा सपे हे कळत नव्हते एका सुट्टीच्या दिवशी, दिवसभर अभ्यास करुन सध्याकाळी फिरायला बाहेर पडले होस्टेलच्या दारातून बाहेर पडताच, त्याच बाकावर बसलेली क्रिस्टीन दृष्टीस पडली ती मुसमुसून रडत होती तिची थरथरणारी बोटे मायेने स्पार्कीच्या अगावरून फिरत होती तिच्या रडण्याचा वेग कमी होईपर्यंत मी थावले व हळूच पुढे होऊन हाक मारली, 'क्रिस्टीन' क्रिस्टीनचा हात पुढे झाला मी तिचा हात हातात घेतला तिच्याजवळ बसून प्रेमाने तिच्या पाठीवरून हात फिरवू लागले काही क्षणानतर क्रिस्टीनच्या अश्रुचे कारण मला समजले

मागच्या आठवड्यात स्पार्की आजारी पडला होता डॉक्टरानी सागितले की, स्पार्की म्हातारा होऊ लागलाय, त्याची नजर कमी होऊ लागलीय क्रिस्टीनसाठी डोळे बनलेल्या स्पार्कीची दृष्टी कमी होऊ लागलीय आणि एके दिवशी तो अचानक सपला तर ? आपल्याला कोण ? हा विचार मनात येऊन असहाय भावनेने क्रिस्टीन स्पार्कीला कवटाळीत रडत होती स्पार्कीच्या रूपात क्रिस्टीनच्या आयुष्यातला, म्हातारा झालेला वसतऋतु जणू मला दिसू लागला आज क्रिस्टीनच्या प्रश्नाचे उत्तर मजजवळ नव्हते कदाचित दुसरा वॉच-डॉग, हे त्या प्रश्नाचे उत्तर असू शकेल पण लहानपणापासून क्रिस्टीनची सोबत केलेल्या स्पार्कीची जागा तो घेऊ शकेल का ? मी माझ्या विचाराना आवर घालून क्रिस्टीनची समजूत

काढली माझ्या रुममध्ये नेऊन तिला कॉफी करून दिली व ती शांत झाल्यावर तिला, तिच्या रुमपर्यंत पोहोचविले

मी माघारी आले बिछान्यावर पडले बिछान्यावर पडल्यावरही क्रिस्टीनचेच विचार मनात येत होते खरे झाले स्पार्कीसारखी जनावरे मुकी असतात, ती जर बोलू शकली असती तर या देशातला स्पार्कीनेही स्वत च्या सुखासाठी, स्वत च्या स्वार्थासाठी क्रिस्टीनकडून 'सेपरेशन' घेतले असते आणि तो केव्हाच निघून गेला असता लौकिकदृष्टया समृद्ध असलेला हा देश क्रिस्टीनसारख्या व्यक्तिसाठी किती छोटा आहे याची नव्याने जाणीव झाली माणुसकीची, इमानदारीने सेवा करण्याच्या भावनेचा या छोटया देशातला, एक स्पार्क मूक स्पार्कीच्या रूपाने मी अनुभवला आज माझ्या दृष्टीने क्रिस्टीनचे अधत्व व स्पार्कीचे मुकेपण हे वरदान आहे· कारण उघडया डोळयानीही जे बघवत नाही, ते क्रिस्टीनला दिसू शकत नाही, म्हणून ती सुखी आहे आणि स्पार्कीचे मुकेपण अत्यंत इमानी आहे म्हणून तो सुखाने तिची साथ करतो आहे

आज माझी खऱ्या अर्थाने अधत्वाबरोबर व मुकेपणावरोबर मैत्री झाली डोळसपणे मी प्रथमच दृष्टिहीनाच्या सुखाचा विचार करू लागले आणि 'गुड नाईट क्रिस्टीन' 'गुड नाईट स्पार्की' असे पुटपुटत मी डोळे मिटून घेतले डोळे मिटून घेतले तरी क्रिस्टीन व स्पार्की डोळयापुढून जात नव्हते आज स्पार्की वृद्ध झालाय म्हणून क्रिर्स्टीन रडत आहे माझ्यापुढे प्रश्न पडलाय तिचे ते अश्रु तिलासुद्धा दिसत नाहीत तर इतराना कुठून दिसणार ?

♣

उठली व स्पार्की मागोमाग कॅफेटेरियाच्या दिशने गेली त्या प्रसगाने आम्ही तिघे मित्र बनलो

अभ्यास करणे व शिकविणे या वळखाऊ कामावरोवर प्रत्यक दिवस इतरही खूप कामे घेऊन येई अधून मधून मी क्रिस्टीनला फोन करीत असे· वीक-एन्डला एखाद्या सध्याकाळी आम्ही वगैवर जेवण घेत असू, फिरायला जात असू तिच्या एकाकी आयुष्यात आनदाचे क्षण निर्माण करण्याचे माझे अल्प प्रयत्न बहुधा यशस्वी होत असत

एका अनाम वेगाने दिवस धावत होते, वसतऋतु सपत आला मला जाणवले येथील ऋतुही तटस्थ कुणामध्ये इन्व्हॉल्व न होणारे उन्हाळा सुरू झाला होता समर जॉब करीत अभ्यास सपविण्यात वेळ कसा सपे हे कळत नव्हते एका सुट्टीच्या दिवशी, दिवसभर अभ्यास करून सध्याकाळी फिरायला वाहेर पडले होस्टेलच्या दारातून वाहेर पडताच, त्याच वाकावर वसलेली क्रिस्टीन दृष्टीस पडली ती मुसमुसून रडत होती तिची थरथरणारी बोटे मायेने स्पार्कीच्या अगावरून फिरत होती तिच्या रडण्याचा वेग कमी होईपर्यंत मी थावले व हळूच पुढे होऊन हाक मारली, 'क्रिस्टीन' क्रिस्टीनचा हात पुढे झाला मी तिचा हात हातात घेतला तिच्याजवळ वसून प्रेमाने तिच्या पाठीवरून हात फिरवू लागले काही क्षणानतर क्रिस्टीनच्या अश्रुंचे कारण मला समजले

मागच्या आठवड्यात स्पार्की आजारी पडला होता डॉक्टरानी सागितले की, स्पार्की म्हातारा होऊ लागलाय, त्याची नजर कमी होऊ लागलीय क्रिस्टीनसाठी डोळे वनलेल्या स्पार्कीची दृष्टी कमी होऊ लागलीय आणि एके दिवशी तो अचानक सपला तर ? आपल्याला कोण ? हा विचार मनात येऊन असहाय भावनेने क्रिस्टीन स्पार्कीला कवटाळीत रडत होती स्पार्कीच्या रूपात क्रिस्टीनच्या आयुष्यातला, म्हातारा झालेला वसतऋतु जणू मला दिसू लागला आज क्रिस्टीनच्या प्रश्नाचे उत्तर मजजवळ नव्हते कदाचित दुसरा वॉच-डॉग, हे त्या प्रश्नाचे उत्तर असू शकेल पण लहानपणापासून क्रिस्टीनची सोवत केलेल्या स्पार्कीची जागा तो घेऊ शकेल का ? मी माझ्या विचाराना आवर घालून क्रिस्टीनची समजूत

काढली माझ्या रुममध्ये नेऊन तिला कॉफी करून दिली व ती शांत झाल्यावर तिला, तिच्या रुमपर्यंत पोहोचविले

मी माघारी आले बिछान्यावर पडले बिछान्यावर पडल्यावरही क्रिस्टीनचेच विचार मनात येत होते बरे झाले स्पार्कीसारखी जनावरे मुकी असतात, ती जर बोलू शकली असती तर या देशातला स्पार्कीनेही स्वत च्या सुखासाठी, स्वत च्या स्वार्थासाठी क्रिस्टीनकडून 'सेपरेशन' घेतले असते आणि तो केव्हाच निघून गेला असता लौकिकदृष्ट्या समृद्ध असलेला हा देश क्रिस्टीनसारख्या व्यक्तिसाठी किती छोटा आहे याची नव्याने जाणीव झाली माणुसकीची, इमानदारीने सेवा करण्याच्या भावनेचा या छोट्या देशातला, एक स्पार्क मूक स्पार्कीच्या रूपाने मी अनुभवला आज माझ्या दृष्टीने क्रिस्टीनचे अंधत्व व स्पार्कीचे मुकेपण हे वरदान आहे कारण उघड्या डोळ्यानीही जे बघवत नाही, ते क्रिस्टीनला दिसू शकत नाही, म्हणून ती सुखी आहे आणि स्पार्कीचे मुकेपण अत्यंत इमानी आहे म्हणून तो सुखाने तिची साथ करतो आहे

आज माझी खऱ्या अर्थाने अंधत्वावरोबर व मुकेपणावरोबर मैत्री झाली डोळसपणे मी प्रथमच दृष्टिहीनाच्या सुखाचा विचार करू लागले आणि 'गुड नाईट क्रिस्टीन' 'गुड नाईट स्पार्की' असे पुटपुटत मी डोळे मिटून घेतले डोळे मिटून घेतले तरी क्रिस्टीन व स्पार्की डोळ्यापुढून जात नव्हते आज स्पार्की वृद्ध झालाय म्हणून क्रिस्टीन रडत आहे माझ्यापुढे प्रश्न पडलाय तिचे ते अश्रु तिलासुद्धा दिसत नाहीत तर इतराना कुठून दिसणार ?

♣

[library stamp]

१४

# 'डेट'

प्रत्येक वर्षी, अकरा जूनचा दिवस आला नसता तर किती बरे झाले असते, असा विचार दरवर्षी ही तारीख जवळ येऊ लागली की, जेनीच्या मनात येत असे सध्या जून महिना चालू आहे अकरा तारीख जवळ येऊ लागली आहे आणि एकाकी जेनी उदास होत चालली आहे दु:खी होत चालली आहे त्यात आज आहे शुक्रवार, सध्याकाळ होऊ लागलीय वास्तविक पाहता प्रत्येक सध्याकाळ तिला उदास करीत असे. तिला नेहमी वाटे, दिवसाने दुपारनतर एकदम रात्रीच्या कुशीत शिरावे व सध्याकाळ, विशेषत शुक्रवारची सध्याकाळ येऊ नये तस पाहिल तर त्या प्रसगापासून जेनी नेहमीच दु:खी असते.

आजही ती अशीच कातर बनलेली आहे आज टर्मचा शेवटचा दिवस उद्या जर समर जॉबसाठी होकारार्थी उत्तर मिळाले नाही तर घरी जायला पाहिजे होस्टेलमध्ये राहाण्यासाठी पैसे कुठे आहेत ? समर जॉब केला तरच फॉल टर्मच्या फीचे पैसे जमा करता येतील कॉलेजसाठी घरापासून दूर आल्यापासून गेल्या तीन वर्षांत कोणत्याही सुट्टीत जेनीला उत्कटतेने घरी जावेसे वाटले नाही तिच्या दोन धाकट्या बहिणींना ती आवडत नाही आई-वडिलाना तिच्या जवळ वा दूर असण्याचे सुखदु:ख नाही व हे असे 'घर' *जेनीला अभिप्रेत असलेल्या* घराच्या व्याख्येत बसत नाही

जेनी दिसायला सुदर नाही ती जाड आहे तिला चष्मा लावावा लागतो अशा सुमार रूपाच्या मुलीने म्युझिक कॉलेजमध्ये जाणे हा तिच्या बहिणींसाठी विनोदाचा विषय आहे हे जेनीने पहिल्या भेटीतच मला सांगितले होते दोन वर्षांपूर्वी स्प्रिंग टर्ममध्ये मी 'सोशॉलॉजी ऑफ मेन्टल

डिसऑर्डर' हा कोर्स शिकवीत होते त्या वर्गात जेनी मला विद्यार्थिनी म्हणून भेटली त्या टर्ममध्ये ती 'साईन – लँग्वेज'चा कोर्सही करीत होती. आठवड्यातून तीनदा वर्गात जेव्हा, जेव्हा आमची भेट होई तेव्हा साईन लँग्वेजमध्ये ती मला एकदोन वाक्ये शिकवी काही वेळा सध्याकाळी जॉगिंग सूट घालून पळत, पळत माझ्या होस्टेलवर मला भेटायला येई व 'हेवनली हॅश' नावाच्या इन्टरेस्टिंग चवीच्या आईसक्रीमची मागणी करी कोर्स सपला तरी जेनीचे मला भेटणे चालूच होते नकळत आमची मैत्री झाली व तिच्या सुखदु:खाशी माझा परिचय झाला जेनीचे सर्वात मोठे दु ख व समस्या होती की, तिला शुक्रवारी सध्याकाळी 'डेट' मिळत नसे कारण ती बेताच्या रुपाची, जाड मुलगी होती काही जाड व्हाईट अमेरिकन मुली डेट मिळत नाहीत म्हणून नाईलाजाने निग्रो मुलाशी मैत्री करीत तशी मैत्री करण्याचे धाडसही तिच्याकडून झाले नाही ती नेहमी स्वत च्या वहिणींच्या सौंदर्याची, हुशारीची तारीफ करी आईवडिलाच्या त्या किती लाडक्या आहेत हे सागे व त्या दोघींना मित्र आहेत हे सागताना उदास होई

अमेरिकन मुलीला सुखाने श्वास घेण्यासाठी, वयात येताच 'बॉय-फ्रेन्ड ' पैदा करावा लागतो भेटवस्तु देणारा सुंदर-सुंदर कार्डस् पाठविणारा, अधून मधून एक डझन गुलाबाची फुले, चॉकलेट धाडणारा नि प्रत्येक शुक्रवारी सध्याकाळी तिला 'डेट' म्हणून मिरविणारा मित्र हवा असतो वहिणींनी केलेली उपेक्षा, हेवादावा, रागराग एकवेळ जेनीला सहन होत असे, पण मित्राविना व्यतीत करावी लागणारी शुक्रवारची सध्याकाळ तिला मुळीच आवडत नसे

आज शुक्रवार असूनही जेनी एकटीच टी व्ही वरील चित्रे बघत बसली आहे तिची रुममेट सामानाची बाधाबाध करून केव्हाच निघून गेलीय नकळत जेनी, विचाराच्या ओघात भूतकाळात जाऊन पोहोंचली. तीन वर्षांपूर्वी अकरा जूनला तिच्या आणि त्याच्यामधला रेशमी दुवा हरवला टेबलावर ठेवलेले त्याचे छायाचित्र निरखताना तिला त्याची तीव्रतेने आठवण येते त्याच्यासमवेत व्यतीत केलेले सारे क्षण आठवतात व तिला गहिवरून येते चष्मा काढून, निळे डोळे ती पुन्हा पुन्हा कोरडे करते.

तो.  ? मानसिकदृष्टचा त्याची वाढ पूर्ण झालेली नव्हती त्याची त्याला जाणीव असावी; कारण तो कोणाला त्रास देत नसे मानसिक-दृष्टचा अपग असलेल्या मुलाच्या शाळेत शिकत असताना त्याला व्हायोलिन उत्तमप्रकारे वाजविता येऊ लागले त्याला वाद्य वाजविताना आनद वाटतो हे जाणवल्यावर त्याची साथ देण्यासाठी ती पियानो शिकली त्याला भावनिक आधार देता, देता ती त्याच्या सुखदु खाशी इतकी समरस झाली होती की माध्यमिक शिक्षण पूर्ण झाल्यावर म्युझिक थेरपी' घेऊन कॉलेजची पदवी पूर्ण करायची आणि अपग मुला-मुलीच्या जीवनात आनद निर्माण करायचे काम स्वीकारायचे असे तिने ठरविले

त्याच्या सदर्भातले सगळे प्रसग जेनीला आठवत होते मानसिक-दृष्टचा अपुरी वाढ झालेली असूनदेखील तो जेनीला समजू शकत असे त्याच्या मायेमुळे कुटुंबातील इतर व्यक्तिची तुटक वागणूक जाणवत नसे त्याला मदत करण्यात, शाळेला नेण्याआणण्यात, त्याच्याबरोबर बोलण्यात, वाद्य वाजविण्यात नि त्याचा अभ्यास घेण्यात तिचा रिकामा वेळ छान व्यतीत होई हायस्कूलचे शिक्षण पूर्ण होताच घरापासून बऱ्याच दूर असणाऱ्या कॉलेजात जेनीला प्रवेश मिळाला त्याला सोडून जायचे या भावनने आणि त्याची नीट काळजी कोण घेईल ? या विचाराने जेनी कासावीस झाली

तो उन्हाळा, कॉलेजला प्रवेश घेण्यापूर्वीचे दोन-तीन महिने तिला आठवले ती जास्तीतजास्त वेळ त्याच्याबरोबर घालविण्याच्या प्रयत्नात असे, नी एक दिवस तो अचानक आजारी पडला त्याला हॉस्पिटलमध्ये नेले त्याच्या सर्व टेस्टचे रिझल्टस् आल्यावर, डॉक्टराचे चेहरे इतके गभीर का व्हावेत हे तिच्या कोवळ्या मनाला उमगले नाही सध्याकाळी ती घरी यायला निघाली तेव्हा त्याचे डोळे, वेदना निमूटपणे सहन करणारे त्याचे डोळे, बावीस वर्षांचे असहाय आयुष्य जगलेल्या नि दहा वर्षे मानसिक वय असणाऱ्या त्या भावड्या पोराचे निष्पाप डोळे जणू केविलवाणे तिला विनवीत होते 'जेनी, प्लीज कम बॅक अगेन,' त्यानतरचे तीन आठवडे जेनी न चुकता हॉस्पिटलमध्ये जात होती कॉलेजला जाण्यासाठी, साठविलेल्या पैशातून त्याच्यासाठी रोज फुले नेत होती

दिवसेंदिवस त्याची प्रकृती खालावत गेली त्याला कॅन्सर झाला होता एके दिवशी डॉक्टरानी तिला सांगितले की, तो काही तासाचा सोबती आहे तिने त्याच्याजवळ जाऊन हळूवारपणे त्याला स्पर्श केला. एका अनाम प्रेरणेने त्याने तिची बोटे घट्ट पकडून ठेवली जणू मृत्युच्या पोलादी पजातून जेनीची नाजूक बोटे त्याला सोडविणार होती जेनीला त्याच्या वेदनापूर्ण चेहऱ्याकडे बघवेना दिवसभर ती त्याच्याजवळ बसून राहिली सध्याकाळ झाली घरी परतावे म्हणून ती मोठ्या कष्टाने उठली. 'गुड–बाय' म्हणण्यासाठी तिचे ओठ विलग झाले तेवढ्यात जेसनने अत्यत आवेगाने तिचा हात पकडला त्याच्या व तिच्या नात्यातील दृढता प्रथमच तिला प्रकर्षाने जाणवली, नि काही क्षणात ती पकड सैल झाली हातातील उब गारठून गेली जेनीला एकटीला सोडून, तो अनताच्या प्रवासाला लगबगीने निघून गेला

'तो अपग होता, त्याचे अस्तित्व सपले, एकापरीने ठीक झाले' या अमेरिकन जीवनातल्या भावशून्य वास्तवतेने काही अशी तिला मानसिक-दृष्ट्या सावरायला मदत केली

आज जेनीची कॉलेजची तीन वर्षे सपलीत ती म्युझिक थेरपी शिकतेय जेसनच्या आठवणींना अर्थ देण्यासाठी शाळेतील अपग मुला-मुलीना शिकवतेय, हसवतेय होस्टेलच्या कॅफेटेरियात भाडी घासून अधिक खर्चासाठी लागणारे पैसे मिळवतेय आणि एखाद्या अपग मुलीला मातीकाम शिकायला लागणारी माती, मोठ्या आनदाने विकत घेऊन देतेय

टेबलावरील त्याच्या छायाचित्राशेजारी ठेवलेल्या दिनदर्शिकेकडे तिचे लक्ष जाते अकरा जून या तारखेवर तिची नजर स्थिरावते. क्षणभर तिला वाटते, छायाचित्राने सजीव होऊन तिच्यासमोर यावे, हातात हात घेऊन म्हणावे, 'चल जेनी, आज शुक्रवार सध्याकाळी आपण सिनेमाला जाऊ' जेनीला आठवते, जेसनला–तिच्या लाडक्या भावाला त्याच्या मानसिक अपगत्वामुळे कधीही 'डेट' मिळत नसे व तिला तिच्या जाड असण्यामुळे 'डेट' मिळत नसे त्याला समाधान वाटावे म्हणून जेनी व तो छान तयार होऊन सिनेमाला जात जेनी त्याची 'डेट' असल्याचे नाटक

करीत असे नि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी तो तिचा हात घट्ट पकडून ठेवीत असे आयुष्याचा चिमुकला प्रवास संपवितानाही तिच्या भावड्या भावाने तिचा हात तसाच घट्ट पकडून ठेवला होता

तो संपला आणि आईवडिलांचे घर (पेरेन्टस् होम) तिला परके वाटू लागले हल्ली तिला नेहमी जाणवायचे, तो जरी तिच्यावर अवलंबून होता तरी मानसिकदृष्टचा ती त्याच्यावर पूर्णपणे अवलंबून होती तिची, सर्वांकडून होणारी उपेक्षा फक्त त्याला समजत होती असे जेनीला जाणवायचे त्याच्या मृत्युनंतर जेनीला कधी नाटक म्हणूनही, कुणावरोबर 'डेट बनून जाता आलेले नसते

जेनीच्या एकाकीपणाचा विचार मला खायला उठत होता एव-ढचात फोनची रिंग वाजली मी फोन घेतला, गहिवरलेल्या आवाजात जेनीचे शब्द ऐकू आले, 'हॅलो उषा, मी जेनी बोलतेय आपली 'डेट' लक्षात आहे ना ? अकरा जूनला आपल्याला चर्चमध्ये जायचे आहे जेसनच्या नावाने मेणबत्ती लावून प्रार्थना करायची आहे'

'येस जेनी . जेसनची डेट माझ्या लक्षात आहे ' असे म्हणत मी फोनचा रिसिव्हर फोनक्रेडलवर ठेवला

♣

१५

# सोशल सिक्युरिटी ?

त्या दिवशी 'दोन नोव्हेम्बर' होता सर्व जगात ख्रिश्चन लोक हा दिवस मृतात्मा-दिन (All Souls' Day), म्हणून पाळतात घरातील मृत व्यक्तिच्या स्मरणार्थ या दिवशी कब्रस्थानात जाऊन कबर स्वच्छ करणे, फुले वाहाणे उदबत्त्या—मेणबत्त्या लावणे, मृतात्म्याला शांती मिळावी म्हणून प्रार्थना करणे वा स्मृती असह्य झाल्या म्हणून अश्रुना वाट करून देणे हे सारे मनोभावे केले जाते कुणाच्या भावना-वेदनाची वरात येथे येऊन संपते तर कुणाच्या एकाकी अश्रुंची मिरवणूक येथून सुरू होते

मला आठवते, मी पुण्यात असताना, आम्ही भावंडे दोन नोव्हेम्बरला, कब्रस्थानात जाऊन, वडिलाच्या समाधीवर फुले वाहात असू उदबत्त्या, मेणबत्त्या लावून गभीरपणे प्रार्थना करीत असू वास्तविक पाहता इतर धर्मियानी हा दिवस लक्षात ठेवण्याचे काही कारण नाही पण अन्य धर्मीय कबरस्थानाच्या प्रवेशद्वाराच्या दुतर्फा हार, फुले उदबत्त्या, मेणबत्त्याची दुकाने सजवीत हारफुलाची दुकाने ठीक, पण फुगेखेळणी विकणारानीही कबरस्थानाच्या दारात या दिवशी गर्दी का करावी ? अर्थात जेथे रोजीरोटी मिळते तेथे गरजू माणूस पोहोचतोच, मग ते कबरस्थान का असेना तसे पाहिले तर ताजमहाल देखील एक समाधीच पण आजपर्यंत लाखो लोकाना या समाधीने रोजगार मिळवून दिला ताजमहाल किंवा वर्षातून एकदा का होईना काही लोकाची भूक भागविणारे पुण्यातले, ते छोटेसे कबरस्थान आठवले की नेहमी वाटते, मृत्युनतरही अशा ठिकाणी कफन ओढून निद्राधीन व्हावे व या चिरनिद्रेनेही कुणा भुकेल्याचा, गरजवताचा आत्मा काही क्षणासाठी तरी तृप्त व्हावा अभावाला मृत्यु म्हणा-

यचे का ? या प्रश्नाचे उत्तर पुण्यात असताना तरी नकारार्थीच मिळायचे आज मी अमेरिकेतील एका सत्तर विद्यार्थांना विद्यादान करणाऱ्या भव्य विद्यापीठात शिकते आहे येथील सामाजिक संदर्भ लक्षात घेता प्रश्नाच्या उत्तराचे स्वरूप बदलत आहे पुष्कळदा उत्तराच्या रूपाने समोर आलेल्या वास्तवाने मनाला जबरदस्त धक्के दिले आहेत

होस्टेलच्या सातव्या मजल्यावरील माझ्या खोलीची खिडकी उघडली की, त्याच्या पलिकडचा बस–स्टॉप दिसत असे बस–स्टॉपच्या मागे काही अंतरावर वृद्धाश्रमाची सुबक इमारत वृद्धाश्रमाच्या बागेची हद्द संपल्यावर एक भिंत भिंतीला लागून असलेल्या जागेत 'ड्राइव्ह इन थिएटर' व शेजारी मोजक्या कबरा असलेले सुनसान कबरस्थान वृद्धाश्रमाजवळ व कबरस्थानाला लागून किंबहुना कबरस्थानाच्याच रिकाम्या भागात असलेल्या 'ड्राइव्ह-इन-थिएटरचा' मला राग येई व अमेरिकन मनाचे कोडे आणखीनच अवघड होई मला वाटायचे संसाराच्या माया मोहापासून, तापापासून मुक्ती मिळून जे आयुष्यात प्रथमच सुखद निद्रेचा अनुभव घेत आहेत त्यांच्या सुखद निद्रेत व वृद्धाश्रमाच्या परिसरातील शांततेत, व्यत्यय आणण्याचे काम ह्या ड्राइव्ह-इन थिएटरमध्ये येणारे प्रेक्षक का करतात ? कारमध्ये बसून, उपभोगाच्या दुनियेत रंगून, त्या लायकीचा एखादा वासना चाळविणारा चित्रपट पाहणाऱ्या त्या तरूण-तरूणींचा मला राग येत असे एकीकडे वृद्धत्व,चिरनिद्रा व एकीकडे जीवना-बद्दलची प्रचंड आसक्ती, वृद्ध व मृतावद्दल पूर्णपणे उपेक्षेची भावना वळी तो कान पिळी हेच ह्यांचे जीवनसूत्र व्यक्ति 'पॉवरलेस' झाली की, तिच्या-कडे संपूर्ण दुर्लक्ष करण्याची वृत्ती वय होणे या वास्तवतेला मान देणारे व मृतांच्या स्मृती जीवापाड जपणारे माझे पौर्वात्य मन ही 'रिॲलिटी' सहजासहजी स्वीकारू शकत नाही

आज दोन नोव्हेम्बर, मृतात्मा–दिन इथे असेन तो पर्यंत मृतात्मा-दिनी आजोबांच्या कबरेवर मेणबत्ती लावण्याचे वचन मी गेल्यावर्षी एस्तेर आजींना दिले होते त्यानुसार त्यांच्या पतीच्या कबरेवर फुले वाहून आणि मेणबत्ती लावून प्रार्थना करण्यासाठी मी कबरस्थानाकडे निघाले किमान त्याक्षणी तरी आकाशाच्या छायेत शांत-शांत वाटत होते थोड्याच

वेळाने चंद्र उगवेल, मखमली चादण्यात शुभ्र कबरा उजळून जातील आणि एकदीड तासानंतर या ग्रहनक्षत्राच्या नीरव दुनियेला कानठळ्या बसवि-णारे 'मॉर्डन पॉप म्युझिक' ऐकावे लागेल, या विचारातच मी एस्तेर-आजींच्या पतीच्या कबरेजवळ पोहचले आजोबाच्या कबरेवर नजर स्थिरावली व या वृद्ध जोडप्याच्या सहवासात घालविलेले अनेक क्षण आठवू लागले

मागच्या वर्षी दोन नोव्हेम्बरलाच एस्तेरआजीची व माझी कबर-स्थानात भेट झाली नेहमीप्रमाणे, सध्याकाळी बसमधून उतरल्यावर होस्टेलकडे जाताना अनाहूतपणे आजोबाच्या कबरेकडे लक्ष गेले कबरे-जवळ एक बादली होती आजी तल्लीन होऊन पाण्याने कबर धुत होत्या कबरेजवळ जाऊन आजीच्या एकाताचा भग करीत मी त्याच्याशी बोलले त्या सागत होत्या, 'पाहिलस उषा, हल्ली लहान मुले फुग्यात रग भरून कबरस्थानात येतात व रगाने भरलेले फुगे कबरावर फोडतात एक तास झाला मी कबरेवरचा रग धुवून कबर स्वच्छ करते आहे आजकाल, जिकडेतिकडे मुलामध्ये अशी विध्वसक वृत्ती दिसून येते काही स्थानाचे पावित्र्य जपायचे असते हे सामाजिक मूल्य त्याना कुणी, कधीच कसे शिक-वीत नाही ?' त्याच्या प्रश्नाचे ओझे माझ्यावर टाकून त्या प्रार्थनेमध्ये दग झाल्या त्याच्या मिटलेल्या डोळ्याकडे पाहताना असाच एक दुसरा प्रसग आठवला माझी मैत्रीण लीन Gerontology घेऊन एम ए करीत होती वृद्ध व्यक्तिच्या समस्या जवळून जाणून घ्याव्यात व त्याना मदत करावी या हेतूने, लीन आठवड्यातून दोन-तीन वेळा स्वयसेवक म्हणून वृद्धाश्रमात जाई तिथे एस्तेर आजी व आजोबाना भेटे आजी व आजींचे पती हे लीनचे स्नेही मला वेळ असे तेव्हा मीही लीनच्या सोबत जात असे, त्याचे बोलणे ऐकत असे त्या बोलण्यातून त्याच्या समस्या जाणवत व अमेरिकन वृद्धावस्थेचे एक भीषण वास्तववादी चित्र माझ्या डोळ्यासमोर तयार होई एस्तेरआजीचे शब्द मला अजूनही आठवतात, त्या म्हणायच्या, 'मुली, मला वाटायचे बालपणासारखे म्हातारपणही आपोआप येते, देवा-कडून अगदी फुकटात मिळते पण या म्हातारपणासाठी इथे इतके पैसे मोजावे लागतील असे वाटले नव्हते' वृद्धाश्रमात, राहण्याचे, जेवणाचे,

औषधाचे व इतर सोयीचे पैसे द्यावे लागत सुदैवाने, आजीआजोबा दोघा-नीही आयुष्यभर नोकरी केल्यामुळे, पगारातून कापून घेतलेल्या सोशल-सिक्युरिटीच्या पैशातून ठराविक रकमेचे चेक, दर महिन्याला मिळत व त्याचे व्यवस्थित भागत असे अधिक हालचाल न करता येणाऱ्या वृद्धाचे चेक, आश्रमाची संचालिका बँकेतून वटवून आणीत असे कुटुंबसंस्थेवर पड-णारे ताण कमी होऊन या संस्थेला बळकटी यावी म्हणून ज्या सामाजिक व शासकीय सुविधा दिल्या जातात त्यापैकी 'सोशल सिक्युरिटी' व 'वेल्फे-अर' या दोन महत्त्वाच्या सोयी होत आर्थिक ओझे व त्यामुळे निर्माण होणाऱ्या काळज्या, चिंता यापासून व्यक्तिला, म्हातारपणी काही अंशी तरी सुटका मिळावी या दृष्टिकोणातून केलेली 'सोशल-सिक्युरिटीची, व्यवस्था खरोखरी स्पृहणीय आहे अर्थात या सोयीचा गैरफायदा घेणारे महाभागही अल्प नाहीत हे तितकेच खरे

औद्योगिक क्रांती, तंत्रविज्ञानातील गती, शहरीकरण, आधु-निकीकरण या आणि अशा अनेक घटकांचे येथील कुटुंबसंस्थेवर गंभीर परिणाम झाले जीवन सोपे, सुसह्य अधिक आनंददायी बनविणाऱ्या सुधारणांचे स्वागत झाले उदाहरणार्थ, टी व्ही आला नि जग प्रत्येकाच्या दिवाणखान्यात विराजमान झाले जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रा-तील क्रांती बुद्धीने सहज स्वीकारली अत्याधुनिक साधने, प्रगत शस्त्रक्रिया-औषधे, प्रशिक्षित उच्चशिक्षित डॉक्टर्स यांच्यामुळे व्यक्तिला वयोमर्या-देच्या क्षेत्रात खूपसे सुरक्षित वाटू लागले, पण वयोमर्यादा वाढूनही भाव-निक क्षेत्रात व्यक्तिला 'पॉवर लेसनेस'चा प्रत्यय येऊ लागला व्यक्ति-वादाची नांदी झाली, व्यक्तिवादामुळे व्यक्तिचा आनंद व समाधान याला अग्रक्रम मिळाला "इमोशनल-इन्व्हेस्टमेन्ट" सारखे फॅन्सी शब्द मानस शास्त्रज्ञाच्या पोतडीतून बाहेर पडले तरूणतरूणींच्या प्रॉयॉरिटी-लिस्ट-मध्ये नोकरी, कार घर, पत्नी, मुलेबाळे, जमल्यास कुत्रे किंवा मांजर या मध्ये इमोशनल इन्व्हेस्टमन्ट केल्यानंतर म्हाताऱ्या आई--वडिलांना सांभा-ळण्याचा प्रश्न उद्भवताच, जीवनाचा, प्रॉयॉरिटी लिस्टचा तोल जाऊ लागला मुलांमधील आत्मीयतेची, कर्तव्याची भावना हरवली समस्या ओळखून, त्यावर लगेचच उपाय शोधण्याचा प्रयत्न करणाऱ्या या समाजाने

तावडतोब कुटुंबसंस्थेचे काही नियम बदलले वृद्ध मातापित्याने भावनिक दृष्टया स्वतंत्र असावे, आर्थिक बाबीत स्वतःच्या मुलाबाळांवर अवलंबून न राहता स्वतःच्या म्हातारपणासाठी तरतूद करून ठेवावी, स्वतःच्या शेवटच्या संस्कारासाठी कब्रस्थानात जागा घेऊन ठेवावी या प्रकारच्या अस्वाभाविक तडजोडी वास्तव म्हणून स्वीकारून, जगणे वृद्धांना भाग पडू लागले

या समाजात जसजसे वय होत जाते तसे तडजोडीचे प्रमाण वाढते नातवंडांच्या बालपणात या थकलेल्या पावलांना जागा नसते शारिरीक मर्यादा जाणवू लागतात, म्हातारपणामुळे येणारे आजार डोके वर काढू लागतात, कष्टाची कामे करण्यास ताकद अपुरी जाणवू लागते अशा क्षणी वृद्ध पतीपत्नीला एका कठोर वास्तवाला स्वीकारावे लागते स्वतः उभा-रलेल्या घरकुलाचा, 'होम-स्वीट होम' चा जड अंतःकरणाने निरोप घेणे भाग पडते आवश्यकतेप्रमाणे उपलब्ध असलेल्या सोयींपैकी एखादी सोय निवडावी लागते आजारी वृद्ध, नर्सिंग होमचा दरवाजा ठोठावतात आणि चालूफिरू शकणारे वृद्ध वृद्धाश्रमाची वाट धरतात वय होणे ही वास्तवता काही वेळा इतक्या केविलवाण्या रूपात का सामोरी यावी ? एस्तेरआजी व आजोबांनीही ही वास्तवता स्वीकारली, किंबहुना पैसे मोजून विकत घेतली व त्याबद्दल समाधानही व्यक्त केले आहे त्या परिस्थितीत समा-धानी व आनंदी असणाऱ्या त्या उभयतांनी स्वतःच्या विवाहाचा पन्नासावा वाढदिवसही मोठ्या थाटाने साजरा केला आजींनी कौतुकाने राष्ट्रा-ध्यक्षाकडून आलेले अभिनंदनाचे शुभेच्छापत्र लीनला व मला दाखविले छोट्या, छोट्या वादविवादातून उठल्यासुटल्या घटस्फोट घेणाऱ्यांच्या ह्या देशात विवाहाचा पन्नासावा वाढदिवस म्हणजे जगातल्या मोजक्या आश्चर्यांपैकी एक बाब त्यामुळे विवाहित जोडपे स्वतः हून राष्ट्राध्यक्षांना आपल्या लग्नाचा पन्नासावा वाढदिवस केव्हा आहे ते कळवितात व राष्ट्रा-ध्यक्षही न विसरता शुभेच्छा धाडतात एखाद्या कुटुंबातील आनंद वृद्धी-गत करण्यासाठी, देशाच्या राष्ट्राध्यक्षाच्या शुभेच्छा सहजासहजी याव्यात हे लोकशाहीचे, व्यक्तिला व्यक्तिशी भावनिक दृष्टया जोडणारे रूप मला फारच लोभस वाटले साठाव्या विवाहवर्धापनदिनालाही, आजी राष्ट्रा-

ध्यक्षाकडून शुभेच्छा वसूल करणार होत्या व वयाच्या पचाहत्तराव्या वर्षीही आजींचा उत्साह व आशावाद दृष्ट लागण्याजोगा होता.

जीवनात एस्तेरआजीना जे अतिप्रिय होते ते म्हणजे आजोबा एके दिवशी आजीच्या सुखाला ग्रहण लागले, आजोबा अचानक नाहीसे झाले पोलिसानी खूप शोध केला पण त्याच्या प्रयत्नाना अपयश आले आजींचे हसरे डोळे केविलवाणे दिसू लागले त्या निरवानिरवीची भाषा बोलू लागल्या आपले मानता येईल, म्हणता येईल असे आश्रमात कुणी उरले नव्हते आजीनी आपल्या आवडत्या वस्तु वाटून टाकल्या राष्ट्राध्यक्षाचे पत्रही त्यानी लीनला भेट दिले कॅलिफोर्नियातील एका वृद्धाश्रमात आजीची बहीण राहात होती, तेथे जाण्यासाठी त्या पत्रव्यवहार करु लागल्या जाण्याचे जवळजवळ घाटतच आले होते इतक्यात एक महत्त्वाची घटना घडली आजोबाचा शोध लागला

अशीच एक सकाळ होती सूर्याच्या कोवळ्या उन्हात, मस्ती करण्यासाठी पक्षी किलबिल करू लागले पक्षाच्या हालचालीतील अधीरता, उत्सुकता, खिडकीतून निरखताना बऱ्याच दिवसानी आजीचे ओठ हास्याने विलग झाले एवढ्यात पोलिसाची गाडी वृद्धाश्रमासमोर येऊन उभी राहिली गाडीतून मजूर उतरले व पोलिसानी सांगितलेल्या ठिकाणी खणू लागले सध्याकाळपर्यंत मजुरानी बागेचा कानाकोपरा खणून काढला त्या रात्रीपर्यंत पोलिसाना बागेतील कोपऱ्यात दोन मानवी देहाचे अवशेष सापडले गेल्या काही वर्षांत वृद्धाश्रमातून अचानक नाहिश्या झालेल्या काही वृद्ध व्यक्तिचा शोध या सापडलेल्या अवशेषामुळे लागला आठवडाभर वृद्धाश्रमाच्या आजूबाजूचा परिसर खोदून काढण्याचे काम चालूच होते एकूण चार मानवी देहाचे अवशेष सापडले वैद्यकीय तपासणीनतर आढळून आले की, ते अवशेष, वेळोवेळी वृद्धाश्रमातून अचानक नाहिश्या झालेल्या व्यक्तिचेच आहेत दुर्दैवाची गोष्ट म्हणजे आजोबाच्या देहाचे अवशेषही सापडले होते, आजींची शेवटची आशा सपली रीतसर कायदेशीर चौकशी पूर्ण झाल्यानतर आजींना, आजोबाच्या देहाचे अवशेष देण्यात आले आजींच्या चेहऱ्यावर हजारो प्रश्नचिन्ह उमटली स्वत च्या वाट्याला आलेल्या या क्रूर दु खाचा अर्थ शोधीत त्यानी त्या अवशेषावर

शवटचे धार्मिक संस्कार केले कबर बांधली आजोबांच्या अस्तित्वाच्या त्या एकमेव दृश्य खुणेने, त्या कबरेने आणखी काही काळ त्यांना त्या परिसराशी बांधून ठेवले लौकिक अर्थाने त्यांच्या आयुष्यातला सर्वात मोठा पाश तुटला होता, परंतु आजीमधली स्त्री त्या कबरेमध्ये सांत्वन शोधीत असावी दुःखाच्या वाटणीत अधिकाराने हिस्सा मागणारी जीवाभावाची व्यक्ति त्या दुःखाची साथीदार असेल तर दुःख हे संपत्तीही बनू शकते. पण आजीच्या सुखदुःखाचा भागीदार तर काळाच्या पडद्याआड गेला होता.

पोलिसांची चौकशी पूर्ण होताच वृद्धाश्रमाच्या संचालिकेला अटक झाली. सोशल-सिक्युरिटी योजनेखाली आश्रमातील वृद्धांना मिळणारे पैसे कायम स्वरूपात मिळावेत यासाठी आश्रमाच्या संचालिकेने एक अजबच मार्ग शोधून काढला होता सोशल सिक्युरिटीच्या पैशासाठी आश्रमातील काही वृद्धांचे खून करून, त्यांना वृद्धाश्रमाच्या परिसरात पुरले होते व ते नाहीसे झालेत असे भासवून, वर्षानुवर्षे त्यांच्या सोशल सिक्युरिटीचे पैसे गोळा केले होते संचालिकेला अटक झाली असा गुन्हा करणारी एक स्त्री होती हे ऐकून मला कमालीचा धक्का बसला अमूक एक व्यक्ति मृत झाली आहे असे कुणी संबंधित अधिकाऱ्यांना कळविले तरच भावनाशून्य संगणकयंत्रात मानवी हात आवश्यक ती सुधारित माहिती नमूद करणार ना ? तसे न केल्याने बेपत्ता व्यक्तींचे पैसे देखील सरकारकडून येतच राहिले. प्रेताच्या टाळूवरचे लोणी खाणे या वाक्प्रचाराचा भीषण अर्थ मला ह्या प्रकारामुळे जाणवला वाटमारी करून वृद्धांना लुबाडण्याचा हा प्रकार पाहून अंगाचा थरकाप झाला

या प्रकारानंतर एस्तेरआजी खचल्यासारख्या झाल्या मागच्या वर्षी दोन नोव्हेंम्बरपर्यंत त्या येथे होत्या मृतात्म्याच्या दिवशी पतीच्या कबरेवर फुले वाहून, आजी दुसऱ्या वृद्धाश्रमात निघून गेल्या आज आजोबांच्या कबरेवर फुले सजविताना, मला आजींची तीव्रतेने आठवण आली. त्यांच्या म्हातारपणाला एका भीषण नाट्याचा फक्त साक्षीदारच व्हावे लागले नव्हते तर त्या क्लेशदायक स्मृती उरलेल्या सर्व दिवसात त्यांच्या आयुष्याची सोबत करणार होत्या. एवढ्यात गीताच्या सुरांनी मी विचारातून भानावर आले पांढऱ्या शुभ्र गाऊन्समध्ये सजलेला लहान मुलांचा

थवा धार्मिक गीते गात, प्रत्यक कबरेवर होली वॉटर शिंपडीत, कबराना अभिवादन करीत चालला होता ज्या शुभ्र कबरावर प्रियजनानी, नातेवाईकानी फुलाची सजावट केली नव्हती त्या कबरावर चर्चप्रमुख फुले वाहत होते प्रार्थना झाली, लोक एकेक करून निघून गेले धर्मगुरु व त्याच्यामागे लहान मुलाची प्रोसेशनही जाण्यास निघाली भारावल्या अवस्थेत तो सर्व विधी पाहताना मनात विचार आला, फुग्यात रंग भरून आणणाऱ्या खोडकर मुलांपेक्षा, या देवदूतासारख्या सजलेल्या मुलाच्या पावलाची साथ, सुराची सोबत या परिसराला निश्चितपणे खूप, खूप भली वाटली असेल

आजोबाच्या कबरेवर मेणबत्ती प्रज्वलीत केली, व होस्टेलच्या दिशेने चालू लागले कबरस्थानातून चालताना, संधीप्रकाशातील, मेणवत्त्याच्या थरथरणाऱ्या ज्योतीनी मला कातर बनविले वाटले, खूप खूप दूर एस्तेरआजीचा चेहरा एकटक आजोबाच्या कबरेकडे पाहतोय विवाहाच्या साठाव्या वाढदिवशी राष्ट्राध्यक्षाकडून शुभेच्छा-पत्र मागविण्याच्या आजींच्या स्वप्नाच्या तुकड्याची धार माझ्या संवेदनाक्षम मनाला घायाळ करू लागली मन व्याकुळ झाले नेत्रात दाटून येणारे अश्रु आवरीत मी रूमवर येऊन पोहोचले व खिडकी उघडली कबरस्थानाकडे नजर गेली आजोबाच्या कबरेवर मी लावलेली मेणबत्ती, क्षीण होत चालली होती तेवढ्यात आरडाओरडा करीत नशा केलेल्या, नशा करणाऱ्या, नशील्या शौकिनाच्या गाड्या ड्राईव्ह-इन थिएटरकडे येऊ लागल्या थोड्याच वेळात काही बेताल चाकाखाली, काही कबरावरची भावफुले तुडविली जातील, मेणबत्त्या विझतील स्वत ला शोधण्याच्या प्रयत्नात, बहकलेले तारूण्य बीअर पीत, एक्स रेटेड् चित्रपट पाहण्यात गुंगेल नि आजच्या दिवसाचे पावित्र्य, शरमेने डोळे मिटून अंगावरील माती पांघरून निद्राधीन होईल पुन्हा कधीही जागे न होण्याच्या इराद्याने

♣

१६

# वेळापत्रक

संध्याकाळी सर्व घरकाम उरकून मी मागच्या दारी असलेल्या छोट्या बाल्कनीत येऊन बसले या देशात उन्हाळा वरदान वाटतो चार महिने बर्फ असते नतर जाणवण्याइतपत थंडी असलेला वसतऋतु येतो तो सपून जेव्हा गात्रातील थंडी घालवून टाकणारा उबदार उन्हाळा सुरू होतो तेव्हा चैतन्याची दिवाळी साजरी होतेय असे जाणवू लागते 'आऊट-डोअर ॲक्टिव्हिटीज' या सदरात मोडणारे सारे प्रकार येथील लोक उत्साहाने करू लागतात सहलीला जातात, वनभोजने करतात, समुद्र किनाऱ्यावर तासन्‌तास घालवितात, निरनिराळे खेळ खेळतात आमच्या घरामागच्या मोकळ्या जागेत देखील शेजार-पाजारची लहान मुले दिवसभर गोंधळ घालतात क्षणात छोट्या, छोट्या सायकलीवर स्वार होऊन शर्यत लावतात, दुसऱ्या क्षणी चेंडूच्या फेकाफेकीत धडपडतात नि तिसऱ्या क्षणी माझ्याकडे इलेक्ट्रिक ट्रेन आहे, तुझ्याकडे नाही म्हणून माझे वडील चागले आहेत किंवा आपल्या दोघाच्या वडिलामध्ये काही कॉमन नाही या बिनबुडाच्या मुद्यावर भांडतात व 'यू आर नॉट माय फ्रेंड' हे निर्वाणीचे वाक्य एकमेकाच्या तोंडावर फेकून आपापल्या घरी जातात साधारण अर्ध्या तासाने पुन्हा येतात व 'विल यू बी माय फ्रेंड ?' अशा प्रश्नाने तहाची बोलणी सुरू करतात त्याच्या या खेळण्याने, बोलण्याने खूपदा माझी करमणूक होते व काही वेळा त्याचा गोधळ--आवाज असह्यही होतो

ह्या मुलाचे खेळ, रूसणे, भांडणे निरखताना, माझी नजर रोज शेजारच्या इमारतीच्या कोपऱ्यातील अपार्टमेंटच्या खिडकीकडे जाते उन्हाळा सुरु झाल्यापासून जवळजवळ रोज संध्याकाळी ६॥ ते ७ च्या सुमाराला त्या खिडकीच्या छोट्या फटीतून एका लहान मुलाचे उत्सुक

डोळे, या मुलाचे खेळ बघताना दिसतात तो वयाने २।। ते ३ वर्षांचा असावा त्यामुळेच त्याची आई त्याला या मुलामध्ये येऊन खेळू देत नसावी त्या मुलाच्या हालचाली निरखणे हा नकळत माझा छंद होऊन बसला तो त्या खिडकीत बसून त्याचा खाऊ खाई, बाहेरच्या मुलाकडे बघून टाळ्या वाजवी, कधी ओरडे तर कधी जीभ दाखवी, कधी खेळण्यातील टेलिफोन-वर एकटाच बोलत बसे एखाद्या सध्याकाळी त्याची आई त्याला रागा-वते आहे, मारते आहे, तो रडतो आहे हेही ऐकू येई व मला उगाचच चुटपुट लागून राही भारतात असते आणि शेजारचा मुलगा असा खिडकीतून रोज सध्याकाळी एकटाच बाहेर केविलवाणेपणे बघत राहिलेला पाहिला असता तर एव्हाना मी त्याच्या कुटुबाचा ओळख करून घतला असतो व रोज त्या गोऱ्यापान गुबगुबीत मुलाला खेळवायला घेऊन आले असते त्याच्या मऊशार तळव्यावर खाऊ दिला असता नि त्याचे अगणित पापे घेतले असते पण येथे सारी उलटी तऱ्हा लग्नानतरच्या पहिल्या काही दिवसातच मला लहान मुलाची भलती आवड आहे हे लक्षात येऊन विज-यने बजावले, "हे बघ, सोनूबाई, ही बारामती नाही कुणाच्या मुलाला घरात बोलवायच नाही, खाऊ द्यायचा नाही, कुणाला आपल्या घरात आणलस नि खेळताना दुखापत झाली तर त्या मुलाचे आईवडील मला कोर्टात खेचतील आणि ५–१० हजार डॉलर्सची नुकसान भरपाई द्यावी लागेल मग तुझी लायब्ररी, पुस्तके सार जागेवर राहील माझ्या पुस्त-काच्या सग्रहाबद्दल अशी धमकी देणे नेहमीप्रमाणे लगेच मला लागू पडले आणि मुलाबरोबर जवळीक करण्याच्या माझ्या उर्मी मी नियत्रणा-खाली आणल्या पण येथील एकदर सामाजिक सकेताच्या अतिरेकीपणाचा रागही आला मुलाना घरी बोलवायचे नाही याचा अर्थ बाल्कनीत बसून त्याना दुरूनच बघून आपली आवड पूर्ण करायची असा सोइस्कर अर्थ काढून मी त्या खिडकीतून बघणाऱ्या एकाकी मुलाकडे बघू लागले व त्याची प्रत्येक सध्याकाळ माझ्या सहानुभूतीचा विषय बनली

एक सध्याकाळ मात्र अशी आली की, त्या मुलाचा व माझा नकळत परिचय झाला मी रस्त्यापलिकडच्या हॉस्पिटलच्या कोपऱ्यावर असलेल्या पत्रपेटीत, पत्र पोस्ट करून रस्ता ओलाडत असता, आईचा हात धरून

फिरायला निघालेला तो मला दिसला येथे ओळख नसतानाही कुणालाही 'हॅलो' म्हणायचा अनौपचारिक संकेत आज माझ्या मदतीला धावून आला मी तातडीने त्या बाईंना हॅलो म्हणाले व आमची ओळख झाली. आम्ही एकमेकांचे शेजारी आहोत हे समजल्यावर त्या बाईंनी स्वतःची माहिती सांगितली त्यांच्या हाताचे बोट घट्ट धरून कुतुहलाने रस्त्यावरची रहदारी पाहणाऱ्या तीन वर्षाच्या जिमला ११ वर्षांचा मोठा भाऊ होता व लवकरच जिमला भाऊ किंवा बहीण होणार होती जिमची आई बँकेत नोकरीला असून सध्या रजेवर होती व रोजचा व्यायाम म्हणून फिरायला बाहेर पडली होती या निमित्ताने तरी जिमला रोज खिडकीत बसून कंटाळवाणी सध्याकाळ न घालवता रोज फिरायला मिळेल या विचाराने मी आनंदी झाले अधून-मधून जिमच्या आईची व माझी भेट होत असे

काही महिने उलटले व पुन्हा जिम मला एकटाच त्या खिडकीत दिसू लागला, त्याचे नवे भावंड बहुधा आले असावे एके दिवशी धीर करून मी जिमच्या घराचे दार ठोठावले त्याच्या आईने दार उघडले व मला आत यायला सांगितले साधारण १०–१५ मिनिटे गप्पा मारून जिमच्या गोबऱ्या गालाचा पापा घेऊन मी परतले जिमला बहीण झाल्याने जिमची आई फार आनंदात होती अमेरिकन स्त्रिया कोणत्या मातीच्या बनल्या आहेत न कळे बेबीच्या जन्मानंतर तीन आठवडे संपण्यापूर्वीच ती पूर्ववत कामाला जाऊ लागली होती बेबीची देखभाल व थोडेफार घरकाम करायला तिने 'हाऊसकीपर' ठेवली होती व त्यामुळे हाऊसकीपरच्या पगारासाठी तिचे नोकरी करणे पूर्वीपेक्षा अधिक आवश्यक वाटू लागले होते सध्याकाळी घरी आल्यावर हाऊसकीपर निघून जाई साहजिकच बेबीच्या आगमनामुळे सध्याकाळच्या घरातल्या कामाचे वेळापत्रक बदलले सध्याकाळचे जेवण झाल्यावरचा ७ ते ८॥ हा वेळ बेबीसमवेत बेबीच्या खोलीत घालवायचा, असे ठरवावे लागले जिमचे वडील घरापासून ७० मैल दूर काम करीत असल्याने सध्याकाळच्या 'रश अवर' मध्ये ड्राइव्ह करून घरी पोचायला त्यांना नेहमीच उशीर होई

जिमचा ११ वर्षांचा भाऊ मित्रासमवेत खेळण्यात सध्याकाळ घालवतो, जिमची आई नव्या बेबीवर अन्याय होऊ नये म्हणून सध्याकाळ

तिच्या खोलीत घालवते. जिमी तीन, सव्वातीन वर्षांचा म्हणून बाहेर खेळायला जाऊ शकत नाही, आईच्या वेळापत्रकात बसत नाही म्हणून दिवसभर तिची वाट पाहूनही बेबीच्या खोलीत तिच्यावरोबर सध्याकाळ घालवू शकत नाही जिमीच्या वाट्याला आलेली असते ती खिडकी नि रोजची अबोल सध्याकाळ थंडी सुरु झाली नाही म्हणून खिडकीची लहानशी फट तरी उघडी असते त्या उघड्या फटीतून जिमीचे डोळे बाहेरच्या मुलांचे खेळ बघू शकतात काही दिवसातच थंडी पडू लागेल खिडकीची ती फटही बंद होईल हिवाळ्याचे स्वागत नि वर्फाचा मारा सहन करणारी ती 'स्टॉर्म विंडो' बनेल चिमुकल्या जिमीच्या इवल्या मनातील 'एकाकी-' पणाचे वादळ मात्र त्याच्या नकळत वाढत्या वयानुसार रौद्र स्वरूप धारण करेल दुर्लक्षिला गेलेला जिमी कदाचित मोठा होऊन चांगल्या मित्राच्या संगतीसोबतीने स्वतःचे आयुष्य समाधानाने घालविल किंवा वाईट संगतीने त्या वादळात भरकटला जाईल व एखाद्या बालगुन्हेगार-सुधार केन्द्रातील एकाकी खिडकीजवळ आपल्या उमलणाऱ्या आयुष्याच्या एकाकी सध्या व्यतीत करील

मला वाटतय जिमीच्या आईशी पुन्हा एकदा बोलून सांगाव, 'जिमीच्या आई, आहे ते वेळापत्रक बदला कोण जाणे, जिमीच्या आईला आवडेल का ? येथे कुणी कुणाच्या वैयक्तिक बाबींबद्दल मत व्यक्त करायची नाहीत, हाही एक अतिरेकी संकेत आहे

आजही जिमीच्या घराची ती खिडकी मला विचार करायला लावते वेळापत्रक न आखता आम्हा सहा भावडांचे जीवन आखीव-रेखीव बनविणारी, सतत अठरा वर्षे एका प्राथमिक शाळेची शिस्तप्रिय मुख्याध्यापिका म्हणून वावरलेली, हजारो मुलामुलींच्या आयुष्याला आकार देणारी माझ्यापासून हजारो मैल दूर, तरी मनाच्या अगदी जवळ असणारी माझी 'आई' आठवते नि मन म्हणते, 'जिमी तुझ्या आईचे वेळापत्रक तुझ्या जीवनाचे वेळापत्रक चुकविणार आहे रे . . !'

♣

१७

# पत्यांचा महाल

शनिवारची सकाळ उगवली. आज पूर्ण करावयाच्या गोष्टीच्या यादीकडे मी नजर टाकली पहिल्या क्रमाकावरची नोद होती, टर्म पेपरचा आराखडा तयार करणे टर्म पेपरसाठी मी विषय निवडला होता- इच्छा. दुपारपर्यंत इच्छा या विषयावर पेपर लिहिण्यासाठी आवश्यक त मुद्दे तयार करायचे होते मी लगेचच सामाजिक मानसशास्त्राचे पुस्तक उघडले. पुस्तकात डब्ल्यू आय थॉमस यानी इच्छाचे वर्गीकरणच केले होते माझा नोटस् काढण्याचा वेग नकळतच वाढला डब्ल्यू आय थॉमस यानी प्रातिनिधीक म्हणून पुढील चार इच्छा सागितल्या होत्या १) नवीन अनुभव घेण्याची इच्छा २) सुरक्षिततेची इच्छा ३) इच्छित सवादी प्रतिक्रियेची इच्छा (द डिझायर फॉर रिस्पॉन्स) (सबधिताकडून परस्पर सहानुभूतीची, समजून घेण्याच्या जाणीवेची अपेक्षा) ४) व्यक्तिचे विशेष गुण मान्य केले जावेत, पसत केले जावेत किवा ओळखले जावेत अशी इच्छा

एवढयात फोन वाजला आणि माझी तद्री भंग पावली काहीशा अनिच्छेनेच मी फोन उचलला

'हॅलो, कोण बोलतय ?'

'मी मिसेस गिब्सन बोलतेय, उषा, आज सध्याकाळपर्यंत 'हाऊस-सिटीग करशील का ?

'मोस्ट सर्टनली, अर्ध्या तासात पोहचते,' असे म्हणून मी फोन खाली ठेवला मनात म्हटले आता तेथे जाऊनच नोट्स काढू, कारण त्याच्या घरातील, घराच्या परिसरातील एकाताचा मला नेहमीच मोह पडत असे. मी पुस्तके, वह्या आवरून जाण्याची तयारी करू लागले

मिसेस गिब्सनच्या घराच्या दिशेने चालताना मन नकळत त्याच्या-बद्दल विचार करू लागले मिसेस गिब्सन माझ्या सराच्या मित्राची विधवा पत्नी सराच्या ह्या मित्राचे वीस वर्षापूर्वी मोटार अपघातात निधन झाले, तेव्हा मिसेस गिब्सन बेचाळीस वर्षांच्या होत्या घरची परिस्थिती अत्यत सुखवस्तु दोन मुले व एक मुलगी याना त्यानी जिद्दीने आणि धैर्याने वाढविले त्याचे ससार थाटून दिले अमेरिकन 'अपार्टमेंट' प्रथेप्रमाणे, स्वत चे व्यक्तित्व जपण्यासाठी ती त्याच्यापासून अपार्ट झाली,आणि मिसेस गिब्सन एकाकी झाल्या पोरे निघून गेल्यामुळे अक्षरश पोरक्या झाल्या असे म्हटले तरी चालेल आता त्याच्या सोबतीला उरले होते त्याचे प्रचड मोठे घरकुल

सुरवातीपासून त्याना घर सजविण्याची आवड होतीच आता तर त्याना आपल्या प्रेमाचा वर्षाव करायला घरच तेवढे उरले होते फॉर्मल व इनफॉर्मल लिव्हिंग रुम, फॅमिली रुम, डायनिंग रुम, चार बेडरुम्स व तितकीच बाथरुम, कीचन, घरापुढे बगीचा, घरामागे कार ठेवण्यासाठी गराज असा घराचा ले -आऊट होता घरही त्यानी छान सजवून ठेवले होते उची फर्निचर, निवडक पण महाग पेंटिंग्ज, गालीचे, डेकोरेशन, अत्याधुनिक सोयींनी, साधनानी परिपूर्ण स्वयपाकघर वास्तविक पाहता इनस्टट फूड खाणाऱ्या एका माणसासाठी एवढे मोठे व सुसज्ज स्वयपाक-घर काय करायचे पण अमेरिकन स्त्रियाना, रोज स्वयपाक केला नाही तरी स्वयपाक घरात सर्व अत्याधुनिक उपकरणे असावीत याची हौस मोठी मिसेस गिब्सनही त्याच्या स्वयपाकघरात वर्षातून तीनदा मोठ्ठा स्वयपाक करीत, थँक्स-गिव्हिंग, ख्रिसमस व मुले भेटायला येत तेव्हा जी गोष्ट घराची, तीच घरासमोरच्या बागेची बागसुद्धा नीटस, रेखीव व स्वच्छ गेली २० वर्षे, घराला चौथे मूल मानूनच त्यानी घराची व बागेची काळजी घेतली होती थोडक्यात मिसेस गिब्सनचा जीव घरामध्ये पूर्णपणे गुतला होता, तिन्ही मुलाच्या प्रेमाचा वर्षाव, त्याच्या अनुपस्थितीत त्यानी घरावर केला होता पुष्कळदा हसत, हसत गमतीने त्या म्हणत, 'उषा, घर रागावले तर अमेरिकन पद्धतीने फोन करून मला विचारेल, तुझ्याकडे माझ्यासाठी वेळ आहे का ?' भारतीय भाषेत सागायचे झाले तर मिसेस

गिब्सन एक संसारदक्ष स्त्री होती वयाच्या साठाव्या वर्षापर्यंत नोकरी सांभाळून देखील या एकाकी विधवा स्त्रीने स्वतःचा संसार असा दृष्ट लागण्यासारखा नीटनेटका ठेवला होता, आणि म्हणूनच की, काय कुणाची दृष्ट लागू नये म्हणून त्या घराला जपत असत घर सोडून त्यांना कुठेही बाहेर जायचे तर तेवढ्या वेळासाठी त्या मला घर सांभाळायला बोलावीत व एका तासाचे पाच डॉलर्स या हिशोबाने मोठ्या आनंदाने हाऊस-सिटींगचे पैसे देत असत त्यांना उगाचच वाटे आपल्या अनुपस्थितीत घराची घडी विस्कटली तर ? मुले जरी आईच्या घरी राहात नव्हती तरी आईचे गृहप्रेम त्यांच्या परिचयाचे होते म्हणून त्यांच्या थोरल्या, कम्प्युटर सायन्सची पदवी असलेल्या मुलाने घरात अनेक गमती-जमती करून ठेवल्या होत्या त्याने घड्याळ, टी व्ही रेकॉर्डप्लेअर, प्रत्येक खोलीतील दिवे यांची कनेक्शन्स अशी जोडली होती की, दिवसा व रात्री वेगवेगळ्या वेळात प्रत्येक खोलीतील दिवे आपोआप लागत व बंद होत अशाच पद्धतीने म्युझिक सुरु होई टी व्ही बोलू लागे किंवा पहाटे घड्याळाचा गजर सुरु होई व बंद होई घरात अशी भुलभुलय्या केल्यामुळे, घरात सतत कुणीतरी आहे असा आभास निर्माण करणारे आवाज चोरांची नक्की दिशाभूल करतील असे निश्चितपणे मिसेस गिब्सनना वाटत असावे या जादूच्या महाल वाटणाऱ्या घराचे मीही मोठ्या हौसेने 'हाऊस-सिटींग' करीत असे.

महिन्यातून एकदा, बहुधा चौथ्या शनिवारी मिसेस गिब्सन आमच्या युनिव्हर्सिटी टाऊनपासून साठ मैल दूर असलेल्या कसीनोत जुगार खेळायला जात आता एका वृद्ध विधवेने गंमत म्हणून का होईना जुगार खेळायला जावे हे योग्य आहे का ? असा प्रश्न या समाजात उद्भवूच शकत नाही असल्या बाबतीतले ह्या लोकांचे नीतीमत्तेचे निकष अगदी वेगळे आहेत चौकड्याचे लुगडे नेसून, नेमाने देवळात जाऊन फुलवाती वळीत बसणारी व सर्वच बाबतीत निरीच्छ झालेली आपल्याकडची आजी फार वेगळी वाटते दर आठवडी पंचाहत्तर डॉलर्स देऊन, ब्यूटी सलूनमधून हेअर-स्टाईल करून घेणारी, स्वतःच्या पोशाखाबद्दल, मेकअपबद्दल अत्यंत सजग असणारी, तरूण दिसण्याचे सर्व प्रयत्न करणारी आजी येथील समाजाला सुसह्य वाटते व्यायामामुळे व जगण्याच्या अपार उत्साहामुळे इथली

माणसे अगदी नव्वदाव्या वर्षीसुद्धा दृष्टी शाबूत ठेवून ड्रायव्हिंग लायन्सस रिन्यू करायला जाताना दिसतात पाठीचा कणा ताठ ठेवून आधाराशिवाय चालू शकतात. हे पाहिले की, फार बरे वाटते त्यामुळे मिसेस गिब्सनने या वयात जुगार खेळणे ही एक मामूली बाब ठरते मिसेस गिब्सनचा ह्या-बाबतचा दृष्टिकोण अगदीच वेगळा आहे त्याच्या दृष्टीने कसिनोमध्ये जाणे म्हणजे निव्वळ करमणूक, मनोरजन, एक आनददायक चैन ह्यापेक्षा अधिक काही नाही अमेरिकन जीवनामध्ये ठरीव साच्याच्या दिनक्रमाचा लोकाना तसा कटाळाच फार प्रत्येक क्षणी आयुष्यामध्ये काहीतरी वेगळे घडावे असे त्याना वाटते ॲबनॉर्मलिटी हीच जीवनाची नॉर्मलिटी असावी असे काहीतरी फॅन्टॅस्टिक तत्वज्ञान घेऊन येथील माणूस जगू इच्छितो जे हाताशी आहे त्यापेक्षा जे हातात नाही त्याच्यामागे धावणे अमेरिकनाना फार आवडते रोजचे सरळसोट जीवन त्याना ॲबनॉर्मल वाटू लागते ठीक चालले म्हणजे जीवनात घोटाळा झालाय असे त्याना उगाचच वाट लागते. मग त्याना फ्रस्ट्रेशन येते एकाकीपण, निराशा, उदासीनता, निष्फळतेची भावना व्यक्तित्वाला ग्रासू लागते फ्रस्ट्रेशन यायलाही वेळ लागत नाही व जायलाही वेळ लागत नाही सामान्य जीवनात फ्रस्ट्रेशन आले की, मग काहीतरी असामान्य करायचे म्हणून लोक वाटेल ते करतात, सामान्य जीवनापासून दूर जाण्यासाठी पळवाट म्हणून पत्त्याचा जुगार घोड्याची रेस, पीन बॉल मशिन्स, स्लॉट मशिन्स, Roulette Wheels या नि अशा अनेक जुगाराच्या प्रकाराकडे वळलेले असख्य लोक तेथे दिस-तात जुगाराच्या सस्था इतक्या नियमित स्वरूपात दिसतात की, असे वाटते हे अमेरिकन जीवनाचे अविभाज्य अगच आहे की काय?, अमेरिकन जीवनातील मूलभूत सस्था असण्याइतपत जुगाराचे वर्चस्व जाणवते योगायोगाने करोडो डॉलर्स मिळावेत, दैवयोगाने लक्षाधीश व्हावे या गोष्टीचा मोह इतका परमावधीचा होतो की, नशीबाची परीक्षा पाह-ण्याच्या अनिवार इच्छेने बुद्धीवादी अमेरिकन कधी कधी निर्बुद्धासारखा वागू लागतो या सर्व गोष्टींची झिंग अमेरिकन माणसाला अशी चढते की, तो पत्त्याचे महाल रचू लागतो, या महालाचे पत्ते त्याला सोन्याचे वाटू लागतात ही मानसिक नशा इथपर्यंत चढते की, अशा अवस्थेला पोहोचलेल्या व्यक्तिची Identity 'कम्पलसिव्ह गॅम्बलर' अशा फॅन्सी

शद्बप्रयोगाने व्यक्त होते व 'कम्पलसिव्ह गॅम्बलर' अशा फॅन्सी शद्बप्रयोगाचा रकाना त्याच्या सख्येने रूदावू लागतो

जुगाराच्या वेडाचे विश्लेषण करण्यासाठी समाजशास्त्राचे रिसर्च-स्टुडन्टस गर्क हातात प्रश्नावली घेऊन, लोक जुगार का खेळतात ? या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी कसीनो किंवा रेस कोर्सच्या फेऱ्या मारू लागतात एखादा सुशिक्षित जुगारी तत्त्वज्ञानाचा मुलामा देऊन बोल लागतो

खर पाहता लाक जुगार का खेळतात ? या प्रश्नाचे निश्चित उत्तर मी देऊ शकणार नाही, पण मला वाटते काही व्यक्तींसाठी जुगार खेळणे ही शारिरीक आवश्यकता असावी दिवास्वप्नाना स्वत्व किंवा तत्त्व देणारा काही तरी विशिष्ट गुण जगार या प्रक्रियेत असावा हे उत्तर ऐकून समाजशास्त्रात दोन पीएच् डी. केलेल्या मलासुद्धा जुगार खेळून पहावेसे वाटू लागते मनोरूग्णतज्ञ सुद्धा या विश्लेषणात मागे राहत नाही एका मनोरुग्णतज्ञाचे विश्लेषण वाचून मला तर वाटू लागले होते की, त्याच्याच मेंदूचे विश्लेषण करून पहावे, त्या तज्ञाने लिहीले होते– 'कम्पलसिव्ह गॅम्बलर' बहुधा मज्जातंतूचा विकार झालेली चिडखोर व्यक्ति असते मानसशास्त्रज्ञाच्या मते या व्यक्तिला हरण्याची अज्ञात किंवा अजाण गरज असते व ही हरण्याची गरज आईवडिलांविरूद्ध वाटणारा क्षोभ, उद्वेग व्यक्त करण्याच्या इच्छेतून जन्माला येते' एवढे दीर्घ विश्लेषण वाचून माझ्या मेंदूचे अक्षरश तुकडे पडलेत की, काय असे वाटू लागले दुर्दैवाने अशा उपपत्ती टेस्ट करता येत नाहीत एकच म्हणता येते की, असुरक्षित, अस्वस्थ, चिंतातुर आणि कमालीच्या निराश झालेल्या व्यक्ति वास्तवापासून दूर जाण्यासाठी जुगार हा पलायनवादाचा मार्ग स्वीकारतात या छदापायी कित्येक व्यक्ति आपले घरदार, मानमर्यादा, व्यवसाय, नोकरी व पत्नीमुलानाही हरवून बसतात स्वत च्या प्रगतीसाठी धाडस करणे, जोखीम घेणे हा मानवी स्वभाव आहे परंतु गुंतविलेल्या पैशातून आपल्याला अवास्तव वाटण्याइतपत कमाई होईल, एका रात्रीत आपण लक्षाधीश होऊ किंवा आपल्या सामान्य जीवनाचा चेहरामोहरा पार बदलून जाईल अशी अपेक्षा बाळगणारेही असतात, व जुगार सपे-

पर्यंत त्या स्वप्नाचे तुकडे, तुकडेही होतात अर्थात यामध्ये मिसेस गिब्सन सारखे काही अपवादढेखील असतात आपले मन सतुलीत ठेवून, उपलब्ध मनोरजनाच्या साधनाचा उपयोग करून थोडावेळ मजेत व्यतीत करतात, त्या साधनाच्या गुलाम बनत नाहीत

मिसेस गिब्सनच्या अनुषगाने अमेरिकन जीवनातील या प्रवृत्तीचे विश्लेषण करीत, हाऊससिटीग नावाची मजा करीत मी टर्म पेपरचा आराखडा पूर्ण केला कटाळल्यासारखे वाटले शतपावली करावी या विचाराने खिडकीतून डोकावले सध्याकाळची स्निग्धता, बागेतील पानाफुलावर विखुरली होती आणि ती स्निग्धता डोळ्यानी झेलीत अधीऱ्या चालीने मिसेस गिब्सन घराकडे परतत होत्या खळखळणाऱ्या झऱ्याकाठी, प्रियकराला भेटून येणाऱ्या प्रेयसीसारखा त्याचा उत्साह तरूण जाणवत होता त्याना पाहून पटकन, त्याच्या सुसज्ज कीचनमध्ये जाऊन चहासाटी पाणी टेवले तातडीने डोअरबेल वाजण्यापूर्वी दार उघडून मी त्याचे स्वागत केले मला कुशीत घेत त्या म्हणाल्या, 'यू, नो स्कॉलर, आज मला माझ्या सर्व प्रार्थनाचे उत्तर मिळाले' आज बाईनी भरपूर पैसे जिकले असावेत असा विचार करीत मी चहाचा कप त्याच्या पुढे ठेवला, पण माझा अदाज साफ चुकला त्यानी उत्साहाने मला जे काही सागितले, त्याचा साराश म्हणजे मी नोटम् काढलेल्या, मानवाच्या मूलभूत चारही इच्छा पूर्ण करू शकेल असा तरूण मानव त्याना भेटला होता पुढच्या शनिवारी त्या त्याच्याबरोबर डेटवर जाणार होत्या डिनर घेणार होत्या अचानक भेटलेल्या अनोळखी व्यक्तिच्या हातात मिसेस गिब्सनने मैत्रीचा हात द्यावा, हे माझ्या मनाला पटेना, पण अमेरिकन प्रथेनुसार हा त्याचा खाजगी प्रश्न होता तेव्हा त्याचे स्वत चे जीवन, स्वत च्या पद्धतीने जगण्याचा त्याना अधिकार आहे अस स्वत ला बजावून व पुढच्या शनिवारी हाऊससिटींगसाटी येण्याचे कबूल करून मी होस्टेलवर परतण्यासाटी निघाले होस्टेलच्या दिशेने चालताना मला मिसेस गिब्सनच्या टी व्हीवर पाहिलेला शो आठवत होता ज्याचे नाव होते, 'व्हॉट अ कन्ट्री' त्या शोच्या नावातच जणू माझी प्रतिक्रिया व्यक्त होतेय अस मला वाटल.

तीन महिने झालेत प्रत्येक शनिवारी मिसेस गिब्सनचे 'हाऊस-

सिटीग' करणे हा माझा क्रमच झालाथ तेथील शांत वातावरणात अभ्यासच्चा अभ्यास होतो, वर पैसेट्टी मिळतात यापलिकडे त्या घराशी माझे काही नाते जुळले असे मला त्यावेळी तरी वाटले नाही, पण नकळत ते घर माझ्या विचारामध्ये घर करून राहिले आहे, हे मला त्यादिवशी जाणवले अशाच एका शनिवारी मी नेहमीप्रमाणे 'हाऊससिटींग' साठी गेले होते घरात पाऊल टाकताच मिसेस गिब्सन म्हणाल्या, 'विल यू प्लीज ड् अ फेवर फॉर मी उषा ?'

'माय प्लेझर' मी उत्तर दिले

'हे बघ तुला तसदी देते आहे म्हणून क्षमा कर, ग्रोसरी-बॉय साडे बारा वाजता येईल, तेव्हा दार उघडून ग्रोसरी घे व जागच्या जागी ठेवून दे, देशील ना ? थँक्यू, यु आर ए लाईफसेव्हर' या असल्या अमेरिकन एक्सप्रेशन्सची मला नेहमीच गमत वाटते स्वत च्या अनुपस्थितीत ग्रोसरीबॉयने येणे ही देखील त्याच्यासाठी जीवघेणी समस्या असू शकत मग डोक्यावरचा घोडा उतरावा अशा सुरात ते जेव्हा म्हणतात, 'यू आर ए लाईफ सेव्हर,' तेव्हा वाटू लागते, लाईफ किती स्वस्त आहे मला 'लाईफसेव्हर' हा किताब देऊन त्या कारमध्ये बसल्या थोड्याच वेळात, त्या त्याच्या प्रार्थनाच्या उत्तराला 'पिकअप' करणार होत्या कसीनोत जाणार होत्या थोडक्यात त्याच्या प्रार्थनाच्या उत्तराला भरघोस पीक येणार होते मी स्वत शीच हसले त्याना कसीनोमार्गस्थ केले शुभास्ते सन्तु पथान असे म्हटले कारण जुगाराच्या मार्गावर अशाच शुभेच्छाची अधिक गरज असावी दार बद करून घरात परतले, आरशासमोर थबकले मेकअपच्या सामानात भर पडली होती मिसेस गिब्सनच्या ओठाच्या रगात भडकपणा कसा आला हे नवीन लीप कलरच्या शेडकडे पाहून लक्षात आले अभ्यासाची आठवण येताच घाईने वळले, तो टेबलावरचा एक बॉक्स धक्का लागून खाली पडला कलपाच्या बारा बाटल्याच्या त्या बॉक्सवर लिहीले होते 'ब्यूटीफूल ब्राऊन, नॉनपेरॉक्साइड नॅचरल कलर' एकदरीत मिसेस गिब्सनचा रग बदलला होता

अमेरिकेतील सामाजिक समस्यावरचे पुस्तक उघडले सराईत नजर शब्दावर फिरू लागली साडेबारा कधी वाजले ते समजले नाही आणि

डोअर बेलचा आवाज आला ग्रोसरी घऊन येणारा मुलगाही इतका वक्त-शीर असावा याचे कौतुक वाटले दरवाजा उघडताच ग्रोसरी-बॉय म्हणाला, 'हाय डार्लिंग' माझ्या अमेरिकेतील वास्तव्याच्या सुरुवातीच्या काळात आमच्या होस्टेलमध्ये येणारा पोस्टमन मला पहिल्यादाच 'हॅलो स्वीटहार्ट' म्हणाला तेव्हा मी किती दचकले होते याची आठवण आली पण येथे स्वीटहार्ट, हनी, डार्लिंग ही सबोधने सर्रास वापरली जातात हे माहिती झाल्यामुळे 'हॅलो गुडलुकिंग' म्हणत मीही त्याला हरभऱ्याच्या झाडावर चढविले ग्रोसरीचे ओझे ठेवायला तो किचनमध्ये आला व एखाद्या ग्रोसरी ॲटमबद्दल माहिती सागावी तितक्या शुष्कपणे त्याने मला माहिती पुर-विली की, मिसेस गिब्सनचा मित्र, कोपऱ्यावरील पेट्रोलपपावर मोटारी धुण्याचे काम करतो, तो खुप देखणा आहे व मिसेस गिब्सनपेक्षा २०–२५ वर्षांनी लहान आहे अशा घटना येथे नेहमी घडत असल्याने, ग्रोसरी-बॉय-साठी त्यात नाविन्य असे काही नव्हते, मला मात्र धक्का बसला हल्ली वृद्ध स्त्रियाचा तरूण मुलाशी मैत्री करण्याकडे कल आहे अशी माहिती वाचली होती पण मिसेस गिब्सन त्या लाटेत सापडतील असे वाटले नव्हते.

सध्याकाळी मिसेस गिब्सन परतल्या, त्या त्याच्या तरुण मित्रासह मित्राला दिवाणखान्यात बसविले, मला चहा करण्याची विनती केली आणि अक्षरश गुणगुणत त्या मेकअप टीक करायला किंवा येथील भाषेत 'नोज पावडर' करायला गेल्या मी चहा करून आणला, आपल्याबरोबर मलाही चहा घ्यायचा त्यानी आग्रह केला, व चहा घेता घेताच, त्या दोघानी विवाहबद्ध व्हायच ठरविलय हे मला सागितले रात्रीच मुलामुलीला फोन करून ही हॅपी न्यूज त्या सागणार होत्या

मिसेस गिब्सनच्या लग्नाला मला जावेच लागले त्यानी त्याच्या लग्नासाठी मलाही एक सुदर ड्रेस शिवून घेतला आईच्या आनदात विर-जण घालण्याचे धाडस त्याच्या मुलानाही झाले नाही पश्चिमी रीती-रिवाजानी, आचार विचारानी माझ्या बाळबोध मनाला कितीतरी वेळा धक्के दिलेत एकदा अमेरिकन मैत्रीणीबरोबर लग्नात देण्यासाठी भेटवस्तु घ्यायला गेले या मैत्रीणीच्या वडिलाचा दुसरा विवाह तिच्याच नवऱ्याच्या विधवा आईशी होणार होता म्हणजे व्याही व विहीण अधिक जवळ

येणार होते वधुवरामधल हे नात समजल्यावर भेटवस्तुची खरेदी करताना मला उगाचच अपराधी वाटले होते मिसेस गिब्सनसाठीही भेटवस्तु निवडताना, का कोण जाणे मन पूर्वक आनद वाटला नव्हता

मिसेस गिब्सनचे लग्न होऊन सहा महिने झालेत मी अजूनही अधून-मधून जाऊन त्याच्या अनुपस्थितीत त्याचे घर साभाळते आज बुधवारी ध्यानीमनी नसताना त्याचा फोन आला त्याना बरे नव्हते, त्या डॉक्टरकडे जाऊन आल्या होत्या व डॉक्टरानी लिहून दिलेली औषधे आणून देण्याची विनती त्यानी मला केली त्याना हवी असलेली औषधे फळे, खाण्यापिण्याचे सामान घेऊन मी त्याना भेटायला गेले त्याच्याजवळ बसून, त्याच्या तापलेल्या कपाळावर हात फिरवू लागले आणि माझ्या स्पर्शाने त्याचे निळे नेत्र पाझरू लागले त्याच्या त्या शब्दामधून, जणू इथल्या वृद्धत्वाची समस्याच बोलते आहे, असे मला वाटू लागले. त्यांच्या तरूण नवऱ्याने—स्टीव्हने लग्न होताच कार वॉश करण्याचा जॉब मिसेस गिब्सनच्या स्टेटसला शोभत नाही असे सागून सोडून दिला गोड बोलून सगळे पैशाचे व्यवहार स्वत च्या ताब्यात घेतले बँकेतील खाते दोघाच्या नावावर केले, सध्याचे घर गहाण ठेवून फ्लॉरिडामध्ये सुट्टीला जाण्यासाठी 'मोबल होम' विकत घेतले नोकरीसाठी मुलाखतीला बाहेरगावी जातो असे सागून गेल्या तीन महिन्यात अधून-मधून तो सारखाच परगावी जात होता मिसेस गिब्सनच्या खात्यातील रक्कम बरीच कमी झाल्याचे त्याच्या लक्षात आले होते चार दिवसापूर्वी मुलाखतीसाठी जातो म्हणून परगावी गेलेला तो अजून परतला नव्हता, त्याने फोनही केला नव्हता ज्या ऑफिसचा पत्ता त्याने दिला तेथे मिसेस गिब्सनने फोन केला तर स्टीव्ह नावाची कोणीही व्यक्ती मुलाखतीसाठी बोलावली गेली नाही असे उत्तर मिळाले होते साशक झाल्यामुळे, अधिक विचारानी त्याना ताप आला प्रत्येक मानवी सबधाचा आधार जो विश्वास, तोच हरवला तर जीवन स्वाभाविक गतीने कसे चालणार ?

एवढ्यात डोअर-बेल वाजली मी खिडकीतून बाहेर पाहिले. ग्रोसरी-बॉयचा चेहरा दिसताच नि शक होऊन दार उघडले ग्रोसरी-बॉयबरोबर एक अपरिचीत व्यक्ती हातात सूटकेस घेऊन उभी होती.

ग्रोसरी-बॉयने परिचय करून दिला तो पट्रोलपपावर स्टीव्हबरोबर काम करणारा स्टीव्हचा मित्र होता स्टीव्ह व तो एकत्र राहात असत तो नोकरी सोडून दुसऱ्या गावी निघाला होता म्हणून त्याच्या खोलीत राहिलेले स्टीव्हचे सामान घ्यायला आला होता मी सूटकेस घेऊन आत ठेवली, त्याचे आभार मानले व त्याना निरोप द्यायला बागेपर्यंत गेले स्टीव्हबद्दल अधिक माहिती मिळवावी व मिसेस गिब्सनने ती ऐकू नये असा दुहेरी हेतु मनात होता स्टीव्हच्या मित्राने सांगितलेल्या माहितीने मी थक्कच झाले स्टीव्ह 'कम्पलसिव्ह गॅम्बलर' होता आपला शौक पुरविण्यासाठी त्याने दोन श्रीमत स्त्रियाशी विवाह केले व त्याच्या सपत्तीचे अपहरण करून घटस्फोट घेतले आतादेखील फक्त पैशासाठी त्याने मिसेस गिब्सनना आपल्या जाळ्यात ओढले होते 'त्याना सावध करा' असे सागून तसेच 'परमेश्वर,या वृद्ध स्त्रीला मदत करो' अशी शुभेच्छा व्यक्त करून ते दोघे निघून गेले

जड पावलानी मी घरात आले मिसेस गिब्सनना झोप लागली होती हलक्या पावलानी तळघरात सूटकेस घेऊन गेले हिम्मत करून ती सूटकेस उघडली त्यात होते स्टीव्हच्या पूर्वायुष्याचे पुरावे त्याच्या पूर्वपत्नीचे फोटो, पत्रे, आणखी बरेच काही कुणाच्या सहजासहजी लक्षात येणार नाही अशारीतीने मी ती सूटकेस लपवून ठेवली, तळघरातून वर आले हॉस्टेलच्या सचालकाना मी आजची रात्र मिसेस गिब्सनच्या घरी राहणार आहे असा फोन केला दुसरा फोन मिसेस गिब्सनच्या मुलीला केला आई आजारी आहे, तिने शक्यतो लवकर यावे, मला तिला खूप महत्त्वाचे काही सागायचे आहे आणि ते फोनवर सागणे शक्य नाही असे बोलून फोन ठेवला

स्टीव्हचा पूर्व इतिहास समजल्यावर माझी खात्री होऊ लागली आहे की, तो कधी न परतण्यासाठीच गेलाय हे कठोर असत्य समजल्यावर, अपार कष्टातून साकारलेले मिसेस गिब्सनचे आयुष्य, पुन्हा सावरू शकेल का ? स्वतःबरोबर, परिस्थितीबरोबर, समाजाबरोबर युद्ध करायला, सघर्ष करायला ताकद लागते ती ताकद ही वृद्धा कोठून आणील ? घरा-लाही एकटेपण जाणवू नये म्हणून मला घराची सोबत करायला बोलाव-णारी ही सवेदनाक्षम स्त्री स्टीव्हशी सबध जोडून, जीवनातील कोणते

समाधान शोधीत होती ? मिसेस गिब्सन याच्या संदर्भात माझ्यापुढे उभे राहणारे सर्वच प्रश्न अनुत्तरित राहणार असे मला वाटत होते, त्याना काय कल्पना की, स्टीव्हच्या पत्त्याच्या महालासाठी त्यानी ते आपले आखीव रेखीव घर, त्या घरातले साठलेले समाधान इतकेच नव्हे तर आपल्या सर्वस्वाची बाजी लावली होती सर्वस्वाचा जुगार खेळायला त्या तयार झाल्या होत्या

मी विचार करीतच होते उगाचच न पाहिलेला कसीनो माझ्या डोळ्यासमोर तरळत होता त्या कसीनोत स्टीव्ह आणि मिसेस गिब्सन एक पत्त्याचा बगला उभारीत आहेत असं दिसत होत बगला पूर्ण व्हायच्या क्षणालाच स्टीव्हने एक फुकर मारून तो उध्वस्त करून टाकला आणि तो निघून गेला मी जागपणीच एकदम दचकले डोअर बेल वाजली बहुतेक मिसेस गिब्सनची मुलगी आली असावी असे मला वाटले पण तो फोन होता मिसेस गिब्सनची मुलगी बोलत होती, ' हॅलो, उषा, मला यायला आवडले असते पण माझा कुत्रा एकाएकी आजारी पडला म्हणून मी येऊ शकत नाही से सॉरी टू मॉम ' मी काहीच न बोलता फोन ठेवून दिला

♣

१८

# शेजारधर्म

---

न्यूयार्कचा उन्हाळा हा तितकासा सुसह्य ऋतु नाही, हवामान अगदी मुंबईसारखे असते पण सतत घामाघूम करणारा हा उन्हाळा परवडला परंतु घराला लागून असलेल्या कॉमन-ड्राइव्ह वे मध्ये दिवसभर धुडगूस घालीत खेळणाऱ्या, शेजारपाजारच्या लहान मुलांचा आरडाओरडा नको, असे उन्हाळा संपेपर्यंत सतत वाटत असे या मुलांना उन्हाळ्याची पूर्ण तीन महिन्यांची सुट्टी अजिबात नसावी असा दुष्ट विचारही मनात डोकावे ड्राइव्ह-वे मध्ये खेळू नका असे या मुलामुलींना सारखे सांगावे लागे कारण ड्राइव्ह-वे आमच्या घराच्या हद्दीत येत असे येणाऱ्या जाणाऱ्या एखाद्या कारमुळे कुणाला दुखापत झाली तर त्या मुलाचे आई-वडील आम्हाला कोर्टात खेचणार, ह्या दडपणामुळे विजय कामावरून परतेपर्यंत माझा वेळ या मुलांकडे लक्ष ठेवण्यातच जाई

आज तर कहर झाला जिमने जोरात फेकलेला चेंडू माझ्या अभ्यासिकेच्या खिडकीची काच फोडून सरळ आत आला सगळी मुले धावत आपापल्या घरी गेली शेजारच्या स्टीव्हने येऊन सांगितले की, जिमने काच फोडली व माझ्याकडून 'किसेस' चॉकलेट वसूल केले किसेस (kisses) नावाचे चॉकलेट काढणाऱ्या हर्षी कंपनीचे, अशा चिडलेल्या स्थितीतही मला कौतुकच वाटले आता कामावरून आल्यावर विजय जिमच्या वडिलांकडे जाणार, त्यांची वादावादी होणार, मग तडफडत दुकानात जाऊन काच आणावी लागणार व अंधार पडायच्या आत ती खिडकीला बसवावी लागणार कारण न्यूयॉर्क मध्ये सुरक्षितता हा वादाचा प्रश्न शेजाऱ्यांबद्दल, त्यांच्या वस्तूबद्दल वा वास्तुबद्दल आदर बाळगावा

असे या लहान मुलामुलीना का शिकवीत नाहीत ? या प्रश्नावर मन विचार करू लागले

विजय घरी आल्यावर, आम्ही दोघे शेजारच्या पधरा मजली अपार्टमेंट बिल्डिंग पर्यंत गेलो विजय जिमचे अपार्टमेंट शोधायला आत गेला मी बिल्डिंगच्या मुख्य दारापुढच्या छोटयाशा चौकात खुर्च्या टाकून गप्पा मारीत बसलेल्या पाच, सहा वृद्ध स्त्री-पुरुषाकडे पाहत उभी राहिले त्यातील एका आजोबाना तर मी रोजच पाहात असे अगात असलेली, उरली-सुरली शक्ती गोळा करून, अत्यत हळूहळू पावले टाकीत, आजोबाना पोस्टाच्या पेटीपर्यंत वा ग्रोसरी स्टोअरपर्यंत जाताना, मी अनेकवेळा पाहिले होते एकदा ग्रोसरी स्टोअरमध्ये मी सामान घेतले व पैसे देण्यासाठी कॅश-काऊंटरजवळ आले माझ्यासमोर आजोबा होते त्यानी घेतलेल्या सामानाकडे नजर गेली व गलबलून आले दोन तीन बटाटे, दोन टमाटे, सेलवर असलेल्या सूप कॅन्सपैकी एक लहानसा सूपचा डबा व लहान आकाराची ब्रेड ९७ सेंटसचे बिल त्यानी व्यवस्थित मोजून दिले व हळूहळू पावले टाकीत ते त्या अपार्टमेंट बिल्डिंगच्या दिशेने चालू लागले सरकारकडून मिळणाऱ्या सोशल सिक्युरिटीच्या अल्प पैशात, या एकाकी वृद्धाना स्वत चे भागवावे लागते त्याची स्वत ची मुले, मुली त्याना जवळ ठेवून घ्यायला राजी नसतात जीवन उताराला लागलेले असताना ही भयानक वास्तवता स्वीकारीत, अनेक थकलेली पावले न्यूयॉर्क सारख्या सपन्न शहराच्या साईडवॉकवरून चालताना दिसतात एकदा, रस्त्याच्या कोपऱ्यावर ठेवलेल्या कचऱ्याच्या डब्यात टाकून दिलेले कोकाकोलाचे रिकामे कॅन्स शोधून त्यातील उरलेले घोट पिणारे वृद्ध गृहस्थ मी पाहिले होते व विजयला विचारले होते की, या देशाला Land of plenty का म्हणायचे? या विचारात असतानाच 'विजय परतला जिमचे वडील कामावरून परतले नव्हते विजय म्हणत होता, 'जाऊ देत, भेटले असते तर जिमला रागावले असते व जिमने चिडून उरलेल्या खिडक्याच्या काचाची वाट लावली असती ' घरी आलो तरी त्या दिवशी आजोबानी घेतलेले ९७ सेंटसचे सामान डोळयापुढून हलत नव्हते. घरी आल्यावर जेव्हा विजय म्हणाला, 'हे बघ,चारच्या चहाबरोबर साबुदाण्याची खिचडी-

कर, मग टी व्ही बघताना खायला शेंगा भाजून दे व रात्री जेवण झाल्या वर कलिंगड खाऊ,' तेव्हा उगाचच स्वत:चे जेवण रांधण्याची आजोबांची केविलवाणी धडपड नजरेसमोर येऊ लागली

ड्राइव्ह-वे मध्ये खेळणाऱ्या या मुलांमध्ये 'ढालगज भवान्या' हे शब्द सार्थ करणाऱ्या नऊ-दहा वर्षांच्या दोन मुलीही होत्या या मिशाल नि जेन आल्या की, हमखास सर्व मुलांची भांडणे व्हायची, रडारडी व्हायची, बोबड्या हॅंगीच्या बाळसेदार शरीराची चेष्टा व्हायची व शेवटी कुणाचे तरी आई-वडील यायचे नि पोरांचा हा लवाजमा पांगायचा चालायचेच, मुलांनी मस्ती व भांडणे नाही करायची तर मग कुणी ? अशी स्वत:च्या मनाची समजूत घालीत मीही माझ्या कामाकडे वळत असे

आज मात्र जेव्हा सायरनचा आवाज एकला तेव्हा मला भयंकर चीड आली येथील लहान मुलेमुली व त्यांना वळण न लावणाऱ्या आई-बापांचा सात्त्विक संताप आला अंगावर भीतीची शिरशिरी पसरविणारा सायरन वाजवीत, एक ॲम्ब्युलन्स ड्राइव्ह-वे मध्ये येऊन उभी राहिली मी धावतच दरवाजा उघडून बाहेर गेले, तो त्या दिवशी शेजारच्या बिल्डिंगसमोर खुर्च्या टाकून बसलेल्या वृद्ध व्यक्तींपैकी एका आजींना जखमी स्थितीत व्हील चेअरवर बसवून ॲम्ब्युलन्सकडे आणले जात होते मी जवळ जाऊन आजींचा हात, प्रेमभराने हातात घेऊन म्हणाले, 'काळजी करू नका,! लवकरच तुम्ही बऱ्या व्हाल, परमेश्वरावर विश्वास ठेवा' आजींच्या व्यथित डोळ्यात अश्रू दाटून आले व त्यांचे मनापासूनचे थॅंक्यू, ॲम्ब्युलन्सच्या आवाजात हरवून गेले आजींना घेऊन ॲम्ब्युलन्स हॉस्पिटलमध्ये गेली. चौकशी करता समजले की, आजी खुर्ची टाकून ऊन खात बसल्या होत्या जेन व मिशालने खाऊसाठी त्यांच्याकडे पैसे मागितले आजींनी दिले नाहीत म्हणून या मुलींनी त्यांना निर्दयपणे जखमी होई-पर्यंत मारहाण केली बिल्डिंगमधल्या एका वृद्धाने ॲम्ब्युलन्सला फोन केला व त्यामुळे आजींना त्वरित उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये तरी जाता आले. त्यांच्या पैकी एक वृद्ध गृहस्थ मला सांगत होते,' कुणीही या मुली-विरूद्ध तक्रार करणार नाही कारण प्रत्येकजण स्वत:च्या जीवाच्या भीतीने शांत बसतो. या बिल्डिंगमधली मुलेमुली नेहमीच आम्हाला त्रास

देतात व आमचे जीवन मिझरेबल करण्याचे सारे प्रयत्न करतात, आमचे एखादे काम करून द्यायचे तर दूरच, आम्ही वृद्ध व्यक्ति त्यांच्या आजी आजोबासारखे, पण त्यांना आपल्यापेक्षा वयाने मोठ्या व्यक्तिबद्दल, शेजाऱ्यापाजाऱ्याबद्दल आदरभाव नाहीच आज मिशाल-जेनने एका आजींना मारहाण केली, उद्या दुसऱ्या कुणालातरी करतील तक्रार करणाऱ्या व्यक्तिला येथे कुणी सुखाने जगू देणार नाही् काय सांगू मुली ? वीक-एन्ड आला की, तरूण मुले–मुली स्टिरीओच्या शक्यतो मोठ्या आवाजात रात्रभर नाचत, ओरडत असतात आपण कुणाच्या झोपेत व्यत्यय आणतोय, कुणाला त्रास देतोय ही भावनाही त्यांच्या मनाला शिवत नाही या बिल्डिंगला कधीही न उतरणाऱ्या अमली पदार्थांची नशा चढलीय जणू इतक्यात 'हाय ? ओल्ड मॅन' असे म्हणत बिल्डिंग-मधला, झिपऱ्या वाढविलेला एक टीन-एजर तारवटलेल्या डोळ्यांनी आमच्याकडे पाहत, आम्हाला ओलांडून पुढे गेला त्या मगरूर तरुणाच्या रागही आला, पण काय उपयोग ? मी स्वतःच, या परक्या देशात होते आजोबांचा निरोप घेऊन येथील वृद्धांच्या दयनीय अवस्थेचा विचार करीतच मी घरी परतले

त्यानंतर माझ्या आग्रहामुळे, मारहाण झालेल्या त्या आजींना भेटायला, त्यांच्या वृद्ध मित्र-मैत्रीणींना घेऊन विजय व मी हॉस्पिटलमध्ये गेलो माझ्या सोशल-वर्कच्या वेडाची विजयला चांगलीच सवय झाली असल्याने, मी स्वतःहून अंगावर घेतलेली, माझी अशी कामे करण्यात तो नेहमीच मला मदत करीत असे आजींची ती संध्याकाळ मजेत गेली असावी असे त्यांच्या समाधानी चेहऱ्यावरून वाटले या पाचसहा वृद्ध व्यक्तिसाठी आम्हा दोघांच्या आयुष्याच्या अनेक वर्षांतले फक्त दीड दोन तास खर्च झाले होते, पण त्या दोन तासांनी या वृद्ध व्यक्तिंना एका अनाम आत्मीयतेचे व समाधानाचे अनमोल असे असंख्य क्षण व लक्षात राहील अशी स्मृती बहाल केली होती

उन्हाळा संपला, थंडी पडू लागली येता, जाता बाहेर खुर्च्या टाकून बसलेल्या त्या वृद्ध व्यक्ति क्वचित दिसू लागल्या शेजारच्या मुलांच्या शाळा सुरू झाल्याने ड्राइव्ह-वे मधील गडबड व गजबजही थंडावली

रोजच्या व्यवहारात काळ पळत होता, कधी हरणाच्या गतीने तर कधी मुगीच्या पावलानी सध्याकाळी खिडकीतून रस्त्यावरची रहदारी न्याहाळण्याचा माझा आवडता उद्योगही कटाळवाणा वाटू लागला येथे थडीबरोबर बर्फ पडायला लागले की, वातावरण असेच बेजान भासायचे अशाच एका गोठलेल्या उदास सध्याकाळी ड्राइव्ह-वे मध्ये काळ्या रगाची मोठी कार थावली त्यातून एक कॉफिन बाहेर काढली गेली व कॉफिनसह काही व्यक्ति शेजारच्या इमारतीच्या मुख्य दरवाजातून आत गेल्या अर्ध्या-पाऊण तासाने खाद्यावर कॉफिन घेऊन त्या व्यक्ति चालत आल्या त्या सर्वांचे काळे पोषाख पाहून वातावरण अधिकच उदास वाटू लागले शेजारधर्म म्हणून आम्ही बाहेर गेलो विचारपूस केल्यावर कळले की, काही दिवसापूर्वी, लहान मुलीनी मारहाण केलेल्या आजी मरण पावल्या होत्या मोठ्या कारमध्ये कॉफिन ठेवण्यात आली काही वृद्ध त्या कारमध्ये बसले उरलेल्याना आमच्या कारमध्य घेऊन मी व विजय कबरस्थानापर्यंत गेलो मोठ्या काळ्या कारमध्ये आलेले आजीचे मुलगा-सून, मुलगी व जावई होते प्रीस्टने सागितल्याप्रमाणे त्या चौघानी यत्रवत सारे विधी पूर्ण केले आजीच्या सुहृदावरोबर आम्ही दोघानीही आजींच्या मृत शरीरावर मूठ, मूठ माती टाकली माती, मातीला मिळाली

घरी परतताना आजीचे सुहृद आमच्यावरोबर परतले परतीच्या वाटेवर ती, मोटी काळ्या रगाची कार एका फॅन्सी वारसमोर उभी राहिली आजीचे लौकिक नातेवाईक, झालेले वा न झालेले दु ख, दारूच्या पेल्यात बुडवायला बारमध्ये शिरलेले पाहिले

घरापर्यंत पोहोचेपर्यंत, आजीना काय झाले होते ती माहिती त्या वृद्ध व्यक्तिनी आम्हाला सागितली व माझा मेंदू बधीर होतो आहे, असे मला वाटले त्याच्या बिल्डिगमध्ये, आजी तेराव्या मजल्यावर राहत होत्या गेले आठ दिवस बिल्डिगमधली लिफ्ट बद होती आजीच्या घरातले खाण्यापिण्याचे पदार्थ व त्याचे औषध सपले होते शेजाऱ्यानी, कुणीही आजीना काही हवे-नको याची चौकशी केली नव्हती व गेली कित्येक वर्ष भावना, आत्मीयता, प्रेम, आपुलकीची भुकेली आजी, शेवटी शारिरीक भुकेने सपली होती.

घर आले, 'तुम्ही खरोखर चागले शेजारी आहात, थँक्यू' गाडीतून उतरताना आजोच्या सुहृदानी आम्हाला सागितले व त निघून गेले आणि शेजारधर्माला जागणारे आम्ही दोघे, शेजारधर्म नसलेल्या आमच्या घराशेजारच्या इमारतीकडे जाणाऱ्या त्या थकलेल्या पावलाकडे पाहत राहिलो

♣

११

# भलेपणाची किंमत

हा देश तसा फार व्यवहारी 'यू डोन्ट गेट एनीथिंग फॉर नथिंग,' पण भलेपणाचीही किंमत द्यावी लागत असेल असे मला वाटले नव्हते माझ्या मैत्रिणीच्या - तोषाच्या भावी नवऱ्याला-बिंदुला ती किंमत द्यावी लागली त्याचे असे झाले

माझी बंगाली मैत्रीण तोषा आजकाल खूप आनंदात होती लवकरच ती, तिच्या नेपाळी मित्राबरोबर - बिंदुबरोबर विवाहबद्ध होणार होती आजही ती अद्भुत विश्वात वावरत असल्याच्या आविर्भावात माझ्या रूममध्ये आली व म्हणाली, 'उषा या वर्तमानपत्रातील वेडिंग गाऊन्सच्या जाहिराती पाहून ठेव आज संध्याकाळी आपण माझी विशेष खरेदी करायला जाऊ,' तोषा नेहमी आज्ञावजा विनंती करीत असे तिच्या मैत्रीत कोणती ताकद होती कुणास ठाऊक? पण ती दुसऱ्या व्यक्तिला आपल्या मैत्रीचा अधिकार निरपवादपणे कबूल करायला लावीत असे तोषा जितक्या अनाहूतपणे आली, तितक्याच अनौपचारिकपणे गेली

मी स्टुडन्ट न्यूजपेपरची पाने उलटू लागले जाहिरातीच्या पानावर नजर फिरवताना 'पर्सनल्स' या मथळ्याखाली आलेल्या एका जाहिरातीने लक्ष वेधून घेतले, 'नीड व्हॉलन्टियर टू फादर माय चाईल्ड, संध्याकाळी सहा ते आठ या वेळात संपर्क साधा, फोन नंबर ३५५-३८६१ एखाद्या कुमारी माता असलेल्या विद्यार्थिनीने दिलेली ही जाहिरात असावी असा तर्क मी केला येथील व्यक्तिस्वातंत्र्य कोणत्या दिशेने धावते आहे हे मला कळेना फ्री सोसायटी व व्यक्तिवाद याच्या आधारे फुललेले या विद्यार्थिनीचे व्यक्तित्व खऱ्या अर्थाने स्वतंत्र आहे की, आधाराच्या गरजेचे गुलाम हे माझ्या मनात विचार तरळले मी दुसरी जाहिरात

वाचली, आत्म्याचा पुर्नजन्म – द रिबर्थ ऑफ अ सोल या मथळ्या-खाली लिहिले होते, आयुष्यातील अनेक अनिश्चितता स्वीकारा आजच परवडण्या जोग्या किमतीत कबरस्थानात स्वत साठी जागा विकत घेऊन ठेवा, तुमच्या मुलाबाळासाठी इतकी सुयोग्य भेट दुसरी असू शकेल का ? पुढे सपर्क साधण्यासाटी पत्ता दिला होता त्याच्या शेजारच्या कॉलममध्ये वेडिंग गाऊन्सची सुबक जाहिरात होती पहिला विवाह असेल तर गाउनची किमत १४०० डॉलर्स, सकड टाईम अराऊड गाउनची किमत ४०० डॉलर्स, थर्ड टाईम अराऊन्ड, पेपर गाऊनची किमत १४० डॉलर्स. पेपर नॅपकिन्स, पेपर प्लेटस, पेपर कप्सप्रमाणे पेपर गाऊनही मिळतो हे मला माहित नव्हते फक्त एकदाच वापरलेल्या सेकड हँड गाऊनच्या जाहिरातीही होत्या विवाहासारख्या शुभ घटनेसाठी आवश्यक वस्तुना अत्यत व्यवहारी रूप आल्याचे या जाहिरातीतून जाणवले तोषासाठी आवश्यक असलेली ती जाहिरात सापडताच मी स्टुडट न्यूज पेपर बाजूला ठेवला

परदेशात उच्च शिक्षणासाठी आलेले भारतीय, नेपाळी, पाकिस्तानी, कोरियन, चायनीज, जपानी विद्यार्थी-विद्यार्थिनी अल्पसख्याक असल्यामुळे व देशापासून, कुटुबियापासून दूर आहोत या समान भावनेमुळे भावनिकदृष्टचा जवळ येत काहींच्या मैत्रीचे तर विवाहबद्ध होण्याइतपतच्या जवळीकीत रूपातर होई तोषा आणि बिंदुची मैत्रीदेखील विवाहाच्या दिशेने पावले टाकू लागली होती तोषा होस्टेलमध्ये राहत असे व बिंदु त्याच्या मित्राबरोबर कमी भाडे असलेल्या, युनिव्हर्सिटीच्या अपार्टमेंट कॉम्प्लेक्समध्ये या दोघाबद्दल विचार करीत असतानाच फोनची घटा वाजली फॉरेन स्टुडटस ॲडव्हायझरच्या ऑफिसमध्ये चार वाजता परदेशीय विद्यार्थी-विद्यार्थिनीची महत्वाची मिटीग आहे असा निरोप सेक्रेटरीने दिला मी तातडीने मीटीगसाठी गेले

आज सध्याकाळी तोषा व मी वधूवेषाची खरेदी करण्यासाटी जाणार होतो पण त्या ऋजु भावनावर ह्या घटनेमुळे उल्कापात झाला. फॉरेन स्टुडट ॲडव्हायझरने थोडक्यात मीटिगचे कारण सागितले ते ऐकून सर्वांनाच धक्का बसला काही महिन्यापूर्वी बिंदुच्या शेजारच्या

अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या विद्यार्थिनीचे पोट एकाएकी खूप दुखू लागले. बिंदू व त्याच्या मित्राने तिला हेल्थ सेंटरमध्ये नेले, तिच्या सात वर्षाच्या कावऱ्याबावऱ्या झालेल्या मुलीची समजूत काढली, तिला खाऊ दिला.

डॉक्टरानी अॅपेन्डिक्सचे ऑपरेशन त्वरीत होणे आवश्यक आहे हे ठरविल्यामुळे त्या विद्यार्थिनीच्या विनतीनुसार, तिला मदत करण्याच्या शुद्ध हेतुने , बिंदुने व त्याच्या मित्राने, ती हॉस्पिटलमधून घरी परतेपर्यंत तिच्या मुलीची काळजी घेण्याचे कबूल केले ती बरी होऊन घरी आली मागच्या महिन्यात बिदुच्या वाढदिवसाला त्या लहान मुलीच्या हाताने तिने बिंदुला भेटवस्तुही दिली व आज सकाळी तिनेच बिंदुविरुद्ध पोलिस स्टेशनमध्ये तक्रार केली व चाइल्ड मोलेस्टेशन 'Child Molestation'च्या आरोपाखाली पोलिस बिंदुला अटक करून घेऊन गेले सर्वांनी उद्या अकरा वाजता कोर्टात हजर राहावे असे अॅडव्हायझरने सांगितले आणि मीटिंग सपली बिंदुचे जवळचे मित्र, वर्गातील मुलेमुली, मुख्याध्यापक, बिंदुच्या चारित्र्यासबधी कोर्टात साक्ष देणार होते व त्यानतर कोर्ट जे ठरवेल त्यावर बिंदुचे भविष्य अवलबून होते

मी येथे आले त्यादिवशी माझे अमेरिकन प्रोफेसर म्हणाले होते, "उषा येथील विद्यार्थी खूप फ्रेन्डली आहेत पण त्याच्यामध्ये जीवाभावाचा मित्र वा मैत्रीण मिळणे मात्र अतिशय कठीण आहे" त्याच्या विधानातील सत्यता आज पुरेपूर पटली होती. येथील स्थानिक विद्यार्थ्यांनी परदेशीय विद्यार्थ्यांना आत्मीयता, आपूलकी विश्वास द्यायचा की, त्याचा असा विश्वासघात करायचा? मला वाटायचे स्त्री,दया व सहानुभूतीची प्रतिमा असते दुसऱ्याच्या उपकाराची जाणीव ठेवण्याची क्षमता स्त्रीमध्ये अधिक असते, पण या विद्यार्थिनीतील ती स्त्री सुलभ भावना कुठे हरवली? उलट सुलट विचार माझा मदू कुरतडू लागले

दुसरा दिवस उजाडला स्टुडट न्यूज पेपरमध्ये बिंदुसबधातील बातमी पहिल्या पानावर छापली होती पूर्ण चौकशी होण्यापूर्वी अशी बातमी विद्यार्थी सपादकाने का छापावी ? हे मला कळेना व्यक्तिस्वातंत्र्याचा अतिरेक, हेच त्याचे उत्तर होते तोषा व मी कोर्टात पोहोचलो बिंदुचे वर्गमित्र, जवळचे मित्र, मुख्य प्राध्यापक व सात वर्षाची मुलगी

याच्या साक्षी झाल्या एके दिवशी आघोळ झाल्यावर विदुने, या लहान मुलीला कपडे घालायला मदत केली, हे गप्पाच्या ओघात तिने, आईला सांगितले, या घटनेचा, त्या मुलीच्या आईने विपर्यास केला होता तीन हजार डॉलर्स जामिन देऊन, विदुची सुटका झाली पोलिस कस्टडीतून तो वाहेर आला एक रात्र का होईना त्याला तुरुगात घालवावी लागली जामिनासाठी तीन हजार डॉलर्स, क्रेडिट युनियनमधून कर्जाऊ घेताना, सही करणारे विदुचे अमेरिकन प्रोफेसर व भारतीय वर्गमित्र मला फार, फार मोठे वाटले विदु निरपराध सुटला नसता तर नेमलेली सजा भोगून होताच त्याला डिपोर्ट केले असते, या नुसत्या कल्पनेनेच अगावर शहारे आले

या घटनेला सहा महिने झालेत आपल्या गरजेच्या वेळी, आपल्याला मन पूर्वक मदत करणाऱ्या व्यक्तिच्या आयुष्यावर, आपल्या बेजबाबदार फिर्यादीचा किती गभीर परिणाम झालाय याची ओझरती तरी कल्पना त्या विद्यार्थिनीला असेल का ? या मला सताविणाऱ्या प्रश्नाचे उत्तर मिळविण्यासाठी, मी नकळत त्या विद्यार्थिनीवावत थोडी वहुत माहिती मिळविली वयाच्या सोळाव्या वर्षी तिने केलेले लग्न 'मास प्रोडच्यूसड मॅरेज–Mass produced marriage नव्हते तर इनसाईड आऊट रोमँटिक कॉम्प्लेक्स मॅरेज–Inside out romantice Complex marriage होते. मास प्रोडच्यूसड मॅरेज म्हणजे सर्व लग्न करतात व टिकवितात म्हणून आपणही लग्न करायचे व टिकवून दाखविण्याचा प्रयत्न करायचा इनसाईड आऊट रोमँटिक कॉम्प्लेक्स मॅरेज म्हणजे दोन व्यक्ति फक्त प्रेमासाठी एकत्र येत नाहीत तर व्यावहारिकपणे, पावले जमिनीवर घट्ट रोवून जबाबदारीने सहजीवन जगण्यासाठी शपथबद्ध होतात प्रणयभावना किंवा प्रणय या शब्दाचे व्याकरणातील जवळपासचे नातेवाईक चुकूनही या उभयताच्या वाऱ्याला उभे राहत नाहीत इतक्या व्यवहारी दृष्टिकोणातून विवाहाच्या एका जबाबदार प्रकाराला स्वीकारणारी ही बिचारी स्त्री, सात वर्षांच्या मुलीला घेऊन एकटी राहते, स्वत चा वैवाहिक दर्जा घटस्फोटिता म्हणून सागते अशाही स्थितीत अभिमानाने म्हणते की, माझ्या फेट मॅरेजची मला सवय झालीय I have grown accustomed

to my late marriage दहा वर्षांच्या वैवाहिक आयुष्याला मी स्वत:हून काडीमोड दिलीय कारण मला वाटते माझा नवरा माझ्यामध्ये आईचे प्रेम शोधीत होता आणि त्या प्रकारचे प्रेम देण्याची माझी क्षमता नाही तिचे विवाह संबधाबद्दलचे तत्त्वज्ञान ऐकून मी अवाकच झाले

खर तर नातेसबध जपण्याची, टिकविण्याची एक क्षमता असावी लागते स्वत:च्या जीवनसाथीदाराला जिला जपता आले नाही तिला विदुच्या उपकाराची जाणीव कशी जपून ठेवता येणार ? येथे स्वत:चे वेगळेपण सिद्ध करण्यासाठी, नाविन्याचा अनुभव घेण्यासाठी, व्यक्ति, कोणत्याही थराला जाऊन पोहोचू शकते स्वत:च्या जीवनातील उद्देशहीनता ज्या व्यक्तिसाठी सवयीची होऊन जाते तिला दुसरी व्यक्ति जीवनाच्या उद्देशाबाबत कमालीची गंभीर असू शकते, ही जाणीव कशी होणार ? माझ्याकडे लक्ष जाईल या विचित्र भावनेपोटी, ही विद्यार्थिनी असे वागली असेल का ?

आयुष्यात इतका मोठा अनर्थ होईल असे विदुला स्वप्नातही वाटले नव्हते आरोपाच्या भाषेतील हीनता त्याला जेव्हा आठवे तेव्हा अपमानाच्या काट्यातून कुणी आपल्याला निर्दयपणे फरफटत नेत आहे, आपण रक्तबंबाळ झालो आहोत असे त्याला वाटे गेल्या सहा महिन्यातील प्रत्येक क्षणी जाणवले की, विदुच्या अस्तित्वाला तुरुंगात घालविलेल्या एकमेव भीषण रात्रीने वेढून टाकले आहे इच्छा, आकांक्षा आनंद, उत्साह जणू श्वास रोखून मौन झालेत. हातातोंडाशी आलेली, पदवी पूर्ण होईल का ? अशी आत्मविश्वास हरविल्यासारखी भाषा तो बोलू लागलाय त्याच्या आयुष्यातील एकमेव कोमल संदर्भ, त्याची प्रेयसी तोषा, हिच्याकडेही तो अपरिचीत नजरेने पाहू लागलाय काही महिन्यापूर्वी जेव्हा तोषाशी विवाहबद्ध होण्याचे त्याने ठरविले तेव्हा त्याला वाटले आता कोणताही निर्णय होण्याचे उरले नाही पदवी पूर्ण करायची व जीवसंगिनीला घेऊन मायदेशी परतायचे एक भरपूर, आश्वस्त, समाधानी जीवन जगण्यासाठी त्याला काय कल्पना की, परोपकाराच्या बदल्यात त्याला जे मिळणार आहे, त्याच्या ओझ्याने,

सुखकल्पनाच्या, यशाच्या, मधुर सहजीवनाच्या, आकांक्षाच्या चिंध्या, चिंध्या होणार आहेत ? नेहमी ब्रायडल शॉपसमोरून जाताना माझा हात ओढून मला थांबविणारी व दुकानातील खिडक्यातून वधूवेषात सजलेल्या पुतळ्यांना अनिमिष नेत्रांनी पाहाणारी तोषा, आजकाल त्या दुकाना-जवळ येताच नजर जमिनीकडे झुकविते, पावलाची गती वाढविते तिचे डोळे पाणावतात व तिचे स्वप्न आसवात बुडून जाते

जे झाले ते विसरून जाण्याची विदुची मनःपूर्वक इच्छा आहे भूत-काळातल्या त्या क्षणापासून मुक्ती मिळावी असे वाटत असूनही जो 'वर्तमान' त्याच्या वाट्याला आलाय तो त्या क्षणांना विसरू देत नाही जामिनासाठी कर्जाऊ घेतलेले तीन हजार डॉलर्स व्याजासह परत द्यायचे आहेत स्टुडंट व्हिसामुळे अधिक पगाराचे काम करता येत नाही विद्या-र्थ्यांसाठी उपलब्ध असलेली छोटीमोठी कामे शोधून पैसे मिळवावे लाग-तात अशा कामाचे किमान वेतन म्हणजे एका तासाला तीन डॉलर्स मिळत स्टुडंट व्हिसा ॲक्टिव्ह ठेवण्यासाठी प्रत्येक टर्मला कमीत कमी दोन कोर्सेस घ्यावे लागतात त्याची फी भरावी लागते ह्या आधीही आपल्या गरजांची पूर्ती करण्यासाठी तो कामे करीत होता परंतु तेव्हा विदुला जो उत्साह जाणवत असे, तो सपलेला आहे

परंतु तरीही विदु काम करतो रात्री दोन वाजता काम आटोपून रूमवर येतो बस नसल्यामुळे बर्फातून दोन मैल त्याला चालावे लागते. आणि चालता चालता, विदु हिशोब करीत असतो चार वर्ग झाडून पुसा-यला किती तास लागले ? त्या तासाचे किती पैसे मिळतील ? व कर्जाची रक्कम किती डॉलर्सने कमी होईल याचा

♣

२०

# मृत देहाचा शृंगार

या टर्ममध्ये, मी घेतलेल्या कोर्सचे नाव होते 'Sociology of Death and Dying थोडक्यात 'मृत्यूचे समाजशास्त्र' नऊ आठव-ड्याच्या टर्मचे तीन आठवडे संपताच सरानी, मिडटर्म परीक्षेचे पेपर लिहायला, वर्गातील प्रत्येकाला विषय दिले मला दिलेल्या विषयाचे नाव होते. 'द हाय कॉस्ट ऑफ डाईंग' ख्रिश्चन धर्मविधीप्रमाणे, अंतिम संस्काराना कमीत कमी किती खर्च येतो या प्रश्नासोबत या विषया-बाबत इतर अनेक प्रश्नाची उत्तरे शोधण्यासाठी फ्युनरल होममध्ये जाऊन सविस्तर माहिती मिळविणे भाग होते हॉस्टेलमध्ये Mortuary College मध्ये Cosmetology किंवा Embalming चे कोर्सेस करणारे कुणी विद्यार्थी आहेत का याची चौकशी केली Embalming व Cosmetology चे ट्रेनिंग पूर्ण करणारा ॲलन नावाचा विद्यार्थी फ्युनरल होममध्ये अर्धवेळ नोकरी करतो हे समजताच त्याची भेट घेऊन टर्मपेपर साठी तो माहिती देऊ शकेल का ? हे विचारले, त्याने आनंदाने मदत करण्याचे आश्वासन दिले व बुधवारी तीन वाजता फ्युनरल होममध्ये ये असे सांगून पत्ता लिहून दिला

बुधवारी, तीनच्या सुमाराला मी फ्युनरल होम जवळच्या बस-स्टॉपवर उतरले आजूबाजूला नजर फिरविली, ॲलनने सांगितल्याप्रमाणे फ्युनरल होमच्या एका बाजूला 'स्लीप हाऊस' नावाचे पलंगगाद्याउशाचे दुकान होते व दुसऱ्या बाजूला 'लाईफ-बिल्डिंग' नावाचे आयुर्विमा ऑफिस होते आयुर्विमा उतरविल्यावर सुखाची निद्रा येण्यासाठी शाही पलंग, पराच्या गाद्याउशाची खरेदी करायची व जमले तर फ्युनरल होमला भेट देऊन कॉफिन्सच्या डिझाईन्सही बघून ठेवायच्या अशा सुज्ञ विचाराने

या तीन इमारती शजारी-शेजारी असाव्यात असा मजेशीर विचार करीत असतानाच माझी वाट पाहाणारा ॲलन दिसला व त्याच्या हॅलोला प्रतिसाद देत, मी फ्युनरल होममध्ये पाऊल टाकले ॲलनबरोबर त्याच्या ऑफिसकडे जाताना, काळ्या पोषाखातील स्त्रीपुरुष, शातपणे एका खोलीत जाताना दिसले बहुधा कोणाचातरी मृतदेह अत्यदर्शनासाठी टेवला असावा फुलाचा व अत्तरासारख्या पदार्थाचा काहीसा संमिश्र मधुर सुगध वातावरणात जाणवत होता मृत्युच्या सान्निध्यातही चित्तवृत्ती उल्हासित करणारा सौरभ जाणवू शकतो हे मी प्रथमच अनुभवले कदाचित आज पहिल्यादा मृत्युकडे अलिप्तपणे पाहण्याची वेळ आली होती त्यामुळेही असेल मला हव्या असलेल्या माहितीसबधीच्या प्रश्नाची यादी, ॲलनच्या हातात देत मी खुर्चीवर बसले प्रश्नावर नजर फिरवीत ॲलन ने 'अमेरिकन मत्यु सबधी' पुढील प्रमाणे माहिती पुरवली

१९३५ साली ॲडल्ट फ्युनरलसाठी येणारा सर्वसाधारण खर्च $४०० होता
१९६०साली ॲडल्ट फ्युनरलसाठी येणारा सर्वसाधारण खर्च $१२०० होता
१९६३ साली ॲडल्ट फ्युनरलसाठी येणारा सर्वसाधारण खर्च $१६००होता
या दशकात म्हणजे १९८० नतर ॲडल्ट फ्युनरलसाठी सर्वसाधारणपणे ३००० ते १०,००० डॉलर्स खर्च होतो शवपेटीच्या विशिष्ट आकारामुळे लहान मुलाच्या अत्यविधीला अधिक खर्च येतो अत्यविधी दोन प्रकारचे आहेत १) दहन व २) दफन

दहन – साध्या लाकडाच्या अनफिनीश्ड शवपेटीमध्ये, मृतदेह फ्युनरल होममध्ये आणून, सर्व धार्मिक विधी झाल्यावर दहनाचा खर्च $७५० ( वाहतुकीचा खर्च वेगळा गावाच्या सरहद्दीबाहेर प्रत्येक मैलाचा दर अधिक)


दफन – तावडतोब दफन करायचे असेल तर एकुण खर्च $८०० या मध्ये मृताचा दाखला मिळविणे, मृतदेह फ्युनरल होममध्ये आणन धार्मिक विधी करणे, साध्या पेटीतून मृतदेह कबरस्थानात नेऊन, कबर खोदून दफनविधी प्रार्थनापूर्वक पूर्ण करणे या सर्वांचा समावेश आहे

डायरेक्ट दहन किंवा डायरेक्ट दफन बहुधा AIDS ने किंवा इतर ससर्गजन्य रोगाने मृत झालेल्या व्यक्तीचे करतात AIDS रोगाने मृत

झालेल्या व्यक्तींच्या देहाचे Embalming करायला सहसा कुणी Embalmer तयार होत नाही व Embalming केल्याशिवाय अत्यदर्शनासाठी देह ठेवायचा नाही असा कायदा असल्यामुळे त्वरीत दहन वा दफन करणे या विधीचाच अवलव करावा लागतो

सर्वसाधारण परिस्थितीत अतिम विधीची व्यवस्था करण्याच्या कमीत-कमी खर्च

१) स्मशानभूमित कबरेसाठी जागा विकत घेणे व कबर खोदणे $१५०० कबरस्थानाचा सामाजिक दर्जा काय आहे यावर किमत कमीअधिक होऊ शकते



२) Mausoleum – जमिनीवरील समाधी Above Ground Burial या कल्पनेतील सौदर्य व प्रतिष्ठा ज्याना मोहात पाडते ते मासोलिअम मध्ये जागा घेतात हिरव्यागर्द वृक्षामध्ये, लपलेल्या घरट्यासारख्या मुबक, सगमवरी किवा इटलीहून आयात केलेल्या वज्र पाषाणाच्या इमारतीत, मृतदेहासाठी ड्रॉवर किवा Crypt space घेणे,त्यावर नाव,जन्मदिन, मृत्युदिन इ तपशील लिहून ड्रॉवर उघडणे याची किमत पाच ते दहा हजार डॉलर्स (वार्षिक केअर-चार्ज वेगळा नि स्तब्ध परिसरातील देखण्या इमारतीतील सात्विक सजावट, ध्यान, मनन, स्मरण करण्यासाठी, मृताच्या नातेवाईकाना निश्चितपणे स्फूर्ती व प्रेरणा देईल याची खात्री )

३) हॉस्पिटल, नर्सिंग होम किंवा घरातून,मृतदेह फ्युनरल होममध्ये आणणे $१५० (शहराच्या हद्दीबाहेर प्रत्येक मैलाला एक ते दीड डॉलर अधिक)

| | | |
|---|---|---|
| ४) अंत्यदर्शनापूर्वी मृतदेहाची तयारी | | डॉलर्स |
| | १) Embalming | २७० |
| | २) आटॉप्सि केलेल्या मृतदेहाचे Embalming | ३२० |
| | ३) अपघातात विरूप झालेल्या देहाचे रिस्टोरेशन तासाला | ३५ |
| | ४) मृतदेहाची देखरेख दर दिवसाला | १५ |
| ५) Cosmetology (वेशभूषा, केशभूषा मेकअप इ) | | ३० ते १०० |
| ६) सर्व तयारी संपल्यावर मृतदेह, शवपेटीत ठेवणे | | ५० |
| ७) शीतोपचार क्रिया | | ६० |
| ८) अंत्यदर्शनासाठी येणाऱ्या लोकांची देखरेख | | १०० |
| ९) अंत्यविधींची देखरेख | | १०० |
| १०) धार्मिक विधी | | ८५ |
| ११) स्मशानभूमित, शवपेटी कबरेत ठेवण्यापूर्वीचे धार्मिक विधी | | ८५ |
| १२) कबरेत पुरलेला देह बाहेर काढण्यासाठी (संबधित अधिकाऱ्याची लेखी परवानगी असणे आवश्यक) | | १७५ |
| १३) मृतदेह दुसऱ्या गावी पाठवायचा असेल तर वेगळा चार्ज द्यावा लागेल | | |
| १४) अंत्यदर्शन – एक पूर्ण दिवस किंवा त्यापेक्षा कमी वेळ | | २५० |
| | दुसरा दिवस – अधिक | ११० |
| | तिसरा दिवस– अधिक | ११० |
| १५) आप्तस्वकीय,मित्रासमवेत फ्युनरल होममधील धार्मिक विधी | | १५० |
| १६) अंत्यदर्शनाशिवाय फक्त धार्मिक विधी | | १५० |
| १७) प्रेत नेण्याच्या गाडीचा चार्ज (गावाच्या हद्दीत) | | १७५ |

१८) फुलानी सजविलेली (गाडी गावाच्या हद्दीत) १७०
१९) Limouisne (गावाच्या हद्दीत) १७०
२०) शवपेटीची किमत $१००० ते १०,००० या रेन्जमध्ये (उदाहरणार्थ १) लाकडाची शवपेटी $१००० २) स्टील $२२२५ ३) ब्रॉन्झ $४५०० )
२१) प्रेतवस्त्र किंवा कफन ४५ ते १५०
२२) मृत व्यक्तीची रक्षा ठेवण्याचे पात्र ७० ते ४००
२३) स्मृतीपत्र १५ ते १७०
२४) आभारप्रदर्शनाची पत्रें ३० ते १५०
२५) शवपेटीवर लावायची नेमप्लेट १०
२६) क्रॉस (कमीत कमी) १०
२७) फुले १०० ते २००
२८) मृताचा दाखला व त्याच्या पाच प्रती २५
२९) ऑर्गन वाजविणाऱ्याची फी १५

याशिवाय कबर बाधणे व स्मृतिलेख (Tombstone or Headstone) या नतरच्या खर्चाच्या बाबी स्मृतिलेखाचा उल्लेख येताच, नागालॅन्डमधील, कोहिमा येथे पाहिलेल्या स्मृतिलेखाची आठवण आली दुसऱ्या महायुद्धात देशासाठी शहीद झालेल्या वीराच्या, कबरस्थानाच्या प्रवेशद्वाराजवळच्या, प्रचड शिळेवरील स्मृतिलेखात, पुढील शब्द कोरलेले आहेत When you go home tell them of us and say, for your tomorrow, we gave our today' अत करणाला स्पर्श करणारे, देशऋणाची आठवण देणारे असे स्मृतिलेख सारे हिशेब विसरायला लावतात हेही तितकेच खरे

मृतदेह जर दुसऱ्या गावी पाठवायचा असेल तर फ्युनरल होम तर्फेच व्यवस्था करावी लागते व त्याचे पैसे द्यावे लागतात विमानप्रवासाचा खर्च वेगळा उदारहणार्थ न्यूयॉर्क ते सॅन फॅन्सिस्को,शवपेटी पाठविण्याचे $४५० अधिक ५ टक्के टॅक्स अर्थात ज्या गावी मृतदेह पोचेल, तेथील फ्युनरल होमचा स्टाफ देहाचा ताबा घेतो व उगाचच मामूली फेरबदल करून (केशभूषा किंवा मेकअप) दु खी कुटुंबाला एक्सप्लॉइट करून अधिक पैसे वसूल करतो फ्युनरल सर्व्हिसेसबाबत वर्तमानपत्रात,

धार्मिक मासिकात येणाऱ्या जाहिराती काहीवेळा लोकांची दिशाभूल करतात जाहिरात अशी असते-संपूर्ण अंत्यसंस्कार $१०० ते ७००० मृतदेह एकदा अन्डरटेकरच्या ताब्यात गेला की, तो प्रमाणाबाहेर किमती सांगून अधिकाधिक पैसे वसूल करतो कारण किमान अशा प्रसंगीतरी सभ्य नातेवाईक पैशाकडे बघत नाहीत ख्रिश्चन धर्मतत्त्वज्ञानाप्रमाणे मृत्यू म्हणजे देहाचा त्याग करून घेतलेली अल्पकालावधीची निद्रा, त्यानंतर 'We wake eternally' 'हे जे विनाशी, त्याने अविनाशीपण परिधान करावे आणि हे जे मर्त्य,त्याने अमरत्व परिधान करावे, हे आवश्यक आहे,' या बायबलमधील वचनावर धार्मिकाचा संपूर्ण विश्वास असल्याने, स्वर्गीय वैभवाने परिपूर्ण शाश्वत पुनरुत्थान, सार्वकालिक जीवन, हे अंतिम सत्य तसेच आत्म्याचे अमरत्व महत्त्वाचे मानले जाते तरीही पुनरुत्थानसमयी देहाचे, आत्म्याशी पुर्नमिलन होणार आहे या विश्वासामुळे, या पुर्नमिलनासाठी योग्य दिसण्याइतपत मानवी देहाचे यथासांग सोपस्कार व्हायला हवेत, या धार्मिक श्रद्धेचे, फ्युनरल होमचा धंदा करणाऱ्यांनी भांडवल केले पुनरुत्थानावरील दृढ विश्वासामुळेच ख्रिश्चन धर्मीयात दहनविधी अमान्य होऊन मृतदेहाचे रक्षण केले जाऊ लागले दफनविधीतील एका औपचारिक विधीला 'The kiss of peace' म्हटले जाऊ लागले अशारीतीने अगदी मॉडेस्ट फ्युनरलला नऊ ते दहा हजार डॉलर्स खर्च येऊ लागला हे सर्व ऐकल्यावर, या देशात असताना श्वासाची दोरी तुटलीच तर 'The kiss of peace' या विधीला तोंड देणे परवडेल का? असा विचार मनात आलाच एवढ्यात ॲलन म्हणाला, 'चल तुला कॉफीन्सची शो-रूम दाखवितो' मी ॲलन बरोबर गेले फ्युनरल होमच्या दुसऱ्या मजल्यावरील आलिशान हॉलच्या एका भागात वेगवेगळ्या किमतीच्या कॉफिन्स ठेवल्या होत्या कॉफिन्स, कॅसकेटस् व ब्यूरीअल केसेस इतक्या विविध प्रकारच्या असतात हे मी पहिल्यादाच पाहिले लोखंड ,लाकूड, दगड, संगमरवर, वज्र पाषाण, हायड्रॉलीक सिमेंट, व्हल्कनाईज्ड रबर, स्टील, चिकनमाती, काच, सेल्युलॉइड, झिंक, ब्रॉन्झ इत्यादि प्रकारच्या हवाबंद, वॉटरप्रुफ, वेदरप्रुफ कॉफिन्सचे नमुने तेथे ठेवले होते शवपेटीच्या आतील भागातील सजावट मखमल, सॅटीन

रेशमी कापडाची त्यावर वेधक रंगाच्या रेशमी धाग्याचा मनमोहक कशिदा, ॲडजेस्टेबल बिछाना, पराच्या उशीला झालरीचा नक्षीदार अभ्रा, शवपेटीच्या चारी कोपऱ्यावर झुलणारे सोनेरी, रेशमी गोंडे काही महाग पेट्याना बाहेरून लावलेली ठोस चांदीची हॅन्डल्स या सर्वांतून मृत्यु सुन्दर व शोभिवंत दिसला पाहिजे हा आग्रह जाणवत होता एक हजार ते दहा हजार डॉलर्सपर्यंत किंमती असलेल्या या पेट्यांपैकी एक निळ्या रंगाची पेटी मला बेहद्द आवडली व मनाच्या खेळाची गमतही वाटली हॉलच्या दुसऱ्या भागात व्हॉल्टचे ( Vault ) निरनिराळ्या धातुचे, आकाराचे व डिझाईन्सचे छोट्या आकारातील - मिनी साईजचे नमुने ठेवले होते व्हॉल्ट म्हणजे शवपेटी पूर्णपणे सुरक्षित राहावी म्हणून ती ज्या दुसऱ्या पेटीत ठेवता येईल असे आऊटर कन्टेनर या सुशोभित पण भक्कम आच्छादन वा आवरणाच्या किंमतीही विचार करायला लावणाऱ्या होत्या ॲलन म्हणाला, 'हे बघ उषा, समज तुला न्यूयॉर्कमधील स्मशानभूमीत तू असलेल्या शवपेटीला व्हॉल्टमध्ये ठेवून पुरले काही वर्षांनी, सेवानिवृत्त झाल्यावर, विजयने कॅलिफोर्नियातील एखाद्या गावी स्थायिक होण्यासाठी, तुझ्यासह जायचे ठरविले तर तुझी कबर उघडून, तुला विजयबरोबर पाठविणे सोपे पडेल कारण व्हॉल्टमुळे, तुझी कॉफिन, हवामानाचा कोणताही परिणाम न होता इनटॅक्ट राहिलेली असेल अर्थात प्रार्थनापूर्वक, कबर उघडून तुला बाहेर आणणे, विमानतळावर नेणे, विमानप्रवासाचा खर्च, ज्या गावी जाणार, त्या गावातील कबरस्थानात जागा विकत घेणे, धार्मिक विधी, कबर खोदून पुन्हा तुला इतमामानं कबरेत ठेवून कबर बंद करणे, कबर बांधणे, पाहिजे असल्यास नाविन्य म्हणून वेगळा स्मृतिलेख इत्यादी खर्चाचा विचार करणेही आवश्यक कारण असे करणारे लोक आहेत ॲलनचे बोलणे ऐकून मला वाटले एकवेळ माझी अखेरची इच्छा म्हणून ७५०० डॉलर्स किंमतीची निळ्या रंगाची, ॲडजेस्टेबल बेडवर मखमली बिछाना असलेली, कशिदाकारी केलेली कॉफिन, विजय विकत घेईल सुद्धा, पण व्हॉल्ट नावाचे वरील आवरण विकत घेऊन, असा शहरोशहरी कबरा विकत घेत, विमानाचे तिकीट काढून मला फिरवील हे शक्य तरी आहे का?

लाडकी असले म्हणून काय झाले ? साध्या लाकडाच्या पेटीतून मला भार तात नेऊन माझे अत्यसस्कार करावेत अशी माझी शेवटची इच्छा, आजच डायरीत लिहून ठेवण्याचा निश्चय केला माझ्या डोळ्यासमोर फुलझाडाची गर्दी असलेले, आखीवरेखीव शात स्मशान उभे राहिले प्रत्येक कबरेजवळ पुष्करिणी, पुष्करिणीत विहार करणारी बदके, अनिर्बंधपणे नाचणारे सुदर मोर, ( याची काळजी घेण्याच्या वार्षिक खर्चाचे काय ? हे पक्षी आजारी पडले तर पक्षीवैद्याचा खर्च कोण देणार ? ) आणि कबरे भोवती चक्क देवदूताचा पहारा ठेवता आला तर काय हरकत आहे माझी कल्पना शक्ती भराऱ्या घेऊ लागली पण अॅलनच्या बोलण्याने भानावर यावे लागले अॅलन रगात येऊन मला सागत होता, 'एकदा मी सर्व व्यवस्था करून शवपेटी, विमानाने सिनसिनाटीला पाठविली, ती चुकून शिकागोला जाऊन पोहोचली व त्या एअरलाईनच्या लॉस्ट अॅन्ड फाऊन्ड विभागाच्या कोपऱ्यात जाऊन उभी राहिली आहे की नाही सनसनाटीपूर्ण घटना ? त्यानतर शोधाशोध, वेळेचा अपव्यय, मानसिक, भावनिक ताणतणाव व अॅडिशनल खर्च, वुई आर टॉकिग बिग मनी, उषा या देशातील उच्च जीवनमान व उच्चतम लाईफ हिअरआफ्टर व्हॉट डू यू से ?'

'चल, आता आपण बाहेर पडून कॉफी घेऊ, माय ट्रीट' मी त्याला म्हणाले अॅलन व मी जिना उतरून प्रवेशद्वारा जवळ पोहोचलो तेथे लहा-नशा टेबलावर नवीन वर्षाच्या दिनदर्शिकेच्या प्रती एका सूचनेसह ठेवल्या होत्या सूचना होती – फ्री कॉपीज, प्लीज टेक वन दिनदर्शिकेची एक प्रत मला देत, आमचे कोट आणायला, अॅलन त्याच्या ऑफिसमध्ये गेला मी दिनदर्शिका पाहू लागले, येशू ख्रिस्ताच्या, वधस्तभावरील मृत्युची प्रसिद्ध चित्रकारानी काढलेली चित्रे, प्रत्येक महिन्याच्या पानावर होती शेवटच्या पानावर पोलिस, फायर डिपार्टमेन्ट, डॉक्टर, दतवैद्य, हॉस्पिटल इमर्जन्सीरूम याचे दूरध्वनीक्रमाक लिहायला जागा होती, एका कोप-ऱ्यात महिने व वर्थ स्टोनची यादी व त्याखाली लग्नाचा वाढदिवस व त्याचे ट्रॅडिशनल नाव याची यादी होती नमुन्यादाखल लिहायचे झाले तर – पहिला लग्नाचा वाढदिवस – कागद ( Paper Anniversary )

दुसरा लग्नाचा वाढदिवस – कापूस (Cotton Anniversary)
तिसरा लग्नाचा वाढदिवस – कमावलेले कातडे (Leather Anniversary)

चौथा लग्नाचा वाढदिवस,फळ,फुले (Fruit, Flowers Anniversary) त्यावर्षी माझ्या लग्नाचा दहावा वाढदिवस म्हणजे ( Tin Anniversary) होती

पंचविसावी म्हणजे "Silver Wedding Anniversary" येईपर्यंत तरी "स्वर्गाकडे जाण्याची पहिली पायरी" अशा मथळ्याची,सिमेट्री गिफ्ट-शॉपच्या Before need सेलची जाहिरात पाहावी लागू नये अशी मनोमन प्रार्थना केली फ्युनरल होममधून बाहेर पडताना शोकाकुल नातेवाईकांनी नूतन वर्षाच्या दिनदर्शिकेच्या फुकट प्रती घेऊन बाहेर पडायचे हा आशावाद आवडला

ॲलन व मी जवळच्या कॉफी-शॉपमध्ये जाऊन वसलो मृतात्म्याला शाती मिळावी म्हणून गरीबाना दान करणे, भोजन देणे या बाबीमध्ये खर्चापेक्षा भावना अधिक महत्वाच्या असा विचार माझ्या मनात आला, तोच ॲलन म्हणाला 'यू नो उषा, मृत्यु आकर्षक, सुन्दर भव्यदिव्य, सुरेख व शोभिवत दिसला पाहिजे त्यामुळेच मृतदेहाचे सौदर्य वाढविण्याची कला अवगत करण्यासाठी मी mortuary college मध्ये पदवी पूर्ण करण्याचे ठरविले आज तुला आमचा सेल्समन भेटला नाही, त्याच्या सभाषणात एकदाही मृत्यु किवा दफन हा शब्द येणार नाही हल्लीच्या शब्दप्रयोगात व्यक्तीचे निधन होत नाही तर ती अतर्धान पावते, पडद्याआड जाते, चित्राच्या चौकटीबाहेर पाऊल टाकते, भवसागर पार करते, चिरजीव होते सवेदनारहित देह ,हा मृतदेह नसतो तर स्वत ची धाव धीराने सप-वून परमेश्वराच्या चरणी विसावा घेणारा, सजीवन प्राप्त झालेला आपला प्रियजन असतो अत्यदर्शनासाठी मृतदेह सजवून ठेवला जात नाही तर देवाच्या देशाला, सौख्यधामाला जाण्यापूर्वी, सुन्दर केशभूषा, वेषभूषा मेकअप असा योग्य जामानिमा करून, तो 'रिपोजिंग रूम' मध्ये आप्त-जनाचा शेवटचा निरोप घेण्यासाठी थावलेला असतो (पूर्वी रिपोजिग

रुमला Viewing room म्हणत असत )मृत्यु, न्यायकाल व परलोक या विषयावरील ख्रिस्ती उपासना गीताच्या चाली अत्यत करुणाजनक असल्याने हल्ली ऑगनवर ती गीते न वाजविता स्फूर्तीदायक सगीत वाजविले जाते पक्ष्याची किलबिल, पावसाची रिमझिम, झऱ्याचा खळखळाट अशा उन्साहवर्धक गीताच्या टेप वाजविल्या जातात मृतदेहाचे अतिम सस्कार होत नाहीत तर मौल्यवान खजिना शोभिवत पेटीत ठेवून, विधीच्या पूर्ततेला 'Living memorial' म्हटले जाते.कबरस्थानालाही Memorial Parks For The Living असे म्हटले जाऊ लागले आहे मृत्यु या शद्बाच्या चाहूलीनेही कुणी कासावीस होऊ नये म्हणून शद्बाची अशी काळजीपूर्वक केलेली निवड, हा मृतदेहाला नटविणाऱ्या व्यापाऱ्याच्या विक्रीकौशल्याचाच भाग म्हटला पाहिजे स्वर्गराज्यातील जागा सिक्युअर करण्यासाठी, धार्मिकाना पृथ्वीवरील तीन साडेतीन हात जागा रेशमी कफनात लपेटून विकणारासाठी कबरस्थानातील जमिनीची खरेदी ही अत्यत फायदेशीर आर्थिक गुतवणूक ठरु लागली मग कमीतकमी जागेचा अधिकाधिक उपयोग करून अधिक फायदा कसा कमावता येईल अशा कल्पना राबविण्यात येऊ लागल्या सगमवरी किंवा वज्रपाषाणाची mausoleums, दिमाखाने, एकावर एक रचलेल्या शवपेटया साभाळीत जमिनीवरील समाधी ही सकल्पना साकार करू लागली जेमतेम उत्पन्न असलेल्या व्यक्तीसाठी त्याच्या आप्ताचे निधन व अतिम सस्कार, आर्थिक असमतोलाचेही कारण बनू शकते, हा मुद्दा तुझ्या पेपरमध्ये जरूर लिही, तो महत्त्वाचा आहे. ॲलनच्या या वाक्यावरोवर कॉफी सपली व बाहेर पडून. आम्ही बसस्टॉपच्या दिशेने चालू लागलो इतक्यात रस्याच्या पलिकडच्या ब्युटीसलूनच्या दारात उभ्या असलेल्या मुलाने ॲलनला हाक मारली काही मिनिटासाठी आम्ही ब्युटी-सलूनमध्ये गेलो ॲलनच्या या ब्युटीशियन मित्राने cosmetology चे ट्रेनिग पूर्ण केले होते व ॲलन काम करीत होता त्या फ्युनरल होममध्ये तो मृतदेहाचे सौंदर्य वाढवायला जात असे त्याच्या आरशासमोरचे, एक थँक्यू-कार्ड उचलून माझ्या हातात देत ॲलन म्हणाला, 'हे वाच, आमच्या कामाचा एक वेगळा पैलू तुझ्या ध्यानात येईल एका मृत व्यक्तिच्या पत्नीने थँक्यू-कार्डवर पुढील मजकूर लिहीला होता "माझ्या पतीचे आत्यतिक वेदना सहन करीत निधन

झाले पण तू कमालीच्या सफाईने त्याच्या चेहऱ्यावर सौम्य भाव आणून स्मितहास्य रेखलेस तू केलेल्या अत्याधुनिक केशभूषेमुळे व मेकअपमुळे माझे पती दहा वर्षांनी तरूण व हसतमख दिसले तुझ्या कलेला अभिवादन म्हणून माझ्या धन्यवादासह एक छोटया रकमेचा चेक सोवत धाडीत आहे

ॲलनच्या मित्राचा निरोप घेऊन आम्ही बसस्टॉपवर पोहोचलो ॲलन म्हणत होता,'तुला गमत सागू,शातीचे चुबन (The kiss of peace) घेणारे रोज आमच्याच फ्युनरल होममध्ये मुक्कामाला येतीलच असे नाही या भागात बरीच फ्युनरल होम्स आहेत, तरीही माझा पगार चालू असतो व अभ्यासाला भरपूर वेळ मिळतो, 'आय लव्ह माय जॉब' एवढ्यात बस आली ॲलनचे मन पूर्वक आभार मानीत मी बसमध्ये चढले बसमध्ये मी विचार करीत होते येथे, मृत्युकडे इतक्या कमालीच्या व्यावहारिक दृष्टीने का पाहिले जाते ? सामान्य आर्थिक स्थिती असलेल्या कुटुबावर विशेषत विधवा स्त्रिया व लहान मुलावर या व्यावहारिकतेचा अनिष्ट परिणाम होतो का ? या नि अशा अनेक प्रश्नाची उत्तरे शोधायला, मृत्युचे अर्थशास्त्र अभ्यासावे अशी गरज, आज मला प्रकर्षाने जाणवली कारण जीवनातील अर्थ शोधण्याच्या प्रयत्नात मृत्युचा अर्थ असा निव्वळ पैशाच्या हिशेबात पाहावा लागेल असे मला कधी वाटले नव्हते अतिम सस्काराना खर्च किती आला ? कबरस्थानाचा दर्जा काय ? शवपेटीची किमत किती? या प्रश्नाच्या उत्तरात, मृत्यूचा अर्थ सामावला आहे का ? Dust to Dust, Ashes To Ashes किंवा मातीला माती मिळणे या शद्बाआड दडलेले, सार्वकालिक जीवन व मुक्तीचे महान तत्त्वज्ञान जर डॉलर्सच्या हिशेबात हरवून गेले तर ? तर शेवटच्या सस्कारापूर्वी ब्युटीशियनच्या कलेमुळे पतीचा चेहरा व दहा वर्षांनी तरूण दिसला, या आठवणीतच समाधान मानून जगावे लागणार

♣

२१

# सशाचे अश्रु

मे महिन्याच्या दुसऱ्या रविवारी साजऱ्या होणाऱ्या मातृदिना-निमित्त आईसाठी एक सुन्दर शुभेच्छा-कार्ड लिहून पोस्टात टाकले. पॉप-कॉर्नचा डबा विकत घेतला व बदकाना पॉप-कॉर्न चारावेत या आवडत्या उद्योगाच्या मोहापायी, पावले नदीच्या दिशेने चालू लागली. माझ्या नहमीच्या जागी पोहोंचले तो बदकाच्या उत्साहवर्धक हालचालीकडे शून्य नजरेने बघणारा ॲलन दृष्टीस पडला. फ्युनरल-होमला भेट दिल्यानंतर जवळजवळ सहा महिने त्याची व माझी भेट झाली नव्हती. अभिवादनाची औपचारिकता संपवून, त्याची परवानगी घेऊन, मी जवळच्या गवतावर बसले व शांतपणे बदकाना पॉप-कॉर्न चारू लागले. काही मिनिटाचा अवधी स्तब्धतेत गेला व अचानक पावसाचा वर्षाव व्हावा, त्या वेगाने ॲलन बोलू लागला.

'उषा, ख्रिसमसच्या तीन आठवड्याच्या सुट्टीत कॅलिफोर्नियातील एका लहानशा गावी राहणाऱ्या मित्राला, शायलरला भेटायला गेलो. आता वाटते गेलो नसतो तर फार बरे झाले असते. का बरे?' मी बदकाकडे लाह्या फेकीत प्रश्न केला ? 'तुला ठाऊक आहेच कॅलिफोर्नियात डिसेम्बरमध्ये इथल्यापेक्षा बरेच उबदार हवामान असते. वाटले, इथल्या जीवघेण्या थंडीपासून, बर्फापासून सुटका मिळेल. रानावनात भटकता येईल, मनसोक्त पोहता येईल. समुद्र-किनाऱ्यावरील उबदार वाळूत शरी-राचा कण नि कण तापवून सूर्यस्नान घेता येईल, जमले तर कॅम्पिंगला जाता येईल. अंधाऱ्या रात्री चमचमणाऱ्या चांदण्याच्या उजेडात तंबू ठोकून काजव्याची नक्षी निरखीत, कॉफी पिता-पिता आवडीचे म्युझिक एकता येईल अशी अनेक स्वप्ने घेऊन मी डिसेम्बरमध्ये शायलरकडे गेलो,'

ॲलन बोलायला लागला की, असेच काहीतरी बोले नायगराच्या धव-धव्यासारखा 'शायलरही एका फ्युनरल होममध्ये काम करतो एके दिवशी त्याला, एका मुलीच्या पत्त्यावर तिच्या मृत आईच्या रक्षेचे पात्र पोहोचवायचे होते रक्षापात्र घेण्यासाठी, आम्ही दोघे विद्युतदाहिनी होती त्या ठिकाणी गेलो कामाच्या गडबडीत शायलर फोन करून, वेळ ठरवून घ्यायचे विसरला होता भर दुपारच्या जाणवणाऱ्या उन्हात आम्ही तेथे पोहोचलो एकावेळी वीस ते पचवीस मृतदेह विद्युतदाहिनीत जळत होते, काही अतरावर राखेच्या पोत्याजवळ च्युईंगम चघळीत, एक मुलगा त्या एकाच राखेच्या पोत्यातून स्त्री असेल तर पाच पौंड व पुरुष असेल तर सात पौंड वजनाची राख वेगवेगळ्या रक्षापात्रात भरून, दुसऱ्या मुलाकडे देत होता व दुसरा मुलगा रक्षापात्र व्यवस्थित सीलबद करून, शोभिवत पॅकिंग करून यादी पाहून त्यावर नावे व पत्ते लिहीत होता ते पाहून अगा-वर शहारे आले क्षणभर वाटले, सारा आसमंत श्वास रोधून उभा आहे एवढ्यात काहीतरी पडल्याचा आवाज आला विद्युतदाहिनीतून अर्धवट जळालेला एक हात खाली पडला होता तो हात परत ज्वालाच्या स्वाधीन, करीत बेदरकार नजरेने आमच्याकडे पाहत, तो मुलगा म्हणाला, 'हाऊ मे आय हेल्प यू ? हातातील पावती त्या मुलाच्या हातात देत आम्ही रक्षा-पात्राची मागणी केली पाच पौडाची राख असलेले रक्षापात्र उचलून त्याने सराईत हाताने ते सीलबद केले, कलात्मक रीतीने पॅक केले, नाव व पत्ता लिहीला आणि 'परमेश्वर मृतात्म्याला शाती देवो,' असे म्हणत ते आमच्या स्वाधीन केले रक्षापात्र घेऊन आम्ही त्या मुलीच्या पत्त्यावर गेलो, तिला ते दिले तिच्या अश्रुभरल्या नजरेशी नजर मिळविताना, शायलरला व मलाही खूप, खूप गिल्टी वाटू लागले त्या प्रसगानतर मला, उरलेली सुट्टी आनदाने घालविणे अशक्य झाले व मी निघून आलो आल्यापासून मात्र का कोण जाणे, माझ्या फ्युनरल होममधील जॉबकडे मी अलिप्तपणे पाहू लागलो आहे दोन आठवड्यापूर्वीच वर्तमानपत्रात वाचले की, कॅलिफोर्नियातील त्या फ्युनरल होमची पोलिस चौकशी करीत आहेत पोलिस पोहोचण्यापूर्वी विद्युतदाहिनी विभागाला एका काम करणा-ऱ्याने आग लावून दिली, म्हणून सपूर्ण पुरावे सापडले नाही, तरीही ज्या एकाला पोलिसांनी अटक केले, त्याच्याकडून समजले की, मृताचे अवयव

मेडिकल कॉलेजला डिसेक्शनसाठी व शरीरशास्त्रसंबंधित संशोधनासाठी विकणाऱ्याच्या टोळीत तो होता. मृताच्या अवयवाचा बाजार करून वर्षाला ते लाखो डॉलर्सचा व्यापार करीत. मी जे क्षेत्र उपजीविकेचे साधन म्हणून निवडले त्या क्षेत्रातील क्रूर वास्तवता अशी उघडीवाघडी होऊन समोर येईल असे वाटले नव्हते. तुला आठवते, सहा महिन्यापूर्वी मीच तुला म्हणालो होतो आय लव्ह माय जॉब. त्यावेळी वाटायचे, जीवनातील एक शेवटचे सत्य, ज्या सत्याला सामोरे जाताना तडजोड नाही, ऑप्शन्स नाहीत, कुणाची सगतसोबत नाही, त्या मृत्युचा हात पकडलेल्या एकाकी देहाचे, माती पांघरण्यापूर्वीचे क्षण सौंदर्याने नटवावेत एव-ढीच अपेक्षा होती. जे मी करतो आहे त्यात पूर्ण समाधान, अनाम आनंद मिळावा एवढीच साधीसोपी माझ्या सुखाची व्याख्या होती. संवेदना-पलिकडे गेलेले शरीर माझ्या कलेच्या मेहेरबानीने जीवंत होणार नसते, याची जाणीव होती, परंतु हा एकच असा व्यवसाय.की, दुसऱ्या व्यक्तीकडून कसलीही प्रतिक्रिया व्यक्त होत नाही, केवळ माझ्या समाधानासाठी मेकअपची रंगतुलिका, बेजान चेहऱ्यावर आपली कमाल दाखविते. माती पांघरण्यापूर्वीची ती देहाची एकमेव सजावट, त्या सजावटीला लागलेला माझा हातभार एवढेच समाधान मागितले होते मी. का कोण जाणे हल्ली या साऱ्या रंगात, त्या राखेचा रंग मिसळल्याचा भास होतो. बेजान देहाचा व्यापार करणारे, देहाच्या राखेची अवहेलना करणारे, लोकांच्या विश्वा-साचा खून करणारे अशाच्या गर्दीत मी सापडलोय असे वाटते, व हा तुटलेला विश्वास, भंगलेले स्वप्न घेऊन जगणे ओझ्यासारखे वाटू लागले आहे. माझी स्वप्न उदास झाली आहेत याची जबाबदारी कोणावर टाकू ? उषा, न टाळता येणाऱ्या गोष्टीपुढे अगतिक बनूनच का मला काम करावे लागणार आहे?' मग तो क्षणभरच थांबला आणि पुन्हा म्हणाला,

'आज कोठे गेलो होतो सांगू ? पुढच्या रविवारी मातृदिन 'Mother's Day' आहे. माझ्या वर्गातील मुलामुलींनी होमलेस मदर्सना, पैसे न घेता सजविले. त्याची हेअरस्टाईल, मेकअप, मॅनीक्युअर असे सर्व लाड केले. एका म्हाताऱ्या स्त्रीने मात्र हे फुकटातले नटवून घेणे नाकारले. ती म्हणाली, 'रस्त्यावर राहणाऱ्या बेघर आईच्या प्रीटी चेहऱ्याकडे बघायला

कुणाला वेळ आहे ? येथे, खरा चेहरा घेऊन जगण्याची इच्छा असणाऱ्याचा चेहराही असा फुकटात रंगवून देऊन त्याच्यावर मेहरबानी का ग करायची ?' ॲलनचे बोलणे नेहमीच असे प्रश्नाने संपे

पॉपकॉर्न संपले होते बदके पुन्हा पाण्याच्या लहरीवर परतली होती मावळत्या सूर्याच्या किरणामुळे लालकेशरी रंगाची आकाशात झालेली उधळण, नदीच्या पाण्यात प्रतिबिंबीत झाली होती, ॲलनच्या मनात धगधगणाऱ्या ज्वालाचे प्रतिबिंब त्याच्या बोलण्यातून उमटले होते. क्षणात ॲलनच्या अश्रुंनी पाण्यातील ते लालकेशरी प्रतिबिंब विस्कटले

ॲलनच्या हातातील घड्याळाने अलार्म वाजवून त्याला जागे केले मला आधार देऊन उठवीत, ॲलन म्हणाला, 'चल तुला होस्टेलवर सोडून मी माझ्या ईव्हनिंग जॉबसाठी जातो' होस्टेलच्या दिशेने चालताना ॲलनने सांगितले की, आठवड्यातून तीन संध्याकाळी तो प्रिझनमध्ये असणाऱ्या स्त्रियांची लहान मुले सांभाळणाऱ्या एका वृद्ध स्त्रीच्या घरी जाऊन स्वयंसेवक म्हणून, बाळांची स्पर्शाची भूक भागवितो

मी विचार करू लागले ज्या ॲलन-स्पर्शाने मृतदेहाचे सौंदर्य खुलते, त्याच स्पर्शसंवेदनांनी ॲलन आईविना वाढणाऱ्या एकाकी बाळांची अव्यक्त वेदना सुसह्य करतो मानवी विकासाच्या दृष्टीने स्पर्शाची गरज मोठी, स्पर्शाची भूक मोठी मानवाच्या पंचसंवेदनांपैकी स्पर्श ही एकच अशी भाषा की, जो देण्यातून प्रगट होते स्पर्श ही देण्याची संवेदना आहे हे ॲलनच्या मनाला कुठेतरी प्रकर्षाने जाणवले असावे मला विचारातून भानावर आणीत ॲलन म्हणाला, 'सिगारेट-होल्डर, पेन-होल्डर असतात तसा मी, बेबी-होल्डर झालोय बाळांच्या मुलायम, रेशमी, कोमल स्पंदनाची भाषा मला आता समजू लागलीय उषा' मी ॲलनला म्हटले, 'ॲलन ते झुडूप दिसते आहे ना ? तेथे एक ससा राहातो मला नेहमी प्रश्न पडायचा की, हिवाळ्यात या नदीचे बर्फ झाले की, तहानेला ससा कुठे जाईल ? आज तुझे अश्रु पाहिले नि माझ्या प्रश्नाचे उत्तर गवसले, ॲलन, अश्रु कधी गोठत नाहीत म्हणून असे एकाकी ससेही जगतात'

माझा निरोप घेऊन, मृतदेहांना सजविणारा, होमलेस मदर्संना नटविणारा, बेबी-होल्डर ॲलन, प्रिझनमधील स्त्रियांची मुले सांभाळायला गेला

♣

२२

# सरगम

सरगमच्या आणि माझ्या परिचयाचा काही वर्षांपूर्वीचा दिवस, मला आजही स्पष्टपणे आठवतो होस्टेलच्या रिसेप्शन डेस्कवर, मी माझे पत्रपेट्यामध्ये विद्यार्थ्यांची पत्रे टेवण्याचे काम करीत होते इतक्यात होस्टेलच्या पहिल्या मजल्यावरील खोल्या स्वच्छ करणारी मेड - पर्ल धावत आली व हॉल-डायरेक्टरला घाबरलेल्या आवाजात सांगू लागली १०४ क्रमांकाच्या खोलीतील, भारतीय अंध विद्यार्थ्याला खूप ताप आला आहे विद्यार्थी भारतीय होता म्हणून मी हॉल डायरेक्टरबरोबर त्या विद्यार्थ्याच्या खोलीत गेले त्या मुलाला आम्ही हेल्थ सेन्टरमध्ये पोचविले आणि मी पुन्हा रिसेप्शन डेस्कवर परतले

हेल्थ सेन्टर, माझ्या समाजशास्त्र विभागाशेजारच्या बिल्डिंग-मध्येच होते त्यामुळे दुसऱ्या दिवशी मी त्याला भेटायला गेले त्याच्याशी बोलताना मला समजले, की तो अनाथ आहे कलकत्त्याच्या एका अनाथा-मात तो वाढला त्याचे नाव होते सरगम मुजूमदार हे नाव त्याच्या संगीताच्या गुरूने त्याला दिले होते लहानपणापासून तो संगीत शिकला त्याने संगीतातील पदवी घेतली कलकत्ता रेडिओ स्टेशनवरून त्याच्या गाण्याचे कार्यक्रम वारंवार होत असत अंधमुक्याबहिऱ्या विद्यार्थ्यांसाठी काहीतरी विधायक कार्य करावे या हेतुने शिष्यवृत्ती मिळवून, स्पेशल एज्युकेशन विभागात पीएच डी करण्यासाठी तो या विद्यापीठात आला होता

दोनअडीचशे एकराच्या भव्य परिसरातले, सत्तर हजार विद्या-र्थ्यांचे हे विद्यापीठ प्रथमदर्शनी डोळस विद्यार्थ्यांना गोंधळात टाकते तेथे अंध सरगमची, सुरवातीच्या काही दिवसात काय अवस्था झाली

असेल याची कल्पना मी करू शकले रजिस्ट्रेशन करणे, क्लासेस शोधणे, होस्टेलच्या परिसराशी परिचय करून घेणे अशा अनेक आवश्यक, प्राथमिक गोष्टी करताना त्याला खूप परिश्रम पडले परिणामी तो आजारी पडला व त्याला दवाखान्यात दाखल करावे लागले

सरगम बरा होऊन, होस्टेलमध्ये परत यायच्या आत मी होस्टेलमध्ये राहणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांशी संपर्क साधला आणि सरगमला क्लासेससाठी नेणे आणणे, कॅफेटेरियात जेवण घेऊन देणे, कपडे धवायला लॉन्ड्री-रूममध्ये मदत करणे इत्यादी आवश्यक गोष्टींसाठी काही स्वयंसेवक मिळविले सरगमच्या मुख्य प्रोफेसराना विचारून, अंध व्यक्तींना मदत करणारा 'वॉच डॉग' कसा मिळवायचा याची चौकशी केली व तो मिळविला देखील सरगम होस्टेलमध्ये परत आला, भारतीय विद्यार्थ्यांच्या मदतीने परिसरात रूळला, रमला, लवकरच त्याला वॉच डॉगही मिळाला. त्याला घेऊन सरगम आपले रोजचे व्यवहार पार पाडू लागला, रोज म्युझिक कॉलेजच्या पायऱ्या चढू लागला सरगमने आपल्या लाडक्या कुत्र्याचे नाव ठेवले 'नाचो' मी त्याला विचारले, 'हे नाव का निवडलेस ?' सरगम त्याच्या सुरील्या आवाजात उत्तरला, 'त्याच्या तालावर मी नाचणार व माझ्या सुरावर तो नाचणार म्हणून तो माझा नाचो' मी त्याच्या उत्तरावर खूप हसले नाचोसाठी घुंगराचा पट्टा खरेदी करून त्याला दिला. माझ्या आत्मीयतेमुळे मी सरगमची आत्मीय बनले तो मला सारे काही सांगत असे त्यामुळे ताप आल्याच्या त्या घटनेनंतर, सरगमच्या आयुष्यात घडलेल्या प्रत्येक महत्त्वाच्या घटनेची मी नकळत साक्षीदार बनले. गेल्या चार वर्षांत, ज्या जिद्दीने त्याने 'स्पेशल एज्युकेशन फॉर फिजिकली हॅन्डीकॅप्ड् चिल्ड्रन' या विषयावरील पीएच डी संपवीत आणली ते पाहिले की, वसला उशीर झाला म्हणून तक्रार करणाऱ्या माझी मला कीव येत असे

त्या दरम्यान मूकबधिर अंध विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी, स्पेशल एज्युकेशन डिपार्टमेंटमध्ये पदवी पूर्ण करणारी मर्सी व सरगम यांची मैत्री झाल्याचे माझ्या ध्यानात आले जेव्हा, जेव्हा मर्सीची भेट होई, ती न कंटाळता सरगमबद्दल बोलत असे तिच्या बोलण्यावरून जाणवायचे


की, जरी तिची दृष्टी शाबूत आहे तरी जीवनसाथी म्हणून अंध व्यक्तीचा हात हातात घेण्याइतपत दोघामधील कोमल स्नेहाचा संबंध दृढ होऊ लागला आहे पुष्कळदा वाटायचे भारतात परत जाऊन पूर्ण करायच्या सरगमच्या लाडक्या ध्येयस्वप्नाची आठवण त्याला द्यावी केवळ सुराच्या साथीने वाढलेल्या अनाथ सरगमला मर्सीची मैत्रीची अपूर्वाई वाटत असावी पण मर्सीच्या मनाचा थाग कसा लागणार ? सरगमला ज्या भाव-जीवनात राहायची सवय झाली आहे तसे जीवन मर्सीसमवेत शक्य आहे का ? सरगमच्या भावनेचे मृदु, मुलायम सूर, एव्हरचेन्जिंग पॉप म्युझिक-शी कसे जुळणार ? मर्सी एकवेळ अपवादही असेल पण माझ्या येथील वास्तव्यातील काही अनुभवानंतर जाणवले, अमेरिकन मनाची साधी, मोठी [illegible] व्याख्या करताच येत नाही वाढदिवस विसरला म्हणून मैत्री तोडणारी, ठरलेल्या वेळी भेट घतला नाही तर नक्की [illegible] बरोवर गेला किंवा गेली असेल असा संशय घेणारी, 'कमिटमेन्ट' नको पण फक्त वीक एन्ड लव्हर पाहिजे अशा अटी घालून मैत्री करणारी अनेक मुले-मुली मी होस्टेलमध्ये व वर्गात जवळून पाहिली आहेत शिवाय क्षुल्लक मतभेदावरूनही, 'मला नाही वाटत, मी आपले संबंध पेलू शकेन, गुड बाय' असा क्षणात शेवटचा निरोप घेऊन चालू लागणारी तसेच 'आय हॅव चेन्जड् माय माईन्ड' या वाक्यात आपली पलायनवादी वृत्ती लपविणारी मुलेमुलीही मला भेटली होती मर्सीही तशीच असेल असा निष्कर्ष काढणे योग्य नव्हते, तरीही वाटायचे एखाद्या क्षणी ती सरगमला म्हणेल, 'आय डोन्ट थिंक आय ॲम रेडी टू गेट टूगेदर' त्यावेळी सरगमची मन स्थिती काय होईल या कल्पनेनेच मला उदास वाटू लागे सरगमची गेल्या चार वर्षांतील ध्येयसाधना जवळून पाहिल्यावर पटले होते मनाला की, आधार, मग तो ध्येयस्वप्नाचा का असेना, समर्थ असेल तर जीवनपथ आपले बोट धरून धावू लागतो, आपल्याला त्याचे बोट धरून धावावे लागत नाही

एका संध्याकाळी मात्र मर्सीच्या व्यक्तित्त्वाची मानवी बाजू जाण-वली मर्सी आठवड्यातून दोनदा, सहा ते दहा या वयोगटातील मुक्या बहिऱ्या मुलांचा समूहाला चर्चच्या परिसरातील एका हॉलमध्ये भेटत

असे त्याना साईन-लँग्वेज शिकवणे, चित्रपट दाखविणे, चित्रकला शिकविणे, पोहायला नेणे, बागेत फिरायला नेणे, त्याच्याशी खेळ खेळणे अशा विधायक गोष्टी करून ती त्याचे मनोरंजन करीत असे त्या सध्याकाळी चर्चसमोरून जाताना,सहज मर्सी आत आहे का पहावे म्हणून मी हॉलमध्ये डोकावले, तिचे विद्यार्थी चित्रे काढण्यात गुगले होते हॉलच्या बाहेरच्या बुलेटिन बोर्डवर, पॉल पी मॉक नावाच्या लेखकाच्या 'पुशबटन पेरेन्टस ॲन्ड द् स्कूल' या शीर्षकाच्या पुस्तकाचे परीक्षण लावले होते त्यात नमूद केलेल्या,एका टिपीकल उपनगरातील, लहान मुलाच्या आठवड्याच्या दिनदर्शिकेने माझे लक्ष वेधून घेतले दिनदर्शिका अशी होती–

सोमवार – स्काऊट मिटींग गुरुवार बॅले क्लास, क्वायर प्रॅक्टीस
मंगळवार – डान्स क्लास शुक्रवार – टीन ( Teen ) सेन्टर
बुधवार – स्केटिंग शनिवार – म्युझिक लेसन
रविवार – चर्च – सडे स्कूल

पुढे लिहीले होते, शाळेच्या वेळेखेरीज आठवडाभर अशा एक्स्ट्रा करिक्यूलर ॲक्टिव्हीटीज असलेल्या मुलासाठी 'मदर हॅज थ्रोन टूगेदर अनदर क्विक मील-सम केमिकल सॅच्युरेटेड ब्रेड, हॅम्बरगर, सम इन्स्टंट कॉन्सन्ट्रेटेड पोटॅटो फ्लेक्स, अ बॉक्स ऑफ फ्रोझन पीज् ॲन्ड अ ग्लास ऑफ मिल्क,' हे सर्व वाचत असता मर्सीने मला हाक मारली व मी आत गेले. मर्सी म्हणाली, 'हे चित्र बघ' ते चित्र असे होते



त पाहात असतानाच मर्सी पुढ सागू लागली, 'पाच वर्षाच्या मुलाने काढलय डॅडीचा एकच हात इतका मोठा का काढला ? या प्रश्नाचे उत्तर त्या मुलाने, दिले की, तो हात मला मारतो, रडवतो, दुखावतो म्हणून' तेवढ्यात शाळा सुटली सर्व मुलामुलींनी साकेतिक भाषेत थँक्यू, आय लव्ह यू असे म्हणत तिचा निरोप घेतला. जाता, जाता एक बहिरी मुलगी, मुक्या मुलाला कातर आवाजात सागताना ऐकले, ती म्हणत होती, 'स्टीव्ह, बिलिव्ह मी, आय रिअली कॅन यूज अ गुड सेट ऑफ पेरेन्टस्' त्या वाक्यातून लहान मुलीची व्यथा मनाला स्पर्श करून गेली मर्सीचे मुलाच्या बाबतीतले हे 'इन्व्हॉल्व्हमेंट' पाहून मी सुखावले मर्सीला लहान मनाचे दु:ख जाणवते म्हणजे ती भावनाची किमत ओळखून आहे या समाधानामुळ मला सरगमचे भविष्य या क्षणी तरी सुरक्षित वाटले सरगमने प्रबध पूर्ण केला व अगदी साध्या समारभात मर्सी व तो विवाहबद्ध झाले गणित विभागातील ओरिसाच्या ब्राह्मण प्राध्यापकानी धार्मिक विधी पूर्ण केले व विद्यार्थ्यांच्या चर्चच्या मिनिस्टरने वधूवराना आशिर्वाद दिला

स्वप्निलता सपली की स्वप्ने आपल्याला आकार देऊ लागतात ते दोघे होस्टेल सोडून अपार्टमेंट मध्ये राहायला गेले सरगमला वैवाहिक जीवन अधिक महत्त्वाचे वाटले की, त्याने ध्येयस्वप्नाशी तडजोड केली, काही समजले नाही पण त्याने गावातील कम्युनिटी कॉलेजमध्ये प्राध्यापकाची नोकरी पत्करली, तो विद्यार्थ्यांना म्युझिक थेरपी शिकवू लागला. काही भारतीय विद्यार्थ्यांनी मनापासून त्याचे अभिनदन केले, तर काहीनी सरगमने बहुधा ग्रीनकार्डसाठी लग्न केले असेही तारे तोडले मी अभ्यासात दग होते मधून-मधून मर्सीची भेट होई तेव्हा नवीन फर्निचर घेतले, सव्वीस इचाचा कलर टी व्ही घेतला, स्टिरीओ सिस्टीम घेतली, नवी कार घेण्यासाठी क्रेडिट युनियनने कर्ज मजूर केले अशा बातम्या ती देई स्वत चे घर सजविणे ही स्त्री-सुलभ आवड आहे या विचाराने मी तिच्या आनदात सहभागी होत असे तिची पदवी पूर्ण व्हायला अजून अवधी होता

एके दिवशी चार वाजता मी होस्टलकडे परतत होते तो सरगम

भटला त्याच्या चेहऱ्यावरून तो कोणाशीतरी तावातावाने भाडून आलाय असे वाटले मला पाहून नाचो भुकू लागला, मी हॅलो म्हणताच सरगमने तावातावाने सांगितले की, तो स्टुडन्ट हाऊसिंगच्या ऑफिसमध्ये मॅनेजरशी भाडून आलाय लवकरच त्याच्या घरी बाळ येणार आहे म्हणून अपार्टमेंट निळ्या रगाने रंगविले तर चालेल का ? असे विचारायला तो स्टुडन्ट हाऊसिंग च्या ऑफिसमध्ये गेला तर मॅनेजरने परवानगी नाकारली कारण टर्मच्या मध्ये रंग लावणे, डागडुजी करणे अशी कामे करायची नाहीत व इतर अपार्टमेंटन्सचा रंग हलका पिवळा आहे तेव्हा निळ्या रंगाने कलर, स्कीम बिघडेल असे त्याने सांगितले सरगमच्या आयुष्यात स्वत चे, हक्काचे नाते घेऊन एक छबकडे येणार याचाच मला इतका आनद झाला की, मी निळ्या रगाबद्दल विसरून उत्साहाने विचारू लागले, 'बाळ केव्हा येणार आहे ? मर्सीने मला फोन करून का सांगितले नाही? मुलाच्या व मुलीच्या नावाची यादी तयार करू का ?' माझ्या बोलण्यातला उत्साह जाणवून सरगमच्या चेहऱ्यावरील भाव बदलले त्याने माझ्याप्रश्नाना उत्तरे दिली व मी त्याचा निरोप घेतला नाचो त्याला घराची वाट दाखवू लागला

काही दिवसानी समजले, मर्सीसरगमने गावात दोन बेडरूमचे अपार्टमेंट घेतले विद्यापीठातील अपार्टमेंटचे भाडे विद्यार्थ्यांना परवडेल अशा बेताचे असे मर्सी विद्यार्थी असल्याने तिच्या नावावर असलेल्या, सध्याच्या अपार्टमेंटमध्ये त्याना राहता आले असते बाळाला पहिल्या दिवसापासून वगळे बेडरूम लागेल या मर्सीच्या हट्टापायी त्यानी घर बदलले बाळाची रूम सजविण्यासाठी लागणाऱ्या वस्तु व फर्निचरची खरेदी, घराचे सध्याच्या पगारात न परवडणारे भाडे, अशा वाढत्या खर्चामुळे सरगमने अधमक बहिऱ्या विद्यार्थ्यांच्या शाळेत दुसरी नोकरी पत्करली त्याचा पूर्ण दिवस व सपूर्ण सध्याकाळ कामानिमित्ताने घराबाहेर जाऊ लागली मर्सीच्या भाषेतला क्वालिटी टाईम तिला देणे, सरगमला जड जाऊ लागले मर्सीसरगमला मुलगी झाली, मुलीचे डोळे तेजस्वी आहेत व ती पाहू शकते हे डॉक्टराचे वाक्य ऐकताच सरगम आपले सारे कष्ट, श्रम विसरून गेला बाळाच्या जन्मासाठी एक टर्म घरी राहिलेली मर्सी पुन्हा कॉलेजला जाऊ

लागली तिची फी व बेबी सीटरसाठी लागणाऱ्या पैशाने, खर्चात भर पडली सरगमच्या संसाराला, अमेरिकन स्टाईलने आपल्या पायावर उभे राहण्यासाठी, स्वत च्या वाढत्या मागण्याची पूर्तता करावी लागली; व या संघर्षात सरगमच्या जीवनाला हजारो व्यस्ततानी जखडून टाकले अशा दुष्टचक्रात स्वत च्या मर्जीचे जीवन व्यक्ती कसे जगू शकणार ? एकच मोठे समाधान की, घरी परतताच सरगम, अत्यत वात्सल्याने मुलीच्या गोबऱ्या गालावर ओठ टेकी, तिच्या निर्भय डोळ्याचे अगणित मुके घेई, तिच्या वाळमुठीत त्याचे बोट घट्ट पकडले जाई व तो तिला बगाली भाषेतील मधुर अगाई ऐकवीत परीराज्याची सैर करून येई बघता बघता सरगमची परी पाच महिन्याची झाली व तिच्या नामकरणाविधीचे आमत्रण आले

सरगम आणि मर्सीच्या घरी जाण्यासाठी योग्य जामनिमा करून आणि त्याच्या मुलीसाठी घेतलेली खेळणी घेऊन मी त्याच्या घरी पोहोचले घराचा दरवाजा उघडा असलेला दुरूनच दिसत होता घरापासून काही अतरावर तीन-चार व्यक्ति आपसात कुजबुजत होत्या एका अनाम शकेने भयभीत होऊन मी घरात पाऊल टाकले रिकाम्या प्रशस्त बैठकीच्या खोलीत सरगम एकटाच कपाळाला हात लावून बसला होता, नसलेली नजर शून्यात लावून, एकाकी, असहाय हताश असा प्रचड वेगाने पखा डोक्यावर गरगरत होता काय झाले ते मला समजेना माझी नजर मर्सीला व त्याच्या मुलीला शोधत होती एवढ्यात त्याच्या शेजाऱ्याने मला बाहेर बोलावून काय घडले ते सागितले तो म्हणाला, 'वाढत्या खर्चामुळे सरगम दोन नोकऱ्याच्या चक्रात अडकला तुला कल्पना आहेच उषा, येथील सुखाची भाषा स्वय शब्दावर केन्द्रित आहे या जगात वाढलेल्या मर्सीने बाळाच्या जन्मानतर पुन्हा कॉलेजला जाऊ लागताच दुसरी साथ शोधली आज सकाळी सरगम कामावर असतानाच, घरातले सर्व सामान, बँकेतील पैसे व कर्ज काढून घेतलेली कार घेऊन मर्सी कुठेतरी तिच्या नव्या मित्राबरोबर निघून गेली 'आय विश चिल्ड्रन इन धिस सोसायटी हॅड मोअर प्रिडीक्टेबल इन्व्हायरमेन्ट टू ग्रो इन', असे म्हणत शेजारी आपल्या घरी निघून गेला त्या शेजाऱ्याने सागितलेली वास्तवता ऐकून मला कमालीचा धक्का बसला व मनात विचार आला कमालीचा आपले-

पणा व तितकाच परकेपणा, एकाच वळी स्वत च्या मनात ठेवून व्यक्ती त्रयस्थपणे कशी जगत असेल ? मला वाटते परस्परविरोधी भावना जगविणे जमते म्हणूनच घर मोडून टाकण्यासारखी गभीर घडामोड, जीवनातील अनिवार्यता म्हणन स्वखुशीने स्वीकारली जाते जखमी पक्षी तडफडावा तसे असह्य वेदनाचे भाव सरगमच्या चेहऱ्यावर येतजात होते मेंदूमध्ये भूकप झाल्यासारख्या हालचाली तो अनुभवीत असावा माझ्या विशुद्ध स्नेहाचे सान्निध्य त्याला जाणवले असावे एका हाताने माझा हात पकडीत व दुसऱ्या हाताने नाचोला कुरवाळीत सरगम मुसमुसून रडू लागला खूप-खूप केविलवाणेपणे त्याने मर्सीला जीवनाची लयात्मक अभिव्यक्ति मानले, पण अस्थिरतेत चिरबंधन शोधण्याचा तो एक वृथा प्रयास ठरला

खोलीत अधार जाणवू लागला मर्सी, घरातले सर्व दिवेही घेऊन गेली होती शेजाऱ्याने उदारपणे आपल्या घरातील टेबललॅम्प आणून लावला रिकामी खोली क्षणभर उजळली आणि पूर्णतया लुटलेल्या सरगमकडे पाहवेना मला इतक्यात बेबीसीटर त्याच्या मुलीला घेऊन आली पोटच्या पोरीला कुशीत घेऊन तिच्या डोळ्यावर ओठ टेकताना नकळत त्याच्या चेहऱ्यावरील भाव मृदु बनले पुढच्या एकाकी आयुष्याशी समर्थपणे झुज देण्याचे सामर्थ्य, बनून ती मुलगी त्याच्या कुशीत निश्चिंतपणे विसावली होती मला वाटले, त्या चिमुकलीचे भविष्य, बेहिशेबी मायेने, सावरताना, जीवन सरगमसाठी पुन्हा एक पाऊलवाट तयार करेल ती पाऊलवाट त्याला मायदेशी घेऊन जाईल, दीर्घ मुदतीच्या कैदेतून मुक्तता झाल्याचे जाणवून, थकलेल्या शरीराला खुल्या वातावरणात दीर्घ श्वास घेण्याचे सुख मिळेल देशाच्या मातीचे ऋण, ध्येयस्वप्नाची याद करून देईल आणि मुलीचे भविष्य घडविताना नकळत सरगमच्या सुरातून अनेक अधवहिऱ्यामुक्या मुलामुलींचे आयुष्य सावरले जाईल मर्सी, तू सरगमला लुटून उध्वस्त, एकाकी करू शकली नाहीस फक्त आयुष्याच्या अशा वळणाकडे गेलीस जेथे तू सख्याशास्त्रीय एकाकीपण (Statistical Loneliness) या सदरातील एक सख्या मात्र बनून राहणार आहेस

●♥●

[library stamp] ६२२ २०२२६